
ग्रं. सं. ठाणे
चरित्र
630



# तार्थ जीवन

— डॉ. न. शिरवळ

REFBK-0009821

# कृतार्थ जीवन

[जमनालाल बजाज यांचें चरित्र]

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 23362 वि. चरित्र
क्रमांक 130 नोंः दि. 9/8/48

: लेखक :
दा. न. शिखरे
एम्. ए.

ऋ. क्र. 8829
REFBK-0009821

प्रकाशक :
जमनालाल बजाज
सेवा ट्रस्ट वर्धा

पहिली आवृत्ति १९५८

मुख्य विक्रेते
चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

मुद्रक :
दा. त्र्यं. जोशी,
बी. ए. ( टिळक )
व्यवस्थापक,
चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव,
पुणें २.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वलमत.
अनुक्रम ..................... दि: ....................

# लेखकाचा दृष्टिकोन

गेल्या पंधरा-वीस वर्षांत, लहान-मोठीं वीस-पंचवीस चरित्रें तरी माझ्या हातून लिहून झालीं. पण प्रस्तुत चरित्र-ग्रंथाचें महत्त्व कांहीं निराळेंच आहे.

गुरुवर्य श्री. नाना आठवले यांच्या भेटीसाठीं मी १९३६ सालीं प्रथम वर्धा येथें गेलों. त्या वेळीं महिलाश्रम, मगनवाडी इत्यादि तेथील संस्थांचें वैभव माझ्या चित्तावर स्थूलपणें ठसलें. त्यानंतर १९४२ च्या फेब्रुआरींत, 'गो-सेवा-संघा'च्या प्रथम अधिवेशनाच्या निमित्तानें मी तेथें गेलों असतांना, कै. जमनालालजी बजाज यांना पाहिलें—त्यांचा गांधीजींशीं कसा हास्य-विनोद चाले, हेंहि अवलोकिलें. परंतु जमनालालजींच्या कर्तृत्वाची व स्वभावाची यथातथ्य व सांगोपांग कल्पना मला तेव्हांहि नव्हती—उलट, महाराष्ट्रांतील किंवदंतीचा किंचित् प्रतिकूल थरच मनावर पसरलेला होता.

पण गेल्या वर्षी, योगायोगानें, नुकतेच पण निकटचे झालेले स्नेही श्री. रिषभदासजी रांका यांनीं आपण लिहिलेलीं कांहीं हिंदी पुस्तकें मला वाचावयास दिलीं. त्यांतील जमनालालजींच्या चारित्रानें माझें चित्त चांगलेंच वेधून घेतलें. हिऱ्यावर सूर्याचे किरण पडावेत त्याप्रमाणें, त्यांच्या मूळच्या उज्ज्वल स्वभावावर गांधीजींच्या तेजस्वी तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडलेला मला आढळला.

जमनालालजींची तर नव्यानेंच ओळख झाली, पण महात्माजींच्याहि मनोमंदिरांतील कैक नवनवीन चिजा दिसल्या. महात्माजींचें चरित्र पुरें समजावून घेण्यास, त्यांचे 'पांचवे पुत्र' असलेल्या जमनालालजींचेंहि जीवन जाणलें पाहिजे, अशी माझ्या मनानें खूणगांठ बांधली आणि मीं त्यांच्याविषयीं मिळालीं तितकीं हिंदी-

इंग्रजी पुस्तकें वाचून काढलीं. 'पांचवे पुत्रको—बापूके आशीर्वाद' या पुस्तकांतील गांधीजींच्या सुमारें तीनशें पत्रांचा ठेवा तर मला अदृष्टपूर्व व अनमोल वाटला. त्याचा लाभ मराठी वाचकांना करून देणें आपलें कर्तव्य आहे, अशी भावना माझ्या मनांत सहजच निर्माण झाली.

जमनालालजी हे व्यापारी असून राजकारणी होते, धनिक असून उदार होते व 'रायबहादुर' असून गांधीजींसारख्या क्रांतिकारकाशीं घनिष्ठ संबंध ठेवणारे होते, या विरोधाभासाचें मला कौतुक वाटलें. स्वत: सामान्यतः अशिक्षित असूनहि ते शिक्षण-प्रसारासाठीं तन-मन-धनानें झिजले, नित्यनेम आचरणारे श्रद्धाशील हिंदु असून अस्पृश्यता-निवारणादि सुधारणा घडवून आणण्यांत अग्रेसर बनले आणि गांधीजी व विनोबाजी या दोन महापुरुषांच्या छायेखालीं वर्षानुवर्षे राहूनहि त्यांनीं स्वतंत्र प्रेरणेनें, स्वतंत्र जीवन घालविलें, हें विशेष. त्यांच्याइतका विनम्र वृत्तीचा पण बाणेदार स्वभावाचा आणि लोकसंग्रही पण स्पष्टवक्ता कार्यकर्ता सांपडणें कठीण.

या सर्व गुणवत्तेपेक्षांहि माझ्या मनाला कोणी मोहून टाकलें असेल, तर त्यांनीं अंतर्मुख वृत्तीनें चालविलेल्या आध्यात्मिक साधनेनें. त्यांचा व्यापार व व्यवहार तर चोखपणें चाललाच होता. त्यांच्या प्रामाणिकपणाची व निर्लोभीपणाची 'विशुद्धि' न्यायमंदिराच्या अग्नि-दिव्यांत सिद्ध झालेलीच होती. त्यांच्या 'निष्कलंक सचोटीची' ग्वाही पं. जवाहरलाल नेहरू यांनीं अनेकवार दिलेली आहे आणि त्यांचें 'तेन त्यक्तेन भुञ्जीथाः' या सूत्रानें चाललेलें जीवन, जवळून न्याहाळून पाहून, म. गांधींना तर वाटे, आपल्या विश्वस्ताच्या कल्पनेचें हें सगुण स्वरूपच आहे. "ट्रस्टीशिपच्या अंतिम सीमेपर्यंत जमनालालजी जाऊन पोंचले नसले, तर त्याला कारण मीच आहें—मीच त्यांना एवढी उडी घेण्यापासून थोपवून धरलें." असें त्यांनीं स्वच्छच लिहिलें आहे.

जग-विख्यात ग्रंथकार मि. लुई फिशर यांनीं गांधीजींना विचारलें होतें, 'आपल्या चळवळींना भांडवलवाल्यांचें साहाय्य होतें ना?' तेव्हां 'होय, पण त्यांचें नियंत्रण मुळींच नसतें.' असें उत्तर गांधीजींनीं दिलें होतें. अशा निर्बंधरहित साहाय्य करणाऱ्या पुंजीपतीचा आदर्श म्हणजे जमनालालजी!

वयाच्या सतराव्या वर्षी संपत्तीकडे पाठ फिरविणारा व पंचवीस लाख रुपयांचा दानधर्म करणारा हा लक्ष्मीपुत्र अखेरीस तर झोपडींत राहून, गो-सेवा करून, शेतकऱ्याचें साधें जीवन जगत होता. आगगाडीच्या तिसऱ्या वर्गानें ते प्रवास करीत. कराची कॉंग्रेसचा आर्थिक कार्यक्रमाचा ठराव झाल्यापासून तर त्यांनीं आपला सारा मासिक खर्च पांचशें रुपयांच्या आंत बसविला होताच, पण पुढें पुढें जमनालालजी अगदीं विरक्त वृत्तीनेंच राहात होते.

या सर्व जीवन-विकासाच्या मुळाशीं त्यांची आध्यात्मिक साधना होती. त्यांच्या निवृत्तिपर जीवनाचें निरीक्षण करणाऱ्याच्या मुखांतून

आये नीतिः व्यये नीतिः।
धन्यार्थाः सुखसंश्रयाः॥

असेच उद्गार निघण्यासारखे होते. त्यांची वृत्ति मुख्यतः परमार्थपर होती. साधकच होते ते. ईश्वराची ओढ त्यांना लहानपणापासून लागलेली. त्यामुळें त्यांची जिज्ञासा एकसारखा गुरूचा शोध करीत होती—आणि अखेर ती 'मनुष्यतेच्या पूर्णावतारापाशीं'—म. गांधींपाशीं स्थिरावली व सुखावली. आपल्या अंतर्मुख दृष्टीनें ते सदैव आत्मसंशोधन कसें करीत, हें मला त्यांच्या 'वासरी'-वरून स्वच्छपणें दिसून आलें. आत्म-शुद्धीनें आत्मोन्नति साधण्याची तीव्र तळमळ त्यांच्या रोजनिशींतील पानापानावर आढळते. मृत्यूच्याहि स्वागतास सिद्ध राहण्याइतकी अनासक्त वृत्ति त्यांचे ठायीं मुरलेली दिसते. गांधीजींसारखा पिता व विनोबाजींसारखा गुरु लाभल्यानें, त्यांनीं आपलें जीवन कृतार्थ केलें.

एक चंदन समस्त उपवन सुगंधित करतो, त्याप्रमाणें जमनालालजींच्या आत्मोद्धारानें त्यांच्या सर्व कुटुंबाचाहि सहजच विकास झाला.

उपजला परि तोचि मला गमे ।
कुल समुन्नति ज्यास्तव घे, रमे ॥

असें साफल्याचें समाधान जमनालालजींना लाभलें. त्यांचें सर्व कुटुंबच राष्ट्र-सेवी बनलें. त्यांच्या सह–धर्म–चारिणी जानकीदेवी यांनीं तुरुंगवास तर सोसलाच, सर्वस्वदान तर केलेंच, पण आतां भू–दानाच्या गंगा–प्रवाहाला कूप–दानाची आपली स्वतंत्र सरिता त्या मिळवीत आहेत व 'पद्मविभूषण' असूनहि परिव्राजिकेप्रमाणें सर्वत्र संचार करीत आहेत.

जशी पत्नी, तसेच पुत्र. कमलनयनजी व रामकृष्णजी या त्यांच्या दोन्ही सुपुत्रांनीं पत्रें–रोजनिशा इत्यादि प्रस्तुत चरित्र–ग्रंथास अवश्य ती सर्व साधन–सामुग्री तर मुक्तहस्तानें दिलीच; पण सूक्ष्म चिकित्सा करणारी चर्चाहि मोकळ्या मनानें केली—आणि ग्राह्याग्राह्यतेच्या बाबतींत अणुमात्र अपेक्षा दर्शविली नाहीं हें विशेष. कै. दादासाहेब मावळंकरांच्या चरित्र-लेखनाच्या वेळीं असाच सुखद अनुभव मला आला होता. पितृ–ऋण फेडण्याच्या बाबतींत दोन्ही ठिकाणीं सारखीच तत्परता व व्यवस्थितता पाहून मला आनंद झाला. पितृ–भक्ति व समाज–सेवा हीं उभय कर्तव्यें या मार्गानें पार पाडण्याची प्रथा वाढीस लागणें, राष्ट्राच्या इतिहासास पोषकच ठरेल. हें चरित्र मराठी वाचकांना नवीन माहिती देऊन जमनालालजी, विनोबाजी व गांधीजी या त्रि–मूर्तींच्या प्रसन्न व उदात्त मानस–मंदिरांत नेऊन सोडील, असा मला विश्वास वाटतो.

'महात्मा' मासिक कार्यालय
नातूबाग, पुणें २.
ता. ११ फेब्रुआरी १९५८

दा. न. शिखरे

# अनुक्रम

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ....130.... नोंद दि ........ पृष्ठे

प्रकरण

१. जीवनाची प्रेरणा - - - १–२
२. धर्म–पिता लाभला - - - ३–२१
३. लढाऊ राजकारण - - - २२–४५
४. जयपूरचा जय - - - ४६–६५
५. पवित्र परिवार - - - ६६–८२
६. व्यवहार–शुद्धीचा आदर्श - - ८३–१०८
७. गांधीजींच्या छत्राखाली - - १०९–१३७
८. समर्पित जीवन - - - १३८–१६०
९. स्वभावाचे पैलू - - - १६१–१८०
१०. राष्ट्र–सेवक कुटुंब - - - १८१–२१०
११. यज्ञाची सांगता - - - २११–२२६
चरित्र–पट - - - २२७–२२८

“जमनालालजींनीं जिथून जिथून जी जी पवित्रता वर्ध्याला आणतां आली तितकी आणली. त्यांनीं भगीरथाप्रमाणें इथें गंगा आणली आणि वर्धा एक क्षेत्र बनविलें”

—आचार्य विनोबाजी

राष्ट्राचा संसार एकात्मतेनें चालविणारें दांपत्य.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम.................... विः ..................
क्रमांक .................... नोंः दिः ..................

मराठी ... संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ९९२१

# १ : जीवनाची प्रेरणा

*“ ईश्वर की हमपर पूर्ण कृपा है और बापूजी का आशीर्वाद है तभी तो हममें इस प्रकारकी बुद्धि उत्पन्न हुई है और सेवा करने का हमारा मन हुआ है ”*

— *जमनालालजी*

रंकाचा राव करणें ही दैवाची कृपा, पण त्या रावाचा स्वेच्छेनें रंक बनणें—आणि इतर रंकांच्या सुखदुःखाशीं समरस होणें, हा केवढा पुरुषार्थ ! मरुभूमीवर क्वचित् एखादें सुंदर फूल उमलावें – आणि तें वाऱ्याच्या लहरीनें राजवाडयांत जाऊन पडावें, तसें वैभवाचें, ऐश्वर्याचें, सौख्याचें भाग्य जमनालालजींना सुदैवानें लाभलें होतें. पण राजवाडयांतील सोनेरी फुलदाणींत स्थान पावलेल्या त्या फुलानें आपखुषीनें देवाच्या चरणीं उडी घ्यावी, त्याप्रमाणें जमनालालजींनीं दैवानें दिलेलें सुखाचें जीवन स्वेच्छेनें सोडून गरिबीची राहणी अंगावर पेहरली आणि शेंकडों–हजारों गोरगरिबांच्या सेवेसाठीं आपला सारा जन्म वाहिला.

घरीं चालून आलेल्या लक्ष्मीकडे पाठ फिरवून दरिद्रनारायणाच्या सेवेसाठीं जमनालालजींनीं फकिरी पत्करली, ती कां ?

ही भरत–भूमि भगवान गौतम बुद्धाची जन्मभूमि आहे. ऐन तारुण्य, सुंदर कान्ता,मुग्ध करणारें बालक आणि राजलक्ष्मी हात जोडून उभी— अशी भौतिक सुखांची पौर्णिमा फुललेली असतांनाहि, राजपुत्र सिद्धार्थानें त्या सर्व बाह्य सौख्य–साधनांचा त्याग केला, आणि आपल्या जीवनाचा हेतु शोधण्यासाठीं, जगाचें कोडें उलगडण्यासाठीं व ईश्वराचा शोध लावण्यासाठीं तो त्या राजवाडयांतून बाहेर पडला, तप करीत राहिला आणि आत्मज्ञान प्राप्त झाल्यानंतर 'बहुजनहिताय, बहुजनसुखाय' तो 'भगवान् बुद्ध' म्हणून सर्वत्र संचार करूं लागला. ही आत्मिक शांतीची प्रेरणाच जमनालालजींच्या अंतःकरणांत बाल्यापासून उसळत होती.

परमेश्वराच्या प्राप्तीसाठीं लहानपणापासून त्यांनीं ध्यास घेतला, साधुसंतांचा शोध केला, तीर्थक्षेत्रांचा ठाव घेतला–आणि अखेर त्यांच्या सुदैवानें, त्यांची इच्छा तृप्त करणारा, त्यांची तृषा शांत करणारा, एक गुरु त्यांना लाभला–आणि त्यामुळें त्यांचें जीवन कृतार्थ झालें.

दत्तक !— एकदां नव्हे दोनदां !! प्रथम लौकिकी पद्धतीनें जन्मदात्या पित्याकडून जमनालालजी दत्तक गेले; आणि नंतर दुसऱ्यांदा स्वतः होऊनच ते महात्मा गांधींना दत्तक गेले. पहिलें दत्तक–विधान झालें, तेव्हां जमनालालजी पुरते पांच वर्षांचेहि नव्हते; पण त्यांनीं स्वतःचें दुसरें दत्तक–विधान केलें, तेव्हां ते ३१ वर्षांचे होते. तेव्हांपासून त्यांच्या धार्मिक प्रवृत्तीनें सामाजिक सेवेचें रूप धारण केलें— आणि त्या समाज–सेवेचें एक प्रमुख अंग म्हणून त्यांनीं राजकारणांत भाग घेतला—स्वातंत्र्य–युद्धांत उडी ठोकली—प्रत्यक्ष तुरुंग–वासहि अनेकवार भोगला. त्यांची धर्मबुद्धि चांगलीच कसास लागली—तिचें जणुं 'उन्नयनच' गांधीजींनीं केलें.त्यांच्या जीवनाचें सोनें अग्नींत तावून–सुलाखून शुद्ध,सतेज होऊन बाहेर पडलें. अध्यात्माच्या अधिष्ठानावर जमनालालजींनीं सेवेचें जें मंदिर उभारलें, तें मंगल, मनोहर व पवित्र असेंच आहे.

• • •

# २ : धर्म-पिता लाभला

*हृदयींचा भाव कळला गुरूसी ।*
*आनंद उल्हासीं बोले मज ॥*
*बोले मज गुरु कृपा तो करूनि ।*
*तुका म्हणे मनीं आनंदलों.* — *तुकाराममहाराज*

काशीकावास—किती पवित्र नांव! हें नांव धारण करणाऱ्या खेडेगांवांत जमनालालजींचा जन्म ता० ४ नोव्हेंबर १८८९ रोजीं झाला. राजस्थानमध्यें, जयपूरजवळ, सीकर नांवाचें संस्थान होतें. त्यांतील एका लहानशा खेडेगांवाचें नांव होतें काशीकावास.

काशीकावास या गांवीं एकदां एक लक्ष्मीपुत्र गेले. त्यांचें नांव शेठ बच्छराजजी. ते वर्धा येथील फार मोठे श्रीमंत व्यापारी होते. त्यांचे घरीं लक्ष्मी पाणी भरी; तरी त्यांचे चित्तांत एक चिंता सदैव डंख मारी. ती चिंता म्हणजे पुत्र-प्राप्तीची. त्या लक्ष्मीपुत्राला मूलबाळ नव्हतें. म्हणून त्यानें एका लहान मुलाला दत्तक घेतलें व त्याचें लग्नहि केलें.

तो मुलगा, ती सून व आपली पत्नी—या सर्वांसह शेठजी सीकर येथें कांहीं कामानिमित्त गेले. पण त्यांचें दुर्दैव असें कीं, त्यांचा

अल्पवयी दत्तक मुलगा तेथें एकाएकीं मरण पावला. सारेजण शोक-सागरांत बुडाले ! " मुलाशिवाय आपण वर्ध्याला परत कसें जायचें ?" शेठजींच्या पत्नीनें दुःख व्यक्त केलें. तिची दीन मुद्रा पाहून शेठजींचें अंतःकरण व्याकुळ झालें. त्यांनीं आपल्या पत्नीला आश्वासन दिलें, " दुसरा मुलगा आपण दत्तक घेऊं."

दुसरा दत्तक घेण्यासाठीं शोधाशोध सुरू झाली. त्यासाठीं बच्छराजजी आपल्या पत्नीसह काशीकावास येथें गेले. तेथें त्यांना कळलें कीं, कनीरामांना तीन मुलगे आहेत.

दुपारची वेळ. जेवणखाण आटोपून गरीब कनीराम आपल्या घरांत बसले होते. तों तेथें लक्षाधीश असलेले बच्छराजशेठजी आपल्या अर्धांगीसह येऊन दाखल झाले. डोक्यावर काठेवाडी पागोटें व अंगांत बंद गळ्याचा कोट—अशा वेषांत, उग्र मुद्रेचे बच्छराजजी अकस्मात् आलेले पाहतांच कनीराम चकित झाले. ते बावरले. त्यांनीं धांदलीनें उठून त्यांचें स्वागत केलें. 'या—बसा' झालें, शिष्टाचाराचें इकडचें-तिकडचें बोलणें झालें. बोलतां बोलतां बच्छराजजींच्या पत्नीनें—सदी-बाईनें—विचारलें, " आपलीं मुलं कुठं आहेत ?" त्या वेळीं सदीबाई पडदा पाळीत होत्या.

" मुलं ना ? तीं काय तिकडे खेळताहेत." असें म्हणून कनी-रामांच्या वायकोनें—बिरदीबाईनीं—आपल्या मुलांना हांक मारली. आईची हांक ऐकतांच एकापाठोपाठ तीं तिन्ही मुलें धांवत आलीं. परक्या पाहुण्यांची नवखी श्रीमंती पाहून तीं मुलें दिपलीं—दवलीं.

" किती सुंदर बाळं आहेत हीं ! मोठ्या भाग्यवान आहांत तुम्ही." सदीबाईनीं बिरदीबाईकडे वळून म्हटलें.

" त्यांत काय मोठंसं ? तीं तिन्ही मुलं आपलींच आहेत." बिरदी-बाई हंसत हंसत म्हणाल्या. तें ऐकून सदीबाईचें मन आशेनें फुललें.

थोडा वेळ गेला, आणि मग बच्छराजजींनीं कनीरामांचा निरोप घेतला. ते उठले आणि जावयास निघाले. पण सदीबाईचें पाऊल उचलेना. पुत्र–सुखासाठीं आसुसलेलें त्यांचें मातृ-मन तेथेंच रेंगाळूं लागलें. बिरदीबाईकडे पाहात व साडेचार वर्षांच्या एका मुलाकडे बोट करीत त्या म्हणाल्या, "हा जमन येऊं दे माझे सांगातीं."

"तो कशाला ?" बिरदीबाईनीं भोळ्या भावानें विचारलें.

"कशाला म्हणजे ? तो आतां माझा झाला आहे ना ?"

"छे ! छे ! असं कसं होईल ?"

"कसं म्हणजे ?"

"तुम्हीच नाहीं का आतां कबूल केलं, हीं तिन्ही बाळं माझीं आहेत म्हणून ?"

"अहो, तें सारं मस्करीचं बोलणं. तें काय खरं धरून चालायचं ? अन् दुसऱ्याला द्यायला मला तरी कुठं फार मुलं आहेत ?"

"अहो बाई, तुम्हांला तीन तरी मुलं आहेत, पण मला पाहा, एकहि मूल नाहीं. 'वंश सुना एक पुत्र बिना' हें खरं आहे ना ?"

"तें सारं खरं आहे हो. पण माझ्या बाळाला मी दुरावूं कशी ?" बिरदीबाईनीं काकुळतीनें विचारलें.

आईचें अंतःकरण तुटत होतें. अन् तें कां तुटणार नाहीं ? देवकी स्वतः तुरुंगांत होती, तरी तिला आपला बाळकृष्ण यशोदेच्या राजमहालांत पाठवितांना क्लेशच झाले ना ? मग बिरदीबाईंना आपला मुलगा श्रीमंत घराण्यांत जात असला तरी राजीखुशीनें हो कसें म्हणवेल ?

पण कनीरामजी दिलाचे सच्चे, शब्दाचे धड व वृत्तीचे धार्मिक ! ते आपल्या पत्नीला म्हणाले, "तुझ्या तोंडून शब्द निघाले ना—'हीं तिन्ही मुलं आपलीं आहेत' म्हणून ? मग दिला शब्द परत कसा घेतां येईल ? तुळसीदासजींनीं रघुकुलाची रीत काय सांगितली आहे ?—

'प्राण जाय वरु वचन न जाई' आपण आपला शब्द पाळलाच पाहिजे. आतां विचार कसला करायचा?" आणि जमनालालजी बच्छराजजींकडे दत्तक गेले–म्हणजे त्यांच्या विधवा सुनेच्या मांडीवर बसले.

कनीरामांनीं आपला मुलगा आपल्या घराण्यांत दत्तक दिला, म्हणून श्रीमंत बच्छराजजी त्यांना धनदौलत देऊं लागले. पण कनीराम स्वाभिमानी. त्यांनीं साफ नकार दिला–घरची गरिबी असतांना नकार दिला. बच्छराजशेट वारंवार आग्रह करूं लागले, तेव्हां कनीराम उदार मनानें म्हणाले, "तुम्हांला कांहीं दिल्याशिवाय राहावतच नसेल, तर माझ्या गांवाला एक विहीर खोदून द्या म्हणजे झालें." त्याप्रमाणें शेठजींनीं विहीर खोदली. ती अजून गांवकऱ्यांना जल–दान करीत आहे. जमनालालांच्या भावी सर्वस्व–दानाची ही गंगोत्रीच नव्हे काय?

▲

तो जुना काळ! लहान लहान बालकांचीं लग्नें तेव्हां होत–आणि राजस्थानांत तर काय? पाळण्यांतल्या मुलांनाच मुंडावळ्या बांधीत. खुद्द जमनालालांचें लग्न वयाच्या १३ व्या वर्षीं झालें. न्या. रानडे किंवा म. गांधी यांचें वयहि, विवाहाचे वेळीं, जवळजवळ हेंच होतें. लो. टिळकांचें लग्न झालें १५ व्या वर्षीं. त्याच जन–रहाटीस अनुसरून, जमनालालांचें लग्न १३ व्या वर्षीं झालें.

वर १३ वर्षांचा आणि वधू ८ वर्षांची! शिक्षणाचा गंध नसलेली, उलट तोंडावरून पडदा ओढून घेणारी. त्या काळीं वधूवरांचीं लग्नें जमावयाचीं, तीं त्यांनीं एकमेकांना न पाहतांच, त्यांच्या आईबापांनींच नव्हे तर, त्यांच्या मित्रांनीं, मुनीमांनीं, आप्तांनीं, फार काय भटजींनीं—वधूवर पसंत करून लग्नें ठरवावयाचीं. १९०२ सालीं मे महिन्यांत जमनालालांचें लग्न झालें, तें अशाच पद्धतीनें.

वर्धा येथील एक ब्राह्मण गृहस्थ राजस्थानांतील जावरा या गांवीं गेला आणि त्यानें गिरिधारीलालांची भेट घेतली. हे गृहस्थ व्यापारांत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थूलमत.
अनुक्रम ........ वि: ........
........ नों: दि: ........



जनक कनीराम यांच्यासह जमनालालजी.

जमनालालजींच्या जननी - बिरदीबाई. या रोज नियमानें आठ तास सूत कातीत.



खूप पैसा मिळविणारे आणि समाजांत मोठा मान संपादन करणारे होते. ते धार्मिक वृत्तीचे—वैष्णव संप्रदायाचे होते. व्यंकटेश, रुक्मिणी सत्यभामा यांच्या सुवर्ण–मूर्तींची पूजा ते भक्तिभावानें करीत; आणि त्यांची पत्नी तर इतकी मृदु स्वभावाची कीं, तिला शेजारीपाजारी म्हणत— ‘ गोगलगाय ’! त्यांची कन्या वर्ध्याच्या ब्राह्मणानें पसंत केली. त्या वेळीं तिचें वय होतें ४।५ वर्षांचें.

सौंदर्यानें त्या मुलीकडे पाठ फिरविली होती; इतकी कीं, तिला स्वतःला आरशांत आपलें रूप पाहतांना संकोच वाटे. पण सौंदर्यापेक्षां संस्कृतींकडे अधिक लक्ष देण्याचा तो काळ होता. घरांतील चालरीत पाहून या मुलीलाच त्या ब्राह्मणानें पसंत केलें. पुढें जमनालालांचे जनक वडील कनीराम हेहि जावरा येथें गेले व त्यांनींहि या मुलीला पसंत केलें.

वाङ्निश्चय झाला. सोन्याचे दागिने वर्ध्याहून भरपूर आले. ३।४ वर्षें लोटलीं. वधू ८॥ वर्षांची झाली. वर्धा येथें विवाह करण्याचें ठरलें. त्यासाठीं जावराहून गिरिधारीलाल आपलें वऱ्हाड घेऊन वर्ध्यास गेले. वराकडे पाहून ते हर्षभरित झाले. हत्तीवर आरूढ झालेल्या गौरवर्ण वराकडे पाहात जो तो गुणगुणे, “वर किती सुंदर! जमनालाल म्हणजे जणुं गुलाबाचें फूल.” विवाह मोठ्या थाटामाटांत झाला. वाद्यें वाजलीं, मेजवान्या झडल्या, दारूकाम झालें. नाच–गाणें इत्यादि सर्व कांहीं सोहळे यथासांग झाले. जमनालालजींना जानकीदेवींची जोड लाभली.

▲

लक्ष्मीपुत्राच्या मांडीवर बसले तरी जमनालालजींचें जिज्ञासु चित्त श्रीमंतींत रमलें नाहीं, ऐश्वर्याला भुललें नाहीं कीं मोहजालांत सांपडलें नाहीं. उलट, आपल्याला आपल्या मातापित्यांनीं दत्तक दिलें याचा त्यांना खेदच वाटे. त्याबद्दल ते त्यांच्याशीं वाद करीत–तक्रार करीत. त्यांना ही दत्तकाची पद्धतच मुळीं मान्य नव्हती.

खेड्याच्या मोकळ्या वातावरणांत स्वच्छंदानें बागडणारे जमनालाल वर्ध्याच्या सोनेरी पिंजऱ्यांत अडकून पडले. तेथें राहण्याला उत्तम घर, खाण्यास मधुर मिष्टान्नें, पेहरण्याला उंची उंची कपडे आणि शब्द झेलण्याला नोकरचाकर सदैव तत्पर. १८९६ च्या फेब्रुवारीपासून ते शाळेंत जाऊं लागले. मराठी चार इयत्ता पार पडल्या. इंग्रजीचा अभ्यासहि २।३ महिने त्यांनीं केला. बस्स ! त्यांचें पुस्तकी शिक्षण तें एवढेंच ! १९०० सालच्या मार्च महिन्यांत त्यांनीं शाळेला जो रामराम ठोकला, तो कायमचाच.

पण शाळेशिवाय, शिक्षकांशिवाय, क्रमिक पुस्तकांशिवाय, त्यांनीं जें थोडेंफार वाचन केलें,जो विविध अनुभव घेतला आणि महापुरुषांचा जो सहवास मिळविला; तेंच त्यांचें खरें शिक्षण ! हें स्वयं-शिक्षण जन्मभर त्यांनीं चालविलें होतें. पुढें पुढें मराठीप्रमाणेंच हिन्दी, गुजराती व इंग्रजी या भाषांचेंहि मार्मिक ज्ञान त्यांना झालें. त्यांची बुद्धि स्वच्छ होती व दृष्टि गरुडासारखी तीक्ष्ण होती.

एकदां जमनालाल आपल्या सवंगड्यांसह सोंगट्या खेळत बसले होते. तें पाहतांच बच्छराजजींना राग आला. ते स्वभावानें मोठे तापट; त्यांची वाणीहि मोठी तिखट. घरांतील माणसांना, चाकरनोकरांना ते टाकून बोलत–शिव्याहि देत. त्या स्वभावानुसार, त्यांनीं जमनालालांना वाक्ताडन केलें. आजोबांचे ते तीक्ष्ण शब्द जमनालालाच्या हृदयांत तीराप्रमाणें घुसले. हातचा खेळ टाकून ते तडक माडीवर एका खोलींत जाऊन निजले. त्यांनीं कानाला खडा लावला, पुनः म्हणून हा खेळ खेळावयाचा नाहीं. त्याक्षणीं त्यांनीं त्या खेळाकडे जी पाठ फिरविली, ती कायमचीच. असा दृढ निग्रह त्यांचे स्वाभिमानी चित्तांत बद्धमूल झालेला होता.'

या निग्रहाची पुरेपूर कसोटी लावणारा एक महान् बिकट प्रसंग लवकरच जमनालालांपुढें दत्त म्हणून उभा राहिला. त्या वेळीं त्यांचें

वय होतें अवघें १७ वर्षांचें—मौज करण्याचें, विलासांत रमण्याचें, देहाचे चोचले पुरविण्याचें ! पण जमनालालांचा मनःपिंडच निराळा. धार्मिक प्रवृत्ति ही त्यांच्या जीवनाची स्थायी वृत्ति. आध्यात्मिक विचारामुळें त्यांचे अंगीं वैराग्य बाणलें होतें व त्याचें दृश्य चिन्ह म्हणजे त्यांची साधी राहणी.

एकदां गांवांतील एका बड्या श्रीमंताचे घरीं लग्न निघालें. त्याचें निमंत्रण बच्छराज शेठजींना आलें. त्यांचीं घरचीं माणसें नटून–थटून लग्नाला निघालीं. सर्वांच्या अंगावर रेशमाचे व जरीचे कपडे झळकत होते; आणि त्यावर लखलखत होते सोन्याचे, मोत्यांचे, हिऱ्यांचे दागिने ! दागिने तर इतके कीं, त्यांनीं सारें शरीर झांकलें गेलें. १७ वर्षांच्या उमलत्या जमनालालांची गोरीपान व देखणी मूर्तिहि बहुमोल वस्त्रालंकारांनीं अशीच मढविली गेली. पण—

कंठा कंठांत घालावयाचा राहिला. “ नसेना का मोत्यांचा कंठा ! ” असें म्हणून जमनालाल चालूं लागले. ते दादा बच्छराजजींनीं पाहिलें. त्यांना तें मोठेंच वैगुण्य वाटलें. आपल्या श्रीमंतीचा हा अपमान आहे, असें त्यांच्या मनानें घेतलें. त्यांनीं लगेच ओरडून जमनालालांना कंठा घालावयास फर्माविलें. पण—

“ नसला कंठा म्हणून काय झालें ? माणसाची योग्यता गुणांवरच असते ना ? ” जमनालाल नम्र स्वरानें म्हणाले. परंतु असा विरोध सहन करणारे बच्छराजजी नव्हते. ते कडाडले, “ तूं—तूं मला हें ब्रह्मज्ञान शिकवतोस ? तुला मोठा गर्व चढला आहे. तुझें माझ्यावर प्रेमच नाहीं. म्हणून तूं माझें कांहीं ऐकत नाहींस. असला मुलगा मला काय करायचा ? तुझें माझ्या संपत्तीवर प्रेम आहे, माझ्यावर नाहीं. ”

जमनालालांचें स्वाभिमानी मन चवताळून उठलें. दाग–दागिन्यांचा बडेजाव त्यांना दुर्गंधीसारखा वाटूं लागला. पैशाची सत्ता पैशाची वृत्ति

निर्माण करते, हा सनातन अनुभव त्यांना नव्यानेंच आला. पैशासाठीं आपण आपलें आत्म्याचें स्वातंत्र्य कां विकावें? असा प्रश्न त्यांच्या अध्यात्मप्रवण मनाला पडला. आणि त्या प्रश्नाचा त्यांनीं चट्कन निकालहि करून टाकला, पण तो किती संयमानें, शांततेनें व निःस्पृहतेनें !

जमनालालांनीं आपल्या धनाढ्य आजोबाला एक लांबलचक पत्र लिहिलें. तें साधें पत्र नव्हतें—भौतिक सौख्याचें तें त्याग—पत्र होतें. त्यामध्यें वैराग्य, निःस्पृहता, सौजन्य, शांतवृत्ति इत्यादि किती तरी गुणांचें दिव्य दर्शन होतें. १७ वर्षांचें पोर आणि लक्षाधीशाची श्रीमंती लाथाडणारें पत्र इतक्या ऋजुभावानें—प्रेमभावानें लिहितें, हा खरोखरी चमत्कारच आहे. सध्यांच्या जडवादी युगांत व भोगवादी जगांत, हें एक आश्चर्यच मानलें जाईल. इंग्लंड—अमेरिकेंतील धन—पिपासु लक्ष्मधिरांना तर हें पूर्ण असत्यच वाटेल, कल्पित भासेल. पण भांगेच्या जंगलांत अशा तुळशीचीं रोपें अधूनमधून उगवतातच.

इटालींतील तो संत ! ॲसिसी गांवांतील फ्रॅन्सिस हाहि एका व्यापाऱ्याचाच मुलगा. बाराव्या शतकांत त्यानें ऐन तारुण्यांत, आपल्या वडिलांना वैराग्याची अशीच चुणुक दाखविली. पिता परगांवीं गेलेला आणि दुकानाचा सारा कारभार फ्रॅन्सिस पाहात असलेला ! तो बाजाराचा दिवस होता. गिऱ्हाइकांची ही गर्दी ! एक मातबर गिऱ्हाईक फ्रॅन्सिसच्या दुकानांत आले होते. त्याला तो उंची उंची कापड दाखवीत होता. इतक्यांत एक चिंध्या—चिरगुटें गुंडाळलेला अस्थिपंजर देह दुकानापुढें उभा राहिला व भीक मागूं लागला. फ्रॅन्सिसनें त्या भिकाऱ्याकडे पाहिलें, पण त्या श्रीमंताकडे त्याचें लक्ष गुंतून राहिलें.

थोड्या वेळानें, निराश होऊन, भिकारी तेथून निघून गेला. तें पाहून फ्रॅन्सिसचा जीव तळमळला. ‘दारीं आलेल्या ख्रिस्तालाच आपण धिक्कारलें.’ अशी भावना त्याचें अंतःकरण जाळूं लागली. तो त्या भिकाऱ्याचा शोध करीत धांवत चालला. भिकारी भेटतांच फ्रॅन्सिसनें

त्याला आपल्या खिशांतले सारे पैसे तर देऊन टाकलेच, पण स्वतःच्या अंगावरचे उंची कपडे त्या भिकाऱ्याच्या अंगावर चढविले आणि—

त्याचे फाटके कपडे आपल्या अंगावर घालून तो दुकानीं परतला. आपलें सर्वांग खिस्तमय झालें, असें त्याला वाटूं लागलें. पुढें त्याच्या पिताजींनीं त्याचेवर आग ओकली. पण तो वैराग्याच्या मार्गानें पुढें–आणि पुढेंच–चालला. त्याच मार्गानें जमनालालजी चालले होते. त्यांनीं आपल्या अजोबांना जें पत्र लिहिलें, तें असें—

' आज आपण मजवर अतिशय नाराज झालां. त्याची कांहीं चिंता नाहीं. ठाकूरजीची मर्जी ! यांत आपली कांहींच चूक नाहीं. आपल्या ओट्यांत ज्यानें मला घातलें त्याचीच ही चूक.

आपल्या शिरावर माझें कांहींच ओझें नाहीं. आपला सारा पैसा आपणच कमावलेला आहे. त्याचें आपण आपल्या इच्छेप्रमाणें कांहींहि करूं शकतां. माझा आपल्यावर कांहींच अधिकार नाहीं. आजपर्यंत आपण माझ्यासाठीं जो खर्च केला, तो होऊन गेला. पण आजपासून पुढें आपणाकडून मी एक छदाम–कवडीसुद्धां घेणार नाहीं — मागणारहि नाहीं. आपल्या जिंदगीवर माझा कोणताहि हक्क यापुढें राहणार नाहीं. मी लक्ष्मीनारायणाची प्रार्थना करतों कीं, आपलें आरोग्य ठीक राहावें आणि २०।२५ वर्षें तरी आणखी आयुष्य आपल्याला मिळावें. मी जेथें कोठें जाईन, तेथें आपल्यासाठीं ठाकूरजीकडे हींच प्रार्थना करीन. आजपर्यंत माझ्याकडून जर कांहीं चूक झाली असेल, तर ती आपण माफ करावी. '

अशी नम्रता व निरिच्छता प्रारंभीं प्रगट करून १७ वर्षांच्या जमनालालांनीं, क्रोधाच्या आहारीं मुळींच न जातां, आपल्या पत्रांत आपली वैराग्यशील तात्त्विक भूमिका पुढील शब्दांनीं स्पष्ट केली—

"सारे लोक पैशाचे सोबती आहेत–केवळ पैशासाठींच सेवा करणारे आहेत, अशी आपली भावना आहे. पण माझ्या मनांत आपल्या पैशाची वासना बिलकुल नाहीं—आज नाहीं, आणि देवदयेनें पुढेंहि होणार नाहीं. माझें नशीब माझ्या सांगातीं आहे. मला पैशाजवळ राहण्याची बिलकुल पर्वा नाहीं. आपल्या कृपेनें होईल तितकें ठाकूरजींचें भजन-स्मरण मी करीत राहीन. त्यायोगें मला या जन्मीं सुख मिळेल—आणि पुढल्या जन्मींहि. आपण प्रसन्न चित्तानें राहा. कोणत्याहि गोष्टीची काळजी करूं नका. सारीं नातीं खोटीं आहेत. कोणी कोणाचा पिता नाहीं आणि कोणी कोणाचा पुत्र नाहीं. जो तो आपल्या सुखाचा सोबती! आज आपल्या उपदेशामुळें मी मायाजालांतून सुटलों. यापुढें श्री भगवान् मला वांचवो!"

हे विरक्तीचे उद्गार कोणाचे! द्रव्याची आसक्ति सोडून देवाची भक्ति करण्याची ही वासना कोणाची? उपनिषदांतील विरक्तीचा व अनासक्तीचा हा उपदेश कोणाच्या मुखांतून निघत होता? नरसी-भक्ताच्या? मिराबाईच्या? छेः, जमनालालजींच्या—१७ वर्षांच्या पोराचे तोंडून हे वैराग्याचे विचार निघाले. त्यांनीं पुढें असें लिहिलें—

"दादाजी, मी आपल्यावर पैशासाठीं फिर्याद करीन अशी शंका-सुद्धां मनांत आणूं नका. आपली इस्टेट, पैसे, रुपये, मालमत्ता, जमीन-जुमला—कशा कशावरहि आजपासून माझा थोडाहि हक्क राहिला नाहीं, हें मी राजीखुशीनें सही करून लिहून देत आहें. मी कोणाचें कर्जवाम केलेलें नाहीं. कोणाचा एक पैसादेखील मला देणें नाहीं. आणखी काय लिहूं? एवढ्यांत सारें समजून घ्या. आपली कोणतीहि वस्तु मीं बरोबर घेतली नाहीं. मी माझें सारें येथेंच ठेवून चाललों आहें. फक्त अंगावर घातलेले कपडे तेवढे आहेत. आपल्या हातून होईल तेवढा खूप दानधर्म करीत असावें." जमनालालजींनीं हें सर्व रीतसर स्टॅंप-कागदावर लिहिलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..................



दादा बच्छराजजी–जमनालालजींचे आजोबा

## राष्ट्रसेवक-कुटुंब



मदालसा, कमलनयन, कमलाबाई, जमनालालजी, जानकीदेवी व ओम.



सेवाग्रामाच्या झोपडींतून बाहेर पडलेले गांधीजी हास्य-विनोद करीत आहेत. सावित्रीदेवी-मदालसा-कमलनयनजी त्या हास्यांत समरस झाले आहेत.

नातवानें आजोबाला केलेला असा उपदेश खरोखर पुराणांतहि सांपडणें कठीण ! आणि या उपदेशाच्या पाठीमागें महान् त्यागाची केवढी शक्ति उभी आहे ! तिचा प्रभाव पडल्याशिवाय कसा राहील ?

तापट माणसें बहुशः निष्कपट असतात. एखादें भांडें लवकर तापावें अन् लवकर निवावें तसा स्वभाव होता बच्छराजजींचा. त्यांना पश्चात्ताप झाला. त्यांनीं जमनालालांचा शोध लावला आणि त्याचेवर प्रेमाचा अभिषेक केला.

यानंतर सहाच महिन्यांनीं, ता. २ जून १९०७ रोजीं, बच्छराजजी मरण पावले. त्या वेळीं त्यांची स्थावरजंगम मिळकत ५।६ लाख रुपयांची होती. त्यांतून पाऊण लाख रुपये खर्च करून त्यांनीं वर्धा येथें श्रीलक्ष्मी-नारायणाचें मंदिर बांधलें. मारवाडी विद्यालयासारख्या शैक्षणिक संस्था-नाहि त्यांनीं देणग्या दिल्या. जुन्या जमान्यांतील कर्तबगार व्यापारी असें त्यांचें जीवन होतें. त्याच जीवनाच्या रुळलेल्या वाटेवरून जमना-लालजी जावयाचे, पण त्यांच्या अंतःकरणांतील आध्यात्मिक प्रेरणा त्यांना उन्नतीच्या मार्गाकडे वळवीत होती.

'माझें जीवन उन्नत, सेवामय आणि प्रगतिशील कसें होईल ? माझें जीवन संपूर्ण सफल कधीं होईल, अशी चिंता तरुण जमनालालांचे मनांत सदैव खेळत होती. ही आध्यात्मिक ओढ हीच त्यांच्या जीवनाची प्रेरक शक्ति. याच ओढीनें स्वामी विवेकानंद गुरूचा शोध करीत चालले होते. सुदैवानें त्यांना रामकृष्ण परमहंसासारखा गुरु भेटला. तसेंच सुदैव जमनालालांच्या कपाळीं कोरलेलें होतें.

या गुरूच्या शोधार्थ, जमनालाल अनेक ठिकाणीं गेले—अनेक मोठ-मोठ्या लोकांना भेटले. धर्मात्मा पं. मदनमोहन मालवीय यांची गांठ त्यांनीं घेतली. कवीन्द्र डॉ. रवीन्द्रनाथ टागोर यांच्या सहवासांत ते राहिले. लो. टिळकांशींहि त्यांची मुलाखत झाली—आणि असेच अन्य किती

तरी थोर थोर नेते! त्या प्रत्येकाच्या कांहीं कांहीं गुणांचा प्रभाव जमनालालांच्या चित्तावर सहजच पडे, पण त्यांची आध्यात्मिक तृषा कोठेंच शमली नाहीं—आपलें सर्व जीवन समर्पित करावें, असें गुरुस्थान त्यांना सांपडलें नाहीं.

आपला गुरु कसा असावा याची प्रत्येकाची कांहीं कल्पना असतेच. ज्याच्या त्याच्या प्रकृतीप्रमाणें, अभिरुचीप्रमाणें, शक्तीप्रमाणें जो तो आपला मार्गदर्शक पसंत करतो. उपजतच कोणाचें मन तर्कप्रधान असतें, तर कोणाचें भावनाप्रधान. महाराष्ट्रीय किंवा मद्रासी यांना जिंकावयाचें तर बुद्धीनें, तशी बंगाली किंवा गुजराती याचें अंतःकरण खोलण्याची किल्ली म्हणजे श्रद्धा. जमनालालांचें अंतःकरण म्हणजे भावनांचें एक सरोवर होतें. प्रखर ज्ञानाच्या लखलखाटापेक्षां भक्तीचें प्रसन्न चांदणेंच त्यांचें हृदय रिझवूं शकत होतें, सुखावूं शकत होतें.

"बोले तैसा चाले, त्याचीं वंदावीं पाउलें!" ही तुकाराममहाराजांनीं दिलेली गुरूची कसोटी जमनालालांनीं हातीं धरली होती. गोरा कुंभार नाहीं का, हातांत थापटणें घेऊन संतमंडळींपैकीं कोणाचें मडकें कच्चें आहे आणि कोणाचें पक्कें आहे, हें तपाशीत चालला होता? याचा अर्थ, भारतांतील श्रेष्ठ पुरुषांची परीक्षा जमनालाल करीत होते असा मुळींच नाहीं. तसा त्यांना अधिकार काय होता? ते केवळ एवढेंच पाहात होते कीं, आपल्या वृत्तीशीं जमणारा, आपली अपेक्षा पूर्ण करणारा आणि आपल्या ध्येयाकडे आपल्याला घेऊन जाणारा मार्गदर्शक गुरु आपल्याला मिळावा. तरच आपलें जीवन निर्मल, सरल व सफल होईल ही त्यांची भावना.

या त्यांच्या दीपाचा शोधक प्रकाश भारताबाहेर दक्षिण आफ्रिकेपर्यंत जाऊन पोहोंचला. तेथें त्या वेळीं गांधीजी आपले सत्याग्रहाचे प्रयोग करीत होते. त्याचें वृत्त वर्तमानपत्रांतून जमनालालजी वाचीत

होते. तें वाचतांना त्यांच्या मनांत येई, " किती निष्ठावन्त व्यक्ति आहे ही ! ही व्यक्ति हिंदुस्थानांत जेव्हां केव्हां येईल, तेव्हां तिचा सहवास मिळविण्याचा प्रयत्न आपण अवश्य केला पाहिजे. "

पुढें १९१५ सालच्या जानेवारी महिन्यांत गांधीजी, आफ्रिकेंतील विजय पाठीशीं बांधून, भारतांत परत आले. ते अहमदाबाद येथें " सत्याग्रहाश्रम " स्थापून राहिले. कोचरब भागांतील एक बंगला भाड्यानें घेऊन, तेथें त्यांनीं आपला छोटासा आश्रम मे महिन्यापासून सुरू केला. हें कळतांच मुमुक्षु जमनालालजींनीं तिकडे धांव घेतली. एकदां नव्हे तीनदां, ते त्या आश्रमांत गेले, कांहीं काळ राहिले, बारीक नजरेनें गांधीजींचें जीवन तपासूं लागले. तें जीवन स्फटिकासारखें–आंतबाहेर एक. सूर्याच्या पाठींपोटीं प्रकाशच !—अंधाराचा लवलेश नाहीं. वचन व वर्तन यांत अद्वैत. तो आश्रम पुराणकालांतील ऋषींच्या तपोधामासारखा पवित्र व मंगल असा जमनालालजींना भासला. तेथें सकाळ–संध्याकाळ प्रार्थना चाले. सायं–प्रार्थनेचे वेळीं गांधीजी स्वतः गीता–रामायण यावर प्रवचन करीत. अतिथींची सेवा ते मोठ्या नम्रतेनें करीत. आश्रमांत कोणी आजारी पडल्यास त्याची शुश्रूषा तें आस्थेनें करीत. त्यांचें सर्व जिवनच धर्ममय होतें.

बाहेरून पाहिली तर गांधीजींची मूर्ति अगदीं साधी. त्यांचे डोक्यावर काठेवाडी पागोटें होतें तें साधें, अंगांत अंगरखा असे तो साधा आणि घोट्यापर्यंत पोंचणारें साधें धोतर. अनवाणी पायानेंच ते चालत. दळण्याचें काम ते स्वतःच करीत. स्वयंपाकांतहि त्यांचा हात असे. अन्न वाढण्याचें कामहि ते स्वतः करीत. स्वतःचा आहार मात्र केळीं, शेंगदाणे, लिंबू व तेल एवढाच. ते व कस्तुरबा दोघेहि आश्रमाच्या सेवाकार्यांत सदैव निमग्न असत. आश्रमांतील लहानसहान गोष्टींकडेहि ते बारकाईनें लक्ष पुरवीत. " बोले तैसा चाले " या कोटींतील हा सत्पुरुष आहे, अशी जमनालालजींना बालंबाल खात्री पटली.

" गांधीजी, आपण आमच्या वर्ध्याला या अन् तेथें आपला आश्रम स्थापन करा. त्या कामीं मी आपल्याला शक्य तें सर्व साहाय्य करीन. " जमनालालजींनीं आदरानें विनंती केली. पण ती विनंती सफल होण्यास १८ वर्षे लागलीं. त्या वेळीं गांधीजींनीं उत्तर दिलें, " मी गुजराती आहें. गुजरातमध्यें राहूनच मी अधिक सेवा करूं शकेन. गुजरातच्या सेवेच्या द्वारें मी भारताची सेवा करीन. " विनोबांना मात्र त्यांनीं वर्ध्याला पाठविलें.

जमनालालजी तसेच परत वर्ध्यास गेले. पण त्यांच्या मनावर गांधीजींची सात्त्विक मूर्ति चांगलीच ठसली. त्यांचें निर्मल चारित्र्य, शीतल तेजस्विता, गरिबांची चिंता, प्रत्येकाशीं सत्यपूर्ण व प्रेमपूर्ण वर्तन, आणि अपार धर्मश्रद्धा हे सारे दैवी गुण पाहून जमनालालजींचें भुकेलेलें मन त्यांचेवर झेपावलें. वासरूं गाईला बिलगलें ! योग्य गुरु भेटल्याचा आनंद जितका शिष्याला, तितकाच सच्चा शिष्य लाभल्याचा संतोष गुरूलाहि.

अशीच एक अलौकिक भेट अर्वाचीन भारतांत घडून आलेली होती. "नरेन्, अरे माझ्या नरेन् ! माझें होतें नव्हतें तें सर्वस्व मीं तुला देऊन टाकलें आहे अन् आतां मी फकीर कीं रे झालों आहें ! ! " असे समाधानाचे उद्‌गार रामकृष्ण परमहंसांनीं विवेकानंदांना उद्देशून काढले. साखरेची बाहुली नदींत गेली, विरघळली अन् समरस झाली; तशीच स्थिति विवेकानंदांची झाली; तेव्हांपासून विवेकानंद रामकृष्ण बनले. जिज्ञासु जमनालालजींची अवस्थाहि अशीच झाली.

" गांधीजी, मी आपल्यापाशीं एक दान मागूं इच्छितों." जमनालाल नम्र स्वरानें म्हणाले. १९२० सालीं गांधीजी वर्ध्यास गेले होते, तेव्हां जमनालालजींनीं प्रार्थना केली. ती ऐकून गांधीजी चकित झाले. कारण दान ते स्वतः मागत असत—दुसऱ्यांना देत नसत. आणि 'आपल्या-जवळ दान देण्यासारखी संपत्ति तरी आहे कोठें ?' असें त्या अपरिग्रही सेवामूर्तीला वाटलें. त्यांनीं आश्चर्यानें जमनालालजींना विचारलें,

" काय ? तुम्ही दान मागतां ? अन् माझ्यापाशीं ? अहो, मी कसलें दान देऊं शकणार तुम्हांला ? "

" फार मोठं दान मागतों आहे मी आपल्याकडे. "

" हां, हां, भरतभूमीची ही परंपराच आहे अजब दान मागण्याची–"

" अन् तें देण्याचीहि. माझ्या आयुष्यांतील एकच इच्छा आहे. ती आपण पूर्ण केल्यास मी स्वतःस धन्य धन्य समजेन ! "

" अशी कोणती ती इच्छा ? ती पुरी करण्यासाठीं मी काय करूं ?"

" आपण मला—कसें बोलूं ? नाहीं, बोलतोंच—माझी इच्छा—मला आपण आपल्या देवदासाचा भाऊ माना—हो, मला आपला पांचवा पुत्र माना. मानाल ? "

गांधीजी थोडा वेळ विचारांत पडले. त्यांची मुद्रा अधिकाधिक गंभीर होऊं लागली. त्या मुद्रेकडे जमनालालजी डोळ्यांत प्राण सांठवून पाहूं लागले. आपल्या जीवनाचें सार्थक होणार कीं नाहीं याचा निकाल लागण्याचा तो क्षण ! शरीराचा अणुरेणु उत्सुकतेनें भरलेला होता. लो. टिळकांनीं बाबा महाराजांना 'हो' म्हटलें–आणि जगन्नाथ-महाराजांना पुत्र मानलें; पण तो 'हो' त्यांचें अर्धे कर्तें आयुष्य खाऊन गेला.

जीवाचे कान करून व गांधीजींकडे टक लावून जमनालालजी अधीरतेनें अवधान देऊं लागले; तोंच—

आकाशांतील काळे ढग दूर झाले. प्रसन्नतेचा प्रशांत प्रकाश गांधी-जींच्या मुखमंडळावर झळकूं लागला आणि त्यांच्या मुखांतून शब्द बाहेर पडले.

' जशी तुमची इच्छा ! '

तीनच शब्द ! पण त्रिभुवनाच्या मोलाचे वाटले जमनालालजींना ! आपल्या कानांत अमृताची धारच ओतली गेली असें त्यांना भासलें !

त्यांचें सर्व शरीर सात्विक अष्टभावांनीं मोहरलें ! त्यांनीं गांधीजींच्या चरणांवर मस्तक ठेवलें. लक्ष्मीनें सेवेचें सेवकत्व पतकरलें ! भौतिक ऐश्वर्य आध्यात्मिक संपदेला शरण गेलें ! धनवंत भिकाऱ्यापुढें भिकारी बनला — आणि शेवटीं सेवा-परायण झाला !

त्या तीन शब्दांत किती ब्रह्मांड सांठविलेलें होतें, याचा उलगडा पुढें दोन वर्षांनीं झाला. एकदां काय झालें ? गांधीजींनीं जमनालालजींना लिहिलेल्या एका पत्राचा मायना 'भाई जमनालाल' असा लिहिला. त्यांना 'पुत्रीकृत' केल्यापासून गांधीजी 'चिरंजीव' लिहीत. पण १९२२ सालींच लिहिलेल्या एका पत्राचा प्रारंभ त्यांनीं 'भाई' या शब्दानें केला. तो पाहतांच जमनालालजींचें चित्त खटकलें. त्यांचें मन दुःखी झालें. त्यांनीं गांधीजींना पत्र लिहून विचारलें, 'आपला चिरंजीव होऊन राहण्यास मी योग्य नाहीं का ?' त्यावर गांधीजींनीं जें उत्तर लिहिलें, तें सविस्तर असून त्यांची स्वतःची वात्सल्यपूर्ण पण व्यवहारदक्ष भूमिका प्रकट करणारें आहे. ऐतिहासिक महत्त्वाच्या त्या पत्रांत गांधीजी नम्रभावानें लिहितात,

"चि० जमनालाल,

तुम्हांला दुःख झालें हें वाचून मलाहि दुःख झालें. मी एका पत्रांत तुम्हांला 'चिरंजीव' म्हणून संबोधलें नाहीं. याचें कारण तें पत्र उघडें होतें. आपल्याला 'चिरंजीव' हें विशेषण लावलेलें सर्व लोकांनीं वाचणें उचित होईल किंवा नाहीं याचा निर्णय मी करूं शकलों नाहीं. म्हणून मीं 'भाई' शब्दाची योजना केली.

"तुम्ही चिरंजीव होण्यास योग्य आहांत कीं नाहीं अथवा मी बापाचें स्थान घेण्यास लायक आहे कीं नाहीं, याचा निवाडा कसा होणार ? तुम्हांला आपल्या परीनें जशी शंका आली, तशीच माझ्या परीनें मलाहि शंका आहे.

"जसे तुम्ही अपूर्ण आहां, तसा मीहि अपूर्ण आहें. तुमच्या प्रेमाखातर मी बाप बनलों आहें. पण त्यासाठीं मी अधिक विचार करावयास पाहिजे होता. आतां माझी प्रार्थना इतकीच आहे कीं, ईश्वरानें मला त्या स्थानास लायक बनवावें. तुमच्यामध्यें कांहीं कमतरता राहिली, तर ती माझ्या स्पर्शामुळें राहील. आपण दोघांनीं प्रयत्न करतां करतांच आपली कामना अवश्य सफल होईल, असा मला पूर्ण विश्वास आहे.

"तथापि, आपली कामना निष्फळ झाली, तर आपलें अंतःकरण जाणणारा भगवान् आपल्या योग्यतेप्रमाणें आपला निवाडा करील. म्हणून जोंपर्यंत मी माझ्या अंतःकरणांत जाणूनबुजून मलिनतेला स्थान देत नाहीं, तोंपर्यंत मी तुम्हाला 'चिरंजीव'च मानीन."

बापू के आशीर्वाद

गांधीजींच्या सत्यमय जीवनाच्या प्रकाशांत जमनालालजींना आपल्या अंगचे दोष दिवसेंदिवस अधिक स्पष्टपणें दिसूं लागले. ते दूर करण्याची त्यांची तळमळ व खटपट एकसारखी वाढत चालली. मुमुक्षु अवस्थेंतून साधकाच्या दशेवर ते चढले, आणि मनांत म्हणूं लागले, "या महात्म्याच्या पुत्रत्वाला मी योग्य कोणत्या रीतीनें बनूं शकेन?" आपल्या मनांतील सारे विचार व विकारहि ते गांधीजींपुढें ठेवूं लागले, आपल्या अंतःकरणाचीं सारीं आंदोलनें ते त्यांचेपुढें मांडूं लागले आणि आपल्या हृदयांतील सर्व कोडीं ते त्यांना सांगूं लागले. आणि त्या त्या वेळीं, त्या त्या प्रसंगीं, गांधीजी त्यांच्या शंका फेडून, कोडीं उलगडून, त्यांना योग्य मार्गदर्शन करूं लागले. शिल्पकाराची छिनी संगमरवरावर चालूं लागली व त्यांतून मूर्ति निर्माण करण्याचें काम करूं लागली.

अशा निकट व निरंतर सहवासाचा परिणाम जमनालालजींचे चित्तावर परिसाच्या स्पर्शासारखा झाला. त्यांना वाटूं लागलें, "आज भारतामध्यें गरिबांसाठीं तळमळणारा जीव कोणता असेल, तर तो

महात्माजींचा. महात्माजी हे खरोखर कारुण्य-मूर्ति आहेत. गोरगरिबांचें दुःख निवारण करतांना श्रीमंतावरहि अन्याय न व्हावा आणि भिन्न-भिन्न वर्गांमध्यें द्वेषभाव न पसरावा, अशी काळजी ते सदैव घेतात. म्हणून या देशांतील सर्व वर्गांचे व सर्व धर्मांचे लोक त्यांचेकडे आत्मीयतेनें पाहतात. भारतवर्षावर त्यांचें जें निस्सीम प्रेम आहे, त्याला लायक असे आम्ही भारतवासी बनूं, तर भारताचा उद्धार अवश्य होईल."

गीतेंतील शिकवणीप्रमाणें, गांधीजींचें जीवन, मुक्तसंग व निरहंकारी असून, तरी धृति व उत्साह यांनीं परिपूर्ण असें होतें. त्यांचें साक्षात् दर्शन झाल्यामुळें जमनालालजी म्हणत, "ज्याला महात्माजींचा सहवास लाभला आणि ज्यानें त्यांचें तत्त्वज्ञान समजून घेण्याचा प्रयत्न केला, तो कधींहि निरुत्साही होणें शक्य नाहीं. तो आपल्या कर्तव्याचें पालन नेहमीं उत्साहपूर्वक करीत राहील. स्वराज्य मिळवून आपल्या देशाची स्थिति सुधारण्याचे कामीं गांधीजींच्या मार्गानें थोडा विलंब लागेल तर खुशाल लागो, पण त्या मार्गानें जी व्यक्ति काम करीत राहील, ती स्वतःची उन्नति करून घेईल आणि स्वतःपुरतें स्वराज्य मिळवील, असा मला पूर्ण विश्वास वाटतो."

जमनालालजींची गांधीजींवर इतकी निष्ठा जडली कीं, त्यांचेसाठीं कोणताहि त्याग त्यांना अपुरा वाटूं लागला.

१९१५ साल्च्या अखेरीस मुंबई येथें कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें होतें. गांधीजींच्या राहण्याची व्यवस्था 'मारवाडी विद्यालयांत' जमनालालांनीं केली होती. आफ्रिकेंतील सत्याग्रहाचा प्रश्न कॉंग्रेस-नेत्यांना समजावून सांगण्यासाठीं गांधीजी एकसारखे फिरत होते. त्यासाठीं त्यांना मोटार हवी होती. त्या काळीं टॅक्सी मिळतच नसत आणि खाजगी मोटारी पण फारच थोड्या असत.

पहिले दिवशीं जमनालालजींनीं एका व्यापाऱ्याची मोटार आणून ती गांधीजींच्या कामासाठीं दिली. पण रोज रोज उसनी मोटार कोठून

आणावयाची ? म्हणून जमनालालजींनीं गांधीजींच्या उपयोगासाठीं एक नवीच मोटार खरेदी केली. त्याचा फायदा त्यांना चांगलाच मिळाला. तो असा कीं, वाच्छा, बानर्जी, सिंह, बसु इत्यादि थोरथोर कॉंग्रेस-पुढाऱ्यांकडे गांधीजींबरोबर ते जाऊं शकले, त्यांचे वादविवाद ऐकूं शकले आणि त्या प्रसंगीं त्यांना गांधीजींचा शांत, विचारी व कधींहि निराश न होणारा स्वभाव ठसठशीतपणें दिसून आला.

श्रीरामकृष्ण परमहंस म्हणत, शिष्यानें गुरूला दुरून-जवळून, दिवसा-रात्रीं, बारीक नजरेनें पाहून घ्यावें-पारखून घ्यावें. जशी गुरूनें शिष्याची, तशीच शिष्यानेंहि गुरूची पारख करावी. त्याच दृष्टीनें जमनालालजी गांधीजींकडे पाहात होते. त्या त्यांच्या निरीक्षणाची फलश्रुति काय ? खुद्द जमनालालजींनींच ती पुढील पारदर्शक शब्दांनीं निवेदन केली आहे. ते लिहितातः—

" गेलीं २४ वर्षें मी महात्माजींचे सहवासांत आहें. या काळांत मीं त्यांच्या जीवनाच्या सर्व क्षेत्रांचें अवलोकन केलें. त्यांच्याबरोबर मी खूप हिंडलों, त्यांचें आश्रमीय जीवन पाहिलें, त्यांच्या उपोषण-प्रसंगीं त्यांच्याजवळ राहिलों, त्यांच्या आजारीपणांत त्यांची शुश्रूषा करीत होतों, त्यांच्या अनेक गहन वाटाघाटींमध्यें हजर होतों, त्यांच्या सार्वजनिक सहकाऱ्यांशींहि माझा संपर्क आला-अशा नाना अवस्थांमध्यें, निकट राहून, मी गांधीजींचें व्यक्तिजीवन सूक्ष्मतेनें न्याहाळून पाहिलें; आणि—

'या पुरुषामध्यें मनुष्योचित गुणांचा फार मोठा समुच्चय आहे-मानवी गुणांचा हा हिमालयच आहे.' अशी श्रद्धा माझ्या चित्तांत वाढूं लागली-मी माझें जीवन त्यांच्यामध्यें अधिकाधिक विलीन करूं लागलों. आज तर ते माझे आदर्श आहेत-आणि त्यांची आज्ञा हा माझा जीवन-मंत्र आहे." असा धर्म-पिता लाभणें हें केवढें भाग्य !

● ● ●

# ३ : लढाऊ राजकारण

*" I could not be leading a religious life, unless I identified myself with the whole of mankind, and that I could not do, unless I took part in politics."*

— Mahatma Gandhi

जशी धर्म-निष्ठा, तशीच राष्ट्र-निष्ठाहि जमनालालांच्या रक्तांत लहानपणापासून खेळत होती. आपल्याला वैयक्तिक मोक्ष मिळावा अशी ऊर्मि त्यांच्या चित्तांत बालपणापासून उसळ्या मारीत होती; त्याप्रमाणेंच राष्ट्रीय मोक्ष मिळून राजकीय स्वातंत्र्याचा लाभ आपल्या देशाला व्हावा अशीहि लालसा त्यांच्या अंतःकरणांत रसरसत होती. आपल्या मनांतील विकार नष्ट व्हावेत म्हणून त्यांना जशी तळमळ लागली होती, तशीच आपल्या देशांतील इंग्रजांचें परकें राज्य निघून जावें, अशी त्यांच्या चित्ताची तडफड होती.

आणि ती कां असणार नाहीं ?

तो काळच तसा होता. सर्व राष्ट्राला पारतंत्र्याचें खग्रास ग्रहण लागलें होतें. राज्यकारभार असो, व्यापार असो कीं शिक्षण असो— कोट्यवधि हिंदी लोकांच्या जीवनाचीं सर्व अंगेंच परसत्तेनें व्यापलेलीं

होतीं. कोठेंहि डोकें वर काढण्यास, स्वाभिमानानें छाती पुढें काढून चालण्यास, हिंदी लोकांना वाव नव्हता. सर्वत्र अन्याय व अपमान, छळ व जुलूम, दारिद्र्य व उपासमार यांचें साम्राज्य पसरलेलें होतें. राजकीय, आर्थिक, सामाजिक व नैतिक—अशा चारी दिशांनीं या देशाचें शोषण ब्रिटिश साम्राज्यशाही, एखाद्या जळूप्रमाणें, करीत होती.

हिंदी माणूस केवढाहि मोठा असो—संपत्तीनें, विद्वत्तेनें, अधिकारानें तो कितीहि उच्च पदाला चढलेला असो—त्याचा पाणउतारा करण्यास व त्याला उपद्रव देण्यास साध्या गोऱ्या सोजीरालाहि दिक्कत वाटत नसे. न्या. रानडे, ना. गोखले, बॅ. तैयबजी—अशा कैक भल्याभल्यांना, परसत्तेच्या क्षुद्र हस्तकांकडून अपमान सोसावा लागत असे. खेड्यापाड्यांतील गांवढळ लोक तर पोलिसाची पगडी दिसतांच थरथरां कांपत. आपल्या देशबांधवांची ही सारी दुर्दशा जमनालाल लहानपणापासून प्रत्यक्ष पाहात आले होते.

एकदां त्यांचे गांवीं कांहीं पोलिसांनीं मुक्काम केला. ते सरकारी खजिना घेऊन चालले होते. त्यांची सारी बडदास्त गांवकऱ्यांनीं चांगली ठेवली होती. खाण्यापिण्याची व्यवस्थाहि फुकट केली होती. पण या पोलिसांच्या पाहुणचारांत एक उणीव मात्र राहिली—आणि त्यामुळें त्यांची तबियत एकदम गरम झाली. ती उणीव म्हणजे, पोलिसांना बासुंदी-पुरी हवी होती; पण त्यांचे ते डोहाळे कांहीं गांवकरी पुरवूं शकले नाहींत. त्यामुळें शिपाईदादा खवळले. त्यांनीं एका गांवकऱ्याला धरून असें बेदम मारलें कीं, त्याला बरें होण्यास पुढें कित्येक महिने लागले. नाहक मार खातांना त्या गांवकऱ्यानें फोडलेल्या आरोळ्या बाल जमनालालांच्या कानांत कैक महिने घुमत राहिल्या आणि त्याबरोबर पारतंत्र्याची चीड वाढत राहिली.

एकदां जमनालालांच्या मुनीमाच्या एका नातलगाच्या घराला आग लागली. घरांत मूल्यवान वस्तु जेथें ठेवलेल्या होत्या, तेथून तो नातलग

दूर जाईना. त्याला दूर करण्यासाठीं पोलिसांनीं त्याला इतकें बडविलें कीं, अखेर खाटेवर घालून त्याला दुसरीकडे न्यावें लागलें. याचा राग जमनालालांना तर आलाच, पण त्या पोलिसी क्रौर्यानें तापट बच्छराजजींचें रक्तहि तापलें. त्यांनीं वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याकडे दाद मागितली, पण तिचा कांहींच उपयोग झाला नाहीं. उलट त्या अधिकाऱ्यानें बच्छराजजींनाच धमकी दिली.

'सरकारी कामांत तुम्ही अशी ढवळाढवळ कराल, तर तुम्हांलाच पकडण्यांत येईल.' या सरकारी बेपर्वाईचा व पोलिसांच्या अमानुष मारहाणीचा विलक्षण परिणाम जमनालालांच्या बालमनावर झाला.

कांहीं झालें तरी या इंग्रजांचें राज्य आपल्या देशांतून हुसकून लावलेंच पाहिजे, हा विचार जमनालालांच्या चित्तांत बळावूं लागला. परतंत्रता ही गांधारीप्रमाणें आहे. शंभर दुष्ट कौरवांना जन्म देण्याचें पातक जसें गांधारीच्या नशिबीं आलें, तसे शेंकडों अपराधांचे रांजण भरणारी परतंत्रता अत्यंत पापी आहे, अशी ठाम समजूत जमनालालांची झाली. या पारतंत्र्याच्या मगरमिठींतून आपला देश मुक्त करण्यासाठीं आपण कांहीं ना कांहीं केलें पाहिजे, असा विचार त्यांच्या चित्तांत दृढावत चालला.

साहजिकच जो कोणी पुढारी जनतेवरील अशा अन्यायांना वाचा फोडीत असेल, त्याच्या निवारणासाठीं झगडत-झटत असेल आणि पारतंत्र्याच्या गोमेचा एक पाय तरी मोडून टाकीत असेल, त्याच्याबद्दल जमनालालांसारख्या भावनाशील तरुणांना अत्यंत आदर वाटत असे. नुसता आदरच नव्हे, तर आपण त्यांच्या कार्यास मदत करावी आणि त्यांच्या चळवळींत सामील व्हावें अशी इच्छाहि त्यांना होई. तिचें दृश्य फळ त्यांच्या वयाच्या १३ व्या वर्षापासून दिसूं लागलें.

तेव्हांपासून जमनालालजी वर्तमानपत्रें वाचीत. त्यांत 'केसरी' वर त्यांची विशेष भक्ति. कारण अर्ज-विनंत्या-शिष्टमंडळांनीं सरकारची

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थूलप्रत
अनुक्रम 23363 दि:
क्रमांक 830 नों: दि:



'रायबहादुर' व 'ऑनररी मॅजिस्ट्रेट' या उपाधींत सांपडलेले जमनालालजी

मनधरणी व पायधरणी करण्याचा मवाळ मार्ग 'केसरीला' कधींच पसंत नव्हता. 'केसरी' कर्ते लो. टिळक हे लोकांना जागृत करून त्यांची संघटना बांधीत चालले होते. त्यांचें लढाऊ राजकारण सूर्यप्रकाशा-प्रमाणें तळपत होतें. त्यांचे तेजस्वी किरण दर मंगळवारीं केसरीच्या अंकांतून गांवागांवांतून पसरत असत--आणि तरुणांचीं मनें देशभक्तीच्या प्रेरणेनें पेटवीत असत. जमनालालजी स्वतः 'केसरी' भक्तीनें वाचीत.

मराठी 'केसरीची' हिंदी आवृत्ति नागपूरहून १९०६ सालापासून निघूं लागली. ती बाल जमनालाल निष्ठेनें वाचीत असत. 'केसरी'-बरोबर लो. टिळकांवर त्यांची इतकी भक्ति जडली कीं, त्यांच्या कार्याला आपण आपलें सर्वस्व देऊन टाकावें, अशी भावना त्यांच्या हृदयांत नाचूं लागली. पण त्या बालवयांत त्यांचें सर्वस्व तें काय असणार?

बच्छराजजी जमनालालांना दुकानांत कांहीं काम करावयास लावीत व त्याचा मोबदला म्हणून त्यांना दररोज एक रुपया देत. पण खाऊ खाण्याचा शोक जमनालालांना होता कुठें? हॉटेलांत जाण्याचें किंवा नाटकें पाहण्याचें वेड त्यांना कधींच नव्हतें. म्हणून दररोज मिळणाऱ्या त्या रुपयाची बचत होत गेली. या 'अल्प-बचत-निधीं'तून त्यांनीं १०० रुपये 'हिंदी केसरी' या पत्राला मदत म्हणून पाठविले. ही त्यांची सार्वजनिक कार्यास पहिली देणगी!

पुढें सर्व आयुष्यभर जमनालालांच्या जीवनांत दान-गंगा शत-मुखांनीं वाहात राहिली असली, तरी या पहिल्या देणगीचें मोल कांहीं आगळेंच आहे! "ती १०० रुपयाची देणगी दिल्यानंतर मला जो आनंद मिळाला, तो आज लाखों रुपये देऊनहि प्राप्त होत नाहीं," असे उद्गार खुद्द जमनालालजी पुढें काढीत असत. इतक्या लहान वयांत अशी त्याग-बुद्धि व राष्ट्रीय वृत्ति किती धनिकांत आढळेल?

धर्म-भक्ति व राष्ट्र-भक्ति या गंगा-यमुनांचा सुंदर संगम जमनालालांच्या जीवनांत होत गेला. त्यांची विचारसरणी अशी



राष्ट्रीय अतिथि-गृह वर्धा येथील बजाज-वाडी.



कॉंग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीकडे चाललेले जमनालालजी—सरहद्द गांधी—जवाहरलालजी

मनधरणी व पायधरणी करण्याचा मवाळ मार्ग 'केसरीला' कधींच पसंत नव्हता. 'केसरी' कर्ते लो. टिळक हे लोकांना जागृत करून त्यांची संघटना बांधीत चालले होते. त्यांचें लढाऊ राजकारण सूर्यप्रकाशा-प्रमाणें तळपत होतें. त्यांचे तेजस्वी किरण दर मंगळवारीं केसरीच्या अंकांतून गांवागांवांतून पसरत असत--आणि तरुणांचीं मनें देशभक्तीच्या प्रेरणेनें पेटवीत असत. जमनालालजी स्वतः 'केसरी' भक्तीनें वाचीत.

मराठी 'केसरीची' हिंदी आवृत्ति नागपूरहून १९०६ सालापासून निघूं लागली. ती बाल जमनालाल निष्ठेनें वाचीत असत. 'केसरी'-बरोबर लो. टिळकांवर त्यांची इतकी भक्ति जडली कीं, त्यांच्या कार्याला आपण आपलें सर्वस्व देऊन टाकावें, अशी भावना त्यांच्या हृदयांत नाचूं लागली. पण त्या बालवयांत त्यांचें सर्वस्व तें काय असणार ?

बच्छराजजी जमनालालांना दुकानांत कांहीं काम करावयास लावीत व त्याचा मोबदला म्हणून त्यांना दररोज एक रुपया देत. पण खाऊ खाण्याचा शोक जमनालालांना होता कुठें ? हॉटेलांत जाण्याचें किंवा नाटकें पाहण्याचें वेड त्यांना कधींच नव्हतें. म्हणून दररोज मिळणाऱ्या त्या रुपयाची बचत होत गेली. या 'अल्प-बचत-निधीं'तून त्यांनीं १०० रुपये 'हिंदी केसरी' या पत्राला मदत म्हणून पाठविले. ही त्यांची सार्वजनिक कार्यास पहिली देणगी !

पुढें सर्व आयुष्यभर जमनालालांच्या जीवनांत दान-गंगा शत-मुखांनीं वाहात राहिली असली, तरी या पहिल्या देणगीचें मोल कांहीं आगळेंच आहे ! "ती १०० रुपयाची देणगी दिल्यानंतर मला जो आनंद मिळाला, तो आज लाखों रुपये देऊनहि प्राप्त होत नाहीं," असे उद्‌गार खुद्द जमनालालजी पुढें काढीत असत. इतक्या लहान वयांत अशी त्याग-बुद्धि व राष्ट्रीय वृत्ति किती धनिकांत आढळेल ?

धर्म-भक्ति व राष्ट्र-भक्ति या गंगा-यमुनांचा सुंदर संगम जमनालालांच्या जीवनांत होत गेला. त्यांची विचारसरणी अशी

असे कीं, "निःस्वार्थ बुद्धीनें जनसेवा केल्यानेंच मोक्षप्राप्ति सत्वर होते असा मला पूर्ण विश्वास आहे. आतां मला जर कोणी असें सांगितलें कीं, या रीतीनें देशसेवा करणाऱ्यांना शंभर जन्मांतहि मोक्ष-प्राप्ति होणार नाहीं, तरी त्याची मला चिंता नाहीं. उलट मला त्याचा आनंदच वाटेल. कारण पवित्र साधनांनीं जनसेवा करतां-करतां शेंकडों जन्म घालवावे लागले, तरी मला आनंदच वाटेल.'

जमनालालांच्या राष्ट्रप्रेमाची कसोटी लागण्याचे प्रसंग त्यांच्या लहानपणापासून येत गेले. गर्भश्रीमंत असणें हें अनेक दृष्टींनीं सुखाचें व हितकारक असलें, तरी कांहीं कांहीं बाबतींत त्याचा जादा त्रासच होतो. 'श्रीमंत' म्हणूनच त्यांच्यावर सरकारची अधाशी दृष्टि वळलेली असे. श्रीमंत म्हणून सरकारनें १९०८ सालीं जमनालालांना 'ऑनररी मॅजिस्ट्रेट' केलें. पोकळ मानाच्या केवळ सुवासावर थोर थोर लोकांना राबवून घेण्याची ही इंग्रजांची शक्कल होती. पगार नाहीं, भत्ता नाहीं, पण न्यायाधिशाचें काम, केवळ मानाचें म्हणून सरकार मोफत करून घेई. जमनालाल १८ वर्षांचे असतांनाच असे 'सन्मान्य न्यायाधीश' बनले.

आणि पुढें त्याच क्रमानें १९१७ सालीं, ता. २१ डिसेंबर रोजीं, त्यांच्या पदरांत पडली, 'रायबहादुर' ही दुसरी पदवी, न मागतां मिळालेली. ही पदवी नाकारणेंहि त्यांना कठीण होतें. पण त्या पदवीमुळें त्यांचें मन खटकत होतें. पदवी ठेवावी कीं टाकावी? असें कोडें त्यांना पडलें. बच्छराजजी देखील रायबहादूर होते.

एके दिवशीं सकाळची वेळ होती. जमनालालजी श्रीकृष्ण-मंदिराकडे चालले होते. रस्त्यावरच त्यांना गांधीजी भेटले. त्यांनीं त्यांना विचारलें, "इतक्या लहान वयांत तुम्हांला 'रायबहादुरी' कशी मिळाली?"

"बरोबर आहे तुमचा प्रश्न बापूजी. पण मी सांगतों, या पदवीसाठीं मीं कांहींहि प्रयत्न केलेला नाहीं. मात्र, नागपूरच्या कमिशनरची तार आली असतांना ५०००० रुपयांचे युद्ध-रोखे मीं खरेदी केले. माझा शिक्षण-प्रचार व सरळ व्यवहार यावर कमिशनर खूष आहे. या दोन्ही

कारणांचा मेळ पडून ही पदवी मजकडे चालत आली असेल, असा संभव आहे. आतां मला आपला आशीर्वाद पाहिजे. ”

‘मी आशीर्वाद तो काय देऊं ? सन्मानाचा उपयोग चांगला करा म्हणजे झालें. मनुष्याची हानि अपमानानें जितकी होते, त्यापेक्षां सन्मानानें अधिक होते. सन्मान ही एक भयंकर वस्तु आहे. तिचा सदुपयोग लोकांनीं फार थोडा केला आहे. तुम्ही तो सदुपयोग करा.”

“ ठीक आहे; पण त्यासाठीं आपला आशीर्वाद हवाच ”

“ तुमच्या आत्मोन्नतीच्या आड तो सन्मान न येवो असा माझा तुम्हांला आशीर्वाद आहे. ”

अशा मार्ग-दर्शनानेंच महात्माजी जमनालालांच्या स्वभावाची मूर्ति घडवीत होते—त्यांच्या आयुष्याला योग्य वळण लावीत होते — मोहापासून वांचवून सन्मार्गाकडे वळवीत होते. या गुरु-मंत्रामुळें सरकारनें जमनालालांना जी उपाधि दिली, ती पुढें सरकारलाच उपाधि बनली. कारण १९२१ सालीं, सरकारी दडपशाहीच्या निषेधार्थ त्यांनीं ती पदवी फेकून दिली. इंद्राचें वज्र इंद्रावरच उलटून मारावें, तसें घडलें. पदवी घरीं आली व ती जमनालालांनीं आपल्या घरीं राहूं दिली, पण ती केवळ दासी म्हणून— स्वामिनी म्हणून नव्हे !

पदवीच्या पाशानें जमनालालजी सरकारचे मिंधे मुळींच बनले नाहींत. उलट प्रसंग येतांच ते आपला स्वाभिमान व बाणेदारपणा बिन-दिक्कत प्रगट करीत. राष्ट्रीय कार्यांत तर ते उघड उघड भाग घेत. राष्ट्रीय नेते त्यांचे मित्र-स्नेही होते. ते त्यांचे घरीं वारंवार येत-जात व जमनालाल त्यांचा पाहुणचार प्रेमानें करीत. गांधीजींसारख्या राष्ट्र-नेत्याचा संबंध जमनालालसारख्या लक्ष्मीपुत्रानें ठेवावा हें सरकारच्या डोळ्यांत सलत होतें —गोऱ्या अधिकाऱ्यांना खड्यासारखें खुपत होतें.

तसाच एक गोरा अधिकारी नागपूरचा कमिशनर म्हणून अधिकार गाजवीत होता. १९१८ सालीं एके दिवशीं त्यानें जमनालालांना आपल्या

मुलाखतीस बोलाविलें. शेठजी वर्ध्याहून तेथें गेले. कचेरींत जाऊन पाहतात तों साहेब गुर्मींत बसलेले. त्यांचेजवळ गुप्त पोलिसांच्या रिपोर्टांची फाईल पडलेली. शेठजी खुर्चीवर बसतात न बसतात, तोंच कमिशनरसाहेबांनीं प्रश्नांची सरबत्ती सुरू केली—

"आपण गांधीजींकडे कधीं कधीं जातां ना?"

"जी हां!"

"आपल्या घरीं मिसेस नायडू, नेकीराम शर्मा वगैरे राजकीय कार्यकर्ते येऊन राहतात ना?"

"जी हां!"

"आपल्याकडे सरकार बहुमानाच्या दृष्टीनें पाहतें आणि सरकारांत आपल्याला मोठी मान्यता आहे, याची जाणीव आपल्याला आहे ना!"

"जी हां!"

"याचा अर्थ आपल्यावर जादा जबाबदारी आहे. ती आपण पार पाडाल अशी सरकारला आशा वाटते."

"हें ठीक आहे. पण आपण हें ध्यानीं घेतलें पाहिजे कीं, जे लोक माझ्या घरीं राहतात त्यांच्या राजकीय विचारांशीं माझा कांहीं संबंध नाहीं. खुद्द माझे विचार काय आहेत यासंबंधीं आपल्याजवळ जर कांहीं रिपोर्ट असतील, तर त्यावरून आपण मला कांहीं प्रश्न विचारा म्हणजे मी त्यांचा खुलासा करूं शकेन. पण राजकीय मतभेद असूनहि मी माझ्या मित्रांशीं स्नेहसंबंध ठेवूं नयेत—त्यांना माझे घरीं उतरूं देऊं नये, अशी मनीषा सरकारची असेल तर ती वावगी आहे. ती मनीषा पूर्ण करणें हें कोणत्याहि माणसाला—जो आपल्याला मनुष्य समजतो त्याला—अशक्य आहे."

"खरें आहे; खरें आहे." चतुर कमिशनर समजावणीच्या स्वरांत बोलला. "गांधीजींच्याजवळ गेल्यानें आपल्यावर कांहीं अनिष्ट परिणाम होणार नाहीं हें खरें; कारण आपण मोठे समजदार आहांत. पण

दुसऱ्या लोकांवर त्याचा वाईट परिणाम होण्याचा संभव आहे. म्हणून आपण विशेष काळजी घेतली पाहिजे. "

कमिशनरच्या या मोहनास्त्राचाहि जमनालालांच्या मनावर कांहीं प्रभाव पडला नाहीं. त्यांनीं आपला पाहिलाच विचार त्याला ठासून सांगितला, " माझ्या मित्रांचें आदरातिथ्य करणें हा माझा धर्म आहे. गांधीजींबद्दल माझा पूज्यभाव आहे. त्यांचा संबंध मी सोडूंच शकत नाहीं. "

" असें असेल तर, तुमच्या विद्यालयाच्या नव्या इमारतीचें उद्घाटन करण्यास चीफ कमिशनर येणार नाहींत. " गोरा गुरगुरला. ब्रिटिश सिंहानें आपलीं नखें बाहेर काढलीं. पण त्यानें जमनालालजी डगमगले नाहींत. त्यांनीं धैर्यानें पण शांतपणें उत्तर दिलें, " ती त्यांच्या मर्जीची गोष्ट, मी काय करूं शकणार? "

या उत्तरानें आगींत तेलच पडलें ! रागानें लाल होऊन कमिशनरनें टेबलावर हात आपटून म्हटलें, " सरकारकडून रायबहादुरी मिळाल्यावर तुम्ही राष्ट्रीय लोकांच्या गोटांत शिरणें सुरू केलें आहे. याचा अर्थ दोन्हींकडून मानमान्यता तुम्हांस उपटावयाची आहे. "

हा कुत्सित आरोप ऐकूनहि जमनालालजी शांत राहिले. ते धीर-गंभीरपणें म्हणाले, " रायबहादुरीसाठीं मीं सरकारकडे कधींच याचना केली नाहीं, आणि ती पदवी मिळण्यापूर्वीपासून माझा या राष्ट्रनेत्यांशीं संबंध आहे. "

" ठीक तर. आपण कलेक्टरला भेटून समझोता करा. "

" समझोता करण्याचा प्रश्नच येतो कुठें? जे लोक माझे घरीं आतांपर्यंत येत आहेत, तें पुढेंहि येत राहतील. "

जमनालालांची राष्ट्रीय वृत्ति या प्रसंगीं पूर्ण कसास लागली. पूर्वीं एखादा ऋषि तपश्चर्या करूं लागला म्हणजे त्याला मोह पाडण्यासाठीं इन्द्र आपल्या अप्सरा पाठवी. तशीच युक्ति इंग्रजी राजनीति करीत असे. त्या मोहाला जे वश न होतील, त्यांचेवर दंडाचा प्रयोग करण्या-

सहि सरकार कचरत नसे. पण सरकारच्या रागाला व लोभाला—दोघांनाहि भीक न घालतां आपली देशसेवेची तपश्चर्या अखंड चालविणारे शेंकडों कार्यकर्ते या भरतभूमींत नांदत होते. सरदार वल्लभभाई पटेल, ना० दादासाहेब मावळंकर इत्यादि कर्तव्यनिष्ठ राष्ट्रभक्तांनीं अहमदाबादेच्या कमिशनरला असेंच खडसावलें होतें. निःस्पृहता व निग्रह हे गुण म्हणजे हिंदी स्वातंत्र्य-सैनिकांच्या ढाल-तरवारीच. जमनालालजी हे तसेच शूर-वीर स्वातंत्र्य-सैनिक होते.

म. गांधींनीं भारतीय स्वातंत्र्यासाठीं सत्याग्रहाचा यज्ञ प्रज्वलित केला. पारतंत्र्याची पूर्णाहुति मिळेपर्यंत हा स्वातंत्र्य-यज्ञ थांबणार नव्हता. पारतंत्र्य ज्या क्षणीं या देशांत आलें, त्याच क्षणापासून तें नष्ट करण्याचे यत्न सुरू झाले. १८५७ च्या स्वातंत्र्य-युद्धांत सैनिक व संस्थानिक यांच्या शौर्यानें पारतंत्र्यावर प्रथम प्रहार केला. शस्त्रसंपन्न ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं शस्त्रानें सामना देण्यास आपण असमर्थ आहों, असें ज्यांना पटलें, त्यांनीं या स्वातंत्र्य-यज्ञांत आपल्या मधुर वाणीच्या व गाढ विद्वत्तेच्या स्निग्ध-शीतल घृत-धारा ओतल्या; पण त्यांचाहि फारसा कांहीं परिणाम दिसून आला नाहीं. तेव्हां लो. टिळकप्रभृतींनीं लोकसंघटनेचें इंधन प्रचंड प्रमाणांत या यज्ञाला पुरविलें. त्याचाच विस्तार आपल्या अहिंसा-शास्त्रानुसार करून, गांधीजींनीं असहकार, कायदेभंग व सत्याग्रह यांचीं मोठमोठीं इंधनें या यज्ञांत घातलीं—आणि त्यामुळें त्या यज्ञाची ज्वाला इतकी विराट व दाहक बनली कीं, तींत ब्रिटिशांनीं लादलेलें सारें पारतंत्र्य भस्मसात् होऊन गेलें.

गांधीजींच्या या नव-युगाची पहाट म्हणजे नागपूरची राष्ट्रीय सभा. त्यापूर्वीं १९०६ सालीं कलकत्ता येथें भरलेल्या राष्ट्रसभेनें स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतुःसूत्रीचा घोष केला होता—सर्व देशभर पुरस्कार केला होता. साऱ्या देशाचें वातावरण या चतुःसूत्रीच्या मंत्रानें दुमदुमून गेलें होतें. भारतीय तरुणांचीं अंतःकरणें या

राष्ट्रीय भावनेनें विद्युत्तंतूप्रमाणें थरारत होतीं आणि त्यांच्या नसानसांतून प्रतिकाराचें रक्त सळसळत होतें. युवक जमनालाल हे त्यांपैकींच एक होते.

स्वराज्याचा ध्यास जमनालालांना रात्रंदिवस लागला. त्याचें साधन म्हणून स्वदेशीचें व्रत त्यांनीं १९०६ सालापासूनच स्वीकारलें. स्वदेशीच्या नाण्याची दुसरी बाजू म्हणजे बहिष्कार. विदेशी मालावर बहिष्कार घालूनच ते थांबले नाहींत, तर त्यांची होळी करण्यांतहि त्यांनीं पुढाकार घेतला. आणि चौथें सूत्र राष्ट्रीय शिक्षणाचें. त्यांनीं आपल्या दोन्ही मुलांना आश्रमीय शिक्षण देण्यास सुरुवात केली.

जमनालालजींनीं १९२१ मध्यें आपल्या पत्नीस जें एक पत्र लिहिलें, त्यांत स्वदेशीची तळमळ स्वच्छ दिसून येते. ते निक्षून लिहितात,

> "आतां तूं आणि मी तर विदेशी कपडा वापरूंच शकत नाहीं. आपलें सर्व कुटुंबच पूर्ण स्वदेशी वस्त्रें वापरणारें आणि साधी राहणी पत्करणारें बनलें पाहिजे. या दृष्टीनें जोरानें उद्योग होणें अवश्य आहे. देवाच्या मंदिरांतहि परदेशी कपडे स्वप्नांतसुद्धां येतां कामा नयेत. जर आले तर त्याची जबाबदारी तुझ्यावर."

'बोले तैसा चाले' या सिद्धान्ताप्रमाणें जमनालालजी स्वतः वागत. स्वदेशी गिरण्यांचें कापड ते १९०६ सालीं वापरीत असत. १९२१ सालापासून सोळा आणे स्वदेशी असलेली खादी वापरण्यास त्यांनीं सुरुवात केली. आपल्या घरांतील उंची उंची बहुमोल विदेशी वस्त्रें त्यांनीं एकत्र केलीं, गाड्या भरून विलायती कपड्यांची मिरवणूक काढली. गांवांतील लोकांनींसुद्धां स्वतःचे कपडे त्यांत टाकले. देवळांतील ठाकूरजींचे परदेशी पोशाखहि त्या ढिगाऱ्यावर घातले आणि त्या अपवित्र कपड्यांना काडी लावली—बालक कमलनयन यानें! २०।२५ हजार रुपये किंमतीचा विदेशी माल बघतां बघतां खाक झाला! रेशमी, जरीचीं, कलाकुसरीचीं—मुद्दाम निवड

करून दूरदूरहून आणलेलीं, सुंदर सुंदर वस्त्रें, भप्‌कन्‌ जळून राख झाली ! त्या राखेंतून २।३ शेर चांदी निघाली.

रावणाची पापी लंका जाळल्याचा आनंद हनुमानाला जसा झाला, तसाच जमनालालजींना विदेशी-वस्त्र-दहनानें झाला. आपलें पापच जळत आहे असें त्यांना, त्या होळीच्या ज्वाला पाहतांना वाटलें. लग्नांतील शालू-पैठण्या 'अग्नये स्वाहा' करतांना त्यांच्या सहधर्मचारिणी—जानकीदेवी—यांनाहि कांहीं खंत वाटली नाहीं. उलट, त्या म्हणाल्या, "माझ्या दागिन्याच्या पेटींत मखमल शिल्लक राहिली आहे, ती मी कां जाळूं नये ?" पण ती पेटी जमिनीमध्यें गाडलेली होती. बजाज-कुटुंबानें केलेलें स्वदेशी-व्रताचें हें कडकडीत पालन पाहून वर्ध्यांतील सारे लोक थक्क झाले आणि जमनालालजींकडे अधिक आदरानें पाहूं लागले.

जमनालालजींबद्दल राष्ट्रीय कार्यकर्त्यांमध्यें किती आदराची भावना वसत होती, याची कसोटी १९२० सालीं प्रथम लागली. पहिलें महायुद्ध संपलें आणि त्यांत ब्रिटिश सरकार विजयी झालें. तो विजय मिळवून देण्यांत हिंदुस्थानचा वांटा मोठा होता. पण त्याचें बक्षीस ब्रिटिश सरकारनें काय दिलें ? "गरज सरो, वैद्य मरो" हीच त्यांची राजनीति. खिलाफतीचा अन्याय करून त्यांनीं तमाम मुसलमानांच्या धार्मिक भावनांवर आघात केले. पंजाबमधील अमृतसर येथें 'जालियनवाला बागेंत' जनरल डायरनें अकारण व अमानुष गोळीबार मन मानेल तसा केला. आणि सरकारचा तिसरा अत्याचार म्हणजे देशांतील सर्वच लोकांचे नागरी हक्क हिरावून घेणारा 'रौलट कायदा' जारी केला. पिसाळलेल्या हत्तीप्रमाणें असे अन्याय करीत सुटलेल्या सरकारला विरोध कोण, कसा करणार ?

याचें उत्तर गांधीजींनीं दिलें. अमृतसरच्या कॉंग्रेसमध्यें त्यांनीं आपलें प्रयोगसिद्ध पण अभिनव असें सत्याग्रहाचें अस्त्र राष्ट्राच्या प्रतिनिधीपुढें ठेवलें. त्याचा आचार म्हणजे असहकार ! सरकारी कोर्टें, कौन्सिलें व

कॉलेजें यांवर बहिष्कार घालण्याची मोहीम त्यांनीं सुरू केली. वकील आमदार व विद्यार्थी सरकारकडे पाठ फिरवून भराभर बाहेर पडूं लागले. सरकारी पदव्या भिरकावून दिल्या गेल्या. सर्व देशांत असहकारितेचें नवेंच वारें संचरूं लागलें. हें नवयुग अवतीर्ण झालें नागपूरच्या काँग्रेस-मध्यें. ही काँग्रेस १९२० सालच्या डिसेंबरमध्यें भरली होती.

अशा या महत्त्वपूर्ण, ऐतिहासिक व क्रांतिकारक काँग्रेसचे स्वागताध्यक्ष कोणाला करावें, हा प्रश्न जेव्हां नागपूरच्या काँग्रेस–कार्यकर्त्यांपुढें उभा राहिला, तेव्हां सर्वांनीं एकमतानें नांव घेतलें जमनालालजींचें! पण खुद्द जमनालालजींना आपण त्या उच्च स्थानास पात्र आहों असें वाटत नव्हतें. कारण त्यांना आपल्या उणीवांची जाणीव पुरेपूर होती. काँग्रेसच्या थोर थोर नेत्यांच्या मानानें आपलें शिक्षण कांहींच झालें नाहीं; आणि आपला राष्ट्रसेवेचा अनुभवहि थोडा, याचें ज्ञान त्यांना पक्कें होतें. म्हणून त्यांनीं १९२० च्या सप्टेंबरमध्यें गांधीजींना एक पत्र लिहून आपली असमर्थता स्वच्छपणें कळविली. परंतु त्यांच्या या नकारास होकार कोणीच देईना. 'शुक्लजी स्वीकारीत नसतील; तर स्वागताध्यक्षपद तुम्ही स्वीकारा.' अशी तार गांधीजींनीं उलट केली.

त्या वेळीं गांधीजींची प्रकृति बरी नव्हती. म्हणून नंतर महादेवभाईनीं पत्र लिहून गांधीजींच्या तारेचा असा खुलासा केला कीं, "आपण अध्यक्षपद स्वीकारणें जरूर आहे. याचें मुख्य कारण हें आहे कीं, कोणी अयोग्य माणूस तेथें येऊं नये. आपलें वय व ज्ञान कमी असल्याची जी तक्रार आपण केली आहे, ती गांधीजींना मंजूर नाहीं. आपण हिंदी भाषेंतच भाषण करावें आणि त्याचा इंग्रजी अनुवाद छापून वाटावा म्हणजे झालें."

नागपूरच्या नेत्यांचा हेतु असा होता कीं, जमनालालजी स्वागताध्यक्ष झाले म्हणजे व्यापारी–वर्ग काँग्रेसच्या राजकारणांत खेचल्यासारखा

होईल. त्या काळीं व्यापारी-वर्ग राजकारणापासून बारा हात दूर असे. सरकारचें भय त्याला फार. सरकारविरोधी काँग्रेसच्या वाऱ्यासहि ते उभे राहात नसत. जमनालालजी म्हणजे एक अपवादच. अवघ्या ३० वर्षांचा तरुण आणि तोहि एक लक्ष्मीपुत्र, काँग्रेसचा स्वागताध्यक्ष होतो, हें पाहून सर्वांना मोठें कौतुक वाटलें.

आणि त्याहिपेक्षां अधिक कौतुक वाटलें त्यांचें भाषण ऐकून. तें भाषण प्रौढ विचारांनीं भरलेलें, राष्ट्रप्रेमानें ओथंबलेलें व लढाऊ कृतीची प्रेरणा देणारें होतें. त्या भाषणांत जमनालालजी म्हणाले,

" काँग्रेसच्या विचारांची सिद्धि जितकी अधिकाधिक भयावह व कंटकाकीर्ण होत आहे, तितकी प्रतिनिधींवरील जबाबदारी वाढत आहे. आपल्या मातृभूमीला स्वतंत्र करण्याची अभिलाषा जसजशी प्रबळ होईल, तसतसा या राजनैतिक युद्धांमध्यें आपला विजय अवश्य होईल, असा आपला आत्मविश्वास वाढत जाईल. "

स्वातंत्र्य–प्राप्तीची मीमांसा करतांना जमनालालजी म्हणाले, " खिलाफत-प्रकरणानें ब्रिटिशांनीं वचनभंग केला. तसेंच हिंदुस्थानला जबाबदारीचें स्वराज्य देण्याऐवजीं असमाधानकारक व निराशाजनक राजकीय सुधारणा तेवढ्या दिल्या, आणि पोलिसांच्या अत्याचाराला मोकळें रान मिळवून देणारा रौलट कायदा बनविला. या सर्व घटनांमुळें अखिल हिंदवासियांचे डोळे उघडले गेले आणि त्यांना आपल्या भयंकर स्थितीचें सत्यज्ञान झालें. सर्व हिंदपुत्रांना कळून चुकलें कीं, ब्रिटिश साम्राज्यामध्यें आपली स्थिति दिवसानुदिवस बिघडतच चालली आहे. या पददलित अवस्थेंतून आपल्या मातृभूमीला मुक्त करण्याचे फक्त दोन मार्ग आहेत. एक उघड बंड व दुसरा सार्वत्रिक असहयोग. सशस्त्र बंडाचा मार्ग भारतीय संस्कृति व सदाचार यांचेविरुद्ध आहे; पण असहयोगाचा मार्ग त्यांच्याशीं पूर्ण जुळता आहे. म्हणून तो स्वीकरणीय व समयोचित आहे. "

असहकारितेनें आपण पूर्ण स्वातंत्र्य मिळवूं, असा आत्मविश्वास जमनालालजींनीं या भाषणाच्या शेवटीं प्रकट केला. "बाहेरच्या कोणाच्या साहाय्याशिवाय पूर्ण स्वराज्य प्राप्त करून घेण्याची आमची मनीषा आहे." अशी गर्जना त्यांनीं केली आणि रशिया, आयर्लंड, चीन, इत्यादि देशांतील युव-युवतींनीं स्वातंत्र्यासाठीं किती स्वार्थत्याग केला, हें सांगून त्यांनीं तरुणांना हांक दिली कीं, "या महान यज्ञांत महान आहुतीची आवश्यकता आहे."

तरुणांना हांक दिली; आणि व्यापारी-बंधूंना?

व्यापारी-बंधूंना उद्देशून जमनालालजी काय बोलतात, याकडे प्रतिनिधींचें विशेष लक्ष होतें. ती त्यांची जिज्ञासा तृप्त होईल असेंच आवाहन जमनालालजींनीं आपल्या भाषणांत केलें. व्यापारी-वर्गाची विवेक-बुद्धि जागृत करण्यासाठीं ते म्हणाले, "ब्रिटिश राज्यामध्यें आतांपर्यंत आपण जें द्रव्य मिळविलें आहे, तें आपल्या देशबांधवांना सुखी करून नव्हे, तर त्यांना अधिकाधिक दरिद्री बनवून. त्याचा परिणाम आज असा दिसत आहे कीं, या देशांतील सुमारें दहा कोटी लोकांना सर्व दिवसांत एक वेळेला पोट भरणेंहि कठीण झालें आहे."

शेवटीं, जमनालालजींनीं मोठ्या तळमळीनें व्यापारी-वर्गाला हाक दिली कीं, "व्यापारी-बंधूंनो! आपलें जीवन सफल करण्याचा हा परीक्षेचा काळ आहे. आपली कैक वर्षांची उपेक्षा व भीरुता यांचा त्याग करून या राष्ट्रीय यज्ञामध्यें आपण पुरेपूर भाग घेण्यानेंच आपल्या व्यापाराचें भावी हित साधलें जाणार आहे. या वेळीं आपण चुकीचा मार्ग स्वीकारला, तर आपल्या भावी पिढ्यांना खऱ्या व्यापाराचें द्वार कायमचें बंद होईल, एवढेंच नव्हे तर राष्ट्रीय कर्तव्य न केल्यानें तुमचा आत्मा पापानें कलंकित होईल. परंतु आपण आपल्या द्रव्याची आहुति आपल्या हातांत घेऊन ती या राष्ट्रयज्ञाच्या ज्वाळेंत अर्पण केली,

तर आपल्या वर्गाचें कायमचें कल्याण होईल आणि त्याला उज्ज्वल यश चिरंतन लाभेल."

नागपूर काँग्रेस यशस्वी व्हावी म्हणून जमनालालजी दररोज २०।२० तास काम करीत होते. ही काँग्रेस सर्व दृष्टींनीं यशस्वी झाली. काँग्रेस झाली, भाषणें गाजलीं, वाद पेटले व शमले आणि अखेर ठरावहि मंजूर झाले. पण मुख्य प्रश्न असतो कृतीचा. कृतीच्या आघाडीवर जमनालालजी तळपत होते. त्यांनीं स्वतः आपली रायबहादुरीची सरकारी पदवी फेकून दिली, एवढेंच नव्हे तर सरकारी कोर्टांत चालणारे आपले सारे खटले एकदम काढून घेतले. त्यामुळें त्यांचें हजारों–लाखों रुपयांचें नुकसान झालें. पण त्यावर त्यांनीं संतोषानें पाणी सोडलें. हत्यारांचे परवाने त्यांनीं सरकारकडे परत केले.

स्वतःच्या वर्तनाचें असें रोकडें उदाहरण घालून देऊन मगच जमनालालजी आपल्या व्यापारी-बंधूंना असहकारितेचा उपदेश करूं लागले. आधीं आचार, मग प्रचार हा त्यांचा बाणा. त्यांनीं गांवोगांव दौरा काढून खाजगी पंचायती स्थापन केल्या व त्यांच्यामार्फत खटल्यांचे निकाल करून घेण्यास व्यापारी-वर्गास समजाविलें.

याशिवाय कोर्टांवर बहिष्कार घालण्यासाठीं जे लोक वकिली सोडतील त्यांच्या चरितार्थासाठीं थोडेफार पैसे देतां यावेत, म्हणून जमनालालजींनीं एक लाख रुपयांची देणगी काँग्रेसला दिली. त्यांचें हें औदार्य व राष्ट्रप्रेम पाहून साहजिकच काँग्रेसनें त्यांना आपले खजिनदार बनविलें. आणि तसेच काँग्रेसच्या कार्यकारिणीचेहि सभासद त्यांना करण्यांत आलें. या दोन्ही मानाच्या व विश्वासाच्या जागा त्यांना आमरण अर्पण करण्यांत आल्या. त्यांच्या निर्लोभी व निरंतर सेवेची ही जनतेनें दिलेली पावतीच नव्हे काय !

काँग्रेसनें पावती दिली खरी, पण काँग्रेस-निंदकांना सरळ रेघाहि वक्रच दिसूं लागली होती. गांधीजींचें राजकारण वैराग्याचें व कृतीचें.

त्या गुणांत जे उणे पडले, ते राजकारणांतहि मागें पडले. ते कितीहि विद्वान असोत, वक्तृत्व-चूडामणि असोत किंवा साहित्य-सम्राट असोत, त्यांच्या पुढारीपणाचें सारें तेज पार लोपलें. ज्ञानसंपन्नापेक्षां सेवासंपन्नाला जनता अधिक मान देऊं लागली. पुढारीपणाचें सिंहासन गमावलेलें व वैफल्यानें ग्रासलेले विद्वान पुढारी पराभवाच्या अपमानानें जळूं लागले, निराशेनें कढूं लागले—आणि खोटेनाटे व कटु-कुत्सित आरोप नव्या काँग्रेस-नेत्यांवर करूं लागले. गांधीजींसारखा जगद्वंद्य साधुपुरुष त्या निंदकांना ' ढोंगी ' वाटूं लागला आणि त्यांचे लेखी, महात्मा हा मोहात्मा ठरला. मग जमनालालजींसारख्या लक्ष्मीपुत्राची काय प्रतिष्ठा ?

" हे पहा काँग्रेसचे ढोंगी पुढारी ! एकीकडे कोर्टावरील बहिष्काराचा अट्टाहास करीत आहेत आणि दुसरीकडे आपल्या पेढीचे खटले कोर्टांत खुशाल चालवीत आहेत ! " असा आरोप करून ' केसरी ' कर्ते श्री. न. चिं. केळकर यांनीं खुद्द जमनालालजींचेंच नांव घेतलें. तेव्हां जमनालालजींना गप्प बसणें शक्य नव्हतें. " आपल्या आरोपाचे आधार द्या, " असें आव्हान त्यांनीं केळकरांना दिलें.केळकर आधार कोठले देणार ? कारण ते आरोप पूर्ण असत्यच होते. शेवटीं त्यांना नाक मुठींत धरून जमनालालजींची सपशेल माफी मागावी लागली.

विशेष हें कीं, हा अप्रिय प्रसंग जमनालालजी तत्काळ विसरून गेले. त्यांचें हृदय इतकें उदार व क्षमाशील होतें कीं, त्यामध्यें कोणाचाहि केवढाहि अपराध सहज विरघळून जाई. पुढें १९२५ सालीं काँग्रेसनें आपल्या सभासदत्वासाठीं हातसुताची अट घातली. चरखा किंवा तकली यावर जो सूत काढणार नाहीं, तो काँग्रेसचा सभासदच राहूं शकणार नाहीं, अशी ही सक्त शर्त होती. ती महाराष्ट्रांतील खादी-विरोधी गटाला मान्य कशी होईल ?

सूत काढवेना पण काँग्रेस सोडवेना—अशा कात्रींत खादी-विरोधी महाराष्ट्रीय सांपडले. त्यांचे नेते होते केळकर. तेव्हां त्यांची अडचण

दूर करण्यासाठीं जमनालालजींनीं आपण स्वतः आपल्या हातानें कातलेलें सूत केळकरांकडे पाठविलें. हा त्यांचा उमदा स्वभाव पाहून केळकर चकित झाले. त्यांनीं त्यांना धन्यवाद देणारें पत्र लिहिलें व त्यांत म्हटलें, " मी आपला फार ऋणी आहें. आपला स्नेह व सद्भाव असाच वाढत राहील अशी मला आशा आहे. " क्रोधाला क्षमेनें व विरोधाला प्रेमानें जिंकण्याचा गांधीवाद जमनालालजींच्या अंगीं असा मुरलेला होता.

▲

क्षमाशील मनुष्य शौर्यशालीहि किती होऊं शकतो, याचे दाखले गांधीजींनीं जगाला हजारों-लाखों दिले. सबलाची क्षमा या गुणाचे तर ते स्वतः आदर्श होते. पण आफ्रिकेंत व भारतांत त्यांनीं अशा वृत्तीचीं लक्षावधि माणसें निर्माण केलीं. फार काय, बॉम्ब-पिस्तुलांचें राजकारण खेळणाऱ्या कैक क्रांतिकारकांना 'शूराची अहिंसा' आचरावयास लावलें. या त्यांच्या अहिंसक सेनेंतील एक मातब्बर सेनानी जमनालालजी हे होते. त्यांनीं आपल्या जीवनांत शांतीचे, क्षमेचे, सहिष्णुतेचे निर्मल निर्झर कैक वेळां वाहविले; त्याचप्रमाणें शौर्याचे, पराक्रमाचे, क्षात्रतेजाचे पर्वतहि त्यांच्या आयुष्यांत उभे असलेले दिसतात. कोठें अन्याय दिसला किंवा स्वाभिमानावर आघात झाला कीं त्यावर ते पहाडाप्रमाणें कोसळून पडत. आणि परक्या राज्यांत अशा अन्यायांना काय तोटा ? त्या परराज्याला तिलांजलि देण्यासाठीं उभी असलेल्या कॉंग्रेसनें आपल्या तिरंगी निशाणाखालीं हजारों-लाखों स्वातंत्र्यभक्त गोळा केले. त्या असंख्य हिंद बांधवांच्या प्रेमाचें व प्रतिष्ठेचें प्रतीक म्हणजे तिरंगी झेंडा !

तो तिरंगी झेंडा गांवागांवांत दिसूं लागला—घराघरावर डोलूं लागला—संस्थासंस्थांवर फडकूं लागला. भारतीयांच्या स्वातंत्र्य-भक्तीचें मापनच बनलें तें ! आणि म्हणूनच तो तिरंगी झेंडा सरकारी अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत खड्यासारखा खुपूं लागला. जबलपूरच्या नागरिकांनीं एका मिरवणुकींत राष्ट्रीय झेंडा नाचविला; तो पाहतांच तेथील अधिकाऱ्यांचें

पित्त खवळलें. पोलिसांनीं तो झेंडा जप्त केला. पण त्याची पर्वा करतो कोण ?

नागपूरच्या नागरिकांनीं सरकारचें आव्हान स्वीकारलें. १९२३ सालीं 'राष्ट्रीय सप्ताहांत' ता. ६ ते १३ एप्रिलमध्यें, जालियनवाला बागेची स्मृति पाळण्यासाठीं नागपूरकरांनीं आपल्या तिरंगी झेंड्याची मिरवणूक काढण्याचें ठरविलें. ता. १३ एप्रिल रोजीं निघालेल्या झेंडा-मिरवणुकीला सरकारनें मनाई केली. त्या वेळीं गांधीजी तुरुंगांत होते; तरी या झेंडा-सत्याग्रहाचा झेंडा नागपूरकरांनीं आपल्या हातीं घेतला. त्याचें पुढारीपण आलें जमनालालजींकडे.

जमनालालजी कलकत्त्यास गेले होते. तेथून परत येतांना, नागपूर स्टेशनवर, त्यांना कांहीं तरुण भेटले. त्यांनीं झेंडा-सत्याग्रह करण्याचा आपला निर्धार त्यांचे कानीं घातला व आपलें नेतृत्व करण्याची गळ त्यांना घातली. 'मी वर्ध्याहून ७।८ दिवसांत परत येतों, तोंवर तुम्ही सबूर करा.' असा सल्ला जमनालालजींनीं त्या तरुणांना दिला आणि ते वर्ध्यास गेले.

'राष्ट्रीय निशाण हें राष्ट्रीय मानचिन्ह होय. त्याच्या इभ्रतीसाठीं सुरू झालेल्या चळवळींत मी भाग घेणें हा माझा धर्मच आहे. या धर्माचें आचरण करतांना जीं जीं संकटें येतील, हाल भोगावे लागतील व कष्ट करावे लागतील, ते सर्व आनंदानें व शांतपणें सहन करणें हेंच माझें कर्तव्य. हें कर्तव्य पार पाडण्याची शक्ति परमात्मा मला देवो!' असे विचार जमनालालजींच्या मनांत खेळूं लागले आणि ते वर्ध्याहून नागपुरास गेले, ते सत्याग्रह करण्याच्या निर्धारानेंच.

ता. २२ एप्रिलचा दिवस उजाडला. त्या दिवशीं जमनालालजी नागपुरास जाऊन दाखल झाले. त्यांनीं सत्याग्रह-संग्रामाची सारी सिद्धता, सेनापतीच्या सूक्ष्म नजरेनें, अवलोकन केली. तरुणांचा उत्साह उतू

जात होता. तो शिस्तीच्या यंत्रांतून व्यवस्थितपणें सरकारवर लोटणें हें कार्य अवघड होतें. जनतेंत उत्साह उत्पन्न करणें जितकें कठीण, त्याहून त्याचें नियमन व नियोजन करणें अधिक कठीण. पण ती बिकट जबाबदारी जमनालालजींनीं आपल्या शिरावर घेतली.

संध्याकाळीं सार्वजनिक सभा भरली. तिला हजारों लोक जमले. सर्व सभा चैतन्यानें थराहून गेली. आपल्या राष्ट्रध्वजाची शान संभाळण्यासाठीं जान देण्याची स्फूर्ति श्रोतृवर्गामध्यें सळसळत होती. पण जमनालालजींचें भाषण, अथांग गंगाजलाप्रमाणें, प्रशांत पण प्रबळ होतें. ते म्हणाले, " आपल्या राष्ट्रीय निशाणाचा अपमान आपण कधींहि सहन करणार नाहीं. त्या अपमानाचें खंडन करण्यासाठीं ता. १ मेपासून सत्याग्रह सुरू केला जाईल. या अपमानाचा कलंक धुऊन काढण्यासाठीं आपण सर्वांनीं जास्तींत जास्त कष्ट सहन करण्याची तयारी केली पाहिजे. सत्याग्रहाचें मुख्य तत्त्वच हें आहे कीं, दुसऱ्यावर प्रेम करून स्वतः कष्ट सोसावे आणि जास्तींत जास्त स्वार्थत्याग करण्यासाठीं सदा तयार असावें. "

जमनालालजींची ही रण–घोषणा सभेंत दुमदुमली-सर्व नागपूर शहरांत निनादली—अखिल देशभर एकसारखी घुमत राहिली. आणि तिचा प्रतिध्वनि उमटला प्रत्यक्ष कृतीचें रूपानें. प्रांताप्रांतांतील राष्ट्रप्रेमी तरुण स्वयंसेवक म्हणून नागपुराकडे लोटूं लागले. राष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून थेंबाथेंबानें जमणाऱ्या सत्याग्रहींचें सरोवर बनलें तें नागपूर !

ता. १ मेचा दिवस उजाडला, फक्त १० सत्याग्रही तरुण हातांत तिरंगी झेंडा घेऊन 'असहयोगाश्रमांतून' योद्ध्यांच्या उत्साहानें निघाले. " सारे जहाँसे अच्छा हिंदोस्तां हमारा. " हें स्फूर्तिदायक रणगीत गात गात ते शांति-सैनिक पुढें पुढें चालले. अवघे दहाच तरुण–आणि तेहि निःशस्त्र ! पण त्यांनीं सारें नागपूर शहर राष्ट्रप्रेमानें पेटवून दिलें. त्या पराक्रमी पथकाकडे घराघरांतून स्त्री-पुरुष आदरानें पाहूं लागले.

रस्त्यारस्त्यावर हजारों लोक जमून राष्ट्रध्वजाचा जयजयकार करूं लागले. अशी ही मिरवणूक तीन मैल चालली. वाटेंत जागजागीं या सत्याग्रही वीरांना पुष्पहार घालून त्यांची पूजा करण्यांत आली. अशा वीरोचित वैभवानें ते सत्याग्रही वीर रण-मैदानावर आले.

त्या झेंडा-चौकांतील दृश्य रोमांचकारक होतें. दहा ध्वजधारी वीर दिग्गजाप्रमाणें उभे होते. त्याचेमागें दोन फर्लांगावर दुसऱ्या दहा वीरांची तुकडी सज्ज होती. त्या दोन्ही पलटणींमध्यें जमनालालजी, सेनापतीच्या अभिनिवेशानें, उभे होते. त्यांच्या पाठीमागें तीन फर्लांगांवर हजारों—हजार नागरिक जमले होते. उलट बाजूला पोलिसांचें दळ सशस्त्र खडें होतें. त्यांच्या पाठीमागें कोण होतें ? दिसत तर कोणीच नव्हतें. पण त्रिखंडांत पसरलेल्या व सूर्याला मावळूं न देणाऱ्या ब्रिटिश साम्राज्याचें पाशवी सामर्थ्य अदृश्य रूपानें तेथें उभें होतें. लाठ्या—बंदुका—तोफा—रणगाडे—विमानें—बॉम्ब—पाणबुड्या इत्यादि प्रलयंकर शस्त्र—सामर्थ्य ब्रिटिश सरकारच्या पाठीशीं होतें आणि त्यांच्याशीं कॉंग्रेसजन सामना देत होते केवळ सत्यानें—अहिंसेनें—म्हणजेच प्रेम-भावानें व आत्मक्लेशानें.

सरकारनें पहिली सलामी दिली १४४ वें कलम पुकारून. ‘ सिव्हिल लाइन ’ मध्यें, युरोपियनांच्या वस्तींत, मिरवणूक काढण्यास व पंचविसाहून अधिक माणसांची सभा भरविण्यास सरकारनें दोन महिने बंदी केली. पण ती मानतो कोण ? कायद्याचें भय झुगारून देऊन व मृत्यूची भीति जिंकून, दररोज १०।१० सत्याग्रही त्या बंदी केलेल्या भागांतच धैर्यानें, नेटानें व शिस्तीनें जाऊं लागले—पोलिसांच्या छातीस छाती भिडवूं लागले. त्यांना निरोप देण्यासाठीं १०।१०, २०।२० हजार लोक जमूं लागले. या प्रजाक्षोभाला सरकार सर्वांत जास्त भीत असे. सरकारनें सैनिक आणले, घोडेस्वार जमाविले, मॅजिस्ट्रेट उभे केले !

सरकारचा मनाई-हुकूम मोडून जे सत्याग्रही वीर तिरंगी झेंडा घेऊन पुढें जात, त्यांच्या डोक्यावर, पाठीवर, हातावर लाठ्यांचे तडाखे पोलिस देऊं लागले. निशाणाच्या काठ्यांनींहि स्वयंसेवकांना बडवूं लागले. आणि ते जमिनीवर पडतांच, बेवारशी कुत्र्याप्रमाणें, त्यांना फरफटत ओढून गटारांत फेकून देऊं लागले! हें ऐकतांच सारें राष्ट्र खवळून गेलें. सर्व राष्ट्रांतून सत्याग्रह्यांचीं पथकें नागपुरांत लोटूं लागलीं. त्या सर्वांचा सामुदायिक सत्याग्रह ता. १८ जून रोजीं करण्याचें ठरलें.

हें कळतांच सरकार बावरलें. त्यांनीं आदले दिवशींच, ता. १७ रोजीं, रात्रींच्या काळोखांत, २५० सत्याग्रहींना, झोपेंत असतांनाच, गिरफदार केलें! त्यांत स्वयंपाक करणाऱ्या लोकांनाहि पकडलें. तसेंच, त्या सत्याग्रह्यांचे सेनापति जमनालालजी यांनाहि अटक झाली. आचार्य विनोबा भावेहि पकडले गेले. सर्वांना १।१ वर्ष कैदेची शिक्षा देण्यांत आली. पण जमनालालजी हे प्रमुख. म्हणून त्यांना १॥ वर्ष सक्त मजुरी व ३००० रुपये दंड ठोठावण्यांत आला.

कोर्टांत खटला चालू असतांनाहि, जमनालालजींची धीर-गंभीर वृत्ति प्रकट झाली. सरकारी वकिलाच्या प्रश्नास ते हिंदींतून उत्तर देत होते. एकदां ते म्हणाले, "जितकी कडक शिक्षा मला देणें शक्य असेल, तितकी तुम्ही द्या."

दुभाष्यानें त्याचा अर्थ सांगितला, "इतर लोकांपेक्षां मीं मोठा अपराध केला आहे; म्हणून मला मोठी शिक्षा द्या." हें चुकीचें भाषांतर ऐकून सरकारी वकील बुचकळ्यांत पडला. त्यानें खुलासा केला, "कायद्यानुसार जास्तींत जास्त शिक्षा द्या, एवढेंच जमनालालांचें म्हणणें होतें."

"आपला आशय काय होता?" मॅजिस्ट्रेटनें विचारलें.

"दोन्हीचा अर्थ एकच!" जमनालालजींनीं शांतपणें उत्तर दिलें.

मॅजिस्ट्रेट डोळे विस्फारून त्यांचेकडे पाहूं लागला.

"परमेश्वराच्या दयेनें आणि गांधीजींसारख्या गुरुजनांच्या आशीर्वादानें, मी शांत चित्तानें व हिंमतीनें, हा कारावास सहन करूं शकेन, असा मला विश्वास वाटतो. कारागृहांतील काळ आध्यात्मिक चिंतनांत मी घालवूं इच्छितों." असें म्हणून जमनालालजींनीं सरकारकडून कोणतीहि सवलत स्वीकारली नाहीं. कष्ट सोसूनहि हिमालयाची यात्रा करणाऱ्या व बद्रिनारायणाचें दर्शन घेणाऱ्या यात्रेकरूंच्या धर्म-भावनेनेंच ते या आंदोलनांत पडले होते. त्यामुळें त्यांना हालांची पर्वा नव्हती कीं हानींची तमा नव्हती.

३००० रुपये दंड वसूल करण्यासाठीं सरकारचे पोलिस जमनालालांचे घरीं गेले आणि त्यांनीं त्यांची मोटार, बगी व ४०० रुपये असलेली पेटी जप्त केली. मोटार व बगी यांचा लिलाव सरकारनें दोनदां पुकारला. पण तो घेतो कोण? इतका देशद्रोह करतो कोण? कित्येक दिवस त्या जप्त झालेल्या वस्तु वर्ध्यासच पडून राहिल्या. शेवटीं मोटार राजकोटला पाठविण्यांत आली. तेथेंहि ती विकत घेण्यास एकहि हिंदी माणूस पुढें आला नाहीं. एका इंग्रज अधिकाऱ्यानें ती थोड्या किंमतीस घेतली.

सरकारी दडपशाही वाढत चालली, पण त्याबरोबरच जनतेची संग्रामाची शक्तीहि वाढत गेली. नागपूरचा तुरुंग भरून गेला, म्हणून अकोल्याचा तुरुंग सरकारनें उघडला. पण तोहि भरला. तुरुंगांत चक्की, अंधारकोठडी अशा क्रूर शिक्षा दिल्या गेल्या, तरी सत्याग्रहाला भरतीच येत गेली. सरदार वल्लभभाईनीं जमनालालजींची जागा घेतली. १०९ दिवस अखंड सत्याग्रह चालला. १८४८ सत्याग्रही तुरुंगात गेले. तरी नवे सत्याग्रही येतच राहिले.

त्या वेळचे कॉंग्रेसचे सरचिटणीस पं. जवाहरलाल नेहरू यांनीं जमनालालजींना तारेनें असा संदेश पाठविला कीं, 'मी नागपूरच्या

सत्याग्रह-संग्रामाकडे गौरवानें पहात आहें. अटक होणाऱ्या भाग्यवान स्वयंसेवकांमध्यें मीहि एक असावें, अशी माझी इच्छा आहे. संयुक्त प्रदेशांतून नागपूरला सत्याग्रहींचे जथे पाठविण्याचा प्रयत्न मी करीत आहे.'


जमनालालप्रभृतींना जेव्हां अटक झाली, तेव्हां जवाहरलाल नागपुरांतच होते. ते तेथील जाहीर सभेंत म्हणाले, 'नागपूरला येण्यापूर्वी येथील सत्याग्रहाचें औचित्य मला कळलें नव्हतें, त्यामुळें माझें मन खिन्न होतें. कारण देशांत दल-बंदीमुळें तुफान उठलें आहे; अशा वेळीं हा लढा कशाला? असें मला वाटे. पण येथें येतांच, मला येथें किती काम झालेलें आहे हें पाहून समाधान वाटलें. मला एकच गोष्ट समजते— ती म्हणजे काम करणें—लढाई करणें. नागपूरचें उदाहरण इतर प्रांतांनाहि अनुकरणीय आहे. सरकारच्या विरोधानें येथील संग्राम बळावतच आहे. त्याला अन्य प्रांतांची मदत जरूर मिळेल; पण ती न मिळाली तरी आपला प्रांत हा लढा चालवील अशी माझी खात्री पटली.'

जनतेचें हें विराट व अक्षय्य सामर्थ्य पाहून सरकार नमलें. त्यांनीं तडजोडीचें बोलणें केलें. आणि ता. १८ ऑगस्ट रोजीं, दुपारीं १२ वाजतां, शंभर स्वयंसेवक, हातांत तिरंगी निशाणें फडकवीत, सिव्हिल लाइनच्या निषिद्ध भागांतून विनाअटक पुढें गेले!

सत्याग्रह सिद्धीस गेला. ता. ३ सप्टेंबर रोजीं सर्व सत्याग्रही बंधमुक्त झाले. त्यांचे विजयी सेनापति जमनालालजी यांना नेण्यासाठीं तुरुंगाजवळ मोटार आलेली होती. पण ते आपल्या सैनिकांसह पायींच निघाले. ती एक भव्य मिरवणूकच निघाली. नागपूर शहरांत त्या विजयी वीरांना पंचारतींनीं ओवाळण्यांत आलें.

"देशांत चारी दिशांना निराशेचा अंधकार पसरला असतांना जमनालालजींनीं एकट्यानें त्याग व बलिदान यांचा प्रकाश पसरविला." अशीं स्तुति-सुमनें विठ्ठलभाई पटेल यांनीं उधळलीं; तर मौ. महंमदअलींनीं त्यांना तार केली—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थूलप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........



नागपूरच्या तुरुंगांतून १९२३ सालीं बंधमुक्त होऊन आलेले सत्याग्रह-सेनानी जमनालालजी यांचे स्वागतार्थ वर्धा येथें लोटलेला जन-संमर्द.

साक्षात्कारी संताचे सान्निध्यांत



'आ[illegible] [illegible] [illegible]ण महर्षींच्यासमवेत जमनालालजी, राजेंद्रप्रसाद इत्यादि.

" माझ्या बहाद्दर बनिया, खूप पराक्रम केलात. तुमच्या पायांचें चुंबन घेण्यासाठीं मी उत्सुक आहें. "

" आपल्या ध्येय-सिद्धीसाठीं कोणत्याहि प्रकारचा निस्सीम त्याग करण्याची तयारी जमनालालजींची आहे. " अशी ग्वाही देऊन श्री. राजगोपाळाचार्य यांनीं जमनालालजींच्या जीवनाची मीमांसा अशी केली कीं, " संपत्ति, उच्चपद, प्रतिष्ठा आणि महात्माजींची दुर्लभ मैत्री—हें सर्व सुख-सौभाग्य प्राप्त झालें असतांनाहि, त्यांनीं आपल्या जीवन-सरितेचा ओघ एका मिनिटांत बदलून टाकला, आणि युद्धामध्यें उडी घेऊन त्यांनीं, अत्यंत नम्र कार्यकर्त्याप्रमाणें, राष्ट्रसेवा आरंभिली. त्या राष्ट्रसेवेमुळें आमच्या राष्ट्राचें शिर उंच झालें नाहीं, असें कोण म्हणूं शकेल ? "

एक राष्ट्रीय नेता, एक त्यागी सेवक व एक विजयी सेनापति या या नात्यानें जमनालालजींचें नांव सर्व देशांत दुमदुमलें.

• • •

## ४ : जयपूरचा जय

नागपूरचा सत्याग्रह-संग्राम जमनालालजींनीं जसा यशस्वी करून दाखविला, तसाच जयपूरचा सत्याग्रह-लढाहि नम्रतापूर्ण निग्रहानें व शांततापूर्ण शौर्यानें सिद्धीस नेला. जसें राजकोट गांधीजींचें, काश्मीर नेहरूंचें; तसें जयपूर जमनालालजींचें. या एकएका संस्थानानें त्या त्या थोर नेत्यांची जणुं सत्त्वपरीक्षाच पाहिली. जन्मभूमीच्या ममत्वामुळें हे भारतीय पुढारी त्या त्या संस्थानांतील अन्याय दूर करण्यासाठीं धांवले-तेथील संस्थानी राजकारणाच्या चक्रव्यूहांत सांपडले—पण शेवटीं विजयाचा तुरा घेऊन बाहेर आले.

गांधीवादाची खुबी ती हीच. गांधीवादी माणूस कोणालाहि शरण जातो व कोणताहि अन्याय गिळतो, हा नेभळटपणाचा समज साफ खोटा आहे. तो नम्र असतो हें खरें, पण तितकाच तो निग्रही असतो. त्याची शांति व क्षमा शूरवीराची असते—प्रतिकारशाली व सामर्थ्य-शाली असते. मानव-समाजाच्या इतिहासांत जसा एकीकडे प्रतिकारशील प्रवृत्तीचा प्रवाह प्रकट झालेला आहे, तसाच साधुशील स्वभावाची

सरिताहि सदैव वहात आलेली आहे. परंतु प्रायः जे प्रतिकारशील होते, ते साधु नव्हते; आणि जे साधु होते ते प्रतिकारशील नव्हते. पण गांधीजींनीं किमया केली—आणि प्रतिकारशील साधूंची परंपरा निर्माण केली. जगाच्या इतिहासांत अभूतपूर्व कार्य गांधीजींनीं केलें तें हें कीं, अशा साधुशील प्रतिकारकांची प्रचंड सामुदायिक संघटना बांधून, राजकारणाच्या क्षेत्रांत तिला यशस्वी केलें.

नाहीं तर, पूर्वीं युरोपांतील क्वेकर पंथांतील शेंकडों त्याग-वीरांनीं, आत्मक्लेशानें, अन्यायांचें निर्दाळण केलें. आणि सत्यासाठीं प्राण देणाऱ्या व्यक्तींचीं फुटकळ उदाहरणें तर इतिहासाच्या सर्व कालखंडांत, जगाच्या सर्व भागांत, हिऱ्याप्रमाणें चमकत आहेत. प्रल्हाद, हरिश्चंद्र, मीरा, सॉक्रेटीस, येशू ख्रिस्त—अशा कैक विभूतींनीं सत्यासाठीं आपले प्राण दिले. पण सामुदायिक अन्यायाचें निराकरण आत्मक्लेशानें करण्यासाठीं शांततापूर्ण लढा देणारी प्रचंड संघटना उभारण्याचें श्रेय केवळ गांधीजींचेंच ! अशा एकेका सत्याग्रह-यज्ञांतूनच, राजेन्द्रबाबू, वल्लभभाई, महादेवभाई—वगैरे नररत्नें पुढें आलीं. धार नसेल तर तरवार नाहीं, त्याप्रमाणें प्रतिकार नसेल तर गांधीवाद नाहीं. फक्त तो प्रतिकार शांततेचा, प्रेमभावाचा व आत्मक्लेशाचा असेल. पण जेथें जेथें म्हणून पाप असेल, जुलूम असेल; तेथें गांधीवादी निर्भयतेनें व प्राणपणानें झगडल्याशिवाय राहणार नाहीं.

हा सत्याग्रहाचा लढा कसा उद्भवतो—कसा चालतो—आणि अखेरीस कसा फत्ते होतो, याचा उत्कृष्ट नमुना वल्लभभाईनीं जसा बार्डोलींत दाखविला, तसाच जमनालालजींनीं जयपूरमध्यें निदर्शनास आणला. या दोन्हीं गांधीभक्तांनीं, गांधीजींच्या नेतृत्वाविना, हे दोन्ही लढे नमुनेदार रीतीनें यशास पोंचविले हें विशेष.

नागपूरचा झेंडा-सत्याग्रह समाप्त झाल्यानंतर एके दिवशीं कांहीं कामानिमित्त जमनालालजी नागपुरास गेले होते. वाटेंत त्यांचे कानीं

आलें कीं, तेथें हिंदु-मुस्लिमांचा दंगा सुरू आहे. तें ऐकून त्यांना मोठा धक्का बसला. पण त्यामुळें भिऊन ते परत गेले नाहींत; उलट ज्या ठिकाणीं दंगा चालू होता, तेथें ते बेडरपणें गेले. तेथें हिंदुमुसलमानांची मारामारी जोरांत चालू होती. ती पाहतांच ते टांग्यांतून खालीं उतरले. उतरतांच त्यांनीं जखमी लोकांना आपल्या टांग्यांतून दवाखान्यांत पाठविलें. इतर जखमी लोकांची सोय करण्यासाठीं आणखीहि व्यवस्था त्यांनीं केली. नंतर लगेच ते त्या दंगलींत घुसले आणि दोन्ही पक्षांना शांततेचा उपदेश करूं लागले.

"आपण येथून निघून जा." असा मित्रा सल्ला कांहीं हिंदु-मुसलमानांनीं जमनालालजींना दिला. पण ते तेथून हालले नाहींत. त्यांचें चित्त अणुमात्र डगमगलें नाहीं. दगडांचा वर्षाव दोन्ही दिशांकडून चालू होता. एक दगड जमनालालजींवर आदळला व त्यांच्या हाताला मोठी जखम करून गेला. त्यामुळें त्यांना दवाखान्यांत नेण्यांत आलें व त्यांच्या हाताला टांके घालण्यांत आले. त्यांची सहनशक्ति इतकी मोठी कीं, क्लोरोफॉर्म न देतांहि, टांके घालण्याचें काम चालू असतांना, ते शांत होते. पुढें एकदां त्यांच्या पायावर विजेचे उपचार चालू असतांना, डॉक्टरच्या चुकीमुळें, चांगला मांसल भागहि जाळला गेला. तरी हूं नाहीं कीं चूं नाहीं! फार काय, त्या डॉक्टरवरहि राग नाहीं. शांति व क्षमा या देवतांचे ते सच्चे पुजारी होते.

नागपूरच्या हिंदु-मुसलमान दंग्यांतील जमनालालजींची ही निर्भय कामगिरी ऐकून सर्वजण त्यांना धन्यवाद देऊं लागले. काशीचे बाबू भगवानदास यांनीं तर आपल्या पत्रांत लिहिलें कीं, "महात्माजींच्या सिद्धान्तांचे आपण पक्के अनुयायी आहांत. सर्व सच्चे हिंदु, सच्चे कॉंग्रेस-वादी आणि सच्चे देशसेवक—या सर्वांचें शिर आपण उंच केलें आहे. आपल्याला मी अंतःकरणपूर्वक नमस्कार करीत आहें."

आपल्या पुत्राचा—आपल्या शिष्याचा—हा पराक्रम व हा गौरव ऐकून गांधीजींना काय वाटलें ? या सर्व लौकिकी भाषेच्या व भावनेच्या वर, ध्येयवादाच्या उच्च अवकाशांत, त्यांचें मन सदैव संचार करीत असे. मृत्यूचें भय जो प्याला, त्याला हाताची जखम काय वाटणार ? गांधीजींनीं जमनालालजींना एवढेंच लिहिलें कीं, "तुम्हांला जखम झाली याचें मला थोडेंसुद्धां दुःख नाहीं. मी तर असें मानतों कीं, आपल्यासारख्या पुष्कळ लोकांना स्वतःचें बलिदान करणें भाग पडेल. समाजांत द्वेषाचें विष इतकें फैलावलें आहे आणि अप्रामाणिकपणा इतका पसरला आहे कीं, कांहीं शुद्ध व्यक्तींचें बलिदान झाल्याशिवाय या आपत्तींतून आपली सुटका होणार नाहीं. शक्य तर दंग्याचें मूळ कारण शोधून काढावें. तें शोधून काढून दूर करण्याइतकें समंजस हिंदु किंवा मुसलमान कोणीच नाहींत काय ?" एक कठोर ध्येयवादी नेता हे बोलत होता—वत्सल पित्याचे हे प्रेमळ शब्द नव्हेत.

मानवी मनांतील दैवी अंश चेतविण्याचें कार्य गांधीजीसारखे महात्मे करीत असतात. जमनालालजींच्या मानवी जीवनांतील पाशवी भाग कमी कमी करीत शून्यावस्थेस नेऊन दैवी अंश मात्र उत्तरोत्तर वाढविण्याचें कार्य, पित्याच्या आस्थेनें, गांधीजी एकसारखे करीत होते. वरील पत्र हें त्याचेंच एक उदाहरण. अधिकाधिक त्यागाला व सेवेला प्रवृत्त करणारे ते त्यांचे गुरु होते. त्यांच्या उपदेशानें व उदाहरणानें अभय, सत्त्व-संशुद्धि, ज्ञान, दान, अहिंसा, सत्य इत्यादि दैवी संपत्ति जमनालालजींजवळ सांचत-वाढत गेली. तिचा पूर्ण आविष्कार झाला जयपूरच्या सत्याग्रहांत.

१९३८ सालीं जयपूर संस्थानांत एक अकारण झगडा उत्पन्न झाला. जयपूरच्या महाराजांच्या आधिपत्याखालीं सीकर संस्थान होतें. तेथील रावराजाशीं जयपूरच्या महाराजांचा जुनापुराणा तंटा होता. पण त्या

तंट्याला एक नवें निमित्त सांपडलें. तें म्हणजे सीकरच्या राजपुत्राला शिक्षणासाठीं इंग्लंडला पाठवावें कीं नाहीं हा प्रश्न! त्यावरून वाद वाढतां वाढतां या दोन्ही संस्थानांनीं खाशी लढाईची जंगी तयारी केली. ता. ४ जुलै १९३८ रोजीं जयपूरच्या पोलिसांनीं आगगाडीवर गोळीबार करून सीकरच्या रजपुतांचें रक्त सांडलें. त्यांत कांहीं बालकेंहि जखमी झालीं. कांहीं रजपूत तर प्राणासहि मुकले. त्यामुळें सीकरमधील सारे रजपूत व सारे जाट हे खवळून उठले. भयंकर दंगा होण्याचें संकट जमनालालजींना दिसून आलें. तें टाळण्यासाठीं ते प्राण देण्यासहि तयार झाले.

जयपूर संस्थानशीं जमनालालजींचा पूर्वींपासून संबंध. त्यांचा जन्म राजस्थानांतला. राजस्थानांत खादीचा प्रचार करण्यासाठीं त्यांनीं अनेकवार संचार केलेला. तेथें त्यांनीं सेवा-समिति, पाठशाला, खादी-केंद्रें इत्यादि संस्था स्थापन केल्या होत्या. १९२४ सालीं बिकानेर संस्थानांत खादीसाठीं त्यांनीं दौरा काढला असतांना त्यांना तेथील अधिकाऱ्यांनीं मनाई केली. त्या वेळीं पं. मालवीय यांनीं बिकानेरच्या नरेशाची कानउघाडणी करून सांगितलें कीं, "जमनालालजी हे सेवाभावी गृहस्थ आहेत आणि त्यांचें चरित्र आदरणीय आहे. ते आपल्या संस्थानांत आल्यानें दुष्परिणाम कांहींच होणार नाहीं. शुभ फलच दिसून येईल."

जयपूरमधील निष्कारण दंगल थांबावी म्हणून जमनालालजींनीं सीकरच्या प्रजाजनांना शांतीचा उपदेश केला. पण ती शांति किती सामर्थ्यशाली होती हें त्यांच्या पत्रकावरून स्पष्ट होत होतें. त्या पत्रकांत त्यांनीं म्हटलें होतें कीं, "सीकरच्या नागरिकांनीं माझें म्हणणें ऐकावें. त्यांत बिलकूल धोका नाहीं. मी व प्रजामंडळ यांच्यावर कोणी संकट आणलें, तर त्यांच्याशीं सामना करणें हें आम्ही मोठ्या भाग्याचें समजूं. शांतिमय सत्याग्रहाचें आंदोलन सुरू करण्यास मीच तेव्हां सांगेन. आणि त्या आंदोलनांतील सैनिकांमध्यें सर्वांत पहिलें माझें नांव मी नोंदवीन, असें वचन मी आपल्याला देतों."

८८२९.

या शक्तिशाली शांति–मंत्राच्या सीकरच्या लोकांवर जादूसारखा परिणाम झाला. ते शांत राहिले. त्यामुळें जमनालालजींना जयपूर दरबारशीं मध्यस्थी करणें सोपें गेलें. दोन्ही संस्थानांत समेट झाला. सर्वत्र आनंदी-आनंद झाला.

पण सत्तेनें आंधळे झालेल्या जयपूरच्या महाराजांनीं तो समेट मोडून टाकला. गांधीजीसारख्या युगपुरुषाशीं केलेला करारहि राजकोटच्या हिंदी दिवाणानें पायाखालीं बिनदिक्कत तुडविला, मग जयपूरचा इंग्रज दिवाण सत्याला, शांतीला व समेटाला कसा मान देईल ? हे गांधीवादी कार्यकर्ते आपल्या डोक्यावर बसत आहेत आणि आपल्या जनतेवर आपल्यापेक्षां अधिक सत्ता गाजवीत आहेत, याचें वैषम्य व दुःख जयपूरच्या इंग्रज दिवाणाला जाळूं लागलें. आपल्या संस्थानांत जमनालालजींचें वजन वाढूं नये म्हणून, कांहींहि कारण नसतांना, त्यांच्यावर प्रवेश-बंदीची नोटीस बजावण्यांत आली !

कारण काय ? तर "तुम्ही आमच्या संस्थानांत प्रवेश केल्यास शांततेचा भंग होईल." हें कोण सांगतो ? तर शस्त्रप्रेमी व साम्राज्य-लोभी इंग्रज दिवाण ! आणि कोणाला ? तर शांतिप्रेमी व सर्वोदयवादी सेवाव्रती जमनालालजींना ! अशा किती तरी विसंगति पारतंत्र्याच्या अनैसर्गिक वातावरणांत निर्माण होत असत.

जयपूर संस्थानांतील 'प्रजामंडळ' संस्था १९३१ सालीं स्थापन झाली, पण तिला विस्तृत व व्यवस्थित स्वरूप प्राप्त झालें १९३६ मध्यें. 'जीवन–कुटीर' या संस्थेच्या उत्सव–प्रसंगीं जमनालालजी अध्यक्ष होते. त्या वेळीं जयपूरच्या पुढाऱ्यांनीं एकत्र येऊन प्रजामंडळास संघटित व विशाल स्वरूप दिलें. त्याचें फल १९३८ च्या लढ्यांत चांगलेंच दिसून आलें.

दरबारानें ता. ३० मार्च १९३८ रोजीं सार्वजनिक संस्थांना प्रति-बंध करणारा हुकूम काढला. जनतेच्या नागरी हक्कावर ती गदा होती.

तथापि 'प्रजामंडळानें' आपलें नांव नोंदविण्यासाठीं अर्ज केला. अशी मान्यता मंडळाला तत्काळ देण्यांत येईल, असें आश्वासन जयपूर दरबारनें दिलेलें होतें.

मंडळाचें पहिलें वार्षिक अधिवेशन ता. ८ व ९ मे १९३८ रोजीं जमनालालांच्या अध्यक्षतेखालीं भरलें. मंडळाचीं नित्याचीं कामें चालू होतीं.

ता. ३० डिसेंबर १९३८ चा दिवस. जयपूर येथें प्रजामंडळाच्या कार्यसमितीची बैठक होती. त्यासाठीं जमनालालजी तिकडे चालले होते. एका स्टेशनावर ते फ्रॅंटियर मेलमधून खालीं उतरले आणि जयपूरला जाणाऱ्या गाडीची वाट पाहूं लागले. तेवढ्यांत जयपूर संस्थानचे इंग्रज पोलिस–प्रमुख मि. यंग यांनीं त्यांना जयपूर राज्याच्या हद्दींत प्रवेश करण्यास मनाई करणारा दरबारचा हुकूम दाखविला. तो पाहून जमनालाल चकित झाले. किंचित् थट्टेनें ते म्हणाले, "आपल्या दिवाणांच्या दृष्टीनें मी इतका भयंकर माणूस बनलों आहें काय?" नंतर गंभीर स्वरांत ते म्हणाले, "मी जयपूर संस्थानचा रहिवासी आहें. माझें जन्मस्थान तेथें आहे. आपले दिवाण तर परदेशाहून आलेले. त्यांना मला मनाई करण्याचा काय हक्क आहे?" असें बोलतां बोलतां जमनालालजींचा स्वर चढत गेला आणि चेहरा लाल झाला.

"कसला हा खेळ चालला आहे? मी हा मनाई–हुकूम मानूं शकत नाहीं! तो मी तोडणारच!" जमनालालजींचा सत्याग्रही आत्मा खवळून गरजला. त्यांचें तें रौद्र स्वरूप पाहून यंगसाहेब लटपटूं लागले आणि ते आर्जवी स्वरांत विनवूं लागले, "माझी आपल्याला अशी विनंति आहे कीं, आपण मला थोडी सवड द्यावी, म्हणजे मी वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं वाटाघाटी करून हा हुकूम परत घ्यावयास लावीन. तो हुकूम चांगला आहे असें मलाहि वाटत नाहीं."

जमनालालजींनीं तत्काळ उत्तर दिलें, "हुकूम परत घेण्याचें आश्वासन तुम्ही कोणत्या आधारावर मला देतां ? मुद्दाम संघर्ष निर्माण करण्यासाठीं ही खोडी जाणून बुजून केलेली आहे. ही मनाई मला व्यक्तीला केलेली नाहीं. हें आव्हान प्रजामंडळास आहे."

तरी यंगसाहेब अजीजीनें सांगतच होते, "आपण असें समजूं नका. हा हुकूम लवकरच परत घेतला जाईल अशी ग्वाही मी आपणांस देतों."

परंतु जमनालालजींना परिस्थितीचें अचूक ज्ञान झटकन होई. ते आपल्या एका सहकाऱ्याला उद्देशून म्हणाले, "आज असो वा उद्यां असो, आपल्याला या संकुचित वृत्तीच्या दरबारी अधिकाऱ्याशीं लढणें भागच आहे. परंतु तें सर्व करण्यापूर्वीं गांधीजींचा सल्ला घेणें जरूर आहे. तो घेतल्याशिवाय मी लढ्यांत पडणें ठीक नाहीं. म्हणून उद्यां आम्ही दिल्ली येथें एकत्र बसून विचार करूं. तुम्ही जयपूरला जाऊन तेथील पुढाऱ्यांना हा सारा प्रकार निवेदन करा." कायदेभंग करण्याचें धैर्य जमनालालजींच्या अंगीं पूर्णपणें होतें. परंतु तितकाच संयमहि त्यांचे ठायीं होता. म्हणून संग्रामाची सिद्धता मनांत ठेवून ते दिल्लीस गांधीजी-प्रभृतींचा सल्ला घेण्यासाठीं गेले. एकट्यानें तत्काळ कायदा मोडण्या-पेक्षां थोड्या काळानें, संघटित लढ्याचें नेतृत्व स्वीकारण्याचा त्यांनीं जो निश्चय केला, तो त्यांच्या नेतेपणाचा पुरावाच होय.

जयपूरचे दिवाण सर बीचम सेंट जॉन हे इंग्रज गृहस्थ होते. ते अस्सल नोकरशहा होते. त्यांना जमनालालांच्या बाबतींत भेटण्यासाठीं राजकोटचे एक बॅरिस्टर श्री. चुडगर हे गेले होते. त्यांच्याशीं बोलतांना या इंग्रज दिवाणानें जो उद्दामपणा दाखविला तो कांहीं विलक्षणच !

"जमनालाल हे शांतताप्रेमी गृहस्थ आहेत आणि ते जयपूर संस्थानांत जाणार आहेत, ते केवळ आपल्या दुष्काळग्रस्त बांधवांची सेवा करण्यासाठींच." असा निर्वाळा चुडगरांनीं दिला व त्यांचेवरील प्रवेश-

बंदीचा हुकूम रद्द करण्याची विनंती केली. तेव्हां हे इंग्रज-बहादुर गुरगुरले,

"हें पहा, कोणत्याहि निमित्तानें काँग्रेसच्या लोकांचा संपर्क आमच्या प्रजेला होतां कामा नये. म्हणून हा मनाई-हुकूम कायमच राहील. तो जमनालालांनीं तोडला तर त्यामुळें जी परिस्थिति निर्माण होईल, तिला तोंड देण्यास मी समर्थ आहें. अहिंसापूर्वक लढा खेळून क्रांति करण्यासाठीं काँग्रेसवाले सज्ज झालेले आहेत. पण अहिंसा हीहि हिंसेइतकीच—किंबहुना,तिच्याहून अधिक प्रबळ अशी—शक्ति आहे. इंग्रज लोकांच्या अंतःकरणांतील भूतदयेच्या भावनेशीं हिंदी लोक खेळत आहेत. पण समजा, हिंदुस्थानांत इंग्रजाऐवजीं जपानी असता, हिटलर असता, तर तुमच्या अहिंसेचा इतका विजय कधींच झाला नसता. माझा तर असा ठाम निश्चय आहे कीं, अहिंसेला उत्तर हिंसेनेंच दिलें पाहिजे. जयपूर संस्थानांत तुम्हीं पूर्ण अहिंसेनें चळवळ चालविली, तरी तिला माझें उत्तर एकच राहील—तें म्हणजे मशीनगन !"

गांधीजींच्या अहिंसक लढ्याचें सामर्थ्य परक्या इंग्रज अधिकाऱ्यानेंहि कसें अचूक ओळखलें होतें हें यावरून दिसून येतें. मात्र त्यानें दाखविलेलें हिटलरचें भय व्यर्थ होय. कारण डायर कांहीं हिटलरपेक्षां कमी क्रूर नव्हता. आणि हिटलर झाला तरी मानवच होता. सत्याग्रहाची आंच थोडी अधिक लागली असती म्हणजे त्याचें पाषाणहृदयाहि वितळलें असतें. सत्याग्रहाच्या भट्टींत वितळणार नाहीं असें मानवी हृदय विधात्यानें निर्मिलेलेंच नाहीं. फक्त तें हृदय जितकें कमी–अधिक कठिण असेल, तितकी कमी–अधिक उष्णता सत्याग्रहानें उत्पन्न करावयाची असते.

खुद्द या जयपुरी दिवाणानें आपल्या या साऱ्या मुलाखतीचा इन्कारच केला. गांधीजींनीं श्री. चुडगरांचें पत्र पडताळा पाहण्यासाठीं त्याचेकडे

पाठविलें होतें. पण त्या दिवाणानें असत्य बोलून आपल्या कानावर हात ठेवले, आणि चुडगर यांनीं दिलेला वृत्तान्त प्रसिद्ध करूं नका अशी विनंति केली. पण गांधीजींचें गोड गिरमीट एकदां सुरू झालें कीं, शेवटपर्यंत जावयाचें. त्यांनीं त्या दिवाणाला छेडलें, "तुमच्या दृष्टीनें मुलाखतीचा खरा वृत्तान्त काय आहे?"

खरा वृत्तान्त म्हणून आपली बाजू देण्याचें त्या दिवाणानें टाळलें. तेव्हां गांधीजींनीं सारा पत्रव्यवहार ता. ११ फेब्रुवारी १९३९ च्या 'हरिजन' मध्यें प्रसिद्ध केला, आणि त्यांत असेंहि लिहिलें कीं, "जमनालालजींना व प्रजामंडळाला चिरडून टाकण्याची प्रतिज्ञा ब्रिटिश दिवाणानें केली आहे असें म्हणतात." या सर्व प्रकरणाचीं पत्रें गांधीजींनीं दिल्लीच्या वेशीवरहि टांगलीं.पण व्हाइसरॉयानेंहि कांहीं न्याय दिला नाहीं.

पुढें ता. ५ जानेवारी १९३९ रोजीं बार्डोली येथें जयपूरचे पुढारी जमले. त्यांनीं आपलें असें स्वच्छ मत दिलें कीं, "संस्थानांत लढाई लढणें जरूर आहे. त्यासाठीं आमची पुरेपूर तयारी झालेली आहे. आमच्या सत्याग्रहाचे सेनापति जमनालालजींनीं व्हावें. त्यांची आज्ञा आम्ही पूर्णपणें पाळूं."

या चर्चेनंतर ते सारे पुढारी गांधीजींच्या झोपडीकडे गेले. त्यांना सत्याग्रहाचा विचार योग्यच वाटला. त्यांनीं त्या संस्थानी लढ्याला आपला आशीर्वाद दिला. "प्रजामंडळाच्या कार्यसमितीचे किमान सहा सभासद तरी माझ्यापाठोपाठ तुरुंगांत जाण्यास तयार असतील, तर सत्याग्रहाची जबाबदारी स्वीकारण्यास माझी हरकत नाहीं." अशी अट जमनालालजींनीं घातली होती, तीहि गांधीजींना उचित वाटली. ती अट जयपूरच्या पुढाऱ्यांनीं मान्य केली.

त्या पुढाऱ्यांना सत्याग्रहाच्या संग्रामाचा अनुभव नव्हता. जमनालालजींवरील जबाबदारी अधिकच वाढली. तें ओळखून गांधीजींनीं

सल्ला दिला कीं, "सरदार वल्लभभाईंचा सल्ला घ्या. त्यांनीं कित्येक सत्याग्रह-संग्रामांची संघटना केलेली आहे."

ते सर्व पुढारी सरदारांच्या झोपडींत गेले. तेथें सरदार एका चटईवर बसले होते. त्यांना नमस्कार करून जयपूरचे पुढारी दवत्या आवाजांत म्हणूं लागले, "आम्ही जयपुरांत सत्याग्रह सुरू करणार आहों, त्यासाठीं बापूजींचा सल्ला घ्यावयास गेलों होतों." हे त्यांचे शब्द पुरे होतात न होतात तोंच सरदार तीव्र स्वरानें म्हणाले, "तुम्हांला सत्याग्रह करायचा आहे कीं नाहीं? करायचा असेल तर बापूंना कशाला विचारायचें? करायचा नसेल तर मात्र त्यांचेकडे जा. म्हणजे त्यांचें नांव घेऊन तुम्ही लोकांना सांगूं शकाल, आम्ही तर सत्याग्रह करूं इच्छित होतों, परंतु बापूंनीं बंदी केली, म्हणून थांबलों. आम्ही काय करणार? मला जेव्हां कांहीं काम करावयाचें असतें तेव्हां मी बापूंना विचारावयास मुळींच जात नाहीं." वल्लभभाईंची ती भीम-गर्जना ऐकून जयपूरचे पुढारी गडबडले. पण जमनालालजींनीं त्यांची समजूत घातली कीं, "सत्याग्रहाचा हा निश्चय सर्वांनीं केलाच आहे. आणि त्याला बापूंचा आशीर्वादहि मिळविला आहे. फक्त या शांति-युद्धांत व्यूहरचना कशी करावी या बाबतींत आपला सल्ला घेण्यासाठीं आम्ही आलों आहोंत."

हें ऐकून वल्लभभाई शांत झाले, संतुष्ट झाले. "क्रियेवीण वाचाळतेचा" वल्लभभाईंना मोठा तिटकारा. येथें क्रिया होणार असें दिसतांच, ते कसलेल्या सेनापतीप्रमाणें, भावी संग्रामाची सिद्धता कशी करावी हें तपशीलवार सांगूं लागले.

दरबारनें ता. १२ जानेवारी १९३९ रोजीं आपल्या गॅझेटमध्यें असें प्रसिद्ध केलें कीं, 'प्रजा-मंडळाला मान्यता मिळणार नाहीं, आणि त्याला आपलें कार्य पुढें चालू ठेवतां येणार नाहीं.' त्यामुळें साहजिकच जनतेनें नागरी हक्कासाठीं सत्याग्रह सुरू केला. सभा-स्वातंत्र्याची मागणी ही प्रमुख होती.

ता. १ फेब्रुवारी १९३९ चा दिवस उजाडला. जयपूर संस्थानांतील सत्याग्रहाचें रणशिंग जमनालालजींनीं फुंकलें. दरबारचा हुकूम पायाखालीं तुडवून त्यांनीं जयपूरच्या हद्दींत प्रवेश केला.

संस्थानी पोलिसांनीं त्यांना पकडलें, आपल्या मोटारींत घातलें आणि संस्थानच्या हद्दीबाहेर नेऊन सोडलें. पण जमनालालजी परत संस्थानी हद्दींत आले. पुनः त्यांना पोलिसांनीं पकडलें. पुनः ते परत गेले. असें दोनतीनदां झालें. तेव्हां जमनालालजींनीं असा निश्चय केला कीं, जोंपर्यंत सरकार आपल्याला पकडींत नाहीं, तोंपर्यंत आपण अन्नग्रहण करावयाचें नाहीं. केवळ गाजरें खाऊन ते राहूं लागले. पोलिसांच्या मोटारींत बसण्यास ते विरोध करूं लागले. तेव्हां पोलिसांनीं जबरदस्तीनें त्यांना आपल्या मोटारींत घातलें. त्या वेळीं ओढाताण झाली. त्या ओढा-ताणींत जमनालालजींचा सदरा फाटला आणि त्यांच्या शरीरास जखम पण झाली. तरी जमनालालजींचा सत्याग्रह चालूच होता. तो पाहून पोलिस–अधिकाऱ्यानें त्यांना अटक केली आणि जयपूरपासून ४० मैलांवर असणाऱ्या ‘ मोरागांव ’ येथें स्थानबद्ध केलें.

तें गांव डोंगरी किल्ल्यासारखें आहे. तेथें त्यांना एकान्तवासाचीच शिक्षा मिळाल्यासारखें झालें. ते तेथें नजरबंद असले, तरी जवळच्या गांवांत दररोज १०।१२ मैल फिरावयास त्यांना जाऊं देत. तेथील गांवकऱ्यांशीं ते सुखदुःखाच्या गोष्टी बोलत आणि त्यांची सेवा करीत.

या गांवाभोंवतीं दाट जंगल होतें. आणि त्या जंगलांत वाघ होते. त्यांचा गांवकऱ्यांना मोठा उपद्रव होई. पण वाघाला आत्मरक्षणासाठींहि ठार मारण्यास मनाई होती. कारण महाराजांना शिकारीचा भारी षोक ! त्यासाठीं वाघ जिवंत राहावयास हवेत ना ? नाहीं तर महाराजसाहेब मारणार कोणाला ? यासंबंधीं खुद्द महाराजांकडेच जमनालालजींनीं गांवकऱ्यांची तक्रार एका पत्रानें कळविली. तें सर्वच

पत्र भावनापूर्ण व तेजस्वी आहे. तत्त्वनिष्ठ नेत्याची भूमिकाहि त्या पत्रांत प्रकट झाली आहे. तें पत्र असें—

" प्रिय महाराजसाहेब,

आपण कराची येथें वृत्तपत्र-प्रतिनिधींना जी मुलाखत दिली, ती मीं वाचली. तिच्यामुळें आपल्या प्रजेला कांहीं लाभ होईल व समाधान मिळेल असें मला वाटत नाहीं. आपल्या प्रजेला पूर्णपणें विश्वासांत घेणें आणि तिचें दुःख दूर करणें हें आपलें पहिलें कर्तव्य होय. मी आपल्याला हें स्वच्छपणें सांगूं इच्छितों कीं, आपलें सुख प्रजेच्या सुखांत आहे व आपलें दुःख प्रजेच्या दुःखांत आहे. आपण असें जाहीर केलें पाहिजे कीं, 'माझ्या प्रजेचें दुःख दूर करण्यासाठीं मी माझ्या सुखाचाहि त्याग करण्यास तयार आहें.' असें जाहीर करून त्याप्रमाणें प्रत्यक्ष अंमल आपण चालू केला तर आपल्या संस्थानांत खरीखुरी शांति निर्माण होईल, असा मला विश्वास वाटतो. कायद्याच्या व तोफा-बंदुकींच्या साहाय्यानें जनतेचें हृदय जिंकणें अशक्य आहे. "

प्रजा-रंजनाचा हा उपदेश कोण, कोणाला करीत होतें? सामान्य कैदी राजाला उद्देशून असें पत्र कधीं लिहील काय? फक्त ध्येयवादी सत्याग्रहीच, स्वतः बद्ध असतांना व क्लेश भोगीत असतांनाहि, सिंहासनावर बसलेल्या राजामहाराजाला अशी राजनीति शिकवूं शकतो. त्याच उच्च भूमिकेवरून जमनालालजी आपल्या संस्थानाधीशांना जागे करण्यासाठीं जगांतील दाखले देतात—

" परदेशांतील परिस्थिति आपण जाणतच आहांत. हिटलर किंवा मुसोलिनी यांनीं जर आपल्या प्रजेचें मन मोडलें असतें व त्यांची सेवा रात्रंदिवस केली नसती, तर तेथले लोक त्यांच्यामागें वेड्यासारखे धांवत गेले नसते. ब्रिटिश सरकारला रशियाचा मोठा तिटकारा, पण आज त्याच्याशींच समेट करण्यासाठीं ते किती आतुर झालेले आहेत! याच

रशियामध्यें, केवळ बादशाहाचीच नव्हे, तर त्याच्या सर्व परिवाराचीहि कत्तल करण्यांत आली. ”

राजकीय इतिहासाचें असें झणझणीत अंजन महाराजांच्या डोळ्यांत घालून जमनालालजींनीं आपल्या पत्रांत वाघांचा तात्कालिक प्रश्न उपस्थित केला. त्यांनीं निर्भयपणें महाराजांना लिहिलें,

“ एका हिंस्र वाघाला आपण ठार केलें हें ऐकून मला थोडा आनंद वाटला. पण त्या वाघानें एका खेडुताला ठार केलें होतें, हें कळल्यामुळें मला फार दुःख झालें. आपल्या गैरहजेरीमध्यें, आपल्या असहाय प्रजेची कशी दुर्दशा होते याचा आपण विचार कराल, तर आपलें हृदय द्रवल्याशिवाय राहणार नाहीं. अशा जंगलच्या कायद्यानें राजाचा तर विशेष फायदा कांहींच नाहीं, पण प्रजेला मात्र भीति व दुःख होत आहे; तर मग असे कायदे जारी ठेवण्यांत काय शहाणपणा आहे ? निदान ब्रिटिश सरकारासारखे तरी आपले कायदे करा. तसें आपण केलें, तर त्रस्त जनता आपलें आजवरचें दुःख विसरून, आपल्यावर मनापासून प्रेम करील व आपल्याला आशीर्वाद देईल, असा मला विश्वास वाटतो. ”

जमनालालजींच्या नम्र व निश्चयी, सभ्य व सावेश मनाचें स्वच्छ प्रतिबिंब या पत्रांत पडलेलें दिसतें. महाराजांना खूष करून त्यांना स्वतःसाठीं कांहीं सोयीसवलती मिळवावयाच्या नव्हत्या—किंबहुना दरबारी अधिकाऱ्यानें त्या देऊं केल्या असतां त्या त्यांनीं झिडकारल्याच.

त्यांना मुगाची डाळ अजीबात आवडत नसे. परंतु तुरुंगांत दररोज त्याच डाळीचें वरण दिलें जाई. पण कांहींहि कुरकुर न करतां निमूटपणें ते तें खात.

तुरुंगांत तूप कोठलें ? तें नसल्यानें जमनालालजी खूप अशक्त झाले. त्यांतच त्यांना श्वास झाला. उजवा पाय दुखूं लागला. त्यावर इलाज करण्यासाठीं ‘ मोरासागर ’ या गांवाहून त्यांना जयपूरजवळील

'करणावताच्या' बागेमध्यें नेण्यांत आलें. सरकारी डॉक्टरांनीं त्यांना असा सल्ला दिला कीं, आपण यूरोपला जाऊन पायावर इलाज करावेत.

हा सल्ला किती सुखाचा ! उजळ माथ्यानें स्थानबद्धतेंतून बिनशर्त सुटका आणि युरोपांतील प्रवासाची मजा—असे दोन पक्षी एका दगडानें मारतां येण्यासारखे होते. पण जमनालालजी सुखापेक्षां कर्तव्य श्रेष्ठ मानणारे होते. म्हणून त्यांनीं सच्च्या गांधी-शिष्याला शोभेशा निग्रहानें सरकारी डॉक्टरला उत्तर दिलें,

"मी येथेंच जन्मलों आणि येथेंच मरूं इच्छितों. युरोपांतील चिकित्सा गरीब लोकांना साध्य नाहीं. मग तिचा फायदा मी कसा घेऊं ? उपचारासाठीं विदेशीं जाण्यापेक्षां मी येथेंच मरण पत्करीन."

असा एक तत्त्वनिष्ठ सत्याग्रही तुरुंगांत कोंडलेला असला तरी, त्याच्या तपाच्या तेजाचे किरण बाहेर सर्वत्र पसरत असतात. त्या तेजानें उत्साहित होऊन जयपूर संस्थानांतील जवळ जवळ ५०० नागरिकांनीं सत्याग्रहांत भाग घेतला. त्यांत कांहीं स्त्रियाहि होत्या. या जनता-जागृतीचें पडसाद थेट दिल्लीपर्यंत जाऊन पोचले.

दिल्लीच्या व्हॉइसरॉयाशीं गांधीजींनीं जयपूर-प्रकरणीं वाटाघाट केली. तेव्हां व्हॉइसरॉयानें योग्य ती तजवीज करण्याचें आश्वासन दिलें. आंतून प्रजेचा सत्याग्रह व बाहेरून व्हॉइसरॉयचा आदेश—या दुहेरी दडपणामुळें जयपूरच्या महाराजांनीं समेट केला. त्यांत असें ठरलें कीं,—

(१) 'प्रजामंडळ' हें नांव कायम राहावें.

(२) प्रजामंडळाचा सभासद संस्थानाबाहेरील राजकीय संस्थेचा सभासद किंवा पदाधिकारी होऊं शकेल.

(३) प्रजामंडळाच्या चळवळींची माहिती जनतेला देण्यासाठीं भाषण-स्वातंत्र्य मिळेल.

(४) प्रजेला जबाबदार असें सरकार स्थापन करणें हें आमचें उद्दिष्ट आहे.

हा समेट म्हणजे प्रजेच्या सत्याग्रहाचा विजय होता—जमनालालजींचा वैयक्तिक गौरव होता. त्यांची मुक्तता तत्काळ झाली. त्यानंतर त्या संस्थानांत विधायक कार्याचें जाळें पसरण्याचा प्रयत्न त्यांनीं जोरानें केला. जयपूर व अजमीर येथें खादी व ग्रामोद्योग यांचीं प्रदर्शनें मोठ्या उत्साहानें भरविण्यांत आलीं.

ता. ९ ऑगस्ट १९३९ रोजीं जमनालालांची बिनशर्त सुटका झाली. आणि दोन आठवड्यांत राजकीय सभाबंदीचा १९३१ चा हुकूम रद्द करण्यांत आला. सुटकेनंतर सप्टेंबर महिन्याच्या पाहिल्या पंधरवड्यांत महाराजांच्या अनेक अधिकृत मुलाखती जमनालालांना मिळाल्या. त्यांतून अशी एक तडजोड निघाली कीं, सभाबंदीचा कायदा कायम राहील. पण त्यांत अशी दुरुस्ती करण्यांत येईल कीं, त्यामुळें कोणत्याहि संस्थेला आपलें नांव नोंदविण्याची गरज राहणार नाहीं. या तडजोडीची माहिती देणारें पत्रक जमनालालांनीं ता. १० सप्टेंबर १९३९ रोजीं काढलें.

सत्याग्रहाची संजीवनी विद्या गांधीजींना आफ्रिकेंत सांपडली. चंपारण्यांत तिचा प्रभाव दिसून आला.खेडा—बार्डोलींत तिचा गुण आला, तसाच जयपूर संस्थानांतहि. जमनालालजींच्या हस्तें त्या संजीवनी विद्येचा उपयोग तेथील प्रजाजनांना झाला.

▲

एकाच गुलाबाच्या झाडाला लाल, पांढरा, पिवळा, निळा—अशा चार रंगांचीं फुलें यावींत; त्याप्रमाणें जमनालालजींच्या सार्वजनिक जीवनाचीं प्रमुख चार अंगें होतीं. तीं म्हणजे स्वातंत्र्य—आंदोलन, खादी, हिंदी आदि विधायक कार्यें, देशी संस्थानांतील स्वराज्याची चळवळ आणि आपल्या मारवाडी समाजांत शिक्षणाचा प्रसार करून व पडदा, बालविवाह इत्यादि रूढि नष्ट करून होणारी समाज—सुधारणा.

यांपैकीं संस्थानी चळवळीसाठीं त्यांनीं प्रत्यक्ष देहदंडहि सोसला. जयपूर हें तर त्यांचेंच संस्थान. "मी वर्ध्याला राहिलों किंवा मुंबईला असलों, तरी मी जयपूरचाच रहिवासी." असें ते म्हणत. त्या

आपल्या संस्थानांत प्रवेश करण्यास जयपूरच्या महाराजांनीं मनाई केली, तेव्हां त्यांनीं कायदेभंग केला, तुरुंगवास सोसला व जय मिळविला.

याशिवाय इतर संस्थानांमध्येंहि प्रजामंडळें स्थापून, लोकांत जागृति करून, स्वराज्याची चळवळ ते चालवीत. हैद्राबाद, भरतपूर, अलवार, देवास, धोलपूर, उदेपूर इत्यादि संस्थानांच्या महाराजांशीं व त्यांच्या दिवाणाशीं त्यांचा सतत पत्रव्यवहार चाले. त्यांत त्यांचें स्वराज्यावरील प्रेम, जनतेवरील भक्ति, सत्याग्रहावरील निष्ठा आणि मुख्य म्हणजे बाणेदार स्वाभिमान—हे गुण ठायीं ठायीं प्रकट होतात. त्यांची भाषा जितकी नम्र, तितकीच निश्चयी असे.

१९३८ सालीं हैद्राबाद संस्थानचे दिवाण सर अकबर हैदरी होते. ते हिंदुस्थानांत काँग्रेसच्या नेत्यांशीं गोडीगुलाबीनें वागत व उदार विचार व्यक्त करीत. परंतु हैद्राबादला गेले कीं, निजामाच्या पिंजऱ्यांत सांपडत, आणि मग आपलीं सारीं आश्वासनें विसरून जात.

अशाच एका प्रसंगीं, ता. १५ नोव्हेंबर १९३८ रोजीं, जमनालालजींनीं हैदरींना एक विस्तृत पत्र लिहिलें. त्याची भाषा ठाम व विचार स्पष्ट आहेत. त्यांत ते लिहितात,

“ आपण हैद्राबाद संस्थानांत ज्या सुधारणा अंमलांत आणण्याचें योजलें आहे, त्या इतर कोणत्याहि संस्थानांतल्यापेक्षां अधिक लोकशाही-प्रधान आहेत असें आपण मुंबईच्या मुलाखतींत बोललां. त्या सुधारणा आपल्या सरकारनें जाहीर केल्या आहेत काय ? असल्यास त्यांची एक प्रत मजकडे पाठवावी.

“ अशा सुधारणांच्या जन्म-काळीं, आपल्या सरकारनें दडपशाही सुरू करणें योग्य नाहीं, असेंहि मीं आपल्या निदर्शनास आणलें होतें. परंतु हैद्राबादची ‘ स्टेट काँग्रेस ’ आपल्या सरकारनें बेकायदा ठरविली आहे. ही संस्था पूर्णपणें राष्ट्रीय आहे—जातीय मुळींच नाहीं. असें

असतांना ती बेकायदा कां ठरावी? कोणत्याहि जातीय संस्थेच्या सभासदाला 'स्टेट कॉँग्रेसचा' पदाधिकारी होतां येत नाहीं. याचा अर्थ आपण ध्यानीं घ्यावा. १९२९ सालापासून आपल्या संस्थानांत राजकीय सभाच भरवितां येत नाहींत, हें कशाचें चिन्ह? गेल्या तीन महिन्यांत आपल्या सरकारनें नऊ संस्था जातीय असल्याच्या सबबीवर बंद पाडल्या. याचा अर्थ लोक एकच करतात आणि तो हा कीं, जनतेमध्यें तिळमात्र जागृति होऊं देण्यास आपलें सरकार तयार नाहीं. "कॉँग्रेस" हें नांवच आपल्या सरकारला बुजगावणें वाटत असेल, तर तें बदलण्याचा प्रयत्न मी करीन. पण 'कॉँग्रेस' हें नांवच ती संस्था जातीय नसल्याचें सूचित करते. या कामीं माझा शक्य तो उपयोग आपण करून घ्यावा."

या झणझणीत पत्राला हैदरींनीं वकिली थाटाचें उत्तर दिलें. तरी त्यानें दबून न जातां जमनालालजींनीं पुनः आपला हल्ला त्यांच्यावर चढविला. ता. २२ नोव्हेंबर १९३८ रोजीं लिहिलेल्या पत्रांत जमनालालजी म्हणतात,

"तुमचें पत्र वाचून मला धक्काच बसला. मुंबई येथें आपल्या बोलण्यांत किती जिव्हाळा होता, पण या पत्रांत सारा कोरडेपणा भरला आहे. मुंबईत आपण सरदार पटेलांना तिकडे येण्याबाबत निमंत्रण दिलें. पण आतां पत्रांत म्हणतां कीं, त्यांचें आगमन म्हणजे संस्थानी कारभारांत हस्तक्षेप होईल. याचा अर्थ तुम्ही मैत्रीचें व समेटाचें दारच बंद केलें. आपल्याकडून अशा वर्तनाची अपेक्षा मीं केली नव्हती."

यानंतर ता. ३ डिसेंबर १९३८ रोजीं जमनालालजींनीं हैदरींना जें निर्वाणीचें पत्र पाठविलें, तें स्वातंत्र्य-संग्रामाच्या तुतारीसारखेंच आहे. हीं सारीं पत्रें इतक्या उच्च राजनैतिक भूमिकेवरून लिहिलेलीं आहेत, आणि त्यांत संयम व युक्तिवाद, पण निर्धार व आवेश हे गुण इतके

ओतप्रोत भरलेले आहेत कीं, तीं पत्रें वाचतांना कोणासहि गांधीजींच्या लेखनशैलीचेंच स्मरण व्हावें. या डिसेंबरच्या पत्रांत जमनालालजी हडसून-खडसून लिहितात,

" आपल्या वाटाघाटी पुढें चालवून आपल्याला अधिक त्रास देणें मला आतां उचित वाटत नाहीं. कारण मी हैद्राबाद येथें स्टेट काँग्रेसच्या चार सत्याग्रहींची काल मुलाखत घेतली. त्यांना ता. २९ नोव्हेंबर रोजीं पकडण्यांत आलें आणि दुसरे दिवशीं त्यांना सोडण्यांत आलें. त्यांच्या मुक्ततेचें कारण आपल्या सरकारनें असें जाहीर केलें कीं, " स्टेट काँग्रेसशीं संबंध ठेवल्याबद्दल त्यांनीं माफी मागितली आणि यापुढें तो संबंध ठेवणार नसल्याची कबुली दिली. " पण या सत्याग्रहींनीं मला लिहून दिलें आहे कीं, ' पोलिसांनीं आम्हांला पाशवी पद्धतीनें मारहाण केली आणि तींतून सुटण्यासाठींच आम्हीं माफी लिहून दिली. ' थर्ड डिग्री ' चा जुल्म त्यांच्या शरीरावर उमटलेला मीं माझ्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिला. कोणत्याहि सुसंस्कृत राष्ट्रांत पोलिसांचें हें वर्तन अमानुष गणलें जाईल. "

" हिंदुस्थानांत राजकीय सभांवर सरहा होणारा लाठीहल्ला हा तर गैरच आहे; पण पोलिस-कोठडींत गुप्तपणें असा अमानुष हल्ला चढविणें अत्यंत निंद्य आहे. यापुढें तुमच्याशीं युक्तिवाद करून आमची बाजू पटविण्यांत कालक्षेप करणें व्यर्थ आहे असें मला कालपासून वाटूं लागलें आहे. कारण शासक व शासित यांच्या संबंधाविषयीं तुमचे-आमचे मूलभूतच मतभेद दिसतात. हीं माझीं मतें, कोठेंहि आणि केव्हांहि, योग्य वाटतील त्या पद्धतीनें, प्रसिद्ध करण्याचा हक्क मला आहे, असें मी मानतों. आपण आपापल्या परीनें हैद्राबादी जनतेची सेवा करीत राहूं. त्या कामीं आपला संघर्ष आला तरी, प्रत्येकाच्या प्रामाणिकपणावर आपण विश्वास ठेवूं. तो न ठेवण्याची वेळ कदापि न येवो. "

याहून शहाण्याला शब्दाचा मार अधिक तो काय द्यावयाचा ?

अलवार संस्थानच्या दिवाणालाहि असेंच एक झणझणीत पत्र जमनालालजींनीं ता. १ ऑगस्ट १९३८ रोजीं पाठविलें. त्या नरेशांना समजावण्यासाठीं ते लिहितात,

" ब्रिटिश हिंदुस्थानांत प्रचंड प्रमाणावर राजकीय फेरबदल घडून येत असतांना आपल्या संस्थानचें सांप्रतचें धोरण जुन्या काळाला शोभणारें आहे आणि त्याचें स्वरूप अत्यंत कोतें आहे. अशा दडपशाहीच्या धोरणामुळें संस्थानचा कांहींच फायदा होणार नाहीं, उलट तेथील प्रजेनें जी शांततापूर्ण चळवळ चालविली आहे, ती भूमिगत पद्धतीनें सुरू होईल आणि मग आकस्मिक स्फोट होण्याचें संकट वाढेल. "

संस्थानी चळवळींत जमनालालजींनीं नेटानें व धैर्यानें भाग घेतला आणि तेथील प्रजेला नागरी हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न मनोभावें केला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 223603 दि: ...
क्रमांक ...132... नों: दि: 20/5/58

● ● ●

# ९ : पवित्र परिवार

*सोईरेधाईरे आम्हां संतजन । तयावीण चिंतन आन नाहीं ॥*
*हाचि माझा भाव हीच माझी भक्ति । आणिक विश्रांति दुजी नाहीं ॥*
*हेंचि माझें कर्म हाचि माझा धर्म । वाऊगाचि श्रम न करीं दुजा ॥*
*हेंचि माझें ज्ञान हेंचि माझें विज्ञान । संतांविण शरण न जाय कोणा ॥*

*——एकनाथमहाराज*

" तुमच्यापेक्षां अधिक उच्च आत्मा धारण करणारा प्राणी माझ्या माहितींत तरी कोणी नाहीं. ' असें प्रशंसापत्र महात्माजींसारख्या थोर पुरुषानें दिलें.

कोणाला ? जगद्वंद्य गांधीजींनाहि वंद्य वाटण्याइतका हा थोर पुरुष कोण ?

विशेष हें कीं, अशी दुर्मिळ प्रशंसा करणारें पत्र ज्या भाग्यवंताच्या हातीं आलें, तो तें पत्र फाडून त्याचे तुकडे तुकडे करीत होता. त्याला अशी संवयच होती कीं, पत्रांचीं उत्तरें लिहून झालीं कीं, तीं फाडावयाचीं. आशय समजला कीं, पत्राचें जीवित संपलें. एके दिवशीं या भाग्यवंतानें असेच एका पत्राचे तुकडे केलेले एका मुलानें पाहिलें. मुलाला कुतूहल मोठें. " कोणाचें हें पत्र असावें ? " अशी जिज्ञासा त्याचे ठायीं जागृत

झाली. त्यानें हस्ताक्षरावरून ओळखलें कीं, हें बापूंचें पत्र आहे. त्यानें त्या पत्राचा एकेक कपटा गोळा केला आणि सारीं अक्षरें नीट लावलीं.

तंबोऱ्याच्या तारा नीट लावल्या कीं, त्यांतून मधुर संगीत बाहेर पडतें, तसें ते पत्राचे कपटे जुळविल्याबरोबर मोत्याच्या मोलाचें, गांधीजींचें वाक्य बाहेर पडलें; तें म्हणजे

" तुमसे बढ़कर उच्च आत्मा मेरी जानकारीमें नहीं है ! "

हें पत्र लिहिलेलें होतें, आचार्य विनोबा भावे यांना—आणि ते त्याचे तुकडे करीत होते. ते तुकडे जुळविण्याचें काम केलें त्यांच्या एका शिष्यानें—जमनालालजींच्या ज्येष्ठ पुत्रानें—कमलनयननें.

त्यानें बालभावानें विनोबांना विचारलें, " हें काय केलें ? पत्र कां फाडलें ? बापूंचें हें पत्र ना ? " तेव्हां विनोबाजींनीं अगदीं सहज रीतीनें उत्तर दिलें, " ज्या वस्तूचा मला उपयोग नाहीं, तीं भविष्यकाळासाठीं मी कशाला राखून ठेवूं ? बापू मोठे आहेत. त्यांच्या महान दृष्टीला मी जसा दिसलों, तसें त्यांनीं लिहून टाकलें. पण माझ्या उणिवा त्यांनीं कोठें पाहिल्या आहेत ? "

प्रभु रामचंद्र लंका जिंकून, रावणवध करून, अयोध्येला परत आल्यानंतर, त्यांनीं राज्यारोहण केलें व त्या प्रसंगीं आपल्या सर्व सैनिकांना व सहकाऱ्यांना पारितोषिकें दिलीं. पण प्राणाहून प्रिय असणाऱ्या हनुमानाला ते काय बक्षीस देणार ? त्याच्या सेवेचें मोल कोणत्याच वस्तूनें होण्यासारखें नव्हतें. पण सीतामाईना राहवेना. त्यांनीं आपल्या कंठांतील पृथ्वीमोलाची रत्नमाला हनुमानाचे गळ्यांत घातली. त्यांतील एक एक रत्न फोडून, त्यांत 'राम आहे का ?' असें हनुमान पाहूं लागला व एकेक रत्न फेकूं लागला. तीच गुरुभक्ति, तीच अनासक्ति, तीच अमानिता विनोबांच्या रोमरोमांत भिनलेली आहे. म्हणूनच त्यांनीं गांधीजींच्या पत्राचे तुकडे केले. नाहीं तर अशा विभूतीकडून असा गौरव लाभण्यासाठीं कोणीहि शतजन्म तपश्चर्या केली नसती काय ?

खुद गांधीजींनाहि अशी गौरवाञ्जलि लाभली होती त्यांच्या गुरूकडून—आणि तीहि फार पूर्वी—म्हणजे १९०९ सालीं. त्या वर्षींच्या कॉंग्रेसमध्यें ना. गोखले यांनीं गांधीजींचें थोरपण, अचूक शब्दांनीं, दूरदर्शीपणें वर्णिलें. ते म्हणाले, " या पृथ्वीच्या पाठीवर गांधीजींहून अधिक निर्मल, अधिक निर्भय व अधिक उदात्त जीव कधीं वावरलाच नाहीं. "

स्वामी रामतीर्थांवर अमेरिकेंत मानपत्रांचा वर्षाव झाला. त्यांचें त्यांनीं काय केलें? स्वदेशीं परत येतांना, आगबोटींतून त्या सर्व मानपत्रांचें गुंडाळें त्यांनीं समुद्रांत फेकून दिलें. तशीच विरक्ति विनोबाजींची !

विनोबा गांधीजींना आपले पिता मानींत हें खरें. देवतात्मा हिमालयापेक्षां महात्मा गांधी हेंच त्यांना योग्य आश्रयस्थान वाटलें. हिमालयाची यात्रा करून व काशीसारख्या पवित्र क्षेत्रीं राहून शेवटीं ते शरण गेले गांधीजींना. उलट, त्यांना गांधीजी फार मान देत. "मी व विनोबा यांच्या सांगण्यांत तुम्हांला मतभेद आढळला, तर तुम्ही विनोबांचें ऐका. " असा सल्ला गांधीजी आश्रमवासीयांना देत. किंबहुना दोन-चार प्रसंगीं तर, आपलें स्वतःचें म्हणणें बाजूस ठेवून, गांधीजींनीं विनोबांचेंच मत स्वीकारलें.

गांधीजींना जमनालालजींनीं " पिता " मानलें, तर विनोबाजींना 'गुरु' केलें. असे पिता व गुरु लाभणें हें केवढें भाग्य ! " बहुतां सुकृतांची जोडी " म्हणूनच जमनालालजींना अशा पुण्यवंतांची जोडी लाभली. लहानपणापासून त्यांच्या हृदयांत धार्मिक वृत्तीची जी ज्योत तेवत होती, तिच्या प्रकाशांतच त्यांना या दोन महान विभूति दृष्टीस पडल्या—आणि त्यांच्या दिव्य तेजांत त्यांनीं आपलें लहानसें तेज समर्पित केलें.

गांधीजींप्रमाणें विनोबाजींनीं प्रत्यक्ष राजकारणांत फारसा भाग घेतला नाहीं—किंबहुना पूर्वीं ते समाजांतहि फारसे मिसळत नसत.

" अरतिर्जनसंसदि " हेंच त्यांचें जीवनसूत्र भूदानाच्या आंदोलनापर्यंतचें. " लागे सदा ध्यान निरंजनाचें " हीच त्यांची स्थायी वृत्ति ! !

" तुका म्हणे मज अवघ्यांचा कंटाळा ।
तूं एक गोपाळा आवडसी ॥ "

या तुकोबांच्या वृत्तींतच विनोबा रंगलेले असत. त्यांनीं एकदां जमनालालजींच्या पत्नीला—जानकीदेवींना—लिहिलेल्या पत्रांत आपल्या भूमिकेचें वर्णन केलें, तें असें—

" संसार मिथ्या मानून बसलेला मी एक रसहीन माणूस. तिथल्या नैसर्गिक आनंदांत मी कदाचित् मिठाचा खडा झालों असतों. रविबाबूंनीं एक गाणें लिहिलें आहे. त्यांत म्हटलें आहे " एकला चालो, एकला चालो, ओरे ओरे ओ उपभागा " अरे भाग्यहीना ! तूं एकटाच चाल ! हें गाणें मी नेहमीं मला लागू करतों. पण ' अरे भाग्यहीना ! ' असें मात्र म्हणत नाहीं. ' अरे भाग्यवंता ' असें म्हणतों. "

तसेंच, खुद्द जमनालालजींना लिहिलेल्या एका पत्रांत, विनोबांनीं आपल्या जीविताचें त्रिभुवन तीन शब्दांत कसें सांठविलेलें आहे, हें कळविलें होतें. त्यांत त्यांनीं लिहिलें आहे,

" माझ्या मानासिक शब्दकोशांत आई, गीता आणि तकली हे तीन शब्द अक्षरशः समानार्थक झाले आहेत. ' आई ' शब्दांत माझी घरची सर्व कमाई सांठवली जाते. ' गीता ' शब्दांत वेदांपासून संतांपर्यंत जितकें अध्ययन केलें तें सर्व येतें. आणि ' तकलींत ' बापूसारख्यांच्या संगतीचें सार उतरतें. "

याहिपेक्षां अधिक सखोल मीमांसा विनोबांनीं आपल्या जीवनाची एका पत्रांत केली आहे. आपल्या एकमार्गी जीवनाचें रहस्य उकलून दाखवितांना ते म्हणतात,

" माझी इच्छा म्हणा कीं वासना म्हणा कीं विचार म्हणा, मला दोनच गोष्टी करण्याविषयीं प्रेरणा देतो. एक देवाचें नांव घ्यावें व

दुसरें दिवसभर कांतावें. ह्याशिवाय तिसरी प्रेरणाच मला होत नाहीं. शिकवणें, लिहिणें, चर्चा, व्याख्यानें इत्यादि सर्वांची किंमत मला अक्षरशः ० वाटते. नामस्मरण आणि कांतणें ह्या दोन्हींचा अर्थ मला माझ्याकरितां एकच वाटतो. म्हणून मी या दोन्हींला मिळून १ समजतों. ह्या १ वर ० ठेवलें तर १०, १०० इ. होतील. पण १ चें साहाय्य नसेल तर सगळीं शून्यें कुचकामाचीं होतील. १ ची काळजी मीं घ्यावीं. ० ची काळजी करण्यास सर्व दुनिया समर्थ आहे. ”

विनोबा हे जितके ज्ञानी आचार्य आहेत, तितकेच तपस्वी भक्तहि आहेत. अध्यात्मांतील गहन प्रश्न सोडविण्यांत ते जितका रस घेतात, तितकाच आनंद त्यांना संडास–सफाई करण्यांत वाटतो. त्यांच्या वृत्तीची उत्कटता व कार्याची एकाग्रता इतकी विलक्षण आहे कीं, एकदां ईश्वर–दर्शनाचा छंद त्यांच्या मनानें घेतला तर त्यासाठीं त्यांनीं घरदार सोडलें, संसारास ते विन्मुख झाले, हिमालयांत भटकले व शेवटीं गांधीजींजवळ स्थिरावले. गांधीजी सेवाग्रामला तर विनोबा पवनारला. दोन्ही गांवांत अंतर फक्त चार मैलांचें. पण कधीं कधीं, दोन-दोन वर्षे, विनोबा गांधीजींची भेट घेत नसत. त्या दोघांच्या हृदयांचें तारायंत्र मात्र जोडलेलें असें.

अध्यात्म–ज्ञानाचा एकच छंद जसा विनोबांनीं घेतला, तसाच एकदां धर्माचें साधन असणारें शरीर सुदृढ करण्याचा चंग त्यांनीं बांधला. मग काय ? खूप कष्टावें व खूप खावें हाच त्यांचा दिनक्रम. “ जसें मनानें तसेंच शरीरानेंहि ते मल्ल बनले. ” असें गांधीजी विनोदानें म्हणूं लागले.

प्राचीन ऋषीप्रमाणें शेती करण्याकडे विनोबांनीं एकदां लक्ष पुरविलें. झालें ! रोज आठ आठ तास राबून, खपून, घाम गाळून, विहिरीचें पाणी स्वतःच्या हातानें काढून, ते शेती शिंपूं लागले.

सूत–कताईमध्यें तर त्यांचा हात धरणारे क्वचितच सांपडतील. "चरका व टकळी चालविण्यांत विनोबा इतके निष्णात आहेत कीं, साऱ्या हिंदुस्थानांत त्यांची बरोबरी कोणीच करूं शकणार नाहीं." असें शिफारसपत्र गांधीजींनीं, १९३९ सालीं, वैयक्तिक सत्याग्रहाचे प्रथम सत्याग्रही होण्याचा मान त्यांना देतांना, जगजाहीर केलें.

आणि आतां तर काय?

**" गोविंद गोविंद । मना लागो हाची छंद ।**
**मग गोविंद ते काया । भेद नाहीं देवा तया । "**

या तुकोबांच्या तल्लीनतेनें ते भूदान–कार्याशीं तन्मय झाले. भूदानांतून संपत्तिदान, ग्रामदान, बुद्धिदान असें करतां करतां जीवन-दानाचें वैकुंठच त्यांनीं गांठलें—आणि समग्र जीवन–परिवर्तन करणारी क्रांति भारत देशांत प्रवर्तित केली.

अशा महर्षि विनोबांचें शिष्यत्व जमनालालजींनीं स्वेच्छेनें स्वीकारलें व निष्ठेनें यावज्जीव पाळलें. कारण "त्यांच्या सहवासाशिवाय मला पूर्ण शांति, समाधान मिळणार नाहीं." अशी जमनालालजींची खात्री झाली. त्यांनीं १९३२ सालीं धुळयाच्या तुरुंगांत असतांनाच आपल्या पत्नीस लिहिलेल्या एका पत्रांत आपला असा अनुभव लिहिला होता कीं,

" माझें मनःस्वास्थ्य ठीक आहे. विनोबांच्या संगतीपासून व प्रवचनापासून सुख व शांति यांचा इतका लाभ मला होत आहे कीं, तो मला जन्मभर पुरेल. "

आपली कन्या मदालसा, हिला लिहिलेल्या एका पत्रांत जमना-लालजी, आपली कृतकृत्यतेची ही भावना प्रगट करतांना म्हणतात, "पूज्य विनोबांच्या सहवासापासून मला पुष्कळ सुख व लाभ मिळत आहेत, ही परमात्म्याची मोठी कृपाच होय."

एखाद्या भक्ताप्रमाणें जमनालालजी स्वतःच्या मनाचें सदैव संशोधन करीत. असा आत्मशोधनाचा प्रकाश जीवनावर पडला, म्हणजे साहजिकच त्यांतील दोष व उणीवा स्पष्ट दिसूं लागतात आणि मग त्या दूर करण्याची इच्छा बळावते. त्यासाठीं सत्संगाची ओढ लागते; आणि अखेर शुद्ध चित्तानें, निर्लोभीपणानें, जनसेवा करणें हीच शुद्ध ईश्वर–सेवा, असें चित्तावर ठसतें.

याच क्रमानें जमनालालजींच्या जीवनाचें कमल विकसित होत गेलें.

" माझे मज कळों येती अवगुण ! "

या साधकाच्या भूमिकेवर ते दीर्घकाळ होते. " माझी कमजोरी " असे उल्लेख त्यांच्या पत्रांतून कैक वेळां आलेले आहेत. त्यांचीं खाजगी पत्रें म्हणजे त्यांच्या आत्मशोधनाच्या मार्गावरील मैलाचे दगडच ! " ईश्वर माझी कमजोरी दूर करून मला सद्बुद्धि देईल तरच माझ्या जीवनामध्यें सफलता येऊं शकेल. " अशी प्रार्थना ते वारंवार करीत.

विनोबाजींच्या सूत्ररूप वाणीचा प्रभाव जमनालालजींच्या मुमुक्षु मनावर फार पूर्वींपासून पडत होता. १९२४ सालच्या आपल्या रोजनिशींत त्यांनीं हिंदी भाषेमध्यें अशी नोंद केलेली आढळते कीं, " ता. २३ जुलै रोजीं, टिळकजयंतीनिमित्त, टिळक हॉलमध्यें श्री. विनोबाजी भावे यांचें अतिशय सुंदर असे प्रभावशाली प्रवचन झालें."

एखादा पाणबुड्या समुद्राच्या खोल तळाशीं बुडी मारून तेथील पाणीदार मोती वर आणून लोकांना जसें चकित करतो, तसें विनोबा वर्षानुवर्ष व रात्रंदिवस सखोल चिंतनांत निमग्न राहून, त्या दीर्घ मननांतून निघणारे मंत्र, इतर मानवांना ऐकवितात आणि त्याच्या आत्म्याची उन्नति करतात. आत्मिक अधिष्ठानावरून पाझरणारे विनोबाजींचे विचार श्रोत्यांच्या आत्म्यापर्यंत जाऊन पोहोंचतात आणि त्याला जागृत व उन्नत करतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 233603 वि: 
क्रमांक 632 नों: दि:


हा उदात्त अनुभव जमनालालजींना वर्षानुवर्ष वारंवार येत गेला. आपल्या मनाचे कान करून मोठ्या भक्तिभावानें ते विनोबाजींचा शब्द्-न् शब्द टिपून—शोषून घेत असत. त्यामुळें त्यांना विनोबांच्या विचारांचा फारच मोठा लाभ झाला.या लाभाचे पडसाद त्यांच्या "वासरी"-मध्यें पुनः पुनः उमटलेले ऐकूं येतात. ता. २५ फेब्रुवारी १९३४ च्या पानावर अशी नोंद आढळते—

"पूज्य विनोबांचें सुंदर प्रवचन ऐकलें—संतोष व सुख मिळालें." जमनालालजींनीं आपल्या मानसिक विकासाच्या अशा मुद्रा अनेक पानांवर उमटविल्या आहेत. "परमात्म्याचें खूप चिंतन केलें—प्रार्थना केली. त्यामुळें हरिजनांची सेवा व चालू कामाची योजना या विषयींची स्फूर्ति मनामध्यें उत्पन्न झाली." असें त्यांनीं लिहिलें आहे.

पुढें दैवयोग असा कीं, गांधीजींनीं प्रज्वलित केलेल्या स्वातंत्र्य-यज्ञामध्यें विनोबा व जमनालाल—या दोघांहि धर्मप्रवृत्त गुरुशिष्यांनीं आपल्या देहदंडाची आहुति दिली. त्याचें फल म्हणून उभयतांना कारागृहवास सोसावा लागला. त्यांचेवर अपकार करूं पाहणाऱ्या ब्रिटिश सरकारचे हातून एक उपकार असा घडला कीं, या दोघांनाहि एकाच तुरुंगांत ठेवण्यांत आलें.

१९४१ सालीं नागपूरच्या तुरुंगांत हे गुरुशिष्य एकत्र होते. तेथेंहि जमनालालजी दररोज रोजनिशी नियमानें लिहीत. रोज पहाटे उठले कीं, त्यांचें तें पहिलें काम—मग ते घरांत असोत, प्रवासांत असोत, कीं तुरुंगांत असोत. तुरुंगांत तुलसीदासांच्या रामायणावर विनोबाजींचीं प्रवचनें होत. 'तीं अत्यंत भावनापूर्ण असून हृदयाच्या गाभाऱ्यांत प्रवेश करणारीं आहेत.' अशी नोंद जमनालालजींनीं ता. ६ जानेवारी १९४१ रोजीं केलेली आहे. तहानलेल्या माणसाचे जिभेवर पाण्याची गार व मधुर धार पडावी, म्हणजे तो जसे संतोषाचे व तृप्तीचे उद्गार एकसारखे काढतो व पाणी देणाऱ्या माणसाला दुवा देऊन स्वतःला

धन्य समजतो, तशी सुखद अवस्था जमनालालजींची विनोबांच्या सहवासानें होत होती.

जमनालालजींनीं ता. १५ जानेवारीच्या पानावर अशी नोंद केलेली आहे कीं, "विनोबांवर माझी श्रद्धा दिवसादिवसाला वाढत आहे. त्या श्रद्धेला परमेश्वर मला जेव्हां योग्य बनवील तो दिवस माझ्या आयुष्यांत धन्य ठरेल. मीं जर मला स्वतःला योग्य बनविलें तर बापू पित्याचें व विनोबा गुरूचें प्रेम मला देतील." एकदां जमनालालजी बोलतां बोलतां सहज म्हणाले, "साधुसंत तर सर्व ठिकाणीं असतात, परंतु मला विनोबांचा अनुभव विशेषच आला."

विनोबांच्या प्रवचनांत काय नसे ? त्यांत वेद येत–उपनिषदें येत, रामायण येई–भारत येई, ज्ञानेश्वरी असे–तुकोबांचे अभंग असत, कुराण असे–बायबल असे, आणि व्यवहारांतील सोपे पण समर्पक दृष्टान्त मधून-मधून चमकून जात. जुनेच दाखले पण नव्यासारखे मांडलेले असत. नित्याचीं सुभाषितें पण आगळाच अर्थ स्रवूं लागत. वेदांतील एका मंत्रावर भाष्य करतांना ते म्हणाले, "आसपासच्या लोकांची पर्वा न करतां जो धनिक धन जमवीत असेल, तो आपला स्वतःचाच वध करून घेतो." हें सूत्र ऐकतांच जमनालालजींचें चित्त चमकलें. आणि त्यांनीं आपल्या जीवनाचा तोच आदर्श आपल्या डोळ्यांपुढें ठेवला.

पुराणकालांतील शिष्याप्रमाणें जमनालालजींची श्रद्धा विनोबांच्या चरणावर जडली होती. आपली आध्यात्मिक उन्नति व्हावी म्हणून त्यांना तीव्र तळमळ लागली होती. "मी पापी आहें, दुराचारी आहें, विश्वासघातकी आहें." अशी त्यांच्या चित्ताची तडफड एकसारखी चालू असे. श्रीसमर्थांच्या 'करुणाष्टका'सारखे आर्त उद्गार त्यांच्या मनांतून निघत. याचा अर्थ इतरांपेक्षां ते अधिक पतित होते असा नव्हे, पण पावन होण्याची त्यांची इच्छा असामान्य होती, हाच त्या तळमळीचा अर्थ.

धुळ्याच्या तुरुंगांत ..................क वर्गीय कैद्याचे वेषांत



फादर एल्विन, प्यारेलाल इत्यादींशीं जमनालालजींची मुलाखत चालली आहे.

## राष्ट्रभक्तांचा हास्य-विनोद



पं. पंत, राजाजी, जमनालालजी, जवाहरलालजी.

## हरिपुरा कॉंग्रेसमध्यें



जमनालालजी, दरबार गोपाळदास, गांधीजी, सुभापचंद्र, वल्लभभाई

या तळमळीमुळें रात्रीं तास न् तास त्यांना झोप येत नसे, त्यांचें मन व्याकुळ होत असे आणि त्यांच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागत. आणि त्यांना वाटे, "आपल्या मनांतील सारी तळमळ आपण विनोबांना सांगितली पाहिजे. तेच यांतून राजमार्ग दाखवतील आणि माझ्या व्यथित हृदयाला शांति देतील. ईश्वराची इच्छा असेल तर तसेंहि होईल. या जन्मीं ईश्वरानें सद्बुद्धि दिली, तर हा देह स्वच्छ, पवित्र, सेवामय जीवन चालविण्यांचे कामीं खर्च होईल, आणि मगच मला समाधान प्राप्त होईल."

विनोबाजींच्या मुखानें दररोज होत असलेल्या ज्ञानाच्या अमृत-वर्षावामध्यें जमनालालजींचें मन न्हाऊन-धुऊन स्वच्छ होऊन निघालें. पवित्र अभ्यंगस्नानच घडलें तें त्याला. त्यामुळें जमनालालजींनीं आपल्या जीवनाला मार्गदर्शक म्हणून पुढील वचनें निवडलीं.

मातृवत् परदारेषु, परद्रव्येषु लोष्ठवत् ।
न त्वहं कामये राज्यं, न स्वर्गं न पुनर्भवम् ॥
यावद् भ्रियेद् जठरं तावत्स्वत्वं हि देहिनाम् ।
अधिकं योऽभिमन्येत स स्तेनो दण्डमर्हति ॥

आणि १९३२ सालीं धुळ्याच्या तुरुंगांत विनोबाजींनीं गीतेवर प्रवचनें दिलीं, तो तर अमृत-सिद्धि योगच ! थोर थोर देशभक्तांची सभा थाटलेली आहे, विनोबाजी आपल्या लाडक्या गीताईवर प्रवचन करीत आहेत आणि जमनालालजींसारखे शिष्य त्याचें आकंठ प्राशन करीत आहेत ! विशेष हें कीं, ज्ञानदेवांना जसे नामदेव, तसे विनोबांना असणारे साने गुरुजी हे तेथें तीं गीतेवरील प्रवचनें टिपून घेण्यास त्या तपोभूमींत तत्पर ! ! या सर्व शुभ ग्रहांची युति झाल्याचा मधुर परिपाक म्हणजे "गीता-प्रवचनें" हा ग्रंथराज ! सूक्ष्मतम अध्यात्म-विचार सुलभतम भाषेंत मांडणारा हा ग्रंथ मराठींत खरोखर अद्वितीय

आहे. गीतेचें हें नवें "देशीकार लेणें" पाहून साक्षात् ज्ञानदेवहि मान डोलावतील !

विनोबाहि जमनालालजींना हाताशीं धरून, प्रोत्साहन देऊन, उन्नतीच्या मार्गावर पुढें पुढें नेत असत. ता. २१-११-३४ च्या पत्रांत विनोबा त्यांना लिहितात,

"जन्मदिवसाचें पत्र मिळालें. तुमच्या हातून आजपर्यंत जी सेवा झाली, त्यापेक्षां किती तरी अधिक सेवा देवाला तुमच्याकडून घ्यायची आहे, अशी माझी श्रद्धा आहे. गेल्या वर्षीं तुम्हांला भोगावी लागलेली शारीरिक यातना ह्या पुढच्या सेवेचें मी पूर्वचिन्ह समजतों. देवाची दया अद्भुत आहे. तिचें यथार्थ ज्ञान कोणाला होणार? पण आपल्याला त्या ज्ञानाची जरूरीहि नाहीं, श्रद्धा पुरेशी आहे."

पोकळ प्रोत्साहन किंवा मोघम आशीर्वाद देऊन थांबणारे विनोबा हे कांहीं बुवा नव्हेत. जरूर तेव्हां कठोर निर्णयहि, सडेतोड भाषेनें ते सांगत. वर्धा येथील कन्याश्रमासंबंधीं कांहीं प्रश्न उपस्थित झाला असतांना विनोबांनीं ता. ८ ऑगस्ट १९३४ रोजीं जमनालालजींना पुढील निःसंदिग्ध पत्र लिहिलें—

"कन्याश्रमाबाबत निश्चित निर्णय अजून करूं शकलों नाहीं. पण जो कांहीं निर्णय होईल तो धर्मरूपच होईल. संस्थेचें रूपांतर करावें लागेल, किंवा देहांतरहि करावें लागेल. पण जें शुभ, कल्याणकारक आणि आवश्यक असेल तेंच करूं. म्हणून ह्यासंबंधी संपूर्ण निश्चिंत तुम्ही राहूं शकलां तर बरें होईल. संस्था जरा अडचणीची झाली कीं मोडून टाकायची, अशी माझी वृत्ति नाहीं. बापूंची तर नाहींच नाहीं. पण मोडणें हाच धर्म ठरला, तर मग ती मोडायचीहि वृत्ति राखलीच पाहिजे. नाहीं तर सेवा करण्याची इच्छा असून असेवा व्हावयाची. संस्था आपण आसक्तीनें सुरू केलेली नाहीं. ज्या हेतूनें सुरू केली आहे त्या हेतूच्या रक्षणासाठीं जें करणें उचित ठरेल तें करूं."

गुरु जर निरहंकारी असेल, तर तोहि शिष्याकडून कांहीं शिकतो. विनोबा हे भूदानापर्यंत, समाजाकडे पाठ फिरवूनच बसलेले होते—जसें कांहीं ताटी लावून बसलेले, रुसलेले बाल ज्ञानदेवच! "ताटी उघडा ज्ञानेश्वरा!" अशी विनवणी करणाऱ्या मुक्ताबाईची भूमिका जमनालालजी केव्हां केव्हां घेत. "तुम्ही लोकांत मिसळा—त्यांच्याशीं कांहीं बोला—त्यांना पत्रें लिहा." अशा प्रेमळ सूचना भक्तिभावानें जमनालालजी त्यांना करीत. विनोबाहि त्या शांतपणें ऐकून घेत; आणि विशेष म्हणजे शिष्याच्या त्या सूचनाप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करीत. ता. ८ नोव्हेंबर १९३२ च्या पत्रांत विनोबा जमनालालजींना कबुली देतात कीं,

"तुमच्याकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मिळालेल्या सूचनांचा अंमल माझ्या वृत्तीप्रमाणें शक्य तितका करतों. मंडळीशीं पूर्वींपेक्षां अधिक परिचय राखतों. पत्रें थोडींफार लिहितों. आणि दिनक्रम नियमित बनविण्याचा प्रयत्न करतों."

गांधीजींच्या उपदेशामुळें जमनालालजींनीं आपलीं मुलें शाळेंत घातलीं नाहींत. पण त्यांचे बुद्धीवर विद्येचे संस्कार कसे होणार? ही चिंता त्यांना पडली. पण ही चिंता कशाला? ईश्वरनिष्ठ विद्यासागर त्या पवनारच्या पवित्र परिसरांत वास्तव्य, करीत होता ना? जमनालालजींची दृष्टि विनोबांकडे सहजच वळली. आपला मुलगा कमलनयन व मुलगी मदालसा यांच्या शिक्षणाचा भार त्यांनीं विनोबांवर टाकला. तेव्हां विनोबांनीं किंचित् विनोदानें पत्र लिहिलें,

"कमलनयनच्या शिक्षणाचा प्रश्न आहे. त्या बाबतींत तुम्ही सुचविल्याप्रमाणें जबाबदारी उचलण्याची इच्छा मला होईलच. पण दीडशें पौंडांचें ओझें उचलण्यास मी समर्थ होईन कीं नाहीं हें देव जाणे. त्याच्या मनाचा मोकळेपणा आणि वृत्तींतील सद्भाव मला गोड वाटला. पण संयमाची आणि विचारांची उणीव पाहतों. मदालसेला देवानें

अशक्तता दिली आहे. देवाची हीहि देणगी कल्याणकारक करतां येईल, जर तशी दृष्टि असेल. त्या मुलींत निग्रह अजून थोडा कमी भासतो. पण हरि-प्रेम आहे. आणि हरि-प्रेम असणाऱ्याविषयीं मला जो जिव्हाळा वाटतो, तो वर्णन करतां येत नाहीं."

बौद्धिक शिक्षण तर विनोबा देऊं लागलेच. पण सतार-वादनाची कलाहि हा आधुनिक ऋषि त्या लक्ष्मी-पुत्रांना शिकवूं लागला.

▲

" विठो माझा लेकुरवाळा " असें म्हणून जनाबाईनें सर्व संतांचें एक कौटुंबिक स्वरूप महाराष्ट्रापुढें ठेवलें आहे. तसेंच प्रेमाचें पवित्र नातें जमनालालजींनीं निर्माण केलें होतें. पवनारच्या पवित्र परिसरांत अध्यात्मनिष्ठ देशभक्तींचें जणुं एक कुटुंबच वास्तव्य करीत होतें. या कुटुंबांतील नातीं स्वतः जमनालालजींनीं एकदां सविस्तर लिहून काढलीं. तीं पुढीलप्रमाणें:—

पिता—गांधीजी.

गुरु—विनोबा.

माता—कस्तुरबा, आनंदमयी.

स्त्री—जानकी.

मुलें—१. राधाकृष्ण, २. रामेश्वर नेवटिया, ३. गुलाबचंद, ४. प्रल्हाद ५. कमल, ६. श्रीराम, ७. रामकृष्ण.

भाऊ:—१. जाजूजी, २. किशोरलाल मश्रूवाला, ३. केशवदेवजी नेवटिया, ४. हरिभाऊ उपाध्याय, ५. फादर एल्विन, ६. गुलजारी नंदा, ७. लालजी मेहरोत्रा, ८. गंगाबिसन बजाज, ९. रामेश्वर पोद्दार, १० नारायणदास गांधी.

मुलांसारखे—१. राधाकृष्णदास गांधी, २. नीलकंठ मश्रूवाला, ३. रिषभदास रांका ४. गिरधारी बजाज, ५. रामचरण सोनी, ६. बजरंगलाल बजाज.

वाहिणी—१. केशर, २. गुलाब, ३. गोमती मश्रूवाला, ४. सुव्रता रुइय्या, ५. मीरा, (स्लेड), ६. सौभाग्यवती दानी.

मुली—१. कमळा, २. मदालसा, ३ ओम, ४. नर्मदा, ५. शांता रुइय्या, ६. तारा.मश्रूवाला.

जमनालालजींचा पवित्र परिवार याहूनहि मोठा होता व तो तितकाच प्रेमाचा व जिव्हाळ्याचा होता. गांधीजी हे पिता, विनोबाजी हे गुरु व जाजूजी हे बंधु हीं त्यांचीं नातीं तर निकटचींच होतीं. पण त्याशिवाय त्या वेळीं अन्य जे नेते होते, त्यांच्याशींहि जमनालालजी कौटुंबिक संबंध जोडीत. विशेष हें कीं, असे सारे प्रेमाचे धागेदोरे जोडलेले असले, तरी तत्त्वाचे बाबतींत किंवा कार्याचे प्रसंगीं जरूर तेवढा स्पष्टवक्तेपणा; किंबहुना विरोधहि ते दाखवीत. या प्रेमळ कठोरपणाचें व भक्तिपूर्ण विरोधाचें एक ठळक उदाहरण म्हणजे त्यांनीं वल्लभभाई पटेल यांना लिहिलेलें पत्र.

हें पत्र वर्ध्याहून ता. ४ नोव्हेंबर १९३८ रोजीं लिहिलें होतें. तें पत्र पुढीलप्रमाणें—

पूज्य वल्लभभाई,

आज मला ४९ वर्षें पूर्ण होऊन पन्नासावें वर्ष सुरू होत आहे. या वर्षांत माझी उन्नति होण्याऐवजीं अवनतिच अधिक झाली. माझ्यामध्यें पुष्कळच उणीवा मला दिसून आल्या. परमात्म्यानें दया केली आणि पूज्य बापू, विनोबा व आपल्यासारख्या पूज्य व प्रिय मित्रांचा आशीर्वाद मिळाला, तर या माझ्या उणीवा दूर होतील आणि कांहीं राजमार्ग दिसेल. नाहीं तर जीवनामध्यें कांहीं गोडी राहणार नाहीं.

"दिल्ली येथें, बिर्ला हाऊसमध्यें, भाई घनश्यामदास यांच्यासमक्ष, आपली व माझी चर्चा ज्या प्रकारानें झाली, त्यावरून हें अगदीं स्पष्ट झालें कीं, माझ्या व्यवहारामुळें आपल्याला पुष्कळ दुःख व यातना होत आहेत. माझीहि पण तशीच अवस्था झाली. तें दुःख व यातना

विसरण्याचा प्रयत्न मीं केला, तरी मीं त्या विसरूं शकत नाहीं. अशा स्थितींत मी आपल्याला पुनः भेटून काय फायदा? त्यानें आपणा उभयतांचें दुःख मात्र वाढावयाचें. म्हणून मी मुंबईस आलों असतांनाहि जाणूनबुजून आपणाला भेटलों नाहीं.

" मी आपल्याला माझा मोठा भाऊ मानीत आलों आहें.—आणि यथाशक्ति मानीत राहीनहि. म्हणून या खाजगी पत्रामध्यें मीं आपल्याला ' पूज्य ' हें संबोधन लावलें. सार्वजनिक पत्रामध्यें मात्र ' प्रिय ' शब्द वापरण्याची माझी इच्छा आहे. आपल्या–माझ्यामध्यें तीव्र स्वरूपाचे मत-भेद निर्माण झाले असतां, चूक माझीच असण्याचा पुष्कळ संभव आहे, हें मानण्यास मी तयार आहें. परंतु माझ्या हृदयांत जोंपर्यंत कांहीं गोष्टी ठाम बसलेल्या आहेत, तोंपर्यंत मी काय करूं?

" नरीमन व शरीफ प्रकरण मी प्रायः विसरूनच गेलों होतों. परंतु दिल्लीमध्यें आपण त्यासंबंधीं जे उद्‌गार काढले, त्यावरून आपल्याला तीव्र दुःख झाल्याचें दिसून आलें. गंगाधरराव, देव व स्वामी यांना मीं जीं पत्रें लिहिलीं, त्याबद्दल तर आपण फारच असंतोष प्रकट केला. परंतु, तीं पत्रें लिहिण्यांत माझा कांहीं अपराध होता, अशी ग्वाही माझें मन मला अद्याप देत नाहीं. त्याला मी काय करूं?

" असें असलें, तरी मी आपल्याला पूज्य मानतों, यावर आपण विश्वास ठेवा. असें पूज्य मानण्याचें कारण आपल्या ठिकाणचे कांहीं विशिष्ट गुण. जें काम हातीं घेतलें असेल, तें सफळ करून सोडण्याची आपली बहादुरी पाहून तर मी मुग्ध होऊन जातों. दुसऱ्या लोकांच्या तोंडून आपली कीर्ति ऐकून मला सुख वाटतें. उलट, कांहीं लोक आपली निंदा करूं लागले, तर त्यांच्याशीं मी लढतहि देतों. हें सर्व कशासाठीं? तर मी आपल्याला ' माझे ' समजतों म्हणून.

" एका कुटुंबामध्यें मतभेद असले, दोष दिसले, तरी त्यांतील माणसें फुटून निघत नाहींत. मला आपल्या स्वभावांत दोष, उणिवा व व्यंगें

दिसतात. त्यासंबंधीं पूज्य बापु व आपले मित्र यांच्यासमक्ष कधीं कधीं चर्चाहि होते. परंतु, त्याचा उद्देश आपल्यामध्यें तेवढेहि दोष राहूं नयेत हाच असतो. मी आपल्या दोषांना गुण समजत नाहीं. पण आपले उच्च गुण व कौटुंबिक नातें यामुळें मी आपल्याला पूज्य मानतों.

" आपली प्रतिष्ठा जितकी वाढेल आणि आपल्या मित्रांमध्यें आपल्याविषयींचा आदर व प्रेम जितकें वृद्धिंगत होईल, तितकें मला अधिक सुख मिळेल. तितकें सुख फारच थोड्या लोकांना मिळणें शक्य आहे. आपल्याला भिऊन आपल्यावर कोणीं प्रेम करावें हें मला आवडत नाहीं. आपल्या दोघांमध्यें फरक आहे तो इतकाच.

" मी काय लिहावयाला बसलों आणि लिहून गेलों काय ? ठीक आहे, माझ्या मनांतील भावनाच मीं लिहिल्या आहेत—आणि त्याहि मोठ्या भावाला उद्देशून. मग त्यांत भीति कसली ?

" अशा अवस्थेमध्यें आपण माझ्या घरीं उतरणें पसंत करीत नाहीं, असें माझ्या कानीं आलें. तेव्हां मला मोठें दुःख वाटलें, हें स्वाभाविकच आहे. यामध्यें मीं आपल्याला दोष देत नाहीं. पण एका तऱ्हेनें मी दोष आपल्याला देऊं शकतोंहि. आपण माझें घर आपलेंच मानावयास हवें. शिवाय माझें घर हें माझ्या एकट्याचें नाहीं. तें जानकीदेवी, कमलनयन, मदालसा, राधाकृष्ण वगैरे सर्वांचें आहे. आणि ते सर्वजण तर आपल्याला पूज्य व प्रियच मानतात. त्यांतील बहुतेकजणांना आपल्या मतभेदाचा पत्ताहि नाहीं. अशा स्थितींत आपण आमचें घर वर्ज्य करणें, हा त्यांचेवर अन्याय होणार नाहीं का ?

" हां, आपण एवढेंच करूं शकतां कीं, राजकीय किंवा सार्वजनिक विषयावर आपण माझ्याशीं चर्चा करणार नाहीं, पण घरगुती गोष्टी व हास्यविनोद यांना काय हरकत आहे ? याचा आपण विचार करावा.

(आपले चिरंजीव) डाह्याभाई यांचेकडे मी जाऊं शकतों—खाऊं शकतों—त्यांचा कानहि पकडूं शकतों. आपल्यामध्यें मतभेद झाले, म्हणून काय सर्व बालकांमध्येंहि ते व्हावेत, असें आपल्याला वाटतें? हा कोठला न्याय?

" आपण माझे शुभचिंतक आहांत. म्हणून आपलें कर्तव्य हें आहे कीं, माझ्यांतील दोष दूर करण्याचे कामीं आपण मला मदत करावी. सुखसमाधान देणारी आपली भेट लवकरच होईल अशी मला आशा आहे.

जमनालाल बजाज चा

वंदे मातरम्

हें पत्र इतकें सविस्तर देण्याचें कारण, त्यामध्यें जमनालालजींच्या अंगांतील बहुतेक सर्व गुण प्रतिबिंबित झालेले आहेत. त्यांत त्यांची निर्मल भक्ति जशी फुललेली आहे, तसेंच स्वाभिमानाचें तेजहि लख-लखत आहे. कौटुंबिक प्रेमळपणा तर शब्दाशब्दांतून ओथंबत आहे, आणि तसाच स्पष्ट शब्दांनीं मांडलेला प्रांजल मतभेदहि त्यांत प्रगट झालेला आहे. एक एक जिव्हाळ्याचीं माणसें हृदयाच्या धाग्यानें जोडण्याची त्यांची कला या पत्रांत अथपासून इतिपर्यंत ओतप्रोत भर-लेली दिसते. पण त्याबरोबरच आपलें तत्त्व न सोडण्याचा निश्चयहि त्यांत स्फुरण पावतांना आढळतो, हें विशेष.

• • •

# ६ : व्यवहार-शुद्धीचा आदर्श

*जोडोनियां धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेच करी ॥*
*परउपकारी जेणें पर-निंदा । परस्त्रिया सदा बहिणी-माया ॥*
*भूतदया गाई-पशूंचें पालन । तान्हेल्या जीवन वनामाजीं ॥*
*शांतिरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचें ॥*

— तुकाराममहाराज

" हिंसेवांचून राजकारण नाहीं, असत्यावांचून जीवन नाहीं आणि लबाडीवांचून व्यापार नाहीं. " अशी दृढ समजूत सर्व काळीं व सर्व स्थळीं मूळ धरून बसलेली आहे. तिला जोराचा धक्का देण्याचें कार्य गांधीजींनीं आपल्या सर्व आयुष्यांत केलें. १९२२ सालीं, साबरमतीच्या तुरुंगांतून एके दिवशीं रात्रीं, त्यांनीं जमनालालजींना एक पत्र लिहून, आपल्या जीवनाचें तत्त्वज्ञान मूर्त स्वरूपांत उभें केलें. त्या पत्रांत गांधीजी लिहितात,

" या हिंसामय जगामध्यें अहिंसामय राहण्याचा प्रयत्न मी करीत आहें. अहिंसा ही सत्यामध्यें समाविष्ट झालेली आहे. किंबहुना

अहिंसेचें फल म्हणजेच सत्य. सत्यापासून प्रेमाची प्राप्ति होते. सत्यापासून मृदुता मिळते. सत्यवादी माणसानें नितांत नम्र होणें जरूर आहे. नम्रतेनें अहंकार जातो. आणि अहंकाराचा सर्वथैव लोप झाला म्हणजे तो जीव मूर्तिमंत सत्य बनतो. त्याला 'ब्रह्म' म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. सत्यासाठीं सर्वस्वाचा त्याग करणें आवश्यक आहे. सत्यधर्माचें पालन करण्यासाठींच मी राजकारणांत पडलों—आणि तुमच्यासारख्यांना पाडीत आहें. कारण सत्याच्या साधनेचें बाह्य स्वरूप म्हणजे भारतीय स्वराज्य आहे."

अशा उच्च व तात्त्विक भूमिकेवरून, राजकारणाला धर्ममय बनविण्यासाठीं गांधीजींनीं जन्मभर आटाआटी केली. त्यामुळें त्यांचे जमनालालजींसारखे अनुयायीहि आपलें जीवन शक्य तितकें सत्यमय, अहिंसामय, सेवामय करण्याचा प्रयत्न करूं लागले. त्याचीं साधनें म्हणजे गांधीजींनीं आंखून दिलेलीं विधायक कार्यें. तीं आरंभीं १८ होतीं, मग २२ झालीं, आणि पुढें त्यांची संख्या किती तरी वाढली असती! कारण जीवनाचीं सर्व अंगोपांगें निर्मळ करणारे ते शुद्ध प्रवाह होते. खादी, ग्रामोद्योग, दारूबंदी, अस्पृश्यता-निवारण—इत्यादि विधायक कार्यांनीं कार्यकर्त्यांची जशी जीवनशुद्धि साधली जाते, तशीच समाज-शुद्धीहि. जनता व कार्यकर्ता—या दोघांच्या हृदयाचे धागेदोरे एकत्र गुंफण्याचें कार्य, हीं विधायक कार्यें करीत असतात.

शिवाय सत्याग्रह-संग्रामाचें शस्त्रागार म्हणजे विधायक कार्य. सत्याग्रहांत शांति, धैर्य, सहिष्णुता इत्यादि ज्या गुणांची आवश्यकता असते, त्यांचें पोषण विधायक कार्यें करीत असतात. आणि ज्या वेळीं सत्याग्रहाचा संग्राम चालू नसतो, त्या वेळीं सत्याग्रही कार्यकर्त्यांनीं काय करावयाचें? त्यांना सत्कार्यांत, सेवा-कार्यांत गुंतवून ठेवण्याचें श्रेय विधायक कार्यांना आहे.

गांधीजींचें हें सत्याचें तत्त्वज्ञान व विधायक कार्याचें चतुर्विध महत्त्व जमनालालजींनीं आत्मसात् केलें होतें. आधींपासूनच त्यांची प्रवृत्ति धार्मिक. त्यामुळें आपलें जीवन, साधुसंतांनीं उपदेशिल्याप्रमाणें, शुद्ध व उन्नत बनविण्याची कोशीस ते करीत होते. त्यांत गांधीजींसारखा नव-तत्त्व-संस्थापक व युग-प्रवर्तक गुरु भेटला.त्यामुळें "राजकारणांत हिंसा, जीवनांत असत्य आणि व्यापारांत लबाडी वावडी." हे सिद्धान्त त्यांच्या जीवनाचे दीप ठरले. आपल्या विविध व संपन्न अशा व्यापाराची वहि-वाट त्यांनीं दीर्घकाळ, चोखपणें केली व व्यापारांत नव्यानें प्रवेश करूं इच्छिणाऱ्या तरुणांसाठीं कांहीं नियम लिहून ठेवले, ते असे—

## व्यापार-सूत्रें

१. पूर्ण अभ्यास केल्याशिवाय कागदावर कांहीं लिहूं नका.

२. नफ्याची खात्री असल्याशिवाय पैशाची जोखीम अंगावर घेऊं नका.

३. नकार देण्यास भिऊं नका. ज्याला आपलें जीवन सफल करा-वयाचें आहे, त्याला आपलें मत दुसऱ्यास समजावून देण्याची हिंमत असली पाहिजे.

४. अनोळखी माणसाशीं सावधानतेनें व्यवहार करा.

५. व्यवहारामध्यें नेहमीं सच्चेपणानें वागा. त्यांतील प्रत्येक घटनेची नोंद करून ठेवा.

६. पुरी जानपछान असेल त्यालाच जामीन रहा.

७. एकेक पैचा हिशेब पक्का ठेवा.

८. वक्तशीरपणा कसोशीनें पाळा. जेव्हां ज्याला भेटावयाचें, तेव्हांच त्याला भेटा.

९. तुम्ही जितकें करूं शकाल, त्याहून अधिक आशा कुणाला दाखवूं नका.

१०. सच्चेपणानें चाला—त्यानें फायदा होवो वा न होवो.
११. जें करावयाचें तें आजच करा.
१२. यशाचाच विचार करा, म्हणजे यश मिळेल.
१३. शरीर व आत्मा यांच्या शक्तीवर विश्वास ठेवा.
१४. अंगमेहनत करण्यास लाजूं नका.
१५. स्वच्छ बोलण्यास संकोच धरूं नका.

"आधीं केलें मग सांगितलें" या श्रीसमर्थांच्या मंत्राप्रमाणें, जमनालालजींनीं हीं व्यापारसूत्रें इतरांना सांगण्यापूर्वीं स्वतः आचरिलीं होतीं. त्यांचा पिढीजात व्यापार कापसाचा. त्याशिवाय साखर, पोलाद इत्यादि कैक पदार्थांचे कारखाने त्यांनीं पुढें काढले आणि देशी–विदेशी व्यापाऱ्याशीं व्यवहार करून दरसाल कोट्यवधि रुपयांची उलाढाल केली. त्यामुळें सरकारी खात्याशींहि त्यांचा पुष्कळ संबंध आला. पण गिऱ्हाईक असो, व्यापारी असो किंवा सरकारी अधिकारी असो-- सर्वांशीं त्यांचें वागणें अगदीं चोख ! व्यवहार–शुद्धीचा आदर्शच !

आपल्या दरिद्री देशांत फार नसलें तरी, थोडे नवकोट नारायण आहेत. पण त्यापैकीं बहुतेकांचे हात असत्यानें व अप्रामाणिकपणानें माखलेले आहेत. ज्यांचीं तोंडें काळ्याबाजारानें काळीं झालीं नाहींत, असे बनिये किती सांपडतील? देशद्रोह करूनहि आपलें उखळ पांढरें करूं पाहणारे कारखानदार थोडे आहेत काय? अशा एका कारखानदारांच्या शिष्टमंडळानें पूर्वीं परदेशाचें प्रस्थान ठेवण्यापूर्वीं गांधीजींचा आशीर्वाद मागितला. पण गांधीजींनीं त्यांना झणझणीत शापच दिला. सत्यासाठीं व दरिद्रनारायणाच्या कल्याणासाठीं महात्माजी किती कठोर होत, याचा तो नमुनाच होता.

गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा प्राणच हा आहे कीं, "सर्व जीवन एकजिनसी आहे." देवघरांत निराळें, दुकानांत निराळें, सभेंत निराळें–असे जीवनाचे कप्पे पाडणें त्यांना पसंत नव्हतें. सूर्य जसा पाठीपोटीं

प्रकाशमय, तसें मानवी जीवन सर्व अंगांनीं, सर्व क्षेत्रांत शुद्ध, मंगल व पवित्र बनलें पाहिजे, हा त्यांच्या जीवनाचा ध्रुव-तारा. पण त्या ध्रुव-ताऱ्याकडे पाहून व्यवहाराच्या डबक्यांत पडणारेच फार.

कांहीं कोट्यधीश कारखानदार पोकळ कंपन्या उभारून, खोटे हिशेब ठेवून, विक्री-कर, प्राप्ति-कर इत्यादि सरकारी देणीं चुकवून आणि कामगारांना पिळून व गिऱ्हाइकांना फसवून आपली तिजोरी भरतात. आणि ते कधीं राजकारणांत भाग घेतात तो एवढ्यासाठींच कीं, आपल्या त्या पापकृत्यांवर पांघरूण पडावें. कॉंग्रेससारख्या बलाढ्य संस्थेला देणग्या देण्यांतहि त्यांचा तोच हेतु असे. इकडे ब्रिटिश सरकारच्या कृपेंतहि राहावयाचें आणि तिकडे कॉंग्रेसलाहि साहाय्य करावयाचें-असा दुटप्पी डाव खेळून दोन्हींकडून फायदा मिळविण्यांत कैक कारखानदार कुशल होते. आपल्या व्यापाराला अधिक सवलती मिळाव्यात, या भोगेच्छेंतूनच त्यांचा त्याग जन्मास येई. त्यांचें सारें राजकारण स्वतःची चामडी बचावून चाले, एवढेंच नव्हे तर, त्या चामडीचे आंत मूठभर मांस जास्त चढावें, याच स्वार्थैक दृष्टीनें ते आपल्या जीवनाचीं सूत्रें हालवीत. त्यांच्या औदार्यांतहि व्यापारी दृष्टि असे.

या सर्वसामान्य वणिक्-प्रवृत्तीला जे दुर्मिळ अपवाद या देशामध्यें होते, त्यांत जमनालाल अग्रगण्य होते, यांत शंका नाहीं. धुतल्या तांदळासारखें त्यांनीं आपलें जीवन साधें व शुद्ध ठेवलें, स्वच्छ आरशाप्रमाणें त्यांनीं आपला व्यापार निर्मळ राखला आणि राजकारणांत भाग घेतला, तो पूर्ण निर्लोभी वृत्तीनें, महान त्याग करून व कठोर देहदंडहि सोसून. व्यापारांतहि त्यांची उदार दृष्टि असे. त्यांची गोष्टच निराळी. म्हणूनच त्यांना आचार्य कालेलकर " वैश्यर्षि " म्हणत.

दुसरे एक कोट्यधीश श्री. घनश्यामदास बिर्ला यांनीं जमनालालजींचा मोठा गुण द्रव्य-निरपेक्षता हा दाखविला आहे. ते एके ठिकाणीं लिहितात,

"त्यांच्यामध्यें सर्वांत मोठा गुण जो होता, तो म्हणजे धनाचा तिरस्कार. त्यांच्या स्वयंपाकघरांत स्वादिष्ट पक्कानांचा अभाव असे. त्यांचें राहण्याचें घर म्हणजे धर्मशाळेंतील एक कोठीच. आणि त्यांचा बहुतेक सारा प्रवास आगगाडीच्या तिसऱ्या वर्गांतून." जमनालालजींनीं आपल्या उद्योगधंद्याचें ब्रीदवाक्य, धर्मराजानें सांगितलेलें, स्वीकारलें होतें. तें म्हणजे—

"यज्ञाय सृष्टानि धनानि धात्रा
यज्ञाय सृष्टः पुरुषो रक्षितश्च ।
तस्मात्सर्वं यज्ञ एवोपयोज्यं,
धनं न कामाय हितं प्रशस्तम् ॥"

जमनालालजींचा कापसाचा व्यापार मुंबई येथें चाले. कापूस खरेदी करून त्याच्या गांठी बांधून त्यांची विक्री करणें हा त्यांचा धंदा. हा धंदा जादा फायदेशीर व्हावा म्हणून कांहीं व्यापारी त्या कापसावर पाणी शिंपडत आणि मग गांठी बांधीत. त्यामुळें कापसाचें वजन तर वाढेच, पण त्याशिवाय तो अधिक चांगला दिसून त्याची किंमत जास्त येई. पण वस्तुस्थिति अशी असे कीं, पाणी मारल्यामुळें तो कापूस पुढें अधिकच खराब होई.

हिंदी बनियांची ही 'अंदरकी बात' परदेशी व्यापाऱ्यांनीं ओळखली आणि ते कापसाला कमी भाव देऊं लागले. त्याचा एक परिणाम असा झाला कीं, जे व्यापारी पाणी मारीत नव्हते, त्यांच्याहि मालाला कमी किंमत येऊं लागली. म्हणून बहुतेक सारे व्यापारी कापसावर पाणीच मारूं लागले. लबाडीच्या या 'दुष्ट वर्तुळाचा' परिणाम गरीब शेतकऱ्यांना भोगावा लागे. त्यांना व्यापारी कमी पैसे देऊं लागले. पण जमनालालजींच्या दुकानाचा सक्त नियम असा होता कीं, कापसावर पाणी मारावयाचें नाहीं.

मुनीमांना चिंता पडली. इतरांपेक्षां आपल्या व्यापारांत नफा कमी होऊं लागला, हें त्याला कमीपणाचें वाटूं लागलें. म्हणून त्यानें जमनालालजींजवळ कापसावर पाणी मारण्याची परवानगी मागितली. तेव्हां जमनालालजींनीं स्पष्ट उत्तर दिलें, "नफा होणार नसेल तर न होवो. परंतु आपल्या व्यापारांत सच्चेपणा असलाच पाहिजे. आणि पाणी मारावयाचें असेल तर त्या गांठीवर W. I. C. (Water in cloth) अशीं अक्षरें लिहून पाणी मारल्याचें जाहीर करा. आणि पाणी न मारलेल्या गांठींवर B. J. (बच्छराज जमनालाल) अशीं अक्षरें लिहा."

असा खुलासा करणारीं पत्रकेंहि वांटण्यांत आलीं. तीं पाहून परदेशी व्यापाऱ्यांना जमनालालांचा खरेपणा पटला. आणि ते त्यांचा न भिजविलेला, B. J. शिक्का असलेला कापूस, जादा दाम देऊन, घेऊं लागले. त्यामुळें त्यांचा कापूसहि जास्त खपूं लागला आणि नफाहि जास्त होऊं लागला. सत्यानेंच त्यांचा व्यापार भरभराटीस चढला. "सचोटी हीच व्यापाराची हातोटी." या म्हणीचा वस्तुपाठच जमनालालजींनीं दाखविला. शेवटीं सर्व व्यापाऱ्यांनींच पाणी मारणें बंद केलें.

सचोटी फायद्याची होते किंवा "सत्यमेव जयते" हे सिद्धान्त सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहेत. पण त्यांत हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, सचोटी किंवा सत्य फलद्रूप होण्यास कालावधि मात्र दीर्घ लागतो; व कष्टहि अधिक पडतात. विनाआयास व झटपट यश असत्यानें, कपटानें, लबाडीनें मिळतें, पण तें टिकावूं नसतें. आणि त्यासाठीं मनःस्वास्थ्याची जी किंमत द्यावी लागते ती भलतीच. लबाडीनें व्यापार करणाऱ्याला चित्त-शांति कोठली? अशा कोट्यधिशाला, गाद्यागिरद्यांवर लोळूनहि, दहा दहा वर्षें मिनिटभरहि झोप येत नाहीं, असे दाखले प्रसिद्ध आहेत.

मात्र सत्यानें व नीतीनें चालणाऱ्या माणसानें आपल्याला हटकून यश व वैभव मिळेलच, असें कधीं धरून चालूं नये. कारण समाज अपूर्ण व

विषम आहे. मनाचें समाधान व आत्म्याची उन्नति हेंच सत्य-पालनाचें अचूक फल होय. आणि त्याची सर त्रिखंडाच्या राज्यासहि येणार नाहीं.

जमनालालजींच्या मुंबईच्या दुकानांत स्वतःच्या मालाशिवाय दुसऱ्या व्यापाऱ्यांच्या मालाचीहि अडतीनें विक्री होत असे. त्यासाठीं कापसाची गांठ फोडून नमुना दाखवावा लागे. केवळ या नमुन्याच्या कापसाची किंमत वर्षाकांठीं हजारों रुपयांची होई. ती कमाई अन्यायाची आहे असें जमनालालजींना वाटलें. लगेच त्यांनीं आपल्या मुनीमाला बोलाविलें व फर्माविलें, "प्रत्येक व्यापाऱ्याचा नमुन्याचा कापूस निराळा ठेवीत जा. आणि तो विकून त्याची किंमत त्याच्या खात्यावर मांडीत जा."

मुनीम आ वासून पाहात राहिला. कारण त्याला माहीत होतें कीं, रोज पांचपन्नास व्यापाऱ्यांच्या शेंकडों गांठी उघडल्या जात होत्या व प्रत्येक गांठींतून १०।२० शेर कापूस घेतला जात होता. त्याच्या किंमतीवर पाणी सोडणें म्हणजे केवढी नुकसानी ! शिवाय तो नमुन्याचा कापूस निराळा ठेवण्यासाठीं जागाहि लागणार.

या साऱ्या तक्रारी व्यवहारचतुर मुनीमानें पुढें मांडल्या. पण जमनालालजींची निर्लोभिता दृढ होती. त्यांनीं निर्णय दिला कीं, "नमुन्याचा कापूस विकून जी रक्कम येईल ती गांठींच्या प्रमाणांत व्यापाऱ्यांना वांटावी." या निर्णयामुळें दरसाल हजारों रुपयांची प्राप्ति जमनालालजींची बुडाली. पण सत्याची एक पायरी ते वर चढले. —मानवतेची उच्च अवस्था त्यांनीं प्राप्त करून घेतली.

संपूर्ण असत्याचा काळाकुट्ट रंग ज्यांना आवडत नाहीं, ते सत्याच्या निरनिराळ्या छटा रंगवीत बसतात. "सत्याशीं सत्यानें वागा—साधूशीं साधुत्वानें चाला, पण असत्याशीं असत्यानेंच सामना दिला पाहिजे—शठाला शाठ्यानेंच जिंकलें पाहिजे." ही त्यांची व्यवहार-नीति. पण गांधीजींना— आणि जमनालालजींसारख्या त्यांच्या शिष्यांना—

ती साफ नापसंत होती. ब्रिटिश सरकार परकें आहे, दुष्ट आहे, जुलमी आहे, आणि आपलें शत्रुहि आहे, हें त्यांना मान्य असूनहि, त्या सरकारचें देणें चुकविण्याची लबाडी त्यांनीं कधीं केली नाहीं.

नागपूरच्या झेंडा-सत्याग्रहांत सामील होण्यासाठीं जमनालाल जेव्हां मुंबईहून निघाले, तेव्हां त्यांनीं आपल्या मुनीमाला सक्त बजाविलें कीं, "प्राप्तीवरील कर चुकविण्यासाठीं खोटे जमाखर्च ठेवूं नका किंवा सरकारी अधिकाऱ्यांना लांच देऊं नका. जें कांहीं असेल, तें सारें खरें खरें दाखवा आणि पुरा कर भरा."

मुनीमाच्या कसोटीचाच तो काळ होता. आपल्या धन्याचें अधिकांत अधिक हित करावें, हा त्याचा विचार दहा लोकांसारखाच होता. आणि गंमत अशी कीं, त्या वर्षीं त्यांच्या व्यापारांत नेहमींपेक्षां खूपच अधिक नफा झाला. त्यावर सरकारनें एकदां का जादा कर बसविला, कीं तो कायमचाच बसेल. या स्वामिनिष्ठ विचारानें त्यानें आपला जमाखर्चच सरकारला दाखविला नाहीं. त्याला वाटलें, दरसालप्रमाणें ५।७ हजार रुपयेच कर बसेल. पण इन्कमटॅक्स ऑफिसरनें ८५ हजार रुपये कर बसविला.

आतां काय करावें? मुनीमाला काळजी वाटूं लागली.

तो त्या ऑफिसरला भेटावयास गेला. १० हजार रुपये लांच त्यानें त्याला दिली. त्या जादूमुळें ८५ ऐवजीं ८ हजार रुपयेच कर बसला. "केवढी लढाई आपण जिंकली!" या खुशींत मुनीमजी परत आले.

पुढें जमनालाल तुरुंगांतून सुटून आले. त्यांनीं मुनीमाला कर-भरणीसंबंधीं छेडलें. मुनीमानें आढेवेढे घेऊन पण सर्व सत्य सांगितलें. तें ऐकून जमनालालजींच्या हृदयाला तीव्र वेदना झाल्या.

आधीं सूचना देऊनहि असत्याचा कलंक आपल्या उद्योगास लागावा, याचें त्यांना मनस्वी दुःख झालें.

त्याच दिवशीं जमनालाल साबरमतीला गेले. गांधीजींच्या चरणावर मस्तक ठेवून त्यांनीं सर्व वृत्तान्त इत्थंभूत निवेदन केला. "या पापाचें प्रायश्चित्त मी काय घेऊं?" असा प्रश्न मुमुक्षु जमनालालजींनीं आपल्या गुरूला विचारला.

गांधीजींनीं क्षणभर विचार केला आणि मार्ग दाखविला. ते म्हणाले, "यावर हाच उपाय आहे कीं, मुनीमानें जो पैसा वांचविला तो जनतेच्या कामाकडे लावावा. त्यायोगें मुनीमाला हें कळून येईल कीं, आपण लबाडीनें वांचविलेला पैसा तुम्ही आपल्याजवळ ठेवीत नाहीं. मग या वाममार्गाकडे त्याची प्रवृत्तीच होणार नाहीं. तुम्हीं स्वतः तर त्या पैशाचा लोभ कधीं धरलाच नाहीं. फार काय? तो लोभ धरूं नका, असा आदेश देऊनच तुम्ही सत्याग्रहाला गेलां होतां. तेव्हां तुम्ही पापापासून अलिप्त आहांत, म्हणून प्रायश्चित्ताची गरज नाहीं."

असेंच व्यवहार-शुद्धीचें उदाहरण पुण्याचे महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांच्या चरित्रांत आढळतें. त्यांना भेटण्यासाठीं एक मित्र मुंबईहून पुण्यास तांतडीनें आला. घाईमुळें त्यानें रेल्वेचें तिकीट काढलें नव्हतें. तें पुढें अण्णासाहेबास कळलें. तेव्हां त्यांनीं स्टेशनवर मनुष्य पाठवून पुणें ते मुंबई असें तिकीट काढून आणलें—आणि लगेच फाडून टाकलें.

"हें काय? कशासाठीं करतां हें?" मित्रानें विचारलें.

"रेल्वेचें बुडालेलें देणें परत करीत आहें."

रक्कम लहान पण नीति मोठी. त्या नीति-शास्त्राप्रमाणें पाहतां, जमनालालजींनीं प्राप्तीवरील वांचलेला सारा कर सरकारांतच भरणें योग्य झालें असतें. पण सरकारच्या चक्रव्यूहांत सरळ पैसा भरल्याचेहि परिणाम वक्र व्हावयाचे! म्हणून सरकारचेहि सरकार असणाऱ्या जनतेला तो पैसा देऊन टाकण्याचा गुरु-मंत्र गांधीजींनीं दिला.

असाच निर्मल व्यवहार करून निर्भयतेनें आपला कारभार करणारे बडे कारखानदार म्हणजे टाटा कंपनी. त्यांचे उद्योग प्रचंड, हिशेब चोख व औदार्यहि मोठें. स्वदेशाची औद्योगिक भरभराट व्हावी अशीहि टाटांची दृष्टि असे. त्यामुळें उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत धडाडीनें उडी घेणारा तरुण व्यापारी दिसला कीं, ते त्याचें सहकार्य घेण्यास पुढें येत. या त्याच्या धोरणामुळें जमनालालजींकडे त्यांचें लक्ष खेचलें गेलें.

ते पहिल्या महायुद्धाचे दिवस. कापडाचे भाव भयंकर कडाडले, त्यामुळें कापड-गिरण्यांना भलताच फायदा होई. म्हणून त्यांच्या शेअरची किंमतहि एकसारखी वाढत असे. एकदां टाटांनीं जमनालालांना असें सुचविलें कीं; ससून गटांतील कापड-गिरण्यांचे ५००० शेअर खरेदी करा. जमनालालांनीं होकार दिला. टाटांनीं ५००० शेअर पाठविले. आणि प्रत्येकीं १० रुपयेप्रमाणें ५०,००० रुपये पाठविण्यास त्यांनीं लिहिलें. पण त्या वेळीं त्या शेअरची किंमत प्रत्येकीं १४ रुपये झाली होती. तें लक्षांत घेऊन जमनालालांनीं टाटांना उत्तर लिहिलें कीं,—

" आपण १० रुपयांप्रमाणें हिशेब करून शेअरचे पैसे मागितले ही आपली माझ्यावर कृपा आहे. पण सध्यां बाजारभाव १४ रुपये आहे. त्या भावानेंच मी आपल्याला पैसे देऊं इच्छितों."

जमनालालांचें हें औदार्य व प्रामाणिकपणा पाहून टाटा चकित झाले. त्या निर्लोभितेमुळें टाटांचा त्यांचेवर अधिकच लोभ जडला.

त्या वेळीं कापसाचा विमा उतरण्याचें काम परदेशी कंपन्या करीत असत आणि त्या त्यावर खूप गबर होत. परदेशाला जाणारा हा सर्व पैसा वांचवावा,असा विचार जमनालालांच्या देशभक्त मनांत उद्‌भवला. तो त्यांनीं टाटांना सांगितला. टाटांनीं जमनालालांच्या सहकार्यानें " न्यू इंडिया इन्शुअरन्स कंपनी " स्थापन केली. ही पहिली स्वदेशी आयुर्विमा कंपनी. तिच्यांतील आपले सर्व शेअर टाटा कंपनीनें जमनालालांचे नांवें करून दिले. त्यामुळें जमनालालांना लाखों रुपयांचा फायदा झाला.

शेठ रामनारायण रुईया हे प्रसिद्ध उद्योगपति होते. त्यांच्या भागींत जमनालाल व्यापार करीत असत. रामनारायणांचा ससून गटाशीं निकटचा संबंध होता. एके दिवशीं ससून यांनीं रामनारायणजींना सांगितलें, "वऱ्हाडमध्यें आमची एक जिनिंग फॅक्टरी आहे. ती आम्हांला विकावयाची आहे. तरी चौकशी करून तिची योग्य किंमत ठरवावी."

रामनारायणांनीं चौकशी केली. त्यांच्या गैरहजेरींत त्यांच्या मुनीमानें ती जमनालालजींना विकली. त्यांनीं लगेच ती दुसऱ्या एका गिऱ्हाइकाला ११००० रु. नफा घेऊन विकली. रामनारायणजी परत आल्यावर त्यांना असें वाटलें कीं, आपल्याला जमनालालजींकडून किंमत कमी मिळाली. त्यांनीं तसें बोलून दाखवितांच जमनालालजींनीं आपले नफ्याचे ११००० रु. त्यांना देऊन टाकले. जमनालालजींची निःस्वार्थी व निर्लोभी वृत्ति पाहून रामनारायणांचें अंतःकरण पुरें जिंकलें गेलें. त्यांनीं आपल्या इस्टेटीचे जमनालालांना पुढें एक ट्रस्टीच बनविलें.

आणखी एक बडे व्यापारी. त्यांचें नांव शेठ हिरालाल रामगोपाल फर्म. त्यांच्या भागींत बच्छराजशेठजी कापसाचा व्यापार करीत असत. तीच वहिवाट जमनालालांनीं पुढें चालू ठेवली होती. एकदां मुंबई येथें "मारवाडी विद्यालय" स्थापन करण्याची वाटाघाट चालू होती. त्यासाठीं जमनालालांनीं ५००० रुपयांचीं देणगी दिली. त्यावेळीं शेठ रामगोपाळ मारवाडांत गेले होते. तेथून ते परत आल्यावर त्यांना हा देणगीचा वृत्तान्त कळला. ती देणगी त्यांना मानवली नाहीं. त्यांनीं तिला हरकत घेतली.

"मीं दिली ती दिली! आपण ती रकम माझ्या नांवें लिहा म्हणजे झालें." जमनालालांनीं त्यांना सांगितलें. पण रामगोपाळांचा राग कांहीं तेवढ्यानें शमला नाहीं. त्यांनीं जमनालालांची भागीदारी तोडून टाकली.

भागीदारी तोडणें ही काय सोपी गोष्ट आहे? त्या फर्मजवळ कापसाच्या शेंकडों गांठी होत्या. त्यांचें काय करावयाचें?

"त्यांचा लिलाव पुकारा." रामगोपाळांनीं रागारागानें फर्माविलें. पण तसें होणें त्या फर्मलाच कमीपणा आणणारें होतें. म्हणून जमनालालजींनीं उदारपणें सांगितलें, "आजचा जो बाजारभाव असेल, त्याप्रमाणें गांठींची किंमत करा म्हणजे ती किंमत देऊन मी साऱ्या गांठी विकत घेतों." खरेदीपेक्षां जादा दाम देऊन जमनालालांनीं त्या गांठी खरेदी केल्या.

भागीदारी तोडण्याच्या या खटाटोपांत वर्ध्यांतील एक जिनिंग फॅक्टरी जमनालालांच्या वांट्यास गेली. तेव्हां इतर व्यापाऱ्यांनीं रामगोपाळांचे कान फुंकले."ही फॅक्टरी न घेतां नुसती इमारत घेऊन आपण काय मिळविलें?" ते कुचकुचले.

हें किल्मिष उद्भवलें असल्याचें जमनालालांना कर्णोपकर्णी कळलें. त्यांनीं लगेच रामगोपाळांना कळविलें, "आपली इच्छा असेल तर आपण फॅक्टरी परत घ्यावी. ती देण्यास मी राजी आहें." करार होऊन दिलेली फॅक्टरी त्या लोभी शेटजीनें परत घेतली.

पण अशा वाममार्गानेंहि रामगोपाळांची फर्म भरभराटीस चढली नाहीं. उलट तिला उतरती कळाच लागली;उलट; सचोटी व उदारता या तत्त्वानें व्यापार करणाऱ्या जमनालालांची मात्र भरभराट होत गेली. तरी वैभवानें मदांध न होतां, जमनालाल रामगोपाळांच्या कुटुंबाशीं सन्मानानेंच वागत व जरूर तेव्हां साहाय्यहि करीत.

कोणाहि व्यापाऱ्याला मदत करण्यास जमनालालजींचा पाय पुढें असे. त्याचें एक गमक म्हणजे एका लक्ष्मीपुत्रानें त्यांना लिहिलेलें एक पत्र. मुंबई येथील श्रीमान शांतिकुमार नरोत्तम मोरारजी यांनीं ता. १ सप्टेंबर १९३३ च्या पत्रांत जमनालालजींविषयीं गाढ कृतज्ञता व्यक्त केली आहे. ते लिहितात,

"माझ्या आयुष्यांतील ऐन आणीबाणीच्या वेळीं आपण मोठें द्रव्य-साहाय्य करून मला जो हातभार लावला, त्याबद्दल मी कोणत्या शब्दांनीं कृतज्ञता व्यक्त करावी हें मला कळत नाहीं. येथें मला हें सांगणें अवश्य वाटतें कीं, माझ्या व माझ्या वडिलांच्या आप्तेष्टांचा व धनिक नातलगांचा जो मोठा परिवार आहे, त्यामध्यें आपल्याइतकी मदत करणारा दुसरा कोणीहि मला आढळला नाहीं."

व्यापारांत समुद्राप्रमाणें भरती–ओहोटी सदैव चालू असते. आज भरतीच्या लाटेवर उभा राहून ऐश्वर्याच्या सूर्यप्रकाशांत तळपणारा व्यापारी, उद्यां ओहोटीच्या तळाशीं जाऊन नांवनिशाणीसुद्धां नाहींसा होतो. चिरंजीलाल नांवाच्या एका तरुण व्यापाऱ्याला या भाग्यचक्राचे फेरे सोसावे लागले. वर्धा येथें येऊन कापसाचा व्यापार करून त्यानें खूप पैसा मिळविला.

मिळविला–आणि थोड्याच दिवसांत सारा घालविला. नुसता घालविलाच नव्हे, तर कर्जाचा बोजाहि डोक्यावर घेतला. त्याला जमनालालजींनीं आश्रय दिला व त्याचें सारें कर्ज फेडलें. तो त्यांचेकडे नोकर म्हणून काम करूं लागला.

एकदां एका नातेवाइकाच्या कामासाठीं चिरंजीलाल एक महिन्याची रजा घेऊन बाहेरगांवीं गेले. तेथून ते परत आले, ते आजारी पडले. पडले ते चांगले चार–पांच महिने. जवळ तर पैसा नाहीं. जमनालालांच्या मुनीमानें रजेचाहि पगार दिला नाहीं. मग त्यांच्या घरीं जाऊन तो वास्तपुस्त कोठून करणार?

त्यांतच त्या नातेवाइकानें चिरंजीलालाकडे पैशाचा तगादा लावला. तो बिचारा घरांतील एक एक वस्तु विकून कसा तरी प्रपंच चालवीत होता. तो हा तगादा कसा भागविणार? त्याला आपला जीव अगदीं नकोसा झाला.

ती करुण कथा कानीं आली, तेव्हां जमनालालांच्या चित्तास मोठी व्यथा झाली. ते स्वतः तडक चिरंजीलालच्या घरीं गेले आणि सद्गदित स्वरानें म्हणाले, "भाई! मला माफ कर. माझ्या मुनीमानें तुमची कांहींच दखल घेतली नाहीं, हा देवाघरचा केवढा अन्याय आहे!" प्रेमानें ओथंबलेले असे उद्गार काढून जमनालालांनीं, त्याच्या रजेच्या दिवसापासून त्या दिवसापर्यंतच्या साऱ्या पगाराचे पैसे, चिरंजीलालच्या हातीं दिले. चिरंजीलालाचें हृदय उचंबळून आलें. त्याच्या नेत्रांत कृतज्ञतेचे सप्तसमुद्र हेलावूं लागले.

श्रीमंत असो, गरीब असो, सर्व मानवांवर प्रेम करावें, ही जमनालालांची वृत्ति.

▲

"दया करी जे पुत्रासी। तेचि दासां आणि दासी॥"

असेच मायाळू व उदार धोरण त्यांचें सदैव सर्वांशीं असे. त्यांना दररोज मालिश करणारा एक साधा नोकर. त्याचें नांव विठ्ठल. नोकरी लागून अवघे आठ दिवस झालेले. कामानिमित्तानें तो जमनालालांबरोबर मुंबईला गेला. तेथें जमनालालांना तार मिळाली कीं, विठ्ठलचे वडील वारले. त्यांनीं विठ्ठलला बोलावून सांगितलें, "तूं वर्ध्याला जा, त्यासाठीं हे १०० रुपये घे."

फक्त आठ दिवस नोकरी झालेली असतांना १०० रुपये देणारा तो धनी पाहून विठ्ठल विरघळला. तो त्यांचा कायमचा एकनिष्ठ सेवक बनला.

थंडीचे दिवस होते. जमनालाल सेवाग्रामला गेले—आणि त्यांचेबरोबर विठ्ठलहि गेला. दोघेहि तेथें राहिले. पहाटे लवकर उठण्याची जमनालालांना संवय. ते बाहेर फिरावयास निघाले, तेव्हां एका साध्या चादरीमध्यें कुडकुडत असलेली विठ्ठलाची मूर्ति त्यांना दिसली. त्याच

दिवशीं त्यांनीं खादी–भांडारांतून एक घोंगडी व एक लोकरीची बंडी खरेदी करून त्याला दिली.

▲

" जे का रंजले–गांजले, त्यांसी म्हणे जो आपुलें । "

या कोटींतील जमनालालजी होते. एकदां एका गुरख्याला गाईनें शिंग मारलें म्हणून त्याला दवाखान्यांत पाठविण्यांत आलें, तर तेथें समक्ष जाऊन जमनालालांनीं त्याची वास्तपुस्त केली. तसेंच, आश्रमांतील एक कार्यकर्ता एकदां आजारी पडला, तेव्हां जमनालाल तुरुंगांत होते. तुरुंगांतून सुटून वर्ध्याला येतांच पहिलें काम त्यांनीं कोणतें केलें असेल, तर दवाखान्यांत जाऊन त्या कार्यकर्त्याची भेट घेणें. माणसाचीं मनें जिंकण्याची हीच गुरुकिल्ली आहे.

जमनालालजी सार्वजनिक कार्यांत अधिकाधिक लक्ष घालूं लागले, त्यामुळें त्यांना आपल्या व्यापाराकडे पुरेसें लक्ष पुरविण्यास वेळ सांपडेना. म्हणून त्यांनीं वर्ध्याच्या दुकानाचें कामकाज पाहण्यासाठीं तीन माणसांची एक समिति बनविली. आपणच सर्व कामें केलीं पाहिजेत, असा लोभ त्यांना कधींच नव्हता. दिवाळींतील लक्ष्मी-पूजनाचे वेळीं आपल्या वहीवर जमनालाल जे शब्द लिहीत, त्यांत त्यांच्या या निर्लोभी, परोपकारी व ईश्वरनिष्ठ वृत्तीचें स्वच्छ प्रतिबिंब पडलेलें आढळतें. ते शब्द असे—

" श्री लीछमी सुं प्रार्थना छजी सद्बुद्धी देव तथा सचाई क साथ व्यापार करण की तथा रुजगार माही लाभ होव ताकी देस तथा दुखी जनता क काम माही लगाण की बुद्धि देव ! "

▲

सर्व आयुष्यभर जमनालालांची एकच मनीषा होती. ती म्हणजे " मी माझ्या आयुष्यांत असें वागावें कीं, त्यामुळें मरतेवेळीं मला कोणी

शत्रु मानूं नये." आणि ही त्यांची मनीषा सर्वांगांनीं पूर्ण झाली असें आतां म्हणण्यास हरकत नाहीं. "अजातशत्रुच" होते ते. कोणी शत्रुभावानें अपकार करूं लागला, तरी ते त्यावर मित्रभावानें उपकारच करीत.

पथिकजी नांवाचे त्यांचे एक स्नेही होते. दोघेहि संस्थानी चळवळींत भाग घेत. काम करतां करतां त्यांच्यामध्यें मतभेद उत्पन्न झाला. त्यामुळें पथिकजी वर्ध्याहून राजस्थानकडे गेले. तेथें ते संस्थानी प्रजेची सेवा करूं लागले.

पुढें एकदां उदयपूर संस्थानचे एक दिवाण जमनालालांना भेटले व पथिकजींविरुद्ध बोलूं लागले. "तुम्ही त्यांना पुष्कळ देशभक्त समजा, पण तो मोठा कावेबाज माणूस आहे." अशीं मुक्ताफळें दिवाणांच्या मुखांतून निघूं लागलीं. तीं ऐकून जमनालालांचा गौरवर्ण चेहरा लालबुंद दिसूं लागला. तांबड्या कांचेच्या हंडींत मेणबत्ती लावल्यानंतर तिच्या वाढत्या प्रकाशानें ती हंडी जशी अधिकाधिक लाल होत जाते तशी जमनालालांची मुद्रा रागानें लाल होत गेली. ते रागावून त्या दिवाणाला कडाडून म्हणाले, "तुम्ही पथिकजींना काय मानत याच्याशीं आम्हांला कर्तव्य नाहीं. आम्ही त्यांना देशभक्तच मानतों, आमचे मतभेद असले, तरी त्यांच्या देशभक्तीला कोणी नांवें ठेवलेलीं आम्हांला खपणार नाहींत."

त्या दिवाणांची इच्छा अशी होती कीं, जमनालालांच्या खादी-कार्यालयांत पथिकजींच्या कार्यकर्त्यांना थारा मिळूं नये. पण जमनालालांनीं त्यांना स्वच्छ बजावलें कीं,

"पथिकजी आमचे मित्र आहेत. त्यांचे कार्यकर्ते आमच्या कार्यालयांत जरूर येतील व राहतील." मतभेदांतहि मित्रता राखण्याइतकी मानवता जमनालालांच्या अंगीं होती.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................
विभाग ........................ नों: दि: ....................

एकदां त्यांच्या एका नातलगानें लग्नासाठीं कांहीं रुपये उसने नेले. ते देतांच जमनालालांनीं त्या गरीब नातलगास सुचविलें, "पैसे परत नाहीं आले तरी चालतील. कारण मी माझ्या खाजगी रकमेंतून देत आहें." तो नातलग गरीब असला, तरी स्वाभिमानी होता. तो उत्तरला, "छे! छे!! असें कसें होईल? मी पै न् पै परत करीन. आपल्या दुकानाच्या वहींतच माझ्या नांवें ती रक्कम मांडून ठेवा."

झालें! कर्ज गेलें आणि मित्रहि गेला—अशी स्थिति निर्माण झाली. तीन वर्षें झालीं. दुकानाच्या मुनीमानें केलेले तगादे फोल ठरले, तेव्हां त्यानें कायदेशीर नोटीस दिली. ती पाहतांच त्या नातलगाचें पित्त खवळलें. तो जमनालालांकडे लाल होऊन आला व तणतणूं लागला.

कोर्टांत खटला सुरू झाला. अर्थात् निकाल जमनालालांच्या बाजूनें झाला. कर्ज वसूल करण्याची डिक्री त्यांना मिळाली. पण त्यांचें थोरपण हें कीं, त्यांनीं त्या डिक्रीचा अंमल कधींच केला नाहीं. कर्जाची रक्कम वसूल झाली नाहीं, ती त्यांनीं आपल्या नांवेंच खर्चीं टाकली.

"जमनालालांनीं हा खटला कोर्टांत नेलाच नसता तर?" एका मित्रानें शंका काढली. तिला उत्तर देतांना जमनालालांनीं लिहिलें, "व्यवहार व मैत्री यामध्यें जो माणूस न्यायनीति सोडून वागतो आणि लोभानें अनुचित मार्ग स्वीकारतो, त्याला मोकळा सोडणें हें मी मुळींच योग्य समजत नाहीं. त्याला मोकळें सोडलें असतें, तर त्याच्या शिव्यांना भिऊन मीं कर्ज माफ केलें,असा समज निर्माण झाला असता आणि तो मला निर्माण व्हावयास नको होता."

व्यवहार व प्रेमभाव यांचा असा समतोल राखल्यामुळें जमनालालजी हे जितके यशस्वी व्यापारी झाले, तितकेच लोकप्रिय सज्जनहि मानले गेले. त्यांनीं त्या कर्जदार नातलगाशीं पुढें स्नेहसंबंध ठेवला.

▲

e C29

पैसा आला कीं भांडणें आलीं. आणि जमनालालजींजवळ पैसा विपुल. तो त्यांना दैवयोगानें दत्तक गेल्यामुळें, वच्छराजजीकडून मिळालेला. ते त्यांच्या संपत्तीचे एकटेच वारस. पण एका नातलगाला लोभ सुटला. त्यानें जमनालालांवर फिर्याद केली. आपणहि बच्छराजजींचे वारस आहों, हा त्याचा दावा. खटला चालला. त्याचा निकाल त्या नातलगाविरुद्ध गेला. तो निकाल न्यायाचाच होता.

निकालानंतर त्या नातलगानें जमनालालांना लिहिलें, "मी आपणावर खटला केला ही माझी चूक झाली. त्याची मला आपण क्षमा करावी. आपण राग न धरतां, मला कोणतेंहि दुःख न द्यावें, हीच हात जोडून प्रार्थना !" या खटल्यांत जमनालालांना लाख रुपयांवर खर्च आला, तरी ते त्याच्याशीं प्रेमानें वागले,त्याला पैशाची मदत देत राहिले!

▲

नागपूरचे एक वकील त्यांचे मित्र होते. ते आर्थिक संकटांत सांपडले होते. तेव्हां त्यांना जमनालालांनीं नाना तऱ्हेनें मदत केली. पुढें त्यांचे डोळे बिघडले. वकिलीचें काम करतां येईना. तेव्हां जमनालालांनीं त्यांना पुष्कळच आर्थिक मदत दिली. त्यामुळें त्यांचे डोळे सुधारले. चर्मचक्षु सुधारले, पण मनश्चक्षु ?

पुढें दोन मराठी वृत्तपत्रांनीं जमनालालांवर भलभलते आरोप केले. तेव्हां त्यांनीं त्यांचेवर अब्रूनुकसानीची फिर्याद केली. या प्रसंगीं त्या वकीलमित्रानें त्यांचे उपकार कसे फेडले ?

जमनालालांविरुद्ध जाऊन व त्या दोन वृत्तपत्रांचें वकीलपत्र घेऊन ! विशेष म्हणजे त्यांनीं ही वकिली फी न घेतां केली ! ! आणि ती करतांना जमनालालांना अशिष्ट व असभ्य प्रश्न विचारले ! ! !

"साहाय्यकर्त्यास मारूं पाहणारा हा भस्मासुरच म्हणावयाचा !" कोणीसें पुटपुटलें. पण जमनालाल म्हणाले, "उपकार न करणें ठीक. पण तो केला तर त्याचा डांगोरा पिटणें अयोग्य. आपण तर अहिंसा-

धर्मी. उपकार करावा अन् तो विसरून जावा. त्याच्या मोबदल्याची अपेक्षा धरतांच कामा नये."

जमनालालांनीं कैक मित्रांना, नातलगांना, कार्यकर्त्यांना मुक्त हस्तानें द्रव्यसाहाय्य केलें—आणि तेंहि फलाची अपेक्षा न धरतां—त्यांनीं कृतज्ञता दाखवावी अशीहि इच्छा न ठेवतां.

"यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः।"

अशा राजस वृत्तीनें ते कधीं दान करीत नसत. आपलें कर्तव्य म्हणून, आपल्याला अनुकूलता आहे म्हणून, ते संकटांत सांपडलेल्या कोणाहि सज्जनास साहाय्य करीत.

▲

जसा व्यक्तिगत व्यवहारांत, तसाच सार्वजनिक क्षेत्रांतहि, जमनालालांचा सरळ व सात्त्विक स्वभाव प्रगट होई. एकदां ते 'मध्यप्रांत कॉंग्रेस कमिटीचे' अध्यक्ष होते. ती कमिटी आपल्या हातीं घ्यावी म्हणून 'स्वराज्य-पक्ष' धडपडत होता. त्या पक्षाचे डॉ. मुंजे यांनीं एका सभेंत कांहीं हरकत घेतली. ती बाजूला सारणें जमनालालांना सहज शक्य होतें. कारण बहुसंख्य सभासद त्यांचे बाजूचे होते. परंतु जमनालालांनीं त्या हरकतीस मान दिला. "रामाची सीता संशयातीत वर्तनाची असली पाहिजे." या न्यायानें त्यांनीं आपली न्यायप्रियता अतीव शुद्ध राखली होती. केवळ न्यायानेंच नव्हे तर औदार्यानेंहि ते आपल्या प्रतिपक्षाशीं वागत. आणि म्हणून त्यांना सर्वत्र प्रेम व मान मिळे.

▲

जमनालाल स्वतः व्यापारी होते—कारखानदार होते—भांडवलवालेहि होते. तरी ते मजूरवर्गासंबंधीं अपार सहानुभूति बाळगणारे होते. त्यांची न्याय-बुद्धि व मानवता-प्रेम स्वार्थानें कधींच कलंकित झालें नाहीं. अहमदाबाद येथें गिरणी-मालक व गिरणी-कामगार यांचे तंटे

मिटविण्यासाठीं एक पंचायत निर्माण झाली होती. तींत मजुरांतर्फे गांधीजी होते. पण ते पुढें राजकारणांत पार गढले. तेव्हां त्यांचे जागीं कोणाला नेमावें? असा प्रश्न उत्पन्न झाला.

तो सोडविण्यासाठीं मजुरांचे एक पुढारी गुलजारीलाल नंदा यांनीं जमनालालांना ता. २६ मार्च १९३० रोजीं पत्र लिहिलें कीं, "मजुरांचे प्रतिनिधि म्हणून महात्माजी काम करीत होते,तें आपण करावें अशी आमची इच्छा आहे. राष्ट्रांतील इतर कामें करण्यांत आपला वेळ गुंतलेला आहे हें मी जाणतों, पण देशांतील श्रमजीवी लोकांचाहि आपल्या वेळेवर हक्क आहे."

एकदां मुंबईतील गुमास्त्यांची एक परिषद १९३७ सालीं भरली. तिचें अध्यक्षस्थान जमनालालांना देण्यांत आलें. त्या परिषदेला पाठविलेल्या संदेशांत गांधीजींनीं जमनालालांचें गुण-वर्णन असें केलें—

"शेठ व नोकर असा भेदभाव जमनालालांच्या अंतःकरणांत आजिबात नाहीं. ते आपल्या दुकानांतील नोकरांना, आचाऱ्यांना, गडी-माणसांना, आपल्या कुटुंबांतील घटक, म्हणूनच वागवितात. आपल्या इतकीच त्यांना विश्रांतीची गरज आहे—सुटीची गरज आहे-आपल्या-बायकामुलांमध्यें सुखानें राहण्याची गरज आहे आणि स्वच्छ व हवे-शीर घरांत राहण्याची व आपल्या मुलांचें शिक्षण व औषधोपचार कर-ण्याची जबाबदारी आपल्याप्रमाणेंच त्यांचेहि शिरावर आहे, याची पूर्ण जाणीव जमनालालांना आहे."

मालक-मजूर, प्रजा-राजा, यांचे सार्वजनिक प्रश्न सोडविण्यांत तर जमनालालांची व्यवहारी पण सात्त्विक बुद्धि उपयोगी पडत असेच, पण ह्याशिवाय पति-पत्नी, पिता-पुत्र, भाऊ-भाऊ यांचे खाजगी तंटे सोडविण्यांतहि जमनालालांची किती तरी शक्ति खर्च होई. त्यांचे एक मित्र शेठ कै.रामनारायण रुईया यांच्या एका कुटुंबावर एकदां सामाजिक

संकट आलें. त्यांतून पार पडण्यास जमनालालांनीं किती साहाय्य केलें हें रुईयांच्या धर्मपत्नीनें त्यांना लिहिलेल्या पत्रावरून स्पष्ट होतें. ता. १ मार्च १९३७ रोजीं मुंबईहून लिहिलेल्या पत्रांत त्या म्हणतात,

" प्रिय भाई जमनालालजी,

योग्य वेळीं आपण इकडे यावें आणि आपल्या बहिणीला आपला अमोल सल्ला देऊन तिची चिंता दूर करावी. आपल्या येण्याची वाट मी मिनिटा–मिनिटाला पाहात आहें. आपल्याला निदान ८।१० दिवस तरी माझ्या कामासाठीं मुंबईस राहावें लागेल. लिहावेंसें पुष्कळ वाटतें, परंतु न लिहितांहि आपण माझ्या मनांतील भाव जाणूं शकाल. "

आपली बहीण

सुव्रता

जमनालाल मुंबईस गेले. पण त्यांना तेथून लगेच दिल्लीस जावें लागलें. म्हणून त्यांनीं धीर देणारें पत्र त्या आपल्या 'बहिणीस' लिहिलें. त्यांत ते म्हणतात,

" प्रिय बहन् ! तुम्ही हिंमत, उदारता व ईश्वरावर विश्वास दाखवाल, अशी मला आशा आहे. कारण त्यामुळेंच तुम्हांला शांति, खरें सुख व समाधान मिळेल. तुम्ही आपलें भावी जीवन समाजसेवेमध्यें घाल-विण्याचा निश्चय धैर्यानें तडीस न्याल अशीहि आशा मी करतों. "

निराशांना आशा दाखवून, दुःखितांना धीर देऊन व आर्तांना साहाय्य करून जमनालालांनीं कैक जणांचा दुवा घेतला. समाजाच्या शिरोभागीं तळपणारा पुढारी किंवा लक्ष्मीपुत्र असो अथवा घरांतील कष्ट करणारी एखादी साधी मोलकरीण असो—त्या सर्वांवर आपल्या कृपेची पाखर जमनालाल घालीत. काशी नांवाची त्यांचे घरीं एक मोलकरीण होती. तिच्यासंबंधीं ते किती आदरभाव बाळगीत हें त्यांच्या 'वासरी'वरून दिसून येतें. ता. ४ सप्टेंबर १९४१ च्या पानावर अशी नोंद त्यांनीं

केलेली आहे—"काशीपासून पुष्कळ शिकण्यासारखें आहे. आहे या स्थितींत राहण्याचें तिला दुःख नाहीं—ऐषआरामाची इच्छा नाहीं. तिच्या हृदयांत खरें ज्ञान आहे आणि तिची वृत्ति अंतर्मुख आहे. तिला आपलें जीवन संतोषानें घालवितां यावें अशी व्यवस्था करणें अवश्य आहे."

व्यवहार-शुद्धीचें आपलें व्रत जमनालालजी अगदीं धार्मिक बुद्धीनें कसें चालवीत आणि त्यापायीं लक्षावधि रुपयांवर कसें पाणी सोडीत याचें एक उदाहरण देण्यासारखें आहे. ते चरखा-संघाचे अध्यक्ष होते. तेव्हां त्यांनीं शुद्ध खादी वापरावी हें त्यांचें कर्तव्यच होतें. पण कापडाची गिरणी त्यांनीं न चालवावी, असें कांहीं बंधन त्यांचेवर नव्हतें. उलट कापडाच्या गिरण्यांत त्यांचे पुष्कळ शेअरहि होते. शेअर असणें म्हणजे त्या गिरणीचे अंशतः मालकच होणें नव्हे काय ? मग अंशतः मालक होण्यापेक्षां पूर्ण मालक होण्यांत काय पाप आहे ? म्हणून आपली स्वतःची कापडाची गिरणी चालवावी असा सल्ला त्यांना त्यांच्या कांहीं मित्रांनीं दिला.

आणि स्वार्थाला परार्थाचा मुलामा देण्यास फसवें मन सदा सज्जच असतें. "इतर गिरणी-मालक मजुरांचें शोषण करतात. तें न करतां महात्माजींच्या तत्त्वानुसार कामगार-वर्गाचें कल्याण कसें करतां येईल, याचा आदर्शच आपण दाखवूं." अशा उमेदीनें जमनालाल एक गिरणी घेण्यास निघाले. सौदा कायम झाला.

चरखा-संघाचा अध्यक्ष कापड-गिरणीचा मालक होणार ?

जानकीदेवींना आश्चर्य वाटलें. त्या जमनालालांच्या सहधर्मचारिणी. आपल्या पतीकडून धर्म-पालन निर्दोष रीतीनें व्हावें.अशी त्यांना तळमळ. म्हणून त्यांनीं गांधीजींकडे धांव घेतली. त्या त्यांना म्हणाल्या, "बापू, आम्ही एकीकडे खादीचा प्रचार करतों; अन् दुसरीकडे गिरणीचे मालक बनणार हें रास्त आहे का ? लोक काय म्हणतील ? हें आपण स्वतः

खादी वापरतात पण दुसऱ्यांना गिरणीचें कापड पुरवितात, अशी टीका लोक नाहींत कां करणार?"

जशी धर्म-पत्नी, तसाच गुरु. खादीचें अणुव्रत भंगलेलें त्यांना कसें खपेल? महात्माजींनीं महादेवभाईंना तत्काळ बोलावून फर्माविलें, "आतांच्या आतां जमनालालांना पत्र लिहा कीं, गिरणीचा सौदा करूं नका." आणि तसें पत्र पाठविलें गेलें.

ता. २७ सप्टेंबर १९३४ रोजीं गांधीजींनीं हें पत्र लिहिलें. त्यांत कापडाची गिरणी घेण्याला आपला सक्त विरोध त्यांनीं प्रगट केला. स्वदेशी-प्रेमी व खादीधारी व्यापाऱ्यानें विदेशी यंत्राचा कारखाना घ्यावा याचें गांधीजींना अत्यंत दुःख वाटलें. म्हणून ते तीव्रतेनें या पत्रांत लिहितात,

"तुम्ही गिरणी घेऊं इच्छितां हें ऐकून माझ्या मनावर आघात झाला. जो माणूस खादीच्या कार्यांत इतका खोल उतरला आहे, तो गिरणी-मालक बनणार याचें मला मोठें आश्चर्य वाटलें. तरी सुद्धां तुम्हांला काय लिहावें याचा निश्चय मी करूं शकलों नाहीं. इतक्यांत काल जानकीमैया आली. तिलाहि आपला हा बेत ऐकून चैन पडेनासें झालें. ती म्हणत होती, 'ही आपत्ति आपण कां घ्या?' मुलांनाहि हें पसंत नाहीं. आणि नोकरहि म्हणूं लागले, 'आतां काय? कापडाची गिरणी घरचीच होणार, मग शेटजी आपल्याला खादी वापरण्यास थोडेंच सांगणार?' हें काम कोणालाहि पसंत नाहीं. म्हणून गिरणीचा विचार सोडून द्यावा. सौदा झाला असेल तर 'नशीब!' म्हणून पुरा करावा. भागीदार गिरणी घेत असतील तर त्यांना खुशाल घेऊं द्यावी. तुम्हांला धंदेच करावयाचे असतील तर पुष्कळ पडले आहेत. परोपकारासाठीं जास्ती पैसा मिळवावा असें वाटत असेल, तर आपण परोपकाराशिवायच राहिलें पाहिजे. ओम् म्हणते, 'आपल्याला कॉंग्रेससाठीं पैसा पाहिजे आहे, म्हणून आपण काकाजींना गिरणी खरेदी करण्यास

प्रेरणा देत आहां ?' या सर्वांला मी उत्तर काय देऊं ? हा विचार सोडल्याची खूषखबर शक्य तर तारेनें कळवा !"

सालोसाल मिळणाऱ्या लाखों रुपयांच्या फायद्यावर पाणी सोडण्यास जमनालाल, केवळ गुरूच्या शब्दाखातर, तयार झाले काय ? देशभक्ति खरी, पण तिच्यासाठीं किती झीज सोसावयाची ?

त्या काळीं असे कैक देशभक्त होते कीं, जे सभेंत खादी वापरीत,पण घरीं परदेशी कपडे पेहरीत, व्याख्यानांत स्वदेशी उद्योगधंद्यांचा पुरस्कार करीत पण लग्नाच्या मेजवानींत परदेशी साखरेच्या पक्वान्नावर हात मारीत, सरकारी कॉलेजांतून विद्यार्थ्यांना बाहेर पडण्याचा उपदेश करीत, पण आपलीं मुलें मात्र त्या कॉलेजांतच काय,पण खुद्द विलायतेला शिक्षणासाठीं पाठवीत. याच कोटींतील जमनालालजी होते काय ? मोठा कसोटीचा प्रसंग होता.

त्या कसोटीस ते उतरले.—आणि मोठ्या सन्मानानें ! त्यांनीं गिरणी घेण्याचा सौदा रद्द केला. विशेष हें कीं, तें गांधीजींचें पत्र पोंचण्यापूर्वींच, स्वतःच्या निर्णयानेंच जमनालालांनीं तो सौदा रद्द केला. हा वृत्तान्त कळतांच गांधीजींना परम संतोष झाला. त्यांनीं जमनालालांना धन्यवाद देणारें पत्र लिहिलें, तें असें—

" गिरणीच्या संकटांतून आपली सुटका झाली हें ठीक झालें. या वाघाच्या भीतीनें आपली पत्नी व आपलीं मुलें यांच्या मनाचें सुंदर स्वरूप दिसलें. सर्वजण व्याकुळ झाले होते. तें पाहून मला फार सुख वाटलें. ही वृत्ति कायम राहील अशी मी आशा करतों. "

हें जसें गांधीजींचें शिफारस-पत्र, तसेंच एका राष्ट्रनेत्याचें प्रमाणपत्रहि जमनालालांना व्यवहारशुद्धीबद्दल मिळालें होतें. वास्तविक, जमनालाल कोटयधीश व्यापारी होते. व्यापाऱ्याचे गादीवर ते बसले, तेव्हांच त्यांची वडिलार्जित संपत्ति ५।६ लाखांची होती. आणि स्वतः जमनालालजींनीं ती "उत्तम वेव्हार" करून इतकी वाढविली कीं,

तिच्यांतून २५ लाखांवर रुपयांचा दानधर्मच त्यांनीं केला. तरी सीतेच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविणारे धोबी केव्हांहि असावयाचेच. अशा कांहीं टीकाकारांनीं संशय घेतला कीं, जमनालाल काँग्रेसचे खजिनदार असल्यानें ते काँग्रेसच्या पैशाचा फायदा स्वतःसाठीं करून घेत असतील. त्या वेळीं काँग्रेसचा खजिना तो केवढा असावयाचा? आणि जमनालालांसारख्या कोट्यधीशाला त्याचा मोह तो काय पडावयाचा? पण टीकाकारांचें व्रतच हें कीं, "मुखमस्तीति वक्तव्यम् ।"

अशा टीकाकारांचा मुख-भंग काँग्रेसचे दीर्घकाळचे चिटणीस पं. जवाहरलाल नेहरू यांनीं जाहीरपणें केला. त्यांनीं एक पत्रक काढून जनतेला ग्वाही दिली कीं, "आमचे सर्व हिशोब सालेसाल काळजीपूर्वक तपासले जातात व जनतेच्या माहितीसाठीं वृत्तपत्रांत प्रसिद्धहि केले जातात. काँग्रेसचे हिशोब व्यवस्थितपणें ठेवल्याबद्दल मी कोषाध्यक्ष जमनालाल बजाज यांना धन्यवाद देतों. योग्य कारण असलें तरी कोर्टाकडे धांव घेण्याची काँग्रेसची वहिवाट नाहीं. तथापि कोणी दुष्ट बुद्धीनें बदनामीकारक आरोप सतत करीत राहील, तर त्याला काँग्रेस कोर्टांत खेचील."

व्यक्तिगत जीवनांत, व्यापाराचे क्षेत्रांत व राजकीय-सामाजिक अशा सार्वजनिक कार्यांत, हजारों-लाखों रुपयांची उलाढाल करूनहि स्वच्छ-शुद्ध-निष्कलंक राहिलेले जमनालालांसारखे देशभक्त धनिक विरळाच.

• • •

# ७ : गांधीजींच्या छत्राखालीं

*तयापरी श्रीगुरू । करिती जैं अंगिकारू ।*
*तै होऊनि ठाके संसारू । मोक्षमय आघवा ॥*

*—ज्ञानेश्वरमहाराज*

जमनालालजी हे तर गांधीजींना दत्तक गेलेले--त्यांना 'पांचवा पुत्र' गांधीजी मानीत.—त्यांच्या बौद्धिक, मानसिक व आत्मिक उन्नतीची काळजी गांधीजी जन्मभर वहात होते. पण विशेष हें कीं, जमनालालजींच्या कुटुंबांतील लहानं-थोर स्त्रीपुरुषांशींहि असेच जिव्हाळ्याचे संबंध त्यांनीं जोडले होते. आणि त्यांच्या शिक्षणाचा व विकासाचा भार गांधीजींनीं आपल्या शिरावर घेतला होता. गांधीजींच्या यशस्वी नेतृत्वाची खुबी ती हीच !

गांधीजी मातृ-हृदयी होते. मातेप्रमाणें इतरांची शुश्रूषा करावी, त्यांना स्वतः अन्न वाढावें आणि त्यांच्या सुखदुःखाशीं समरस व्हावें, हें प्रेमकार्य त्यांनीं आमरण केलें. लहान मुलांशीं खेळीमेळीनें वागून, तरुणांच्या लग्न-प्रकरणांत रस घेऊन व प्रौढांच्या जीवनाचीं कोडीं सोडवून—

त्यांनीं कैक कुटुंबांच्या पोटांत शिरून त्यांना अगदीं आपलेसें करून घेतलें होतें. नेहरू—कुटुंब हें याचें जसें एक ठळक उदाहरण, तसेंच बजाज—कुटुंबहि.

बलाढ्य ब्रिटिश सरकारशीं प्राणपणानें झुंज देणारे गांधीजी अशा कौटुंबिक प्रेमामध्यें लीलेनें विहार करीत. राष्ट्रीय स्वातंत्र्य, जातीय ऐक्य, स्वदेशीचा प्रसार इत्यादि गुंतागुंतीचे सार्वजनिक प्रश्न सोड-विण्यांत ते जितकी आस्था दाखवीत, तितकीच पिता व पुत्र, पति व पत्नी, बंधु व बंधु——इत्यादि कुटुंबांतील नातलगांचे मतभेद, गैरसमज, कलह नाहींसे करण्यांत ते तत्पर असत. दिल्लीच्या सिंहासनावर बस-लेल्या "कर्तुमकर्तुं" अशा ब्रिटिश व्हॉइसरॉयावर "लोखंडी घणाचे घावामागून घाव आपण घालीत आहों." असें गांधीजी स्वतः सांगत. पण नेहरू, बजाज, दास, अनसारी—इत्यादि कैक कुटुंबांतील व्यक्तींवर ते आपल्या मधुर बोलण्याचा व प्रेमळ वर्तनाचा अमृत-वर्षाव करीत.

कठीण असें लाकूड पोखरून-पोखरून त्याचा भुगा करण्याची शक्ति जो भुंगा दाखवूं शकतो, तोंच कमळाच्या कोमल पाकळ्यांत कैदी होऊन पडतो. तसेंच थोरांचें वागणें असतें. जरूर तेथें वज्रापेक्षां कठोर पण इतरत्र कुसुमाहूनहि मृदु—हा संतांचा स्वभाव गांधीजींच्या सर्व जीवनांत ओतप्रोत भरलेला दिसून येतो.

जमनालालजींना गांधीजींनीं लिहिलेलें जें पहिलें पत्र आज उपलब्ध आहे, तें १९१७ च्या जुलैमधील आहे. त्या वेळीं गांधीजी चंपारण्याच्या सत्याग्रहांत गुंतले होते. तेव्हां 'मोतीहारी' येथून त्यांनीं ५।६ ओळींचें हिंदी भाषेंतील पत्र पाठविलें होतें. त्याचा मायना "सुज्ञ भाई, श्री. जमनालालजी" असा आहे. पुढें कधीं ते केवळ "भाई जमनालालजी" असें लिहूं लागले आणि त्यांना 'दत्तक' घेतल्यानंतर 'चि० जमनालाल' असेंच संबोधूं लागले. अशीं सुमारें २०० पत्रें तरी गांधीजींचीं उपलब्ध आहेत.

या त्रिशतपत्रीमध्यें राजकीय विषय तर आलेले आहेतच, पण त्याहिपेक्षां वैयक्तिक सुखदुःखांचा भाग अधिक आहे. कोणाचें दुखणें तर कोणाचा विवाह, कोठें विनोद तर कोठें विरोध, क्वचित् बोध तर क्वचित् क्षमा–अशा नाना रंगांनीं नटलेलीं हीं पत्रें म्हणजे गांधीजी व जमनालालजी या दोघांच्या प्रेमसंबंधाचें उत्कृष्ट चित्रणच होय. पाण्यानें घनदाट भरलेल्या मेघावर सूर्याचे पांढरेशुभ्र किरण पडले म्हणजे त्यांतून जसें सप्तरंगी इंद्रधनुष्य दिसूं लागतें, त्याप्रमाणें भक्तीनें भरलेल्या जमनालालजींच्या जीवनावर गांधीजींचे तेजस्वी विचार पसरविणारीं हीं पत्रें विविध व रम्य रंग–छटा दाखवितात. सात्त्विक प्रेमाचें हें उदात्त दर्शन कोणाचेंहि मन मुग्ध केल्यावांचून राहणार नाहीं.

दोन तेजोगोलांवर जाऊन आपण त्याचा अंतर्भाग अवलोकल्याचें समाधान ही प्रेम–मधुर व पारदर्शक पत्रें वाचतांना लाभतें. १९१८च्या एका पत्रांत गांधीजी लिहितात, " आपल्या पत्राचें उत्तर देण्यास उशीर झाला याची मला क्षमा करावी. सध्यां मीं येथें दोन मोठ्या कार्यांमध्यें गिरफदार होऊन गेलों आहें. "

" येथील कार्य माझ्या आयुष्यांतील क्षण न् क्षण घेत आहे. " असें गांधीजींनीं दुसऱ्या एका पत्रांत कळविलें आहे. हीं दोन कार्यें कोणतीं? " अहमदाबादच्या मजुरांचा हरताळ व खेडा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांवर सरकारनें चालविलेला जुलूम. " किसान व कामगार या दोघांच्या सेवेसाठीं गांधीजींचा क्षण न् क्षण, या देशांत आल्यापासून, कसा वेंचला जाई, हें या पत्रावरून दिसून येतें.

१९१८ सालींच लिहिलेल्या एका पत्रांत गांधीजींनीं आपल्या रंगरूट–भरतीचा उल्लेख केला आहे आणि गुजराती लोकांची एक पलटण तयार करण्याच्या तजविजींत आपण गढून गेल्याचें लिहिलें आहे. त्या पत्रांत जमनालालजींसंबंधीं गांधीजी म्हणतात, " आपल्या प्रेमभावानें मी लज्जित होतों. इतक्या प्रेमाला मीं लायक बनावें अशी

माझी इच्छा आहे, तशी माझी प्रभूपाशीं प्रार्थना आहे. आपली भक्ति आपल्याला नेहमीं नीतिमार्गावर पुढें पुढें घेऊन जाईल, अशी मी आशा बाळगतों."

जमनालालजींची अशी एक पद्धत असे कीं, दरवर्षी आपल्या वाढ-दिवसाचे वेळीं गांधीजी, विनोबाजी, जाजूजी इत्यादि आपल्याला पूज्य व प्रिय असणाऱ्या व्यक्तींना मनमोकळीं पत्रें लिहावयाचीं. त्यामध्यें ते आपली आध्यात्मिक प्रगति गेल्या वर्षी किती झाली आणि आपल्या स्वभावामध्यें कोणते दोष प्रगट झाले यांची कबुली देत. आत्म-निरीक्षण करण्यासाठीं ते आपल्या बुद्धीचा कडक पहारा आपल्या वर्तनावर सदैव ठेवीत. आणि आपले दोष व व्यंगें व्यक्त करण्याचा मन-मोकळेपणाहि अशा पत्रांतून ते दाखवीत. त्यांच्या आत्मिक विकासाचें बीज हेंच. गांधीजीप्रभृतींनीं आपल्याला आशीर्वाद द्यावा, अशी प्रार्थना ते या पत्रांमधून करीत. हीं पत्रें म्हणजे त्यांच्या हृदयाचा आरसे-महालच होय.

अशा एका पत्राला उत्तर देतांना, ता. २१ नोव्हेंबर १९२६ सालीं, गांधीजी लिहितात, "तुम्ही दीर्घायु व्हा आणि तुमचें पावित्र्य वृद्धिंगत होवो. या जगामध्यें निर्दोष असें कोणीच नाहीं. ते दोष दूर करण्याचा प्रयत्न आपण करूं शकतों. तसा प्रयत्न तुम्ही करीत आहां. 'प्रयत्नशील माणसाला दुर्गति नाहीं' असें भगवंताचें आश्वासन आहे."

असा केवळ पोकळ आशीर्वाद देऊन गांधीजी अंग झाडीत नसत. कांहीं कांहीं वेळां लांब लांब पत्रें लिहून, जमनालालजींच्या दोषाचें निराकरण कसें करतां येईल याचे प्रत्यक्ष उपायहि सांगत. कारण गांधीजी जितके ध्येयवादी, तितकेच व्यवहारवादीहि होते. आकाशांतील नक्षत्रांकडे पाहून चालतांना जमिनीवरील खड्ड्यांत पाय न पडण्याची खबरदारी ते सदैव घेत. ते तत्त्वहि सांगत आणि तपशीलहि सांगत. लहान मुलाचा हात धरून अक्षर काढण्यास पंतोजींनीं शिकवावें,

त्याप्रमाणें ते बारीकसारीक सुधारणाहि सुचवीत. ता. ५।१०।१९२२ च्या पत्रांत त्यांनीं जमनालालजींना अपवित्र विचारांचें निराकरण करण्याचा मार्ग पुढील शब्दांनीं सुचविला—

“अपवित्र विचारांपासून जो मुक्त झाला, त्याला मोक्ष मिळाला असेंच आपण समजा. अपवित्र विचारांचा सर्वथैव नाश मोठ्या तपश्चर्येनें होतो. त्याचा एकच उपाय आहे. मनांत अपवित्र विचार आले कीं, त्यांच्याविरुद्ध तत्काळ आपण पवित्र विचार उभे करावेत. दुसरा उपाय म्हणजे ईश्वरी प्रसाद चोवीस तास ईश्वराचें नाम जपणें आणि तो ईश्वर अंतर्यामीं आहे याचें ज्ञान होणें—या मार्गांनीं ईश्वरी प्रसाद प्राप्त होतो. पुष्कळ वेळां जिभेवर रामनाम असतें, पण मनांत दुसरेच विचार येत राहतात. जिभेनें रामनाम घेण्याचा प्रयत्न इतका करावा कीं, अंतकाळीं जिभेवर रामनामच खेळावें व तेव्हां तें हृदयामध्यें प्रथमस्थानीं असावें. प्रयत्न करण्याचें संपूर्ण क्षेत्र आमच्याजवळ आहे; परिणामाचें क्षेत्र ईश्वरानें आपल्या हातीं ठेवलें आहे. म्हणून त्याची चिंता तुम्ही करूं नका.”

असें स्वानुभवाचें तत्त्वज्ञान तर गांधीजी हाकारून सांगतच, पण त्यावरोबरच “अल्पाहार करावा, निरंतर पवित्र पुस्तकें वाचावींत, डोळे पापी झाले तर ते फोडण्याइतका निग्रह असावा.” अशा बारीकसारीक सूचनाहि ते देत आणि शेवटीं धीर व विश्वास देणारा आशीर्वादहि देत, ‘ईश्वर तुमचें सर्व प्रकारें रक्षण करो.”

हिमाचलसारखा धवल-शीतल व प्रचंड–उत्तुंग असा गांधीजींचा आधार पाठींशीं असतांनाहि, जमनालालजींचें आत्म-निरीक्षक मन वर्षानुवर्षाला आपल्या अवनतीमुळें-किंवा मंद प्रगतीमुळें-दुःखित होई. तें आपलें सारें दुःख निःशेषपणें व निःसंदिग्धपणें गांधीजींच्या गुरुचरणीं निवेदन करीत. १९२८ सालच्या आपल्या वाढदिवशीं त्यांनीं गांधीजींना

ज सविस्तर व प्रांजल पत्र लिहिलें, त्यांत आपला ‘ दिल का दर्द ’ त्यांनीं मोकळेपणें मांडला आहे. त्यांत ते लिहितात,—

“ आज मला ५० वें वर्ष लागत आहे. आपला आशीर्वाद तर सदैव मिळतच आहे. पण आपल्या आशीर्वादाला मी पात्र नाहीं असें मला गेल्या दोन–अडीच वर्षांत वाटूं लागलें आहे. माझ्या दोषांचा विचार जेव्हां मी करूं लागतों, तेव्हां माझ्या मनांत आत्महत्येचेसुद्धां विचार येतात. आत्महत्या करणें हें पाप आहे—भित्रेपणाचें कृत्य आहे, असें मी मानीत आलों आहें. आणि बौद्धिक दृष्टीनें अजूनहि मी तसेंच मानीत आहें. पण माझी उन्नति होण्याऐवजीं अवनतीच विशेष होत आहे, याचें मला फार दुःख होतें. त्यामुळें सर्व सार्वजनिक कामांतून अंग काढून घ्यावें, किंबहुना खासगी कामांतूनहि अलग व्हावें, असा विचार मनांत जोर करूं लागतो. ”

निष्क्रिय होण्यापर्यंत—किंबहुना आत्महत्या करण्यापर्यंत—मनानें धांव घ्यावी, असे प्रचंड दोष जमनालालजींच्या ठायीं कोणते होते? याचें उत्तर त्या पत्रांतच दिलें आहे; तें पुढीलप्रमाणें,—

“ अहिंसा व सत्य यांचें आचरण कमी कमी होत आहे. त्यांचेवरील श्रद्धाहि कमी होईल कीं काय अशी भीति वाटते. त्यामुळें असहनशीलता वाढली आहे. क्रोधाचें प्रमाणहि वाढलें आहे. काम, लोभ हे रिपुहि बळावत आहेत. असें असतांना जीवंत राहण्याचा मोह कां होतो? या स्थितींत स्वाभाविक मृत्यूचें निमंत्रण आलें, तर मला समाधान व शांति मिळेल असें वाटतें. उलट, आज माझ्या ठायीं कोणी असा विश्वास जर निर्माण केला कीं, ‘ माझें पतन कधीं होणार नाहीं व सत्याच्या मार्गावरून मी कधीं मागें हटणार नाहीं ’ तर माझ्या अंगीं फिरून नवजीवनाचा उत्साह संचरूं लागेल. पण माझी मानसिक स्थिति प्रेमानें सुधारूं शकेल असा कोण आहे? ”

" उभा कल्पवृक्षातळीं भीक मागे " अशी स्थिति जमनालालजींची कां झाली ? त्याचें उत्तर त्याच पत्रांत जमनालालजींनीं निःसंकोचपणें दिलें आहे, तें असें—

" आपण व विनोबा यांचेवरच माझा भरंवसा होता. परंतु आपल्यावरील आशा आतां कमी होत चालली आहे. अजून विनोबांची आशा आहे, कदाचित् कांहीं समाधानकारक मार्ग निघेल. "

निराश व निष्क्रिय देशाला आशा देणारा व क्रियाशील बनविणारा महात्मा सन्निध असतांना जमनालालजी असे हताश कां झाले ? ते लिहितात,—

" या वर्षामध्यें मी आपल्याजवळ माझें हृदय मोकळें करण्यासाठीं कैक वेळां आलों होतों. परंतु आपली मानसिक, शारीरिक व आसपासची परिस्थिति यामुळें माझें हृदय मी पूर्णपणें खुलें करूं शकलों नाहीं. आपल्याला व अन्य मित्रांना मी धोका तर देत नाहीं ना ? त्याहून मोठें पाप दुसरें काय असूं शकेल ? सर्वसाधारण मनुष्यामध्यें माझी गणना व्हावी, असा मार्ग आपण मला दाखवावा. मला तर आपल्याला प्रणाम करण्याचाहि संकोच वाटतो. "

एका साधकाच्या आर्त हृदयाचें हें आक्रंदन आहे. अशा हृदयाचें अश्रुबिंदु तुकाराममहाराजांच्या प्रारंभींच्या कैक अभंगांतून पाझरत आहेत.

" ना संसार ना तुझे पाय । " " मज अवघ्यांचा कंटाळा । "

" कामक्रोध हे नागविती । " असे उसासे सर्वच साधकांच्या हृदयांतून निघत असतात. पण त्यांतूनच त्यांची प्रगति होत असते.— आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग त्याला सांपडत असतो. आणि जमनालालजींचें भाग्य तर असें कीं, गांधीजी – विनोबाजींसारखे महापुरुष मार्गदर्शनाला लाभलेले !

गंमत हीं कीं, आपल्या हृदयाचें मंथन करून जमनालालजींनीं लिहिलेलें हें पत्र गांधीजींना मिळालेंच नाहीं ! ता. २७।११।१९३८

रोजीं ते गांधीजींना भेटण्यास गेले असतां त्यांना हें कळलें. मग तास-सव्वा तास त्यांचें बोलणें झालें. पुढें ता. २६।१२।१९३८ रोजीं जमनालालजींनीं गांधीजींची पुनः भेट घेतली आणि वाढदिवशीं लिहिलेल्या आपल्या मूळ पत्राची नक्कल त्यांना दिली. तो गांधीजींचा मौनवार होता. म्हणून त्यांनीं त्या पत्राचें उत्तर लिहून दिलें, "उद्यां आपण थोडा वेळ बोलणें करूं. नाहीं तर एक दोन दिवस तुम्ही राहूं शकत असाल तर येथें राहावें. तुमच्या रोगाचें औषध मला माहीत आहे. घाबरण्याचें कांहीं कारण नाहीं. तुमचा विनाश तर होणार नाहीं, पण तुमच्या दोषांचा स्वीकार मी करीन. कारण अशा प्रकारचा पुष्कळ अनुभव मला येऊन चुकलेला आहे. हें गूढ उकललें जाईल एवढेंच मीं आतां सांगतों."

गांधीजींच्या इच्छेप्रमाणें जमनालालजी १।२ दिवस तेथें राहूं शकले नाहींत. कारण जयपूर दरबारचा मनाई हुकूम मोडणें त्यांना जरूर होतें. म्हणून ते तिकडे गेले. तेव्हां गांधीजींनीं आपले विचार सविस्तर मांडणारें पत्र त्याच दिवशीं ता. २६।१२।३८ रोजीं लिहिलें. त्यांत ते म्हणतात,—

"माणसानें आपल्या दोषांचें चिंतन न करतां गुणांचें करावें,' अशा अर्थाची एक इंग्रजींत म्हण आहे. कारण मनुष्य ज्याचें चिंतन करतो, तसा तो बनतो. याचा अर्थ आपण आपले दोष पाहूं नयेत असें नव्हे. दोष जरूर पाहावे. पण त्यांचाच विचार करण्याचें वेड लागूं देऊं नये. आपल्या शास्त्रांतहि हेंच सांगितलें आहे. म्हणून तुम्ही आत्मविश्वास बाळगून असा निश्चय करा कीं, माझ्या हातून कल्याणकारक कृत्येंच होणार आहेत. आजपर्यंत तीं झालींहि आहेत."

अशी तात्विक भूमिका समजावून देऊन व आशेचीं बीजें पेरून गांधीजी जमनालालांचें एक एक कोडें सोडवीत चालले आहेत. ते पुढें म्हणतात,—

"अति लोभ सोडणें उचित आहे. परोपकारासाठींसुद्धां व्यक्तिगत व्यापार करणें बंद करावें. तें शक्य नसेल तर त्या व्यापाराला कांहीं मर्यादा घालावी. राजकीय क्षेत्रांतून बाहेर पडण्याचाहि प्रयत्न करावा. पण त्यांत राहणें भाग असेल आणि तुम्ही आपल्या अटीवर त्यांत राहूं शकत असाल, तर केवळ मध्यप्रांताच्या संघटनेचें कार्य करावें. परंतु तुमचें क्षेत्र पारमार्थिक व्यापार हें आहे. म्हणून तुम्ही चरखा संघाकडे आपली सारी शक्ति लावावी. तें काम तुमची बुद्धि, तुमची नीति व तुमची व्यापार–शक्ति यांचा पुरा उपयोग करून घेईल."

व्यापार व राजकारण यासंबंधीं असें स्पष्ट मार्गदर्शन केल्यानंतर मानसिक विकारासंबंधीं गांधीजी लिहितात, "दुसरा विषय विकारांचा. तो जरा कठीण आहे. स्त्री–परिचर्या टाळणें उचित आहे. आपल्या मंडळीमध्यें स्त्रियांचा सहवास सर्वांत अधिक करणारा मीच एकटा आहें. माझ्या दृष्टीनें तो एक प्रयोग आहे. शुकदेवांची स्थिति प्राप्त करण्याची माझी कामना आहे. त्या स्थितीपासून मी कित्येक योजनें दूर आहें. हा माझा प्रयोग सफल होईल कीं असफल होईल, याचा निर्णय माझ्या मृत्यूनंतरच लागेल. तुम्हांला आत्मविश्वास असेल तर मला कांहीं म्हणावयाचें नाहीं."

किती तळमळीचे विचार आहेत हे! स्वतःची भूमिका कोणता गुरु आपल्या शिष्यापुढें इतक्या नम्रतेनें मांडील? शेवटीं, "यथेच्छसि तथा कुरु!" असा भगवंताचा इच्छा–स्वातंत्र्याचा संदेश गांधीजींनीं या पत्रांत दिला आहे. आणि निरुत्साही अर्जुनाला कर्तव्यास प्रवृत्त करणाऱ्या भगवंताप्रमाणें गांधीजी जमनालालांना अखेर लिहितात,

"निराशेला कधींहि स्थान देऊं नका.
तुम्ही पतित नाहीं––सत्यनिष्ठ आहां.
सत्यनिष्ठ माणसाचें पतन होण्याचा संभव नसतो."

सर्व जगाच्या शिरीं बसून व सर्व युगांचें तत्त्वज्ञान पुढें नेऊन सर्व मानवजातीची उन्नति करूं इच्छिणारे गांधीजी म्हणजे हिमालयाचें अत्युच्च व धवल शिखरच ! पण व्यवहाराच्या भूमीवर यावयाचें म्हटलें कीं, तें उंच व शुभ्र शिखरहि खालीं लवतें—किंचित् काळवंडतें. भाग्यवंतहि गरजवंत झाला कीं मातीमोल ठरतो. याचना हीच मुळीं कोणालाहि लघुत्व देणारी आहे--मग ती स्वार्थासाठीं असो कीं परार्थासाठीं असो. त्यांतहि तो याचक सज्जन असेल, प्रामाणिक असेल, पापभीरु असेल, तर त्याला, याचनेचे पैसे मागण्याचे शब्द उच्चारतांना, प्राणोत्क्रमणापेक्षां अधिक दुःख होतें. कबुतराच्या कंठांतून होणाऱ्या अस्फुट आवाजाप्रमाणें याचनेचे शब्द त्याच्या गळ्यांतल्या गळ्यांत फिरूं लागतात आणि ‘ याचना म्हणजे यातना ’ हा कटु अनुभव त्याला येतो. ही याचना गुरूनें शिष्याकडे, पित्यानें पुत्राकडे किंवा नेत्यानें अनुयायाकडे केलेली असली, तरी याचकाची हीच अनुकंपनीय अवस्था, थोड्या फार प्रमाणांत तरी, झाल्याशिवाय राहात नाहीं.

आतां गांधीजी किती थोर ! आणि त्यांचेवर जमनालालांची भक्ति किती अपार ! आणि पैशाची याचना केलेली, तीहि किती थोर कार्यासाठीं ! पण तशा वेळीं गांधीजींची लेखणी चांचरे. कधीं दुःख तर कधीं लज्जा, त्यांना प्रगट करावी लागे. १९१८ सालीं गांधीजींनीं आश्रमाचें बांधकाम सुरू केलें. त्यासाठीं १ लाख रुपये खर्च येणार होता. त्यांतील २५००० रुपये जमनालालांनीं द्यावे अशी त्यांची इच्छा. ती प्रगट करतांना ते एका पत्रांत लिहितात,—

“ ही रक्कम आपण देऊं शकाल तर मी पुष्कळ अंशांनीं निश्चित होईन. मात्र माझ्या या लिहिण्याचा असा अर्थ समजूं नये कीं, ही रक्कम दिलीच पाहिजे. आपल्याला मुळींच संकोच वाटत नसेल, तरच ही रक्कम द्यावी. ”

खरा संकोच गांधीजींनाच वाटत होता. त्यांच्या जिभेवरच याचनेनें

मणामणाचें ओझें ठेवलेलें होतें. म्हणून दुसऱ्या एका पत्रांत त्याच विषयाबाबत ते लिहितात, " जे भाई माझ्या भिक्षेचा अनादर करीत नाहींत, त्यांना माझी गरज सांगण्यामध्यें मला संकोच वाटतो. पण न सांगणें हेंहि अशक्य आहे. म्हणून माझी तीव्र इच्छा अशी असते कीं, माझी भिक्षा स्वीकारण्यामध्यें जर कोणाला कांहीं अडचण असेल, तर त्या याचनेचा अस्वीकार करण्यानेंच माझ्यावर अनुग्रह होईल. "

गांधीजी व मालवीयजी हे भारतांतील 'पट्टीचे भिक्षेकरी' म्हणून प्रसिद्ध ! या ना त्या कार्यासाठीं सर्व जन्मभर गांधीजी पै-पैशापासून लाखों-करोडों रुपयांपर्यंत भीक मागत आलेले. पण तरीहि पैशासाठीं हात पसरतांना त्यांचा जीव संकोचे—जीभ अडखळे. १९३८ सालीं त्यांचा जमनालालजींशीं किती घनिष्ठ संबंध आलेला ! पण तरीहि त्यांना एका पत्रांत असें लिहावेंसें वाटलें, " काल मोटार सर्व दिवस माझ्याकडे राहिली हा माझाच अपराध आहे. काल किशोरीलाल आले नाहींत याचा विषाद वाटला. त्यामुळें माझें हृदय रोदन करूं लागलें—मला स्मृति-भ्रंश झाला. मी काय करूं ? "

याहिपेक्षां अधिक दुःखित अंतःकरणानें गांधीजींनीं १९४१ च्या डिसेंबरांत एक पत्र जमनालालजींना लिहिलें. वर्धा येथें 'अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचें' अधिवेशन गांधीजींनीं बोलावलें. तें बोलावणें सोपें होतें, पण तें पार पाडण्याची जबाबदारी कोण घेणार ? अशा परिषदांची जबाबदारी पार पाडण्यासाठीं लागणारे श्रम व खर्च जमनालाल करीत. पण यावेळीं त्यांना तसें करणें कांहीं कारणानें शक्य नव्हतें. परंतु त्यांना न विचारतांच गांधीजींनीं हें अधिवेशन वर्ध्यास भरविण्याचें ठरविलें. मग त्यांच्या लक्षांत जमनालालजींची अडचण आली. तेव्हां ते एका पत्रांत कळवळून—विव्हळून लिहितात,—

" मी किती बेवकुब आहें; आणि स्वार्थीहि आहें. तुमच्या प्रकृतीचा मी कांहींच विचार केला नाहीं. फक्त माझ्या कार्याचा केला. तुमची

परवानगी मागितली, पण ती मिळण्याची वाटहि पाहिली नाहीं आणि कमिटीला खुशाल आग्रह केला कीं, अधिवेशन वर्धा येथें होऊं द्या. असें करण्यानें माझ्याकडून हिंसा घडली—आणि ती साधी नाहीं. मैत्रीचा, तुमच्या औदार्याचा मीं दुरुपयोग केला. याबद्दल तुमची माफी मागणें हें पुरेसें प्रायश्चित्त नाहीं. खरें प्रायश्चित्त तेंच होईल कीं, यावेळीं मी तुमच्याशीं ज्या निर्दयतेनें वागलों, तसें यापुढें तुमच्याशीं किंवा दुसऱ्या कोणाशींहि वागतां कामा नये.

"तुम्हांला मी धन्यवाद देतों. आपल्या मनांतील विचार सांगण्याची हिंमत तुम्हीं दाखविली आणि आपली मर्यादा स्पष्ट केली, ही लहान गोष्ट नव्हे. आपण थोडीहि चिंता करूं नये. तुम्ही नकार दिल्यामुळें माझा आदर व प्रेम वाढलें आहे—तें वाढण्यास कांहीं जागा असेल तर!"

स्वतःला पाण्याहून पातळ, धुळीच्या कणाहून नीच, दीनाहून दीन मानणाऱ्या महात्माजींचें हें पत्र वाचून भक्त-हृदय जमनालालजींच्या मनाला काय वाटलें असेल? त्यांनीं आपल्या रोजनिशींत अशी नोंद केली आहे कीं, "पूज्य बापूजींच्या पत्रामुळें मला दुःख झालें. त्याचें उत्तर मीं लिहिलें, परंतु त्यानें संतोष होईना म्हणून तें पाठविलें नाहीं." पुढें तें पत्र त्यांनीं फाडून टाकलें.

तत्त्व-पालनाचे बाबतींत गांधीजी स्वतः तर कठोर असतच; पण दुसऱ्यालाहि तसें बनविण्याचा प्रयत्न करीत. जमनालालांनीं आपल्या मारवाडी जातीची उन्नति करण्यासाठीं पडदा, बालविवाह यांना प्रतिबंध करण्याचा प्रचार केला. पण या त्यांच्या सामाजिक सुधारणेमुळें सनातनी बंधूंचा मस्तकशूळ उठला. त्यांनीं सर्व जातीनें त्यांचेवर बहिष्कार घालावा अशी खटपट चालविली. त्यांच्या आयुष्यांतील हा मोठा बांका प्रसंग होता. तशा वेळीं गांधीजींनीं त्यांना काय सल्ला दिला असेल?

ता. ११ जुलै १९२५ रोजीं लिहिलेल्या पत्रांत गांधीजी जमना-

लालांना लिहितात, " तुमच्यावर जें तुफान उठलें आहे त्याची मला अपेक्षा नव्हती. पण येऊं द्या. त्यांत आपल्या धर्माची परीक्षाच आहे. ज्ञातीनें दोषपत्र तुमच्याकडे पाठविलें, तर तें माझ्याकडे रवाना करा. मी त्याचा जबाब तयार करीन. त्यांत तुम्हांला वाटेल तो फरक तुम्ही करा. हेतु इतकाच कीं, आपण विनयाचें पालन पूर्णपणें करावें. "

असें सर्वसामान्य लिहून पुढें कसें वागावें, याचें मार्गदर्शन करतांना गांधीजी लिहितात, " जातीच्या नियमाचें उल्लंघन जी व्यक्ति करील, तिच्यावर बहिष्कार घालण्याचा अधिकार जाति–संस्थेला आहे. तुम्ही जें कांहीं केलें आहे, त्यामध्यें शरम किंवा पस्तावा वाटण्यासारखें कांहींच नाहीं. मात्र या बहिष्कारामुळें जातीमध्यें तुमचें वजन कमी होईल आणि पैसा मिळविण्याची शक्तीहि कमी होईल. पण मला त्याची मुळींच चिंता नाहीं. तुमच्यावर भीक मागण्याची पाळी आली तरी हरकत नाहीं. आपण आपला धर्म सांभाळून भिकारी बनलों, तरी तें स्वागतार्ह आहे. शेवटीं तुमचा धर्म व विनय यांची ओळख पटेल, तेव्हां तुमची जात नम्र होऊन तुमच्याकडे येईल. " जाति-बहिष्काराच्या आगींत खुद्द गांधीजींचें पूर्वायुष्य होरपळून निघालें होतें. तरी तत्वनिष्ठ राहण्याचा आग्रह ते आपल्या दत्तक पुत्राला करीत होते.

जमनालालजींनीं १९३२ सालीं स्वेच्छेनें ' क ' वर्ग मागून घेतला. तेव्हां गांधीजींनीं तुरुंगांतून त्यांना आनंद प्रदर्शित करणारें एक पत्र लिहिलें. त्यांत ते म्हणतात, " तुमच्या 'क' वर्गाचा मला हेवा वाटतो. त्यामुळें तुमचें आरोग्य बिघडेल अशी शंका मला कधींच आली नाहीं. आपली व आपल्या शेजाऱ्याची प्रकृति सांभाळण्याची पात्रता तुमचे ठायीं पूर्ण आहे, याविषयीं मला मुळींच शंका नाहीं. ' क ' वर्गामध्यें जो अनुभव तुम्हांला मिळत आहे, तो तुम्हांला दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें कधींहि मिळाला नसता. "

प्रेमभाव व व्यवहार अशा या दोन्ही नात्यांनीं गांधीजींचे जमना-

लालांशीं संबंध आले. पण जमनालालांच्या पत्नी जानकीदेवी किंवा त्यांचे पुत्र कमलनयन व रामकृष्ण आणि पुतण्या राधाकृष्ण या कुटुंबियांशीं गांधीजींचे संबंध निव्वळ घरगुती स्वरूपाचे होते. त्यामुळें ते निर्मळ झऱ्याप्रमाणें शुद्ध,प्रेमळ राहिले. हास्य-विनोद व थट्टा-मस्करी यांचे लोट गांधीजींच्या बोलण्यांतून व लिहिण्यांतून वहात असत. जमनालालांच्या कन्या कमला,मदालसा व ओम् यांच्याशीं तर ते फारच खेळीमेळीनें वागत.

जानकीदेवी यांचा स्वभावच विनोदी. विनोदाच्या भरांत गांधीजींनीं त्यांना १९३२ सालीं असें लिहिलें—" किती अभिमान हा ! तुरुंगांत जाऊन आलां म्हणून आतां मला पत्रहि लिहीत नाहीं काय ? जशा कांहीं तुम्हीच एकट्या तुरुंगांत जाऊन आलांत ! "

१९३२ सालीं गांधीजी येरवड्याच्या तुरुंगांत होते. तेथें ता. २० सप्टेंबरपासून त्यांनीं प्राणान्तिक उपोषण सुरू केलें. हरिजनांना सरकारनें दिलेला वेगळा मतदारसंघ रद्द व्हावा हा त्याचा हेतु. तो ' येरवडा करारानें ' साधला. उपोषणाचें हें अग्निदिव्य करण्याचें आदलेच दिवशीं, गांधीजींनीं " चि. जानकीमैया " स, जें पत्र लिहिलें, तेंहि विनोदानें असें खदखदणारें व प्रेमानें ओथंबलेलें असेंच आहे. त्यांत गांधीजी लिहितात,—

" तुम्हांसारख्या लोकांना 'क' वर्गाचें अन्न खाऊन मरण्याचें भय असतें. म्हणूनच मी कांहीं न खातां जगण्याचा मार्ग पकडला आहे. तें उद्यांपासून दिसून येईल. खाऊन–खाऊन तर सारें जग मरत आहे. परंतु अनशन करून जीवंत राहण्याची कला कशी आहे पाहा. मात्र त्यासाठीं एक अट आहे. ती ही कीं, साऱ्या बहिणींनीं जोगिणी बनून बाहेर पडलें पाहिजे, आणि अस्पृश्यांना स्पृश्य बनवून आपण " ईश्वरी शक्ति " असल्याचा हक्क शाबीत केला पाहिजे. "

जमिनीवरून मोटारीप्रमाणें चाकांच्या आधारानें फिरत जाणारें विमान एकदम अस्मानांत उड्डाण करत व आपल्या पंखाच्या बळावर

उंच उंच अवकाशांत विहार करतें; त्याप्रमाणें गांधीजींचें हें पत्र प्रारंभीं व्यावहारिक विनोद करणारें असलें, तरी पुढें तें महात्म्याला शोभेशा तत्त्वज्ञानाच्या भूमिकेवर नेऊन सोडतें. त्या पत्रांच्या उत्तरार्धांत गांधीजी लिहितात,—

" मी तर जीवंत राहाणारच आहें. जोंपर्यंत एक तरी बहीण माझें काम करीत राहील तोंपर्यंत मी मेलों आहें असें कोण म्हणेल ? आत्म्याच्या अमरत्वासंबंधीं गीतेनें जें तत्त्वज्ञान सांगितलें आहे, तें कोणी टाकून दिलें तर खुशाल देवो. पण मीं सांगितलेलें हें अमरत्व चर्मचक्षूनेंहि दिसण्यासारखें आहे. म्हणून ( माझ्या मृत्यूनें ) तुम्ही थोडेहि घाबराल तर खबरदार ! स्वतः शोभिवंत व्हावें व दुसऱ्याला शोभिवंत करावें. तन–मन–धन ईश्वरावर सोपवून सुखी राहा.

" हौशी ओम् व ज्ञानी मदालसा यांना आज मी कांहीं लिहूं शकत नाहीं. हें पत्र तुम्हां सर्वांसाठीं आहे असें समजावें. तुमचें सौभाग्य अखंड राहो. "

जीवनाच्या अंतिम सीमेवर उभे राहून, पैलतीरावरील मृत्यूचें दर्शन घेत असतांनाहि, गांधीजींची हीच स्थितप्रज्ञता व विनोदी वृत्ति अभंग राहिली. ता. २७ सप्टेंबर रोजीं जमनालालांना लिहिलेल्या पत्रांत गांधीजी म्हणतात,—

" तुम्ही बिलकुल दुःखी होऊं नका. ज्याला तुम्ही पित्याचें स्थान दिलें, तो तुमच्या प्रिय कार्यासाठीं आपली पूर्णाहुति देत आहे. हें पाहून तुम्ही आनंदानें नाचायला हवें. तुम्ही उत्सव करावा अशी ही गोष्ट आहे. जानकीमैयाबरोबर माझा विनोद चालूच आहे. "

' चिंता करतो विश्वाची :' असा भार, शेषाच्या शक्तीनें, सतत वहात असणारे गांधीजी, इतके आनंदी–विनोदी व खळखळून हसणारे कसे राहात, हें एक अजब कोडेंच आहे. १९३३ सालीं मार्च महिन्यांत जानकीदेवींना गांधाजींनीं लिहिलेलें पत्र किती मौजेचें–विनोदाचें आहे पाहा—

"वा: ! माझ्या पत्राचें उत्तरसुद्धां देत नाहीं ? माझी इतकी भीति वाटते ? मला संत्रीं पाठविण्यासाठीं पैशाची थैली खुली होते, ती हरिजनासाठीं बंद कां राहाते ?"

एकदां जमनालाल व जानकीदेवी या दोघांच्या स्वभावाची तुलना गांधीजींनीं मोठ्या मौजेनें केली. ता. २३-८-१९३४ रोजीं जमनालालजींना लिहिलेल्या पत्रांत गांधीजी म्हणतात, "ज्या लेखनाबरोबर "विनोद" असें लिहावें लागतें तो काय विनोद झाला ? जानकीमैया आरडाओरड करून गडबड उडवून देतात हें ठीक, कीं तुम्ही सारे कांहीं मनामध्यें दाबून ठेवून स्वप्नें पाहात राहातां हें ठीक ? जेव्हां जानकीमैया धामधूम उडवून देतात तेव्हां आम्हांला वाटतें, यांना मोठें दुःख झालें आहे. तुम्ही आपल्या मनांत सारें ठेवून गप्प बसतां, तेव्हां आम्ही लोक संकटांत पडतों. मग सांगा बरें तुम्हां दोघांमध्यें थोर कोण तें ?"

कधीं "तुम्ही फार धूर्त आहां. कांहीं ना कांहीं कारण काढून तुम्ही पत्र लिहिण्याचें टाळतां." अशी जानकीदेवींची चेष्टा गांधीजी करीत, तर कधीं त्यांना चिडवून कार्याला लावण्यासाठीं असें लिहीत, "आतां मदालसा तुमच्यासारखीच आळशी झाली आहे. ती तशीच आळशी राहिली, तर तिला तुमच्यापासून दूर नेण्याचा हुकूम जारी करणें मला भाग पडेल." कांहीं पत्रांत गांधीजी जानकीदेवींना प्रेमभावानें असें उपरोधिक लिहीत, "आतां तुम्हांला उत्साह कां नाहीं ? आतां तर तुम्ही सभेंत भाषण करतां--वर्तमानपत्रांतहि तुमचें नांव छापून येतें. वेळोवेळीं जेव्हां "जानकीबाई बजाज" असें नांव वृत्तपत्रांत झळकतांना मला दिसतें, तेव्हां मला वाटतें, जमनालाल आणि आम्ही सर्वजण तुरुंगांत जाऊन तेथेंच कायम राहावें. मला तर पूर्वीपासून असा विश्वास वाटतच होता कीं, तुम्ही जो अविश्वास दाखवीत होता, त्याच्या पाठीमागें पूर्ण आत्मविश्वास होता. त्याची वृद्धि ईश्वर करो."

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. 
अनुक्रम 23363 दि: 
क्रमांक


एका पत्रांत गांधीजी जानकीदेवींना लिहितात, "खूप केलें! अखेर पेन्सिलीनें दोन ओळी लिहिण्याची तुम्हीं तकलीफ घेतली म्हणावयाची! तुरुंगांत जाऊनसुद्धां आळस गेला नाहीं ना? तुम्हांला 'अ' वर्ग देण्यांतच चूक झाली. 'क' वर्ग देऊन खूप काम करून घ्यावयास हवें होतें. तुमचें पत्र बरोबर वेळेला आलें नाहीं, तर शिक्षा मिळेल."

गांधीजी दुसऱ्याशीं जसा विनोद करीत, तसा दुसऱ्यानें केलेला विनोदहि सहन करीत. आणि विनोदाचा मुख्य पायाच समता हा आहे. त्यांनीं एकदां जमनालालांच्या वृद्ध मातेचे कान पकडले, तर उलट त्या म्हाताऱ्या माउलीनें गांधीजींचे कान पकडले! हंसाहंसी उडाली! अशी स्वतःचीं चेष्टामस्करी करवून घेण्यांत गांधीजींना मुळींच कमीपणा वाटत नसे.

जानकीदेवींना प्रायः प्रत्येक पत्र गांधीजी लिहीत, तें विनोदानें ओथंबलेलें. त्याला जानकीदेवीहि तितक्याच विनोदी वृत्तीनें उत्तर लिहीत. १९३२च्या ऑगस्टमध्यें वर्धा येथून लिहिलेल्या उत्तरांत जानकीदेवी स्वाभिमानानें म्हणतात, "आळशी, आळशी म्हणून तुम्ही मला म्हणतां, पण साऱ्या आयुष्यांत मीं वाचलीं नसतील इतकीं म्हणजे वीस पुस्तकें पांच महिन्यांत पुरीं केलीं. येथें येतांच पुनः तुरुंगांत अडकलें. ता. ४।८।३२ रोजीं मी सुटलें, आणि ता. ७।८ रोजीं साहित्याच्या परीक्षेचा अर्ज भरून दिला. त्या परीक्षेला ओम्, कमल, प्रल्हाद वगैरे मुलेंहि बसणार होतीं. आतां आपण तेथूनच मला आशीर्वाद द्या म्हणजे मी पास होईन."

अशा तऱ्हेनें बापूजींनीं केलेला आपल्यावरील आलस्याचा आरोप तर जानकीदेवींनीं लीलेनें उडवून दिलाच, पण उलट त्यांचेवरहि कांहीं आरोप केले. त्या लिहितात, "ओम् म्हणते, 'बापूजींना विशेष काम कांहीं नाहीं, म्हणून लोक त्यांना मोठमोठीं विशेषणें लावतात.' मला पक्कें माहीत होतें कीं, माझा 'अ' वर्ग आपल्याला खटकत आहे. आपण

खुशाल 'क' वर्गाची इच्छा धरा, किंबहुना त्याच्याहि खालच्या वर्गाची अभिलाषा बाळगा. मला तर एकच भय वाटत होतें तें हें कीं, 'क' वर्गाचें अन्न खावयास लागून मी कोठें मरून जातें कीं काय? मरणाशिवाय दुसरी कोणतीहि शिक्षा आपण मला द्या. आपण लोकांना सांगतां, 'दया करा.' पण आपण स्वतः आपल्या दुखऱ्या हाताकडून किती काम करून घेतां? विनोबांच्या तावडींत मी सांपडावें असें आपण लिहिलें आहे. पण विनोबाच माझ्या चिमटींत सांपडत आहेत, ही नवी खबर ऐका.

कमलचें वजन ४४ पौंड कमी झालें होतें, तें आतां ३५ पौंड झपाट्यानें भरून आलें आहे. अधिक न वाढेल तर चांगलें !"

एखादी लाडकी मुलगी आपल्या प्रेमळ पित्याशीं जशी लडिवाळपणानें बोलते, तशीच जानकीदेवींची ही भाषा. त्यांच्या चित्तांत गांधीजीविषयीं अथांग आदर आहे. पण त्या आदराच्या सागरावर वात्सल्याचे सोनेरी किरण पडलेले आहेत. त्यामुळें त्यांच्या पत्रांतून विनोदाचीं अशीं इंद्रधनुष्यें उमटतात.

पण केवळ थट्टामस्करी करणारीं पत्रें लिहिण्याची संवय गांधीजींना नव्हती. सर्वसामान्य माणसांच्या मनोवृत्ति खेंचून घेण्यापुरतेच ते त्यांच्याशीं समरस होत. आणि एकदां का आपल्या विनोदाच्या रेशमी रज्जूनें त्यांनीं एखाद्या व्यक्तीला पक्कें बांधून टाकलें कीं, मग ते त्या व्यक्तीला आपल्या उच्च तत्त्वज्ञानाच्या अंतराळांत खेचून नेत आणि जनसेवेच्या भराऱ्या मारावयास लावीत. खरा महात्मा तेव्हां प्रगट होई! १९२७ च्या एप्रिलमध्यें गांधीजींनीं जानकीदेवींना लिहिलेल्या एका पत्रांत मृत्यूची मीमांसा किती सखोल व सुंदर केली आहे! उपनिषदांतील ऋषि-मुनींप्रमाणें ते म्हणतात,

" माझ्या प्रकृतीची चिंता करण्याचें कारण नाहीं. म्हातारीं माणसें मृत्यूच्या किनाऱ्यावरच बसलेलीं असतात ना? कोणत्या ना कोणत्या कारणानें त्यांना जीर्ण मंदिर सोडणें अवश्य असतें. त्यांना इच्छा असेल

तर ते नव्या मंदिरांत वास्तव्य करतील. आणि बंदीवास नकोच असेल, तर स्वतंत्र राहून वायूमध्यें निवास करतील. परंतु दीर्घकाल तुरुंगांत राहाणाऱ्या माणसाला तुरुंगच चांगला वाटूं लागतो, तशीच आपली स्थिति आहे. देहाध्यासामुळें देह सोडणें चांगलें वाटत नाहीं. मला चांगलें वाटते कीं नाहीं, तें मी जाणत नाहीं. माझ्या बुद्धीला मात्र त्याहून अधिक चांगलें कांहींच वाटत नाहीं. परंतु बाहेरच्या दडपणापुढें बिचारी बुद्धि दीन होऊन जाते. म्हणून खऱ्या स्थितीचा पत्ता मरते-वेळींच लागेल."

याहिपेक्षां मृत्यूचें तत्त्वज्ञान अधिक गंभीरपणें गांधीजींनीं जमना-लालजींना १९३२ सालीं विवरून सांगितलें. आपल्या दोषांची तीव्र जाणीव झाल्यामुळें जमनालालजींचा जीव, पाण्याबाहेरील मासोळी-प्रमाणें, सदैव तळमळे–तडफडे. तो इतका कीं, आत्महत्या करण्याचाहि अखेरचा विचार त्यांच्या मनांत येई. तो रोखणारे विचार गांधीजींनीं या पत्रांत विस्तारानें मांडले आहेत. "मृत्यूचें सौंदर्य" या विषयावरील तो त्यांचा जणूं एक प्रबंधच आहे. त्यांत ते लिहितात,—

"मृत्यूचें भय कशाला आणि त्याचेसाठीं शोक तरी कशाला? छोटे–बडे, काळे–गोरे, मनुष्य–पशु वगैरे सर्व जीवांना मृत्यु हा ठेव-लेलाच आहे. मला तर पुष्कळ वेळां असें वाटतें, जन्मापेक्षां मृत्यु अधिक चांगली वस्तु आहे. जन्माआधीं मातेच्या गर्भामध्यें ज्या यातना भोगाव्या लागतात, त्या तर मी सोडूनच देतों, परंतु जन्मापासूनच ज्या यातना सुरू होतात, त्यांचा प्रत्यक्ष अनुभव आपल्याला आहे. त्या-वेळची पराधीनता किती? पण आपलें जीवन स्वच्छ असेल तर मृत्यू-मध्यें पराधीनता अशी मुळींच नाहीं. बालकामध्यें ज्ञानाची इच्छा नसते, आणि त्याला ज्ञान मिळण्याची शक्यताहि नसते; पण मृत्यूचे वेळीं ब्राह्मी स्थिति असणें संभवनीय आहे. अशा स्थितींत पुष्कळ लोकांचा मृत्यु झालेला आहे. जन्म म्हणजे दुःखामध्यें प्रवेश, तर मृत्यु म्हणजे

संपूर्ण दुःखमुक्ति होऊं शकते. असा मृत्यु तुम्हांला प्राप्त होवो असा माझा आशीर्वाद आहे."

लहान मुलाच्या लहानसहान गोष्टींकडेहि गांधीजी किती बारकाईनें लक्ष पुरवीत हें, जमनालालजींच्या मुलांमुलींना, त्यांनीं लिहिलेल्या पत्रावरून दिसून येतें. खुद्द त्यांचें हस्ताक्षर चांगलें नव्हतें. पण त्याचें महत्त्व ते जाणत होते. म्हणून ते कमलनयनला वारंवार लिहीत, "तुझें अक्षर सुंदर आहे, पण स्पष्ट नाहीं. 'द' 'ह' सारखा दिसतो; 'अ' अपुरा असतो. इत्यादि." याहिपेक्षां वर्तनाचे नियम त्यांनीं एका पत्रानें कमलनयनाला लिहून कळविले. "सत्यं वद! धर्मं चर!' अशा उपनिषदांतील उपदेशाप्रमाणें गांधीजी सूत्ररूपानें वागण्याचे नियम सांगतात, ते असे,—

(१) कमी बोलावें.

(२) सर्वांचें ऐकावें—त्यांतील चांगलें असेल तसें करावें.

(३) प्रत्येक मिनिटाचा हिशेब ठेवावा.—ज्या क्षणाचें काम त्या क्षणींच करावें.

(४) गरिबांसारखे रहावें—धनाचा अभिमान कधीं धरूं नये.

(५) पै-पैचा हिशेब ठेवावा.

(६) अभ्यास ध्यानपूर्वक करावा.

(७) व्यायाम करावा.

(८) मिताहार ठेवावा.

(९) रोजनिशी लिहावी.

(१०) बुद्धीच्या तीव्रतेपेक्षां हृदयाचें सामर्थ्य क्रोडों पटींनीं अधिक मोलाचें आहे. म्हणून हृदयाचा विकास करावा. त्यासाठीं गीता, तुलसीदासाचें रामायण यांचें मनन आवश्यक आहे. भजनावली दररोज वाचावी. प्रार्थना रोज दोन्ही वेळां करावी.

कमलनयनच्या शिक्षणासंबंधीं गांधीजींनीं वारंवार अशीं पत्रें लिहून बारीकसारीक सूचनाहि केल्या आहेत. परदेशाला जावें, अशी इच्छा कमलनयनच्या मनांत १९३४ सालीं होती. तेव्हां गांधीजींनीं त्याला लिहिलें, "तुम्ही हिंदीमध्यें 'उत्तमा' परीक्षा दिली पाहिजे आणि इंग्रजीवर उत्तम प्रभुत्व मिळविलें पाहिजे. त्यायोगानें तुम्ही परिपक्व व्हाल आणि अभ्यासी बनाल. नंतर पश्चिमेकडील राष्ट्रांत तुम्ही गेलां तर पुरा लाभ घेऊं शकाल. जेव्हां तिकडे जाण्याचा समय येईल, तेव्हां माझी सूचना अशी आहे कीं, तुम्ही प्रथम अमेरिकेला जावें, नंतर इंग्लंडला—आणि नंतर युरोपमधील दुसऱ्या देशांना. शेवटीं जपानला व चीनला. एकूण बाहेर दोन वर्षें राहावें. मात्र आतांच तिकडे जाण्याचा विचार सोडून द्यावा. हिंदी पूर्ण करणें व इंग्रजी पक्की करणें—यासाठीं चार वर्षें जरूर आहेत असें मी मानतों. हिंदीसाठीं संस्कृतच्या अभ्यासाची आवश्यकता आहे, असेंहि मी मानतों."

एखादा प्रेमळ पिता आपल्या मुलाचें जीवन उत्कृष्ट बनावें, म्हणून कारणपरत्वें—किंवा कारण नसतांनाहि—एकसारख्या सूचना करीत असतो, त्याप्रमाणें गांधीजी कमलनयनला पुनः पुनः लिहीत, "आपलें इंग्रजी सुधारा, अध्ययन रसपूर्वक करा, शरीर मजबूत बनवा. श्रम करण्यामध्यें आळस करूं नका. त्यामध्यें लाज वाटण्यासारखें काय आहे?"

आग्रह किंवा सक्ति मुलावर करूं नये, हें शिक्षणशास्त्राचें तत्त्व गांधीजींना पुरेपूर अवगत होतें. त्यांच्या अहिंसावादाचा तो प्राणच ना? वास्तविक त्यांना स्वदेशी व खादी यांचें किती प्रेम! परंतु त्यांचीहि सक्ती ते करीत नसत. ता. ४ सप्टेंबर १९३५ रोजीं कमलनयनला लिहिलेल्या पत्रांत गांधीजी किती आर्जवानें लिहितात, पहा. "तूं हात-कागद वापरूं शकत नाहींस याची चिंता नाहीं. त्यासाठीं तुझ्या ठायीं उत्साह व गरिबांविषयीं अत्यंत अनुकंपा उत्पन्न होणें आवश्यक आहे. ते गुण तुझ्या स्वभावामध्यें उत्पन्न झाले म्हणजे तूं या सर्व गोष्टी आपो-

आप करशील. जी गोष्ट तूं आपल्या मनाच्या उत्साहानें करशील, तीच ठीक होईल—आणि तिचेंच फळ तुला मिळेल."

या वेळीं कमलनयन इंग्लंडला गेलेले होते. तेव्हां तेथील रीतिरिवाजाप्रमाणें व हवामानाप्रमाणें ते आपले कपडे करीत. निसर्गाला व परिस्थितीला शरण न जातां, कडाक्याच्या थंडींतहि, आपला अर्धामुर्धा पोशाख इंग्लंडमध्येंहि कायम ठेवणारा महात्मा एखादाच. १९२६ सालीं गांधीजींना फिनलंडचें बोलावणें आलें होतें. तेव्हां त्यांनीं पहिली अट ही घातली कीं, माझा पोशाख माझ्याच पद्धतीचा राहील. परंतु सर्व-सामान्य माणसें प्रवाहपतित असतात—परिस्थितीला शरण जाणारीं असतात. परिस्थितीची पहार वाकविणारे भीमसेन थोडेच.

हें तारतम्य लक्षांत घेऊन गांधीजी कमलनयनला लिहितात, "तेथें आपल्या इच्छेनें तुम्ही खादीचा आग्रह धरूं शकत नसाल तर सोडून द्या. तुम्हांला योग्य वाटेल तोच पोशाख करा—आणि योग्य वाटेल त्या कापडाचाहि. ओव्हरकोट, पायमोजे, गंजीफ्राक—या साऱ्या वस्तु हातसुताच्या मिळविण्यासाठीं प्रयत्न करणें गैर नाहीं, पण तसें न केलें तर पाप मानूं नये."

शेवटीं गांधीजी सूत्ररूप इषारा देतात, "तेथें तुमचें मुख्य काम आपलें अध्ययन पूर्ण करणें हें आहे—निर्भयता, वीरता, दृढता, उद्यम, उदारता, दया, प्रेम—या सर्वांचा विकास करणें हें आहे. साधेपणा व नम्रपणा वाढविला पाहिजे. तेथील जीवनाचें निरीक्षण करावें. क्षणाक्षणाचा सदुपयोग करावा. रोजनिशी लिहावी."

दुसऱ्या एका पत्रांत गांधीजी आंतडें पिळवटून कमलनयनला लिहितात, "तेथील प्रलोभनाला सीमा नाहीं. आपलें नांव सुशोभित करावें आणि पित्याचे गुण ध्यानीं आणून, 'कमळा'प्रमाणें, चिखलांत असूनहि अलिप्त राहावें. यानें सर्व कांहीं ठीक होईल. आपल्या शक्तीप्रमाणें उडी

मारावी. कोणाशीं स्पर्धा करूं नये. प्रत्येक क्षणाचा सदुपयोग केला तर तुझ्या शक्तीचा विकास जितका व्हावयाचा तितका होईल. रामायण व गीता यांचा गाढ अभ्यास करावा. मूळ गीता तर वाचावीच. पण आर्नोल्डचा इंग्रजी अनुवादहि वाचावा."

१९३७ च्या फेब्रुवारींत लिहिलेल्या एका पत्रांत गांधीजी कमलनयनला म्हणतात, "तुम्ही इकडे लवकर यावें अशी तुमच्या सासऱ्याची, वडिलांची, आईची, सर्वांची इच्छा आहे. मी मात्र तटस्थ आहें. तेथून तुम्ही कांहीं घबाड घेऊन येणार आहांत असें मी मानीत नाहीं. तथापि तुम्हांला तेथें जितका काळ राहावेंसें वाटेल, तोंपर्यंत इकडे बोलविणें मला ठीक वाटत नाहीं. तुम्हांला व्यापारांत पडावयाचें असेल तर पदवीचा मोह सोडला पाहिजे. बॅरिस्टर होऊन काय करणार? पदवीधर होऊन काय करणार? मला जें माहीत आहे, त्यावरून तुम्ही स्वतः पैसे कमावणार आहांत. पित्याच्या पैशावर जगणार नाहीं. साधुहि होणार नाहीं. व्यापारांतच तुमचा पुरुषार्थ, म्हणून बॅरिस्टरीचा किंवा पदवीचा मोह सोडा."

कमलनयन यांना गांधीजींनीं लिहिलेलें अखेरचें महत्त्वाचें पत्र ता. २२ नोव्हेंबर १९४५ या तारखेचें आहे. गरिबांसाठीं जमनालालजींनीं नागपूर येथें एक बँक उघडली होती. ती त्यांच्या पश्चात् बंद होण्याची वेळ आली. ती आपत्ति टळावी म्हणून गांधीजी या पत्रांत कळवळून लिहितात,

"तुम्ही जमनालालजींचे वारस आहां. याचा खरा अर्थ, त्यांच्या पतीचे, प्रतिष्ठेचे वारस आहां. हें जाणूनच मीं जालियनवाला ट्रस्ट, ग्रामोद्योग-संघ इत्यादि संस्थांना आपले पैसे 'नागपूर बँकेंत' ठेवण्याचा सल्ला दिला. ती बँक बंद करून कसें चालेल? जमनालालजींचे वारस होणें ही कांहीं अशी तशी गोष्ट नाहीं. 'पुत्र' या नात्यानें

तुम्ही त्यांचे वारस आहां, तर 'दत्तक पिता' या नात्यानें मीहि त्यांचा वारस आहें. त्यांचें नांव अखंडित राहावें हा माझा स्वार्थ आहे. त्यांनीं सुरू केलेलें काम चालू राहावें, एवढेंच नव्हें तर, अधिक शोभिवंत व्हावें. तरच तुम्ही व मी त्यांचे खरे वारस मानले जाऊं."

कमलनयनच्या मनांतील सद्भावाची वृत्ति जागृत करण्यासाठीं गांधीजी या पत्राचे अखेरीस लिहितात, "तुम्ही पैसे मिळवाल आणि 'बडे व्यापारी' म्हणून मानले जाल असा संभव आहे. परंतु जमनालालजींच्या उत्तर आयुष्यांतील पारमार्थिक कार्यांचें काय होणार? त्या बँकेचें काय होणार? गरीब गाईचें काय होणार? खादीचें काय होणार? ग्रामोद्योगाचें काय होणार? त्यांच्या इच्छेमुळेंच मी वर्ध्याला जाऊन बसलों ना? त्यासाठीं सरदारांचा गोडसा रागहि सहन केला ना? त्या एका जागेऐवजीं सरदारजी मला दहा बगीचे सहज देऊं शकत होते; पण ते जमनालालांना देऊं शकले नसते. म्हणून मी दहा बगीचे सोडून वर्ध्याला जाऊन बसलों. परंतु आतां मी जमनालालजींना गमावून बसलों आहें, असा आभास माझ्या मनामध्यें अणुमात्रहि होऊं नये असें मी इच्छितों. त्यांची किल्ली तुमच्या हातांत आहे–राधाकृष्णाच्या हातांत आहे— जानकीदेवींच्या हातांत आहे. पण ते दोघे फारसे शिकले नाहींत. आणि तुम्ही तर विलायतेला जाऊन आलेले.— व्यापारी म्हणून थोडेंबहुत नांवहि मिळाविलेले—आणि तुमच्या मनांत आत्मविश्वासहि जरूरीपेक्षां अधिक आहे. तें कसेंहि असो, पण जमनालालजींच्या गादीवर बसलेले वारस म्हणून मी तुमच्याकडे पाहात आहें. म्हणून तुम्हांला सांगत आहें कीं, आपल्या पित्याचें नांव परोपकाराच्या साधनानें उज्ज्वल करण्यासाठीं तुम्ही सतत झटा."

मुलें जितकीं लहान, तितका त्यांचेशीं गांधीजी अधिक विनोद करीत. "मुलांच्या चालीनें चालावें। मुलांच्या बोलीनें बोलावें।" ही तर त्यांच्या लोक–प्रियतेची खुबी. जमनालालजींची मुलगी मदालसा

ही लहान होती, तेव्हां तिला आपलेसें करून घेणारीं, विनोदाचीं-थट्टा-मस्करीचीं, किती तरी पत्रें गांधीजींनीं लिहिलीं. त्या पत्रांत ते तिला कधीं ‘ मदु ’ म्हणत, तर कधीं ‘ पगली ’ म्हणून संबोधीत. एका पत्रांत तर ते लिहितात, “ तूं वेडी आहेस. पण नेहमींच वेडी राहणार काय ? ”

एका पत्रांत गांधीजींनीं मदालसेला अभिमान व स्वाभिमान यांतील भेद विशद करून सांगितला; तर दुसऱ्या पत्रांत क्रोध टाकून सेवावृत्ति स्वीकारण्याचा उपदेश केला. ते लिहितात,—

“ तूं समजतेस कीं, आपल्यामध्यें ईर्ष्या, अभिमान वगैरे दोष फार भरले आहेत. पण मला तसें वाटत नाहीं. हे दोष तुझ्यांत येतील कोठून ? जमनालालजींमध्यें ते नाहींत,जानकीदेवींमध्येंहि ते नाहींत.बरें, तुला कोणाची कुसंगतिहि लागलेली नाहीं. तुझ्यामध्यें कोणती न्यूनताहि नाहीं. क्रोध आहे, तो मीं पाहिला आहे. पण तो विचार करून काढून टाकावा. विचार कोणता ? तर जसें आपण, तसेच सर्व लोक आहेत. सर्वांमध्यें एकच जीवात्मा आहे. म्हणून दुसऱ्या कोणावर क्रोध करणें म्हणजे स्वतःवरच क्रोध करण्यासारखें आहे. जीवमात्राची सेवा करण्याची आवड ज्याचे ठायीं आहे, त्याच्या अंगीं दोष राहूं शकत नाहींत. म्हणून तूं आपली सेवेची वृत्ति वाढीव. ”

पुनः दुसऱ्या एका पत्रांत गांधीजी क्रोधाची मीमांसा, उच्च तात्विक भूमिकेवरून, करतात. ता. ११-१-१९३३ रोजीं मदालसेला लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात, “ जो प्रश्न तुझ्या मनांत आला आहे, तो सर्व जिज्ञासूंच्या चित्तामध्यें उत्पन्न होत असतो. तो वाचन व विचार यांच्या साह्यानें सोडवितां येतो. जग म्हणजे आपणच आहों. आपण जगांत आहों आणि जग आपणांमध्यें आहे. ईश्वरहि आपणांमध्यें आहे. आपणांमध्यें हवा भरलेली आहे, ती आपण डोळ्यांनीं पाहूं शकत नाहीं. परंतु तिचें ज्ञान करून देणारें इंद्रिय आपणापाशीं आहे. तसेंच ईश्वराचें

ज्ञान करून देणाऱ्या इंद्रियाचा विकास करणें शक्य आहे. तो विकास झाला, तर ईश्वराचेंहि ज्ञान होईल."

अशा प्रेमानें व आस्थेनें गांधीजींनीं लहान—थोरांचीं मनें जिंकलीं होतीं. मदालसेसारख्या मुलींचाहि विश्वास व प्रेमभाव त्यांनीं संपादन केला होता. शकुंतलेला आपला धर्मपिता कण्व याविषयीं जितका आदर व आत्मीय भाव वाटत असेल; तितकाच मदालसेला गांधीजीं-बद्दल वाटत असेल. गांधीजी सांगतील तें आपल्या हिताचेंच असणार अशी तिच्या मनाची पक्की खात्री. त्यांचा शब्द कसा मोडावयाचा ? पित्याइतका प्रिय व गुरूइतका पूज्य असा हा महात्मा आपल्याला मार्ग-दर्शक भेटला, याचा तिच्या बाल मनावरहि मोठा प्रभाव पडला होता.

तो प्रभाव किती होता ? गांधीजींच्या शब्दावर मदालसेचा विश्वास किती बसला होता ? याची कसोटी लावणारा कठीण प्रसंग लवकरच आला. पुराणांतील गुरुशिष्याची परीक्षा पाहण्यासाठीं अवघड गोष्टी करावयास सांगत. त्याहि मदालसेनें केल्या असत्या. वस्त्रालंकारांचा मोहहि तिनें सोडला असता. पण त्याहून तापदायक अशी सत्त्व-परीक्षा गांधीजींनीं तिची घेतली.

गांधीजी म्हणजे बडे बैरागी! पक्के प्रयोगी! सौंदर्याची आसक्ति किंवा अभिलाषा त्यांना कोठली? ती आपल्या माणसांचेहि अंगीं असूं नये, अशी त्यांना इच्छा. वैराग्यासाठीं सौंदर्याचा बळी देण्यास ते कचरत नसत. आणि केश—कलापासारखें स्त्री—सौंदर्याचें दुसरें रमणीय अंग कोणतें? काळ्याकुरळ्या केसांचा अभिमान स्त्रियांना सहजच असतो. कारण त्यानें त्यांचें सौंदर्य वाढतें. पण असें होणेंच विरागी गांधींना नको होतें. भोग-वासना वाढविणाऱ्या साधनांवर कुऱ्हाड चाल-विण्याइतके ते कठोर बनले होते. त्यांनीं मदालसेला ता. ९ सप्टेंबर १९३२ रोजीं लिहिलें,

"तूं आपल्या डोक्यावरील केस काढून टाक; त्यांत एवढी भीति

कसली ? जसें गवत, तसें केस उगवत राहतात. मी तर असें पाहिलें आहे कीं, पुष्कळ मुलींचे केस कापल्यानंतर ते पूर्वीपेक्षां जास्त वाढतात. म्हणून तूं केसांचा मोह धरूं नकोस. ते काढून टाक. ”

असें हें विरक्त तत्त्वज्ञान सांगूनच गांधीजी थांबले नाहींत, तर खुद्द आपल्या हातांनीं त्यांनीं तिचे केस कापून टाकलें! गुरूच्या शब्दाखातर आपली जीभ, आपली मान तोडून परमेश्वराच्या चरणांवर अर्पण करणारे भक्त काय थोडे आहेत ? बापूंनीं सांगितलें—मदालसेनें ऐकलें ! तसे प्रेमाचे व विश्वासाचे संबंधच होते त्यांचे.

हा कुंतल—कर्तनाचा विधि १९३३ सालच्या दिवाळींमध्यें घडला ! गांधीजींनीं १६-१७ वर्षें वयाच्या मदालसेचे केस कापले. आणि त्या केसांची एक लांब दोरी तिच्या आजीनें बनविली. वळकटी बांधण्यासाठीं त्या दोरीचा उपयोग होऊं लागला !

आयुष्याच्या अगदीं अखेरी अखेरीपर्यंत गांधीजी मदालसेच्या स्वभावाची घडण घडवीत होते. ता. २४ ऑगस्ट १९४६ रोजीं लिहिलेल्या पत्रांत गांधीजी तिला उपदेश करतात, “ आपण दुसऱ्याचे दोष पाहूं नयेत—आपले पाहावेत. त्यानें जीवन सुखी होतें. आणि आपण स्वच्छ राहतों. आपण आपल्यासाठीं असें काम निवडून घ्यावें कीं, स्वतः विषयीं चिंतन-मनन करण्याला अवकाशच मिळूं नये. ”

पुढील सप्टेंबर महिन्यांत गांधीजी पुनः तिला लिहितात, “ तूं आपले दोष व दुसऱ्याचे गुण पाहूं लागशील, तर तुझी उन्नति झपाट्यानें होईल आणि सुखाचा अनुभव मिळेल. दुःख नांवाची वस्तुच तुला कोठें आढळणार नाहीं. आपल्याला कोणाकडून, कोणतीहि आशा बाळगण्याचा अधिकार नाहीं. आपण देणेदार आहों म्हणून आपल्याला जन्म मिळाला. आपण कोणाचे सावकार नाहीं—घेणेदार नाहीं. हीं गोष्ट तुला नीट समजली तर सारें जग तुला सरळ दिसूं लागेल. हें

कांहीं तत्त्वज्ञान मी सांगत नाहीं, तर आपला जीवन-प्रवाह सरळपणें नेण्याचा हाच एक राजमार्ग आहे."

ता. ९ जून १९४७ रोजीं लिहिलेल्या पत्रांत गांधीजी मदालसेला आपली जीवनविषयक भूमिका उलगडून दाखवितात, ती अशी—"माझ्या लेखनांत किंवा वर्तनांत स्वच्छंदपणाला स्थान नाहीं. माझें जीवन संयमासाठीं आहे. त्यांत मी परिपूर्ण झालों नसेन, परंतु मी स्वेच्छाचारासाठीं दरवाजे कधींहि उघडणार नाहीं, असा मला विश्वास आहे."

मदालसेचा विवाह श्रीमन् नारायणाशीं झाला. त्यानंतर त्या दोघांचा संसार सुखाचा व्हावा, म्हणून गांधीजींनीं हृदय पिळवटून लिहिलें, "अनेक पुण्य कृत्यें केल्यावरच असा पति मिळतो. तूं त्यांच्या जीवनांत समरस होणें अवश्य आहे, त्यांतच तुझें सुख आहे याविषयीं मला शंका नाहीं."

या समरसतेचा साक्षात्कार गांधीजींना पुढें एकदां झाला. कांहीं निमित्तानें मदालसेनें आपल्या पतीजवळ बक्षीस मागितलें. श्रीमन् यांनीं कोऱ्या कागदावर सही करून तो आपल्या प्रिय पत्नीजवळ दिला व म्हटलें, 'यावर कोणत्याहि वस्तूचें नांव तूं घाल.' मदालसेनें तो सहीचा कोरा कागद व १५०० रुपये दिले पाठवून गांधीजींकडे. ते तर बैरागी.त्यांना स्वतःला पैसे काय करावयाचे? पण त्यांच्याजवळ भिकेचा कटोरा मोठा होता. त्यांत त्यांनीं ते १५०० रुपये घेतले. आणि हरिजन-फंडाकडे ते कारणीं लावले. शिष्या त्यागी, गुरु योगी!

मदालसेपेक्षां धाकटी मुलगी ओम्. तिच्याशींहि गांधीजी हंसत-खेळत. त्या बालिकेला ते कधीं 'पंडिता' म्हणून संबोधित, तर कधीं 'सोती सुंदरी' असें म्हणून चेष्टा करीत. तिच्या पत्रांतूनहि गांधीजींचा हाच उपदेश चालू असे. "सच्चेपणानें वाग, सच्चा विचार कर,

सच्चें भाषण कर. असें करणें तुझ्या शक्तीबाहेर असेल तर माझा त्याग कर. एक पळहि व्यर्थ जाऊं देऊं नको. आपलें वचन पाळ— कृतीनें व मनानेंहि. जें करावयाचें तें चांगलें करावें, सुंदर करावें. लहान असो–मोठें असो, कोणत्याहि कामांत 'वेठ वारली' असें न करावें."

लहान मुलांनाहि समाजसेवेचे धडे न कळत देण्यासाठीं गांधीजी नाना युक्त्या करीत. एका पत्रांत गांधीजींनीं ओम्‌ला लिहिलें, "मला येथें दहा रुपयांचें पुस्तकालय बनवावयाचें आहे. त्यासाठीं मराठी पुस्तकें पाठव. ज्या कोणाजवळ छोटीं छोटीं मराठी पुस्तकें असतील, पण त्यांची गरज ज्यांना नसेल, त्यांचेकडे जाऊन, पुस्तकें मागून, तीं गोळा करून मजकडे पाठव. हें काम तुला आवडत नसेल, तर तसें स्वच्छ लिही. म्हणजे दुसरीकडे मी आर्जवें करीन."

सत्याग्रहाची संजीवनी मात्रा हातीं घेऊन गांधीजी गांवोगांव जात, घरोघर शिरत, हृदयाहृदयांत प्रवेश करीत. प्रेमरसाच्या अनुपानासह त्या मात्रेचे चार वळसे त्यांनीं देतांच, भोगाची जागा त्यागाकडे, स्वार्थाचें स्थान परार्थाकडे आणि अहंभावाचें सूत्र सेवाभावाकडे सहजच जाई. कैक कुटुंबें गांधीजींनीं अशीं उन्नत केलीं आहेत. कोणा व्यक्तीला राजकारणांत ओढावयाचें, एवढी संकुचित व तात्कालिक दृष्टि गांधीजींची नसे. ते त्या व्यक्तीचें संपूर्ण जीवनच बदलून टाकीत– विकसित करीत. आणि केवळ त्या व्यक्तीचेंच नव्हे, तर त्याच्या बायकामुलांचें–त्याच्या सर्व कुटुंबाचेंच–हृदय-परिवर्तन ते करीत. अशा कौटुंबिक परिवर्तनाच्या परंपरेंत बजाज–कुटुंब अग्रगण्य होय.

• • •

# ८ : समर्पित जीवन

*पापाची वासना नको दावूं डोळा । त्याहून अंधळा बराच मी ॥*
*निंदेचें श्रवण नको माझे कानीं । बधिर करोनि ठेवीं देवा ॥*
*अपवित्र वाणी नको माझ्या मुखा । त्याजहुनि मुका बराच मी*
*नको मज कधीं परस्त्रीसंगति । जनांतुन माती उठतां भली ॥*
*तुका म्हणे मज अवघ्यांचा कंटाळा । तूं एक गोपाळा आवडसी ॥*

*—तुकाराममहाराज*

देश-भक्तीपेक्षां देव-भक्ति जमनालालजींचे ठायीं अधिक होती. परार्था-पेक्षां परमार्थाची मातब्बरी त्यांना अधिक वाटे. देशांतल्या ब्रिटिशांच्या पारतंत्र्याचें निराकरण करणें तर ते अवश्य समजत, पण स्वतःच्या शरीरांतील विकारांचें दमन करणें हें त्यांना अधिक अगत्याचें वाटे. राजकीय स्वातंत्र्यापेक्षां आध्यात्मिक मोक्ष मिळविण्यासाठीं ते आतुर झालेले होते. ईश्वर-प्राप्ति हें त्यांच्या जीवनाचें ध्येय, आणि जन-सेवा हीं त्यांची साधना. ते खऱ्याखुऱ्या अर्थानें आरंभीं मुमुक्षु होते, पुढें साधक बनले आणि गांधीजी व विनोबा या विभूतींच्या दिव्य प्रकाशांत,

सिद्धावस्थेची वाट चालूं लागले. ती वाट चालतां चालतां त्यांना अपार शांति व गाढ समाधान लाभलें. आणि हेंच त्यांचें जीवित–साफल्य.

आपल्या पत्नीस कलकत्त्याहून ता. ६ जानेवारी १९१७ रोजीं लिहिलेल्या पत्रांत जमनालालजींनीं आपलें मन उघडें केलें आहे. त्यांत ते म्हणतात, "सरकारकडून 'रायबहादुर' पदवी मिळाल्यामुळें पुष्कळ ठिकाणांहून मित्रांचीं अभिनंदनाचीं पत्रें व तारा येत आहेत. हें सर्व अवडंबर आहे. पण परमेश्वराची इच्छा असेल, तर या अवडंबराचाहि उपयोग सेवेसाठीं होऊं शकेल. परमेश्वराची नेहमीं अशी प्रार्थना करणें अवश्य आहे कीं, 'देवा! मला सद्बुद्धि दे आणि निःस्वार्थ भावनेनें सेवा करण्यासाठीं सामर्थ्य दे!"

याच पत्राचे प्रारंभीं जमनालालजींनीं जें एक वाक्य सहजगत्या लिहिलेलें आहे, तें त्यांच्या जीवनाचें सर्व रहस्य उकलणारें आहे. अगदीं खासगी पत्रांत—आणि तेंहि प्रिय पत्नीला लिहिलेल्या पत्रांत—मनुष्य जें लिहितो, तें शंभर टक्के खरेंखुरें असतें, यांत शंका कसली? आपल्या मनाचा आंतला पडदा खोलून जमनालालजी "श्रीमती प्रिय देवीस" लिहितात, "माझ्या मनांत हाच एक विचार खेळत आहे कीं, संसार मिथ्या आहे. म्हणून शरीराकडून जी कांहीं सेवा होऊं शकेल ती निःस्वार्थ भावनेनें करण्याचा नित्य प्रयत्न करणें हेंच मनुष्य-जन्माचें मुख्य कर्तव्य आहे. मला आशा आहे कीं, तुम्हीहि हेंच ध्येय डोळ्यापुढें ठेवून कार्य करीत राहिलां तर शांति अवश्य मिळेल." हें त्यांच्या जीवनाचें ब्रीदवाक्यच!

१९२२ च्या सप्टेंबरमध्यें जमनालालजींनीं आपल्या पत्नीस एक पत्र लिहून आपल्या कुटुंबाविषयींची आपली मनीषा प्रगट केली. त्या पत्रांत ते लिहितात, "पुष्कळ वर्षांपासून माझी अशी इच्छा होती कीं, तुम्हांला व मुलांना माझ्यामुळें प्रतिष्ठा न लाभतां, स्वतःच्या पवित्र

सेवा–कार्यामुळें लाभावी. तें तुम्हांला व मुलांना श्रेयस्कर आहे व मलाहि श्रेयस्कर आहे. तें कार्य आतां परमेश्वराच्या कृपेनें व पूज्य बापूजींच्या आशीर्वादानें होत आहे असें दिसतें. आतां मला असा विश्वास वाटूं लागला आहे कीं, आपल्या घरांतील लहानमोठे सर्वजण कमी–अधिक प्रमाणांत सेवा–कार्य करणारे निघतील. सेवा–धर्मापासूनच आनंद व सुख मिळतें." यामुळें जमनालालजींना 'धन्यो गृहस्थाश्रमः' असे उद्‌गार काढावेसे वाटले असतील.

या सेवा–कार्याचा विकास आपल्या सर्व कुटुंबांत होत आहे, हें पाहून जमनालालजींचा संतोष सतत वाढत गेला. संपत्तीच्या कितीहि राशि मिळाल्या असत्या तरी झाला नसता, इतका संतोष त्यांना आपलें सर्व कुटुंब सेवा–कार्यांत समरस झाल्याचें पाहून वाटला. त्यांनीं अपार सेवा–धन जमविलें. १९३० सालीं ते स्वतः राष्ट्रसेवेचें बक्षीस भोगीत होते. तें म्हणजे नाशिकच्या तुरुंगांतील शिक्षा. पण तेथूनहि संतोषच व्यक्त करणारें पत्र त्यांनीं ता. २१–६–१९३० रोजीं आपल्या पत्नीस पाठविलें. त्यांत त्यांनीं लिहिलें—

"तुमच्या अटकेची बातमी ऐकून गंमत वाटली. तुम्ही तर सर्वच गोष्टींना तयार आहां. कांहीं काळ तुम्हांला तुरुंगाच्या दुनियेचा अनुभव मिळेल व त्याबरोबरच शांतिहि मिळेल. या प्रकारें सेवा करण्याची बुद्धि आपल्याला झाली, ही ईश्वराची आपल्यावर पूर्ण कृपा आहे व बापूजींचा आशीर्वाद आहे. तुमची बहादुरी व हिंमत पाहून माझ्या मनाला सुख होत आहे. तुमच्या बाबतींत—व साऱ्या कुटुंबाच्या बाबतींत—मला पूर्ण संतोष व अभिमान आहे."

जमनालालजींची सेवा-कार्याची महत्त्वाकांक्षा तुरुंगवासावरच तृप्त होणारी नव्हती. "मी हंसत हंसत फांसावर चढेन." अशी ग्वाही देणाऱ्या गुरूचे ते चेले होते. या पत्रांतच ते आपली महत्त्वाकांक्षा पुढील शब्दांनीं लिहितात,

"माझी अशी इच्छा आहे कीं, या प्रकारच्या धर्म-युद्धामध्यें आपणा सर्वांची—निदान जो सर्वांत जास्त प्रिय असेल त्याची—आहुति पडावी. त्यानें मला परम संतोष व सुख होईल. एक दिवस मरणें तर अवश्य आहे. पण ज्यानें आपला देश, जाति व कुल यांची प्रतिष्ठा वाढेल, असा पवित्र मृत्यु प्राप्त झाला, तर आणखी काय पाहिजे? आतां इच्छा तुरुंगाची नाहीं--तशा मृत्यूची आहे. अजून पुष्कळ खेळ खेळायचे आहेत--पाहायचे आहेत. आपलें भविष्य अत्यंत उज्ज्वल व स्वच्छ असल्याचें मला दिसत आहे."

परमेश्वराच्या भक्तीचे जे नऊ प्रकार वर्णिलेले आहेत, त्यांत शेवटचा 'आत्म-निवेदन' हा आहे. त्या अखेरच्या पायरीवर उभे राहून जमनालालजी आत्म-समर्पणास सिद्ध झालेले दिसतात.

स्वतःच्या जीवितावर तुळशीपत्र ठेवावयास जो तयार झाला, तो आपल्या आप्तांच्या आयुष्यावर पाणी सोडण्यास कसा कचरेल? ता.२० ऑगस्ट १९३३ रोजीं जमनालालजी आपल्या पत्नीस लिहितात, "पूज्य बापूजींनीं तुम्हांला सांगितलें, तेथेंच तुम्ही राहा. तेथें प्लेग आहे. त्यामध्यें तुमची आहुति पडली, तर मला संतोषच होईल. कारण त्यामुळें तुम्हांला बापूंचा आशीर्वाद मिळेल—आणि त्याबरोबरच स्वर्गहि."

१९२० सालीं असहकारितेचें अभूतपूर्व आंदोलन राष्ट्रांत सुरू करून गांधीजींनीं ब्रिटिश सरकारला आव्हानच दिलें. म्हणून सरकारनें त्यांना १९२२ सालीं ६ वर्षांची शिक्षा ठोठावली आणि येरवडा येथील तुरुंगांत कोंडून ठेवलें. "या सहा वर्षांत आपण काय करावयाचें?" असा प्रश्न प्रत्येक राष्ट्रभक्तापुढें उभा राहिला आणि जो तो आपापल्या परीनें तो सोडवूं लागला. तो सोडविण्यांत जमनालालजींनीं जी अभिनव व दूरदर्शी दृष्टि दाखविली, ती त्यांच्या गुरु-भक्तीची व कार्य-प्रेमाची द्योतक आहे. त्यांच्या लोकसंग्रहकारी बुद्धीनें हें अचूक जाणलें कीं, सारे सच्चे गांधीभक्त एकत्र येतील, तरच राष्ट्रकार्याचा गोवर्धन पर्वत दोन-चार अंगुलें तरी उचलला जाईल.

या उद्देशानें त्यांनीं १९२३ मध्यें एक नवी संस्था स्थापन केली. तिचें नांव "गांधी-सेवा-संघ." प्रारंभीं काँग्रेस कार्यकारिणेचे फक्त तीन सभासदच या संघाचे सदस्य होते. कारण "सत्य व अहिंसा हें आपलें ध्येय मानून गांधीजींचें विधायक कार्य करण्याची प्रतिज्ञा करणाऱ्या लोकांचें हें संघटन आहे." असें ध्येय जमनालालजींनीं ठरविलें होतें.

या ध्येयाची आसिधारा ते स्वतःलाहि लावीत. प्रारंभीं साहजिकच ते या संघाचे संस्थापक सभापति होते. पण त्यांची वृत्ति सतत अंतर्मुख असल्यानें आपल्या दोषांची जाणीव त्यांना तीव्रतेनें होई. 'मो सम कौन कुटिल खल कामी' असें सूरदास म्हणतात किंवा 'उत्तम जन्मा येउनि रामा गेलों मी वायां' अशी हळहळ विठोबाअण्णा व्यक्त करतात, त्याचा अर्थ दोषांची जाणीव झाली आहे इतकाच. हे दोष इतर दहा लोकांपेक्षां त्यांचे ठायीं जास्त होते असें नाहीं. पण गांधी–पुत्रासाठीं त्यांनीं उच्च कसोटी लावली होती. त्या नैतिक व आध्यात्मिक कसोटीस आपण पूर्णपणें उतरत नाहीं, असें त्यांना दरवर्षीं वाटूं लागलें. आणि म्हणून त्या पवित्र संस्थेपासून आपण अलिप्त राहावें असा विचार त्यांचे चित्तांत बळावला. पण संस्था स्वतःची! तिच्यापासून आपण अलग कसें व्हावयाचें? हें हृदय–मंथन वर्षानुवर्ष चाललें होतें. अखेर १९३४ सालीं त्यांनीं संघाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.

तरीहि त्यांचें मन त्यांना टोचीतच राहिलें. "अध्यक्ष नाहीं, पण सभासद म्हणून तरी राहण्याइतका अधिकार आपल्याला आहे का?" असा प्रश्न ते करूं लागले. तें मनांतील वादळ शमविण्यासाठीं त्यांनीं सभासदत्वाचाहि राजीनामा दिला. त्या वेळीं संघाचे अध्यक्ष श्री. किशोरलाल मश्रूवाला यांचेबरोबर त्यांचा जो पत्रव्यवहार झाला, त्यांत त्यांच्या मुमुक्षु मनाचें स्वच्छ प्रतिबिंब पडलेलें दिसतें.

'गांधी–सेवा–संघाचे' नंतर झालेले अध्यक्ष किशोरलाल यांनीं

आपल्या विनोदी शैलीनें या परिणामाचें छानदार वर्णन केलें. जमनालालजींना लिहिलेल्या ता. ८।१०।१९३८ च्या पत्रांत ते म्हणतात,

"युरोपांतील लढाई चेंम्बरलेननें तूर्त तरी थोपविली आहे. तसेंच सरहद्द प्रांतावर बॉंब फेकण्यापूर्वी आधीं सूचना द्यावी, असें सरकारनें जाहीर केलें आहे. पण आपण तर दूरच्या ठिकाणाहून एकदम बॉंब फेकला—आणि तोहि सरळ अध्यक्षांचे डोक्यावर! किती आश्चर्य आहे!! आपल्या राजीनाम्याचा परिणाम संघावर काय होईल याचा आपण विचार करणें जरूर आहे. आपण या बाबतींत योग्य मार्ग स्वीकारला नाहीं अशी मला भीति वाटते."

परंतु जमनालालजींचा निश्चय ठाम. तो त्यांनीं उत्तर लिहून किशोरलालांना कळविला. त्याचें प्रत्युत्तर किशोरलालभाईंनीं जें दिलें, तें जितकें विनोदी, तितकेंच मर्मग्राही आहे. हृदय हालविणाऱ्या भाषेंत ते जमनालालजींना लिहितात,

"आपल्याला लहानपणापासून अशी संवयच आहे कीं, जो आपल्याला जवळ करतो, त्याला आपण हैराण करतां. बच्छराजशेठजींनीं आपल्याला दत्तक घेतलें, तर आपण त्यांना धमकी दिली कीं, 'तुम्हांला सोडून मी निघून जातों.' तसेंच बापूंनीं आपली मागणी मंजूर केली आणि आपल्याला 'पांचवे पुत्र' मानलें. आतां आपण म्हणतां कीं, मी बापूंचा पुत्र राहूं शकत नाहीं. पण आतां असें कसें सुटाल? उद्यां आपण जानकीदेवींनाहि सोडण्याची धमकी द्याल! पण तसें कसें होईल? हिंदु-धर्मांतील दत्तक व विवाह रद्द होऊं शकत नाहीं. आणि तसाच गुरु–शिष्य–भावहि रद्द होऊं शकत नाहीं. 'गांधी-सेवा-संघां'तून मुक्त होणें आणि बापूंपासून मुक्त होणें या दोन्ही गोष्टी आपल्याला सारख्याच आहेत. त्या या जन्मांत होऊं शकणार नाहींत–आणि झाल्याच तर त्या आपल्याला शोभणार नाहींत. आपण फकीर होऊन, सर्वांची चिंता सोडून, 'गांधी-सेवा-संघाचे'

या उद्देशानें त्यांनीं १९२३ मध्यें एक नवी संस्था स्थापन केली. तिचें नांव "गांधी-सेवा-संघ." प्रारंभीं काँग्रेस कार्यकारिणेचे फक्त तीन सभासदच या संघाचे सदस्य होते. कारण "सत्य व अहिंसा हें आपलें ध्येय मानून गांधीजींचें विधायक कार्य करण्याची प्रतिज्ञा करणाऱ्या लोकांचें हें संघटन आहे." असें ध्येय जमनालालजींनीं ठरविलें होतें.

या ध्येयाची आसिधारा ते स्वतःलाहि लावीत. प्रारंभीं साहजिकच ते या संघाचे संस्थापक सभापति होते. पण त्यांची वृत्ति सतत अंतर्मुख असल्यानें आपल्या दोषांची जाणीव त्यांना तीव्रतेनें होई. 'मो सम कौन कुटिल खल कामी' असें सूरदास म्हणतात किंवा 'उत्तम जन्मा येउनि रामा गेलों मी वायां' अशी हळहळ विठोबाअण्णा व्यक्त करतात, त्याचा अर्थ दोषांची जाणीव झाली आहे इतकाच. हे दोष इतर दहा लोकांपेक्षां त्यांचे ठायीं जास्त होते असें नाहीं. पण गांधी–पुत्रासाठीं त्यांनीं उच्च कसोटी लावली होती. त्या नैतिक व आध्यात्मिक कसोटीस आपण पूर्णपणें उतरत नाहीं, असें त्यांना दरवर्षी वाटूं लागलें. आणि म्हणून त्या पवित्र संस्थेपासून आपण अलिप्त राहावें असा विचार त्यांचे चित्तांत बळावला. पण संस्था स्वतःची! तिच्यापासून आपण अलग कसें व्हावयाचें? हें हृदय–मंथन वर्षानुवर्षे चाललें होतें. अखेर १९३४ सालीं त्यांनीं संघाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.

तरीहि त्यांचें मन त्यांना टोचीतच राहिलें. "अध्यक्ष नाहीं, पण सभासद म्हणून तरी राहण्याइतका अधिकार आपल्याला आहे का?" असा प्रश्न ते करूं लागले. तें मनांतील वादळ शमविण्यासाठीं त्यांनीं सभासदत्वाचाहि राजीनामा दिला. त्या वेळीं संघाचे अध्यक्ष श्री. किशोरलाल मश्रूवाला यांचेबरोबर त्यांचा जो पत्रव्यवहार झाला, त्यांत त्यांच्या मुमुक्षु मनाचें स्वच्छ प्रतिबिंब पडलेलें दिसतें.

'गांधी–सेवा–संघाचे' नंतर झालेले अध्यक्ष किशोरलाल यांनीं

आपल्या विनोदी शैलीनें या परिणामाचें छानदार वर्णन केलें. जमनालालजींना लिहिलेल्या ता. ८।१०।१९३८ च्या पत्रांत ते म्हणतात,

"युरोपांतील लढाई चेंम्बरलेननें तूर्त तरी थोपविली आहे. तसेंच सरहद्द प्रांतावर बॉंब फेकण्यापूर्वीं आधीं सूचना द्यावी, असें सरकारनें जाहीर केलें आहे. पण आपण तर दूरच्या ठिकाणाहून एकदम बॉंब फेकला—आणि तोहि सरळ अध्यक्षांचे डोक्यावर! किती आश्चर्य आहे!! आपल्या राजीनाम्याचा परिणाम संघावर काय होईल याचा आपण विचार करणें जरूर आहे. आपण या बाबतींत योग्य मार्ग स्वीकारला नाहीं अशी मला भीति वाटते."

परंतु जमनालालजींचा निश्चय ठाम. तो त्यांनीं उत्तर लिहून किशोरलालांना कळविला. त्याचें प्रत्युत्तर किशोरलालभाईंनीं जें दिलें, तें जितकें विनोदी, तितकेंच मर्मग्राही आहे. हृदय हालविणाऱ्या भाषेंत ते जमनालालजींना लिहितात,

"आपल्याला लहानपणापासून अशी संवयच आहे कीं, जो आपल्याला जवळ करतो, त्याला आपण हैराण करतां. बच्छराजशेठजींनीं आपल्याला दत्तक घेतलें, तर आपण त्यांना धमकी दिली कीं, 'तुम्हांला सोडून मी निघून जातों.' तसेंच बापूंनीं आपली मागणी मंजूर केली आणि आपल्याला 'पांचवे पुत्र' मानलें. आतां आपण म्हणतां कीं, मी बापूंचा पुत्र राहूं शकत नाहीं. पण आतां असें कसें सुटाल? उद्यां आपण जानकीदेवींनाहि सोडण्याची धमकी द्याल! पण तसें कसें होईल? हिंदु-धर्मांतील दत्तक व विवाह रद्द होऊं शकत नाहीं. आणि तसाच गुरु–शिष्य–भावहि रद्द होऊं शकत नाहीं. 'गांधी-सेवा-संघां'तून मुक्त होणें आणि बापूंपासून मुक्त होणें या दोन्ही गोष्टी आपल्याला सारख्याच आहेत. त्या या जन्मांत होऊं शकणार नाहींत–आणि झाल्याच तर त्या आपल्याला शोभणार नाहींत. आपण फकीर होऊन, सर्वांची चिंता सोडून, 'गांधी-सेवा-संघाचे'

सदस्य बनण्याचा निश्चय केला आहे, असें बापूंना सांगा, कमलनयनाला सांगा, जानकीताईंना सांगा. असें केल्यानें आपला उत्साह वाढेल."

प्रेमानें ओथंबलेल्या या पत्राला जमनालालजींनीं जें उत्तर दिलें,- त्यांत त्यांनीं आपलें हृदयच ओतलें आहे. ते जयपूरच्या स्थानबद्धतेंतून ता. ४।७।१९३९ रोजीं लिहितात,

"आपलें सच्चें प्रेम पाहून माझ्या मनांत जे भाव उत्पन्न झाले, ते मी कागदावर लिहूं शकत नाहीं. त्या प्रेमासाठीं मी आपल्याशीं जन्मभर कृतज्ञ राहीन. श्रेष्ठ दर्जाच्या विनोदांतून आपण उपदेश केला आहे, पण मी काय करूं? 'गांधी-सेवा-संघा'सारख्या उच्च व पवित्र संस्थेला मी योग्य आहें, अशी ग्वाही माझें मन मला देत नाहीं. गेल्या दोन वर्षांत मी अधिकाधिक हैराण, बेचैन, निरुत्साही बनलों आहें. बापूंच्या पुत्रामध्यें हरीलालहि आहे. तो बिचारा प्रसिद्ध आहे. माझ्या-सारखे मात्र लपून राहतात. बापूंचे दुसरे चार मुलगे 'गांधी-सेवा-संघांत' कोठें आहेत? त्यांची गति, तीच माझी गति. संघांत राहण्या-इतकें पुण्य मीं कोठें केलें आहे? आणि संघ सोडणें म्हणजे बापूंना सोडणें, असें मी मानीत नाहीं. आपल्यासारख्यांच्या संगतीमुळें मृत्यूचें भय फारसें राहिलें नाहीं. कधीं कधीं तर त्याचें स्वागत करण्याचाहि उत्साह मनामध्यें येतो."

असाच दुसराहि एक राजीनामा देण्याचा प्रसंग.

जमनालालजींनीं ता. १६ ऑक्टोबर १९३३ रोजीं काँग्रेसच्या कार्य-कारिणीचा राजीनामा दिला. त्यांत त्यांनीं जें कारण दिलें, तें त्यांच्या उच्च भूमिकेस शोभणारेंच आहे. त्यांनीं आपल्या त्याग पत्रांत लिहिलें,

"मी अद्याप तुरुंगांत गेलों नाहीं याचा माझ्या मनाला फार भार होत आहे. ज्याचा सत्याग्रहावर पूर्ण विश्वास आहे, त्यानें केवळ प्रकृतीसाठीं तुरुंगांत जाण्याचें टाळलें, तर काँग्रेसमधील अधिकार-पदावर राहण्यास तो पात्र नाहीं असें मी मानतों. माझी शारीरिक व मानसिक प्रकृति

सुधारण्यासाठीं आणखी कांहीं काळ लागेल, असें मला वाटतें. म्हणून मी कार्यकारिणीचा सभासद व खजीनदार या दोन्हीं जागांचा राजीनामा देत आहें. त्यामुळें माझ्या मनावरील मोठा भार उतरल्यासारखें होईल. त्यानंतरहि मी कॉंग्रेसचें कार्य यथाशक्ति करीत राहीन, हें लिहावयास नको. ”

सत्तेचा अभिलाष जमनालालजींना जन्मांत कधींहि काडीमात्र नव्हता. ते राजकारणांत पडले, ते परमार्थाचें साधन म्हणूनच. हा उलगडा खुद्द गांधीजींनीं एका पत्रांत स्वच्छ केला आहे. ते म्हणतात,

“ ज्याला राजकारण म्हणतात तो माझ्या आवडीचा विषय नव्हे— आणि जमनालालजींच्याहि आवडीचा विषय नव्हे. ते राजकारणांत पडले याचें कारण मी राजकारणांत होतों. पण माझें खरें राजकारण म्हणजे विधायक कार्य. त्यांचेंहि राजकारण तेंच. आपल्या संपत्तीचे ट्रस्टी किंवा संरक्षक म्हणूनच ते वागत. ट्रस्टीपणाच्या पूर्णतेला ते पोचले नसले, तर त्याला कारण मीच आहें. मीच त्यांना सर्वस्व-त्यागापासून परावृत्त केलें. कारण माझी इच्छा, कोणीहि उत्साहामध्यें किंवा आवेशामध्यें, कार्य करून, शांत विचारांतीं शोक किंवा पश्चात्ताप करूं नये, अशी असते. पण मी हें निश्चितपणें सांगूं शकतों कीं,

“ **जमनालालजींनीं अनीतीनें एक पैहि कमावली नाहीं—आणि जी कांहीं कमाई केली ती सर्व त्यांनीं जनताजनार्दनाच्या कल्याणासाठींच खर्च केली.** ”

याहून अधिक उज्ज्वल असें दुसरें कोणतें प्रमाणपत्र गुरु शिष्याला देऊं शकेल ?

जमनालालजींविषयीं बोलण्या-लिहिण्याचा प्रसंग जेव्हां जेव्हां येई, तेव्हां गांधीजी त्यांचें स्वतंत्र कर्तृत्व उघड करून सांगत. शिष्याचे अंगीं जें जें भलें, तें तें माझ्यामुळें झालें, असें सांगणारे गुरु गांधीजी नव्हते.

ी—कांटा त्यांचे हातीं सदैव असे. १९३६ सालीं मुंबई येथील विद्यालयांतील' विद्यार्थ्यांपुढें भाषण करतांना गांधीजी म्हणाले,

"जमनालालजी लोकसंग्रही वृत्तीचे आहेत. जात व पंथ यांचे पाश त्यांनीं पूर्वीच तोडून टाकले आहेत. तुमच्या या संस्थेला 'मारवाडी' अशी उपाधि आहे, याचें कारण केवळ मारवाडी समाजाच्या देणग्यांतून ती जन्मास आली आहे. परंतु हें या संस्थेभोंवतालचें जातीय कुंपण काढून टाकल्याशिवाय जमनालालजींना चैन पडत नसे. अखेरीस त्यांनीं हें विद्यालय सर्वांसाठीं खुलें केलें—स्पृश्यांसाठीं व अस्पृश्यांसाठीं, हिंदूसाठीं व मुसलमानांसाठीं त्यांच्या हृदयांत अस्पृश्यतेला थाराच नव्हता. आणि तसाच धर्माधर्मांतील श्रेष्ठ–कनिष्ठ भावालाहि. हिंदूंच्या संस्थांना त्यांनीं ज्या भावनेनें मदत केली त्याच भावनेनें मुसलमानांच्या संस्थांनाहि त्यांनीं सढळ हातानें मदत केली आहे. ते आपल्या मुसलमान मित्रांना सख्ख्या भावासारखे वागवितात."

या जाति–धर्मातीत मानवतेच्या उच्च भूमिकेवर जमनालालजी स्वतःच्या प्रेरणेनें व प्रयत्नानें चढले, हें सांगण्यास गांधीजी विसरले नाहींत. याच भाषणाचे अखेरीस ते म्हणाले, "आणखी एक गोष्ट मी तुम्हांला सांगतों. ती तुम्हांला माहीत नसेल—पुष्कळांना ती माहीत नाहीं. अस्पृश्यता–निवारणाची ही तळमळ, जातीय भावनेपासून अलिप्तता आणि सर्वधर्मी समभाव हे गुण जमनालालजींनीं माझ्यापासून मुळींच घेतलेले नाहींत. आपली श्रद्धा दुसऱ्याला देणें शक्यच नसतें. दुसऱ्याचे ठायीं मूळची असलेली श्रद्धाच प्रगट करण्याचे कामीं आपण कांहीं साहाय्य करूं शकतों इतकेंच. पण इतकेंहि कार्य मी जमनालालजींचे बाबतींत केलेलें नाहीं. माझी भेट होण्यापूर्वींच त्यांच्या जीवननिष्ठा ठरलेल्या होत्या आणि त्याप्रमाणें त्यांचा आचारहि चालू झाला होता. या त्यांच्या दृढमूल निष्ठेमुळेंच आम्ही दोघे एकत्र आलों आणि

इतकीं वर्षें सहकार्यानें कार्य करीत राहिलों. तुम्ही मुलांनीं जमनालाल-जींचा हा कित्ता गिरवावा."

ज्ञानेश्वरीच्या भाषेंत, जमनालालजी हे गांधीजींचा 'केला' होतें. त्यांचें सारें जीवनच गांधीजींनीं घडविलें होतें. तरीसुद्धां जमनालालजी प्रसंगाविशेषीं आपलें स्वतंत्र मत व स्वतंत्र कर्तृत्व प्रगट करीत आणि आपलें सत्य–प्रेम राखीत.

एकदां पाटणा येथें ऑ. इं. कॉं. क. ची सभा भरली. सभेपुढें मुख्य प्रश्न सत्याग्रह स्थगित करण्याचा होता. तो स्थगित करण्यांत गांधीजी चूक करीत आहेत असें जमनालालजींचें विचारांतीं ठाम मत झालें. तेव्हां ते कॉंग्रेसचे हंगामी अध्यक्ष होते. ते गांधीजींना म्हणालें, "बापूजी, आज माझें मन फार दुःखी आहे. आतांपर्यंत मी माझ्या मतापेक्षां आपलें मत श्रेष्ठ मानीत आलों आहें. पण आज माझा नाइलाज आहे. आज आपल्याविरुद्ध मत मला द्यावें लागणार आहे."

"हां, हां! जरूर तसें करा." गांधीजींनीं त्यांना इच्छा-स्वातंत्र्य दिलें. पण जमनालालजींना आपली अंतःप्रेरणा जितकी महत्त्वाची वाटे, तितकीच गांधीजींच्या निर्णयावर त्यांची श्रद्धाहि असे. सत्याग्रह–शास्त्राचे गांधीजी द्रष्टेच. म्हणून ते मत-दानाचे वेळीं तटस्थ राहिले व इतरांना सांगितलें, 'गांधीजींचेंच आपण ऐका. माझें मन तशी ग्वाही देत नाहीं, म्हणून मी त्यांच्या सूचनेस मत देत नाहीं इतकेंच. पण ते या शांति–संग्रामांतील सेनापति. त्यांचाच हुकूम सर्वांनीं मानला पाहिजे."

"कौन्सिल-प्रवेश हा आतां येथला कायमचा रहिवासी झाला आहे." असे उद्गार गांधीजींनीं काढले, आणि 'स्वराज्य-पक्षाला' कौन्सिलांत जाण्यास मुभा दिली. हें जमनालालजींना मान्य नव्हतें. तेव्हां त्यांनीं गांधीजींना सक्त विरोध केला.

सत्याचा धर्म–कांटा त्यांचे हातीं सदैव असे. १९३६ सालीं मुंबई येथील 'मारवाडी विद्यालयांतील' विद्यार्थ्यांपुढें भाषण करतांना गांधीजी म्हणाले,

"जमनालालजी लोकसंग्रही वृत्तीचे आहेत. जात व पंथ यांचे पाश त्यांनीं पूर्वींच तोडून टाकले आहेत. तुमच्या या संस्थेला 'मारवाडी' अशी उपाधि आहे, याचें कारण केवळ मारवाडी समाजाच्या देणग्यांतून ती जन्मास आली आहे. परंतु हें या संस्थेभोंवतालचें जातीय कुंपण काढून टाकल्याशिवाय जमनालालजींना चैन पडत नसे. अखेरीस त्यांनीं हें विद्यालय सर्वांसाठीं खुलें केलें—स्पृश्यांसाठीं व अस्पृश्यांसाठीं, हिंदूंसाठीं व मुसलमानांसाठीं त्यांच्या हृदयांत अस्पृश्यतेला थाराच नव्हता. आणि तसाच धर्माधर्मांतील श्रेष्ठ–कनिष्ठ भावालाहि. हिंदूंच्या संस्थांना त्यांनीं ज्या भावनेनें मदत केली त्याच भावनेनें मुसलमानांच्या संस्थांनाहि त्यांनीं सढळ हातानें मदत केली आहे. ते आपल्या मुसलमान मित्रांना सख्ख्या भावासारखे वागवितात."

या जाति–धर्मातीत मानवतेच्या उच्च भूमिकेवर जमनालालजी स्वतःच्या प्रेरणेनें व प्रयत्नानें चढले, हें सांगण्यास गांधीजी विसरले नाहींत. याच भाषणाचे अखेरीस ते म्हणाले, "आणखी एक गोष्ट मी तुम्हांला सांगतों. ती तुम्हांला माहीत नसेल—पुष्कळांना ती माहीत नाहीं. अस्पृश्यता–निवारणाची ही तळमळ, जातीय भावनेपासून अलिप्तता आणि सर्वधर्मी समभाव हे गुण जमनालालजींनीं माझ्यापासून मुळींच घेतलेले नाहींत. आपली श्रद्धा दुसऱ्याला देणें शक्यच नसतें. दुसऱ्याचे ठायीं मूळची असलेली श्रद्धाच प्रगट करण्याचे कामीं आपण कांहीं साहाय्य करूं शकतों इतकेंच. पण इतकेंहि कार्य मी जमनालालजींचे बाबतींत केलेलें नाहीं. माझी भेट होण्यापूर्वींच त्यांच्या जीवननिष्ठा ठरलेल्या होत्या आणि त्याप्रमाणें त्यांचा आचारहि चालू झाला होता. या त्यांच्या दृढमूल निष्ठेमुळेंच आम्ही दोघे एकत्र आलों आणि

इतकीं वर्षे सहकार्यानें कार्य करीत राहिलों. तुम्ही मुलांनीं जमनालालजींचा हा कित्ता गिरवावा. "

ज्ञानेश्वरीच्या भाषेंत, जमनालालजी हे गांधीजींचा 'केला' होतें. त्यांचें सारें जीवनच गांधीजींनीं घडविलें होतें. तरीसुद्धां जमनालालजी प्रसंगाविशेषीं आपलें स्वतंत्र मत व स्वतंत्र कर्तृत्व प्रगट करीत आणि आपलें सत्य–प्रेम राखीत.

एकदां पाटणा येथें ऑ. इं. कॉं. क. ची सभा भरली. सभेपुढें मुख्य प्रश्न सत्याग्रह स्थगित करण्याचा होता. तो स्थगित करण्यांत गांधीजी चूक करीत आहेत असें जमनालालजींचें विचारांतीं ठाम मत झालें. तेव्हां ते कॉंग्रेसचे हंगामी अध्यक्ष होते. ते गांधीजींना म्हणालें, "बापूजी, आज माझें मन फार दुःखी आहे. आतांपर्यंत मी माझ्या मतापेक्षां आपलें मत श्रेष्ठ मानीत आलों आहें. पण आज माझा नाइलाज आहे. आज आपल्याविरुद्ध मत मला द्यावें लागणार आहे. "

"हां, हां! जरूर तसें करा." गांधीजींनीं त्यांना इच्छा-स्वातंत्र्य दिलें. पण जमनालालजींना आपली अंतःप्रेरणा जितकी महत्त्वाची वाटे, तितकीच गांधीजींच्या निर्णयावर त्यांची श्रद्धाहि असे. सत्याग्रह–शास्त्राचे गांधीजी द्रष्टेच. म्हणून ते मत-दानाचे वेळीं तटस्थ राहिले व इतरांना सांगितलें, 'गांधीजींचेंच आपण ऐका. माझें मन तशी ग्वाही देत नाहीं, म्हणून मी त्यांच्या सूचनेस मत देत नाहीं इतकेंच. पण तेच या शांति–संग्रामांतील सेनापति. त्यांचाच हुकूम सर्वांनीं मानला पाहिजे."

"कौन्सिल-प्रवेश हा आतां येथला कायमचा रहिवासी झाला आहे." असे उद्गार गांधीजींनीं काढले, आणि 'स्वराज्य-पक्षाला' कौन्सिलांत जाण्यास मुभा दिली. हें जमनालालजींना मान्य नव्हतें. तेव्हां त्यांनीं गांधीजींना सक्त विरोध केला.

याहून अधिक विरोधाचा प्रसंग १९३७ सालीं आला. गव्हर्नरच्या अलिप्तपणाच्या आश्वासनानंतर काँग्रेसनें आठ प्रांतांत मंत्रिमंडळें बनविलीं. तेव्हां प्रश्न उद्भवला, राजनिष्ठेची शपथ घेण्याचा. स्वातंत्र्य-भक्तांना ब्रिटिश बादशाहाशीं एकनिष्ठ राहण्याची शपथ कशी घेतां येईल–त्यांतहि 'गांधी-सेवा-संघा'च्या सभासदांना? जमनालालजींनीं गांधीजींशीं हुज्जत घातली. शेवटीं गांधीजींनीं तत्त्व व व्यवहार यांचा मेळ घालून सांगितलें, "अशी शपथ घेणें हें नैतिक नसलें, तरी नीतिविरोधी नाहीं." साधूवर मुत्सद्दयानें मात केली, हें पाहून जमनालालजींचें किती समाधान झालें, हें सांगणें कठीण आहे.

जमनालालजींना हरिपुरा काँग्रेसचे अध्यक्ष करावें, असें कार्यकारिणीनें १९३८ सालीं अनौपचारिक रीत्या ठरविलें. गांधीजींनींहि आपल्या संमतीचें शिक्कामोर्तब केलें.पण त्याच सुमारास सुभाषचंद्र युरोपाहून येथें आले होते. त्यांच्या पाठीमागें आजाराचा ससेमिरा होता. तो सुटण्याचा एकच मार्ग त्यांना दिसत होता. तो म्हणजे काँग्रेसचें अध्यक्षपद मिळविणें. तसें त्यांनीं गांधीजींना सांगितलें. शिवाय जर्मनी–जपानसारख्या परराष्ट्रांशीं वाटाघाटी करण्यासाठींहि त्यांना काँग्रेसचें उच्च अधिष्ठान हवें होतें. पण आतां प्रश्न होता जमनालालजींनीं त्याग करण्याचा.

त्या काळीं काँग्रेसच्या अध्यक्षपदावर बसणें हा मान राजाच्या गादीवर बसण्यापेक्षांहि मोठा मानला जात होता. कोणाहि देशभक्त भारतीयाला याहून अधिक मोठा मान वाटत नसे. परंतु ना धनाची, ना मानाची अभिलाषा, साधक जमनालालजींच्या वैराग्यशील मनांत होती. त्यांनीं चट्दिशीं सुभाषबाबूंना होकार दिला आणि आपल्या शिरावर शोभूं पाहणारा काँग्रेसचा किरीट त्यांचे मस्तकावर चढविला. असा त्याग फारच दुर्मिळ!

राजकारणापेक्षां विधायक कार्याकडेच जमनालालजींचा ओढा अधिक. राजकीय सत्ता काबीज करण्यासाठीं चळवळींचा धबधबा

गांधीजींनीं सुरू केला होता, आणि त्याबरोबरच त्याला पाण्याचा अखंड पुरवठा करणारा विधायक कार्याचा गंगा-प्रवाहहि त्यांनीं चालू ठेवला होता. जशी ज्याची प्रवृत्ति, तसे कार्यकर्ते या दोन मार्गांमध्यें गुंतले जात. जमनालालजींना सेवेच्या 'स्वकर्म-कुसुमांची माला' जनता-जनार्दनाचे कंठांत घालण्यांतच आनंद वाटे. राजकारणाचें लखलखीत शस्त्र हातीं धरण्यापेक्षां विधायक कार्याचें अनुष्ठान सतत करीत राहणें त्यांना प्रिय होतें.

या विधायक कार्यांपैकीं खादी, हिंदी व अस्पृश्यता-निवारण या तीन कार्यांवर त्यांची भक्ति विशेष. १९२५ सालीं त्यांनीं आपलें दुसरें मृत्यु-पत्र करून ठेवलें. त्यांत त्यांनीं याच तीन कार्यांवर भर दिला आहे. "मुझे सबसे प्रिय काम तो खादी-प्रचार है" अशी आपली आवडहि त्यांनीं त्यांत लिहिली आहे. खादीच्या प्रचारासाठीं ते गांवो-गांव हिंडले आणि त्यांनीं आपलें सारें कुटुंबच खादी-धारी करून सोडलें. स्वदेशीची परम सीमा म्हणजे खादी, अशी पुरेपूर श्रद्धा त्यांचे ठायीं होती. खुद्द गांधीजींनीं असा निर्वाळा दिला आहे कीं, "खादीच्या कामामध्यें त्यांची भक्ति माझ्यापेक्षां कमी नव्हती. खादीसाठीं मीं जितका काळ दिला, तितकाच त्यांनींहि दिला. या कामासाठीं त्यांनीं माझ्यापेक्षां कमी बुद्धि खर्च केली नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, मी खादीचा मंत्र दिला आणि जमनालालजींनीं त्या मंत्राला मूर्त स्वरूप दिलें."

खादीच्या प्रचारासाठीं राजस्थानांतील अनेक संस्थानांत जमनालाल-जींनीं दौरे काढले होते. त्या वेळीं देशी संस्थानिक व त्यांचे दिवाण हे खादीला बुजत. बिकानेर संस्थानच्या पोलीस अधिकाऱ्यानें तर त्यांना खादी-प्रचार करण्यास बंदी केली; एवढेंच नव्हे तर आपल्या संस्था-नांतून त्यांना घालवून दिलें. परंतु जमनालालजींचा खादी-प्रचार आमरण अखंड राहिला. त्याचें फळ म्हणजे अ. भा. चरखा संघाचे अध्यक्षपद त्यांनाच प्रथम देण्यांत आलें.

खादीविषयीं जमनालालजींची श्रद्धा किती गाढ होती, हें त्यांच्या पुढील उद्‌गारावरून कळून येण्यासारखें आहे. "मी खादीला भारताचा युगधर्म मानतों. मी असेंहि मानतों कीं, सध्यांच्या काळांत ब्राह्मणानें कांहीं दिवस स्नानसंध्या न केली, तरी ईश्वर त्याला क्षमा करील; परंतु तो जर चरखा न चालवील व खादी न वापरील तर त्याला ईश्वराच्या घरीं क्षमा होणें कठीण. याच रीतीनें एखादा वैश्य कांहीं दिवस देवळांत जाऊन ठाकूरजीचें दर्शन न घेईल, तर त्याला परमेश्वराच्या दरबारांत अपराधी म्हणून उभें राहावें लागणार नाहीं; परंतु तो जर चरखा व खादी यांपासून आपलें तोंड मागें वळवील, तर त्यावर देवाचा कोप ठेवलेला. गिरणीचा कपडा गरिबांची रोटी व रोजगार छिनावून नेतो आणि खादी गरिबाला संजीवन देते, हें ज्या दिवशीं मला उमगलें, तेव्हांपासून मी असें मानूं लागलों,—खादी वापरणें हें पुण्य व गिरणीचें कापड वापरणें हें पाप!"

'अग्रवाल महासभेचे' अध्यक्ष या नात्यानें त्यांनीं जें भाषण केलें, त्यामध्येंहि त्यांची हीच व्यापक दृष्टि दिसून येते. जातीय बहिष्काराचें विवेचन करून त्यांनीं आपल्या व्यापारी बंधूंना शुद्ध जीवन व राष्ट्रहित यांकडे लक्ष देण्याची विनंती केली. केवळ स्वार्थपरायण राहिल्यामुळें, वैश्य-समाजामध्यें तेजस्विता व स्वाभिमान हे गुण घटत चालले आहेत आणि अतिलोभ व भीरुता हे दोष वाढत आहेत, अशी मीमांसा करून त्यांनीं परदेशी कापडाचा व्यापार सोडून देण्याचा समयोचित सल्ला त्यांना दिला.

विदेशी कापडावरील बहिष्काराचीच दुसरी बाजू म्हणजे स्वदेशी. आणि स्वदेशीचें सर्वांत शुद्ध स्वरूप म्हणजे खादी. त्या खादीविषयीं जमनालालजी या भाषणांत म्हणतात,

"मी माझ्या अनुभवावरून आपल्याला हें सांगूं इच्छितों कीं, खादी ही आपलें चारित्र्य सुधारण्याचे बाबतींत एक महान उपदेशक आहे,

देशाचें दारिद्य दूर करण्याचे बाबतींत ईश्वरी वरदान आहे आणि स्वराज्यप्राप्तीचे बाबतींत एक सेनापति आहे. वर्तमान भारताची मुक्तता खादीनेंच होईल, याविषयीं मला अणुमात्र संदेह नाहीं. ”

खादीनंतर गोरक्षणाचाहि पुरस्कार त्यांनीं या भाषणांत केला. पुढें पंधरा वर्षांनीं त्यांनीं आपलें सर्व जीवन गो-सेवेला वाहिलें असलें, तरी त्यांचीं बीजें या भाषणांत दिसून येतात. याशिवाय बेकारीचें निवारण, स्त्री-समाजाची सुधारणा, बालविवाह-बंदी, विवाह–संस्थेंतील सुधारणा, पोटजातींतील विवाह, अस्पृश्यता–निवारण इत्यादि अनेक विषयांकडे त्यांनीं आपल्या व्यापारी बंधूंचें लक्ष वेधलें.

आपल्या समाजाचा सर्वांगीण उद्धार व विकास व्हावा ही त्यांना निरंतर तळमळ लागलेली होती.

हिंदी भाषेचें प्रेम तर जमनालालजींना गांधीजींची भेट होण्यापूर्वीं-पासूनच होतें. दक्षिण हिंदुस्थानांत हिंदीचा प्रसार कमी—म्हणून त्या भागांत हिंदीचा प्रसार करण्यासाठीं जमनालालजींनीं दौरे काढले. त्यासाठीं कोचीनमध्यें १९२९ सालीं भरलेल्या हिंदी परिषदेनें खास ठराव करून त्यांचे आभार मानले. आणि मद्रासमध्यें १९३७ सालीं ‘अखिल भारतीय हिंदी साहित्य-संमेलन’ भरलें असतांना, त्याचे अध्यक्षपदीं जमनालालजींनाच नियुक्त करण्यांत आलें.

मद्रास येथील ‘हिंदी साहित्य संमेलनाच्या’ अध्यक्षपदावरून जमनालालजींनीं हिंदी भाषेचें महत्त्व मोठ्या तळमळीनें विशद करून सांगितलें. त्या भाषणांत ते म्हणाले, “देशाची शक्ति वाढविण्याचे कामीं साहित्य व शिक्षण यांना किती महत्त्वाचें स्थान आहे, हें मी जाणतों. आणि म्हणून साहित्य–सेवक व शिक्षण–शास्त्री यांच्याशीं मैत्रीचे संबंध जोडण्याचा मी सतत प्रयत्न करतों. मी कॉंग्रेसमध्यें १९०६ सालापासून आहे. त्या वर्षीं कलकत्ता येथें दादाभाईंच्या अध्यक्षते-

खालीं भरलेल्या काँग्रेसचें सारें काम इंग्रजींतूनच चाले. तें पाहून मला फार दुःख झालें. हिंदुस्थान देशांत हिंदुस्थानी भाषा सोडून विदेशी भाषेंतून आपला विचार–व्यवहार चालावा याचें मला वैषम्य वाटलें. त्यामुळें सर्वसामान्य जनतेला शिक्षण कसें मिळणार? व प्रेरणा कशी मिळणार?

"लोकमान्य टिळक, मालवीयजीमहाराज, लाला लजपतराय आणि पूज्य गांधीजी यांनीं इंग्रजी भाषेमध्यें जें कांहीं राजकीय आंदोलन चालू होतें, तें देशी भाषेंत आणून, जनतेला जागृत केलें व तिची शक्ति वाढविली. धार्मिक क्षेत्रांत आमच्या साधु-संतांनीं संस्कृत भाषेंतील आध्यात्मिक शास्त्रें देशी भाषांत आणून जनतेच्या उद्धाराचें दार जसें उघडलें, तसेंच कार्य राजकीय क्षेत्रांत या राष्ट्र-नेत्यांनीं केलें. त्यामुळें माझी राष्ट्रभाषेवरील श्रद्धा अधिकच वाढली. राष्ट्रभाषेच्या प्रचाराशिवाय आमच्या लोकांचें संघटन होणें शक्य नाहीं आणि आमच्या संस्कृतीचें रक्षण व विकास हेंहि होणें शक्य नाहीं."

साहित्य व जीवन यासंबंधीं त्यांनीं आपले विचार असे प्रगट केले, "आमचें साहित्य हें आमच्या लोकजीवनाचें प्रतिबिंब आहे—आमच्या संस्कृतीचा आरसा आहे. जीवन परिवर्तनशील असतें; पण साहित्य अमर असतें. आमची अशी अभिलाषा आहे कीं, आमच्या लेखकांची व साहित्यिकांची प्रतिष्ठा केवळ भारतांतच नव्हे तर सर्व जगतामध्यें उच्च राहावी."

हिंदी व उर्दू या भाषांच्या एकीकरणासंबंधीं ते म्हणाले, "आम्हांला या देशांतील भिन्न भिन्न संस्कृतींचें एकीकरण करावयाचें आहे. त्या अमृत–मंथनांतून आमची एक आदर्श संस्कृति निर्माण होईल. त्यासाठीं महत्त्वाची गोष्ट म्हणजे हिंदी व उर्दू यांचें ऐक्य. गेलीं २५।३० वर्षें जनतेची सेवा करतां करतां माझें असें ठाम मत झालें आहे कीं, एक राष्ट्रभाषा सर्वत्र प्रसृत झाल्याविना आमच्या लोकांचें संघटन होणें

अशक्य आहे—आमच्या संस्कृतीचें रक्षण व विकास होणेंहि अशक्य आहे. हिंदी ही सत्याची, प्रेमाची, स्वातंत्र्याची व राष्ट्रीय ऐक्याची भाषा आहे. ”

राष्ट्रभाषेच्या प्रचाराचें महत्त्व अशा प्रकारें वर्णन करून तिच्या विकासासाठीं प्रत्यक्ष कार्य काय केलें पाहिजे, यासंबंधीं जमनालालजींनीं आपल्या भाषणांत ज्या कांहीं रोकड्या व्यावहारिक सूचना केल्या, त्या पुढीलप्रमाणें:—

( १ ) प्रथम हिंदी व उर्दू या दोन भाषांचें ऐक्य केलें पाहिजे.

( २ ) देवनागरी लिपि शास्त्रीय दृष्ट्या परिपूर्ण आहे, तथापि हिंदी विद्वानांनीं उर्दू लिपि शिकावी आणि मुसलमान विद्वानांनीं देवनागरी शिकावी.

( ३ ) हिंदी भाषेच्या शिक्षणाची व्यवस्था कौन्सिलामार्फत व्हावी. विधिमंडळांचें काम हिंदुस्तानी व प्रांतीय भाषा यांमार्फत चालावें.

( ४ ) जाहिराती, पत्रकें वगैरे ठिकाणीं जेथें इंग्रजी वापरलें जातें, तेथें हिंदुस्तानीचा उपयोग करावा.

( ५ ) कॉंग्रेससारख्या सार्वजनिक सभांमध्यें हिंदी माणसाला, शक्य तोंवर, इंग्रजींतून व्याख्यान देण्यास मुभा देऊं नये. तें भाषण ऐकूंच नये.

( ६ ) व्यापारी लोकांनीं आपला पत्रव्यवहार, हिशेब–ठिशेब सारें हिंदीमध्यें ठेवावें.

( ७ ) हिंदी टाइपराइटिंग व लघुलेखन शिकण्याचे वर्ग सुरू करावे.

हिंदी–प्रचाराची ही सप्तपदी जमनालालजींनीं १९३५ सालीं जाहीर केली, पण अद्याप ती पूर्णपणें अंमलांत यावयाची आहे. आपल्या राज्यघटनेनें १९६५ सालापासून इंग्रजीचें उच्चाटन करून तिचें स्थान हिंदीला पूर्णपणें देण्याची प्रतिज्ञा केलेली असली, तरी ती सफळ होण्याचीं चिन्हें दिसत नाहींत. इंग्रजी सत्ता गेली, तरी इंग्रजी भाषा येथें दीर्घकाळ सत्ता चालवील, असा विद्वानांचा सूर वाहात आहे.

मद्रासमध्यें व एकूण दक्षिण भारतामध्यें हिंदी भाषेचा प्रचार करण्यासाठीं, जमनालालजींनीं आपल्या स्वतःच्या खाजगी पैशांतून प्रचारक नेमले, एवढेंच नव्हे तर त्या भागांत हिंदीसाठीं पैसा गोळा करण्याकरितां ते श्री. राजगोपालाचार्य यांच्याबरोबर हिंडले. तिकडे हिंदीचा प्रचार व्हावा म्हणून त्यांनीं 'अग्रवाल महासभे' कडून ५० हजार रुपये मिळविले. इंदूर येथील 'हिंदी साहित्यसंमेलनाचे' वेळीं तर, त्याच कामासाठीं, गांधीजींच्या हातीं, एक लाख रुपये देण्याचा संकल्प स्वागत-समितीनें केला. खूप खटपट केली तरी ६० हजार रुपये जमले आणि संमेलनाची तारीख तर उजाडली. ठरलेल्या मुदतींत संकल्प पुरा न केला, तर गांधीजी संमेलनाला येणारच नाहींत. हा पेंच कसा टाळावा?

तो टाळण्याचा मार्ग सोपा होता. तो म्हणजे स्वतःजवळचे ४० हजार रुपये देणें. ती भरती जमनालालजींनीं स्वेच्छेनें व संतोषानें तत्काळ केली—आणि तीहि गाजावाजा न करतां. "उजव्या हातानें केलेलें दान डाव्या हाताला कळूं देऊं नये." हें तर त्यांच्या अपार औदार्याचें अथांग रहस्य!

हिंदी भाषेचा सर्वत्र जोरानें प्रचार व्हावा, म्हणून त्यांनीं गांधीजींना, "हिंदी नवजीवन" हें वृत्तपत्र काढण्याचा आग्रह केला आणि त्याची जिम्मेदारी आपल्या शिरावर घेतली. आर्थिक जबाबदारी तर त्यांचे शिरावर होतीच. तसेंच "राजस्थान केसरी"च्या वृत्तपत्रासाठीं १०।१२ हजार रुपये त्यांनीं खर्च केले. "कर्मवीर," "प्रताप" इत्यादि हिंदी वृत्तपत्रांनाहि त्यांनीं पुष्कळ आर्थिक साह्य केलें. त्याचबरोबर मुंबई येथें "गांधी हिंदी पुस्तक भांडार" त्यांनीं सुरू केलें. आणि आज सर्व देशांत विशिष्ट स्थान पावलेली दिल्लीची यशस्वी हिंदी प्रकाशन-संस्था "सस्ता साहित्य मंडल" हीहि त्यांच्याच

प्रयत्नानें जन्मास आली. या मंडळातर्फे 'त्यागभूमि' हें हिंदी मासिक सुरू करण्यांत आलें.

जशी खादीवर, जशी हिंदीवर, तशीच अस्पृश्यता-निवारणावरहि जमनालालजींची गाढ निष्ठा होती. तो त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. "आधीं केलें, मग सांगितलें." या न्यायानें अस्पृश्यता-निवारणाचा आचार त्यांनीं स्वतः प्रथम केला आणि नंतर त्याचा प्रचार जोरानें चालविला.

जमनालालजी वैष्णव होते-श्रीकृष्णाचे श्रद्धाळू भक्त होते. ते दररोज ठरलेल्या वेळीं देवळांत जाऊन ठाकूरजींचें नियमानें दर्शन घेत. त्यांच्या वडिलांनीं वर्धा येथें "श्रीलक्ष्मीनारायण मंदिर" बांधलें. त्याची सारी व्यवस्था वैष्णवांच्या मंदिरासारखीच जमनालालजींनीं ठेवली होती. फक्त एक फरक होता आणि तो फारच महत्त्वाचा होता. तो म्हणजे आपलें तें मंदिर १९२८ सालीं हरिजनांसाठीं त्यांनीं विनोबांच्या हस्तें हरिजनांना खुलें केलें. तसेंच रेवाडी येथें "भगवद्भक्ति आश्रमा'-मध्यें हरिजनांच्या हातचें जेवणहि त्यांनीं घेतलें.

हरिजनांच्या वस्तीमध्यें प्रचारक नेमण्यासाठीं व हरिजन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ति देण्यासाठीं त्यांनीं आपले स्वतःचे पुष्कळ पैसे खर्च केले. सार्वजनिक विहिरीवर अस्पृश्यांना पाणी भरूं देण्यासाठीं त्यांनीं खूप खटपट केली. पण त्याचे आधीं वर्धा येथील आपल्या स्वतःच्या धर्मशाळेंतील विहीर हरिजनांसाठीं मोकळी करण्याचा त्यांनीं निश्चय केला.

पण तें काम सोपें नव्हतें. त्या कामीं त्यांना एक जबरदस्त अडचण आली. ती म्हणजे ट्रस्टींची. धर्मशाळेची व्यवस्था ट्रस्टींकडे होती. आणि ते ट्रस्टी तर सनातनी मताचे. ते विरोध करूं लागले. परंतु जमनालालजींनीं त्यांचें मत-परिवर्तन करण्यासाठीं आर्जवाची, आग्रहाची युक्तिवादाची पराकाष्ठा केली. त्यांचें सुदैव असें कीं, त्यांत त्यांना यश आलें. आणि 'बच्छराज धर्मशाळें'तील विहीर मनुष्यमात्रासाठीं १९२७

सालपासून खुली झाली. मग जमनालालजींनीं आपल्या मालकीच्या गांवामधील, शेतामधील, बागामधील विहिंरी हरिजनांना मोकळ्या केल्या हें काय सांगावयास हवें ?

'लक्ष्मीनारायण मंदिर' काय, किंवा "बच्छराज धर्मशाळा' काय, दोन्ही ठिकाणें जमनालालजींच्या मालकीचीं, पण ट्रस्टींच्या ताब्यांत गेलेलीं. पण त्या दोघांमध्यें हरिजनांचे बाबतींत ३६ चा आंकडा आलेला. तो उलटवून ६३ करण्याला जमनालालजींना किती रक्त आटवावें लागलें, हें पुढील मुलाखतीवरून दिसून येतें.

मंदिर खुलें होण्याच्या आधीं दोन दिवस. गांवांतील १५०।२०० सनातनी लोकांचें एक शिष्टमंडळ जमनालालजींना भेटावयास आलें. त्या वेळीं त्यांचा जो संवाद झाला, तो देशांतील दोन विचारप्रवाहांचें प्रतिबिंब असल्यामुळें येथें विस्तारानें देत आहें.

शिष्टमंडळ—आपण हरिजनांना मंदिर उघडें करून देऊं नये.

जमनालालजी—कां ?

शि०—त्यानें धर्म बुडेल.

ज०—मंदिर न उघडण्यानें धर्म बुडेल असें भय मला वाटतें.

शि०—निदान ५।७ वर्षें तरी थांबा.

ज०—त्यानंतर तुम्ही या कामीं मला मदत कराल काय ?

शि०—मदत तर आम्ही करूं शकत नाहीं.

ज०—कां नाहीं करूं शकत ? हिंदुधर्माचें प्रेम, मानवतेचें प्रेम यांचा कांहीं विचार कराल कीं नाहीं ?

शि०—युक्तिवादांत आम्ही आपल्याला जिंकूं शकणार नाहीं. पण आपण आमचे नेते आहां. म्हणून आमची इच्छा पूर्ण करा.

ज०—मला तुम्ही नेता मानतां ना ? मग तुम्ही माझी एक गोष्ट ऐका म्हणजे मी तुमच्या इतर साऱ्या गोष्टी ऐकेन.

शि०—कोणती ती गोष्ट ?

ज०––जन्मभर खादी वापरण्याची प्रतिज्ञा करा. म्हणजे मी मंदिर-प्रवेशाचा प्रश्न ५।७ वर्षे पुढें ढकलीन. खादीचे बाबतींत तरी तुमची धर्मभावना किंवा रूढि आड येत नाहीं ना?

शि०––नाहीं. पण तें आमच्यानें होणें नाहीं. हरिजनांचा मंदिर-प्रवेश आम्ही मान्य करूं, पण कांहीं काळानंतर.

ज०—असें असेल तर मी दुसरी तोड सुचवितों. आपण वर्ध्यामध्यें दुसरें मंदिर उभारूं. त्याचा निम्मा खर्च तुम्ही द्या, निम्मा मी देईन. आणि तें मंदिर हरिजनांना उघडें ठेवूं.

पण त्या सनातनी शिष्टमंडळाला कांहींच तडजोड मान्य होईना. तें तसेंच परत गेलें. आणि दुसरे दिवशीं––

वर्धा येथें सनातनी लोकांची विराट सभा भरली. बाहेर गांवांहून सनातनी पुढारी सभेसाठीं आले होते. सभेचें वातावरण खूपच तापलें होतें. 'लक्ष्मीनारायण मंदिरांत' हरिजनांना प्रवेश देण्यास विरोध करणारा ठराव मंजूर झाला, एवढेंच नव्हे तर, दुसेर दिवशीं सकाळीं मंदिरापुढें सत्याग्रह करण्याचाहि निश्चय झाला. 'उद्यां काय होणार?' ही चिंता सर्व लोकांत पसरली.

तो दिवस उजाडला. सकाळचे सहा वाजले. गांधी–चौकांत जमना-लालजी आपल्या मित्रमंडळींसह जाऊन दाखल झाले. तेथें पुष्कळ कॉंग्रेसजन जमले. मंदिरापासून पन्नास यार्डांवर सनातनी लोक गोळा झाले. दंग्याचें भय उत्पन्न झालें. पोलीस–अधिकाऱ्यानें जमनालालजींस विचारलें, "बंदोबस्तासाठीं पोलिसांची मदत हवी का?"

जमनालालजी हंसले व म्हणाले, "मला दंग्याची भीति वाटत नाहीं—पोलिसांची कांहीं जरूरी नाहीं."

सकाळचे आठ वाजले आणि विनोबांच्या हस्तें मंदिर खुलें झालें! हरिजनांची एक टोळी भजन करीत करीत मंदिरापाशीं आली. तिनें मंदिरांत प्रवेश केला. घंटा घणघणल्या. टाळा खणखणल्या. मृदंग

समतेचे बोल काढूं लागला. आणखी भजनमंडळ्या आल्या आणि हरिनामाचा एकच गजर झाला. भक्तीच्या भावनेनें सारें मंदिर कोंदून गेलें. समतेच्या व ममतेच्या नव्याच युगांत आपण प्रवेश केल्याचें समाधान सर्वांच्या मुद्रेवर झळकूं लागलें.

आणि सनातनी काय करीत होते ?

विरोध नाहीं नि सत्याग्रह पण नाहीं. फक्त आपल्या मनांतील द्वेष प्रगट करण्यासाठीं त्यांनीं रस्ते झाडणाऱ्या भंगी-भंगिणींना धरधरून मंदिराकडे पाठविलें. त्यामुळें मंदिरांत गोंधळ उडेल अशी त्यांची कल्पना. पोट-अस्पृश्यता चिथावून जागी करण्याचा त्यांचा डाव. पण तो साफ फसला. सूर्यास गिळावयास गेलेला अंधार स्वतःच लुप्त झाला. दुपारीं १२ वाजेपर्यंत ३।४ हजार हरिजन लक्ष्मीनारायणाचें दर्शन घेऊन, पावन होऊन, आनंद मिळवून गेले. त्या सर्वांचें स्वागत करण्यासाठीं जमनालालजी सस्मित मुखानें खडे होते. त्या वेळीं त्यांचें मन म्हणत होतें, "गेलीं तीन वर्षें जी ज्वाळा पेटली होती, ती आज शांत झाली." साऱ्या देशांत हरिजनांना खुलें झालेलें हें पहिलें सवर्ण मंदिर !

सनातनी लोकांनीं आपलें बहिष्काराचें शस्त्र जमनालालजींवर उगारलें. मंदिरांतील पुजारी, पुराणिक व इतर नोकर दुसरे दिवसापासून येईनासे झाले. त्यांचे जागीं नव्या विचाराचे दुसरे नोकर ठेवण्यांत आले, एवढेंच नव्हे तर, मंदिराच्या ट्रस्टींमध्यें एका हरिजनालाहि घेण्यांत आलें. आपल्या घरींहि त्यांनीं हरिजन नोकर ठेवले व त्यांच्या हातचें जेवण घेण्यास सुरुवात केली.

पुढें कॉंग्रेसनें अस्पृश्यता-निवारणासाठीं एक समिति नेमली, तींत जमनालालजींना अध्यक्ष नेमण्यांत आलें. त्यांनीं अगदीं जीव तोडून हें काम केलें. सार्वजनिक देवळांच्या ट्रस्टींना उद्देशून त्यांनीं एक पत्रक प्रसिद्ध केलें. मध्यभारत, राजपुताना, मद्रास, सिंध, पंजाब, सीमा प्रांत

इत्यादि दूरदूरच्या प्रदेशांत जाऊनहि त्यांनीं प्रचार केला. गांवोगांवच्या नगरपालिकांच्या अधिकाऱ्यांना भेटून शाळा, हौद, दवाखाने, उपाहार-गृहें इत्यादि सार्वजनिक ठिकाणीं अस्पृश्यांना प्रवेश देण्याकडे त्यांचें मन वळविलें. वऱ्हाडमधील एलिचपूर येथील दत्तमंदिर खुलें करण्यास त्याच्या ट्रस्टींना त्यांनीं तयार केलें. हें मंदिर जमनालालजींच्या हस्तेंच खुलें करण्यांत आलें. त्या वेळीं भाषण करतांना ते म्हणाले,—

"जो स्वतः पतितपावन आहे, तो अस्पृश्यांच्या संसर्गानें पतित होईल—अपवित्र होईल, असें मानणें म्हणजे ईश्वराची विटंबना करणें होय. आईबाप आपल्या सर्व मुलांवर सारखें प्रेम करीत नाहींत काय? त्यांतहि जो मुलगा दुःखी व दुर्बल असेल, त्यावर अधिक माया करीत नाहींत काय? आपण जर एका पुत्राला दूर ठेवलें, तर त्याच्या माता-पित्यांना किती व्यथा होईल याची कल्पना तर करा. ईश्वराचा दरबार काय आपणा मूठभर लोकांसाठींच आहे? मनुष्याला पशूपेक्षां हीन लेखणें हें कोणत्याहि प्रकारें धार्मिक कृत्य ठरत नाहीं. तें पापच आहे."

जन-मताचें परिवर्तन करण्याचें कार्य जमनालालजींनीं जोरानें चालविलें होतें—आणि त्याला यशहि येत चाललें होतें. पण यशाच्या नाण्याची दुसरी बाजू म्हणजे विरोध. किंबहुना हा विरोध म्हणजे त्या यशाचें मोजमापच. कट्टर सनातनी जमनालालजींवर खवळून उठले. एके दिवशीं वर्धा येथील बालाजीच्या मंदिरांत ब्राह्मण, अग्रवाल व माहेश्वरी या जातींच्या प्रतिष्ठित लोकांनीं एकत्र जमून असा ठराव केला कीं, जमनालालजींना जातींतून बहिष्कृत करावें. जमनालालजी या संकटाला तयारच होते. त्यांना बंधुतुल्य असलेले श्री० कृष्णदास जाजूजी यांना कोणी विचारलें, "तुम्ही जमनालालजींबरोबर राहणार कीं जातीबरोबर?"

जाजूजी शांतपणें उत्तरले, "मला जमनालालजींच्या कार्यामध्यें कांहीं अनुचित दिसत नाहीं. त्यांचें सहकार्य मीं कां सोडावें?"

जाजूजीवरहि बहिष्कार पुकारण्यांत आला. बहिष्काराची आज्ञा अशी विचित्र होती कीं, "आमच्या येथें कांहीं मंगलकार्य निघालें, तर त्याचें निमंत्रण आपल्याला येईल, पण आपण कृपा करून येऊं नये. उलट आपल्याकडे कांहीं कार्य निघालें व आपण आम्हांस आमंत्रण दिलें तर आम्ही त्या कार्यास येणार नाहीं, त्याचा राग मानूं नये."

मुंबई येथील "मारवाडी विद्यालय" हरिजन मुलांसाठीं जमनालालजींनीं खुलें केलें. तेव्हां मारवाडी समाजाचा त्यांचेवर असाच घुस्सा झाला. त्याला तोंड देण्यास ते सिद्धच होते. कांहीं कांहीं गांवीं तर त्यांच्या मोटारीवर दगड फेकण्यांत आले. कोठें त्यांच्या मोटारीपुढें रस्त्यावर ब्राह्मण, पंडे, पुजारी आडवे पडले. पण या विरोधाच्या वादळांतहि न डगमगण्याइतकी खंबीर तत्त्वनिष्ठा जमनालालजींचे अंगीं होती.

त्यांच्या या वेळच्या मनोवृत्तीचें व कार्यशक्तीचें यथार्थ वर्णन गांधीजींनीं ता. १३ डिसेंबर १९२८ च्या "यंग इंडिया"मध्यें केलें आहे. तें असें—"जमनालालजींनीं सेवेसाठीं विस्तृत क्षेत्र निवडलें आहे. एक पंथ किंवा जात एवढें तें संकुचित नाहीं. संपूर्ण विश्व हें त्यांचें कुटुंब आहे. मानवतेची सेवा करूनच ते आपल्या जातीची सेवा साधीत आहेत."

निरलसता व निर्भयता हे जमनालालजींचे गुण या प्रसंगीं फारच मोठ्या प्रमाणांत प्रगट झाले. धर्मभक्त असूनहि समाजसुधारणा करण्याइतकी विवेचकता त्यांचे ठायीं असल्याचें सर्वांचे प्रत्ययास आलें. एकदां एखादें तत्त्व बुद्धीला पटलें म्हणजे त्यासाठीं अंग मोडून, त्रास सोसून, विरोध गिळून, नेटानें व धैर्यानें काम करण्याचा त्यांचा नेतृत्वाचा गुणहि या वेळीं स्पष्टपणें व्यक्त झाला.

• • •

# ११ : स्वभावाचे पैलू

“ If you really want to judge of the character of a man, look not at his great performances. Watch a man do his most common actions, those are indeed the things which tell you the real character of a great man. Great occasions rouse even the lowest of human beings to some kind of greatness, but he is the really great man whose character is great always, the same wherever he be. ”

—*SWAMI VIVEKANANDA*

मनाचें मोठेंपण लहान लहान घटनांमध्येंहि दिसून येतें. किंबहुना त्या लहान घटना याच मोठेपणाच्या खऱ्या कसोट्या. सार्वजनिक प्रसंगीं मोठेपणाचा आव कोणीहि आणूं शकेल. पण घरीं-दारीं, हास्य-विनोदांत, बायका-मुलांशीं बोलण्यांत किंवा नोकर-चाकरांशीं वागण्यांत जो स्वभाव प्रगट होतो, तोच खरा म्हणावयाचा. या कसोटीवर घासून

पाहतां, जमनालालजींचें सौजन्य, औदार्य व सेवाभाव बावन्नकशी असल्याचें दिसून येतें.

अशा खऱ्या मोठेपणाच्या अनेक पैलूंवर स्वच्छ प्रकाश टाकणाऱ्या त्यांच्या किती तरी आठवणी प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्यांपैकीं रहाना तैयबजी यांची आठवण आठवणींत ठेवण्यासारखी आहे.

रहानाचे वडील १९३६ सालीं निधन पावले. तेव्हां जमनालालजी त्या मुलीला म्हणाले, " रहानाबहन, तूं कांहीं चिंता करूं नकोस. तूं मला आपला मोठा भाऊ मान. " असें म्हणून त्यांनीं तिला वर्ध्यास नेलें. एके दिवशीं सकाळीं त्यांनीं तिला आपल्या ' लक्ष्मीनारायण-मंदिरांत ' नेलें. त्यांची इच्छा अशी कीं, तिनें तेथें भजन गावें. हिंदूंच्या मंदिरांत मुसलमान स्त्रीचें भजन करविण्याइतका उदारपणा त्यांचा होता.

मोटारींतून ते खालीं उतरतात, तोंच त्यांचे कानीं तंबोऱ्याचा मधुर नाद आला. आसावरी रागांतील तान कानांत घुमत असतांनाच रहाना आंत गेली आणि पाहते तों एक आंधळा वृद्ध माणूस 'लक्ष्मीनारायणाच्या' मूर्तीसमोर तल्लीनतेनें भजन गात आहे. तें ऐकत रहाना बसली.

भजन आटोपलें. जमनालालजींनीं त्या अंधास विचारलें,

"कसें काय ? ठीक चाललें आहे ना ? "

" शेठजी, आपली कृपा आहे म्हणून मी आनंदात आहें. माझ्या साऱ्या आशा आपल्या कृपेमुळें पुऱ्या झाल्या आहेत–फार आनंद आहे. " अंध व वृद्ध गवयानें उत्तर दिलें.

अशा किती तरी अनाथांच्या अंधाऱ्या जीवनांत जमनालालजींनीं आपल्या प्रेमाचा प्रकाश पाडला असेल !

▲

दुसरी आठवण रहानांनींच दिलेली आहे, ती अशी—

" रामाधीन नांवाचा घरचा टांगेवाला. किती साधा अन् गरीब. पण एकदां जमनालालजींना पोलीस तुरुंगांत नेत होते. त्यासाठीं त्यांना

स्टेशनवर नेण्यांत आलें. तेथें त्यांना निरोप देण्यासाठीं बड्या बड्या लोकांची केवढी गर्दी ! बिचारा टांगेवाला रामाधीन दूर एका कोपऱ्यांत पाठीमागें उभा राहिला होता. पण त्या गर्दीतून जात असतांनाहि जमनालालजींचें लक्ष त्याचेकडे गेलें. तत्काळ ते त्याचेकडे गेले आणि हंसत हंसत त्यांनीं त्याला कुशल विचारलें. त्या रंकाची मूक भावना त्यांनीं अचूक जाणली. आपल्या अटकेमुळें त्याचें चित्त किती व्यथित झालें आहे, हें त्यांनीं त्याच्या गहिंवरलेल्या मुद्रेवरून व व्याकुळ दृष्टी-वरून ओळखलें. त्यांनीं त्याला धीर दिला व दुःख न करण्यास समजावलें. " श्रीरामाला शबरीचें व श्रीकृष्णाला कुब्जेचें महत्त्व ज्या भावनेसाठीं, त्याच भावनेच्या तराजूनें जमनालालजींनीं त्या टांगे-वाल्याच्या प्रेमाचें मोल जोखलें.

▲

एकदां जमनालालजी रेवाडी येथील ' भगवद्भक्ति आश्रमांत ' गेले होते. आश्रमांत गरीब मजूर एक तलाव खोदीत होते. जमनालालजी त्यांच्यांतच जाऊन सामील झाले आणि माती खणून बाहेर टाकूं लागले. नंतर ते विहिरीवर गेले आणि आपल्या हातानें पाणी काढून बरोबरीच्या लोकांना आंघोळ घालूं लागले. तेव्हां ते म्हणूं लागले, " शेठजी, आम्ही पाणी काढतों, आपण कशाला ? "

" नाहीं, नाहीं, आज तुम्ही लोकांनीं तलाव खोदण्याची फार मेहनत केली आहे. तेव्हां तुमचे श्रम घालविण्यासाठीं मीच तुम्हांला न्हाऊं घालतों. "

▲

एक कापडाची गिरणी पुष्कळ दिवस बंद पडली होती. ती विकत घेण्याचा सल्ला त्यांच्या भागीदारांनीं जमनालालजींना दिला. तेव्हां " मी खादीवाला, गिरणी चालविणें माझ्या तत्त्वाविरुद्ध आहे " असें म्हणून जमनालालजींनीं नकार दिला. पण भागीदार खंबीर. ते म्हणाले,

"आपण गिरणी चालवूंच नका. एका हातानें ती खरेदी करा आणि लगेच दुसऱ्या हातानें विकून टाका. एवढ्या नुसत्या देवघेवींत लाखों रुपयांचा फायदा तुम्हांस सहज मिळून जाईल." पण त्या मोहजालांत जमनालालजी सांपडले नाहींत. त्यांनीं त्या गिरणीच्या व्यवहारास नुसता हातहि लावला नाहीं.

▲

बच्छराजजींच्या वारसाचा खटला चालू असतांना जमनालालजींच्या सल्लागारांना असें दिसून आलें कीं, एका वर्षाची वही आपल्या विरुद्ध जाणारी आहे. म्हणून मुनीमानें ती वही दडवून ठेवली. पण विरोधी पक्षानें कोर्टांत वहीची मागणी केली.

"वही नाहीं." मुनीमानें उत्तर दिलें. पण जमनालालजींनीं त्याला खूप छेडलें आणि शपथ घेऊन सत्य सांगण्यास बजावलें. तेव्हां मुनीमानें कबूल केलें, "आपलें नुकसान होऊं नये म्हणून मीं ती वही दडवून ठेवली आहे."

"अरे, हें काय केलेंस? आपण या खटल्यांत हरूं किंवा जिंकूं. पण असत्य व्यवहार बिलकूल होतां कामा नये." असे निश्चयाचे उद्गार काढून जमनालालजींनीं वही आणविली आणि ती कोर्टांत दाखल केली.

आश्चर्य असें कीं, त्या वहींतील नोंदीमुळें जमनालालजींची बाजू कोर्टांत अधिक बळकट झाली आणि खटल्यांत फत्ते त्यांचीच झाली.

▲

निर्भयता हा गुण जमनालालजींच्या शुद्ध जीवनांतून प्रथमपासूनच जन्मास आलेला होता. तो गांधीजींच्या सहवासानें व असहकारितेच्या आंदोलनानें वाढीस लागला. १९१२ सालीं मध्यप्रदेशाच्या गव्हर्नरनें त्यांना आपल्या दरबारचें निमंत्रण दिलें होतें. नेहमींप्रमाणें बूट-पाटलोणी पोशाखांत येण्याची सूचनाहि दिलेली होती. परंतु तो विदेशी थाटाचा

पोशाख करण्यास जमनालालजींनीं नकार दिला. तेव्हां सरकारनें त्यांना कळविलें, आपल्या इच्छेस येईल तो पोशाख करून आपण यावें. मग ते मारवाडी वेषांत नागपूरच्या त्या दरबारांत गेले.

लो० टिळक आमदार झाले तरी बूट–पाटलोण न घालतां धोतर–जोडा घालूनच सरकारच्या विधानसभेंत जात असत, या बाणेदारपणाची परंपराच जमनालालजी चालवीत होते. पुढें गांधीजी तर लंडनच्या राजवाड्यांत बादशहांना भेटले, ते आपल्या खादीच्या दोन वस्त्रांनिशींच.

याच्या उलट, एकदां गव्हर्नर वर्ध्याला येणार होते. तेथील बडे व्यापारी म्हणून जमनालालजींनीं त्यांना मेजवानी देणें अवश्य होतें. तें त्यांनीं मान्यहि केलें. पण कलेक्टरला स्वच्छ बजावलें कीं, माझ्या मेजवानींत अंडें, मांस किंवा दारू मिळणार नाहीं.

▲

भारतमंत्री मि. मॉंटेग्यू हिंदुस्थानांत आले होते, तेव्हां त्यांचेकडे दरभंग्याचे महाराज सनातनधर्मीयांचें एक शिष्टमंडळ घेऊन जाणार होते. त्यांत जमनालालजींनीं यावें अशी इच्छा महाराजांनीं प्रगट केली. तेव्हां जमनालालजींनीं त्यांना अशी अट घातली कीं, “लष्करासाठीं जो गो-वध होत आहे तो बंद व्हावा, अशी मागणी हें शिष्टमंडळ करील, तर त्यांत मी सामील होईन.” ही मागणी करण्याचें धारिष्ट कोणता महाराज करील? जमनालालजी त्या शिष्टमंडळांत सामील झाले नाहींत. तसेंच बरद्वानच्या महाराजांनींहि जमीनदारांच्या शिष्टमंडळांत भाग घेण्यास जमनालालजींना पाचारिलें होतें, पण त्यालाहि त्यांनीं नकार दिला.

▲

अत्यंत श्रीमंत व्यापारीहि फाटक्या सरकारी अधिकाऱ्यालासुद्धां प्रायः भिऊन–नमून वागतात, हांजी-हांजी करतात, लोटांगणें घालतात. कारण स्वार्थासाठीं केलेलीं पापे व गुन्हे त्यांना छपवावयाचे असतात. पण

"आपण गिरणी चालवूंच नका. एका हातानें ती खरेदी करा आणि लगेच दुसऱ्या हातानें विकून टाका. एवढ्या नुसत्या देवघेवींत लाखों रुपयांचा फायदा तुम्हांस सहज मिळून जाईल." पण त्या मोहजालांत जमनालालजी सांपडले नाहींत. त्यांनीं त्या गिरणीच्या व्यवहारास नुसता हातहि लावला नाहीं.

▲

बच्छराजजींच्या वारसाचा खटला चालू असतांना जमनालालजींच्या सल्लागारांना असें दिसून आलें कीं, एका वर्षाची वही आपल्या विरुद्ध जाणारी आहे. म्हणून मुनीमानें ती वही दडवून ठेवली. पण विरोधी पक्षानें कोर्टांत वहीची मागणी केली.

"वही नाहीं." मुनीमानें उत्तर दिलें. पण जमनालालजींनीं त्याला खूप छेडलें आणि शपथ घेऊन सत्य सांगण्यास बजावलें. तेव्हां मुनीमानें कबूल केलें, "आपलें नुकसान होऊं नये म्हणून मीं ती वही दडवून ठेवली आहे."

"अरे, हें काय केलेंस? आपण या खटल्यांत हरूं किंवा जिंकूं. पण असत्य व्यवहार बिलकूल होतां कामा नये." असे निश्चयाचे उद्गार काढून जमनालालजींनीं वही आणविली आणि ती कोर्टांत दाखल केली.

आश्चर्य असें कीं, त्या वहींतील नोंदीमुळें जमनालालजींची बाजू कोर्टांत अधिक बळकट झाली आणि खटल्यांत फत्ते त्यांचीच झाली.

▲

निर्भयता हा गुण जमनालालजींच्या शुद्ध जीवनांतून प्रथमपासूनच जन्मास आलेला होता. तो गांधीजींच्या सहवासानें व असहकारितेच्या आंदोलनानें वाढीस लागला. १९१२ सालीं मध्यप्रदेशाच्या गव्हर्नरनें त्यांना आपल्या दरबारचें निमंत्रण दिलें होतें. नेहमींप्रमाणें बूट-पाटलोणी पोशाखांत येण्याची सूचनाहि दिलेली होती. परंतु तो विदेशी थाटाचा

पोशाख करण्यास जमनालालजींनीं नकार दिला. तेव्हां सरकारनें त्यांना कळविलें, आपल्या इच्छेस येईल तो पोशाख करून आपण यावें. मग ते मारवाडी वेषांत नागपूरच्या त्या दरबारांत गेले.

लो० टिळक आमदार झाले तरी बूट–पाटलोण न घालतां धोतर–जोडा घालूनच सरकारच्या विधानसभेंत जात असत, या बाणेदारपणाची परंपराच जमनालालजी चालवीत होते. पुढें गांधीजी तर लंडनच्या राजवाड्यांत बादशहांना भेटले, ते आपल्या खादीच्या दोन वस्त्रांनिशींच.

याच्या उलट, एकदां गव्हर्नर वर्ध्याला येणार होते. तेथील बडे व्यापारी म्हणून जमनालालजींनीं त्यांना मेजवानी देणें अवश्य होतें. तें त्यांनीं मान्यहि केलें. पण कलेक्टरला स्वच्छ बजावलें कीं, माझ्या मेजवानींत अंडें, मांस किंवा दारू मिळणार नाहीं.

▲

भारतमंत्री मि. मॅांटेग्यू हिंदुस्थानांत आले होते, तेव्हां त्यांचेकडे दरभंग्याचे महाराज सनातनधर्मीयांचें एक शिष्टमंडळ घेऊन जाणार होते. त्यांत जमनालालजींनीं यावें अशी इच्छा महाराजांनीं प्रगट केली. तेव्हां जमनालालजींनीं त्यांना अशी अट घातली कीं, "लष्करासाठीं जो गो-वध होत आहे तो बंद व्हावा, अशी मागणी हें शिष्टमंडळ करील, तर त्यांत मी सामील होईन." ही मागणी करण्याचें धारिष्ट कोणता महाराज करील? जमनालालजी त्या शिष्टमंडळांत सामील झाले नाहींत. तसेंच बरद्वानच्या महाराजांनींहि जमीनदारांच्या शिष्टमंडळांत भाग घेण्यास जमनालालजींना पाचारिलें होतें, पण त्यालाहि त्यांनीं नकार दिला.

▲

अत्यंत श्रीमंत व्यापारीहि फाटक्या सरकारी अधिकाऱ्यालासुद्धां प्रायः भिऊन–नमून वागतात, हांजी-हांजी करतात, लोटांगणें घालतात. कारण स्वार्थासाठीं केलेलीं पापे व गुन्हे त्यांना छपवावयाचे असतात. पण

जमनालालजींचा सारा व्यवहार खुला व स्वच्छ ! मग त्यांना डर कसली? शुद्ध जीवनामुळें मन स्वतंत्र होतें व वृत्ति निर्भय राहते. याचें जीवंत उदाहरण म्हणजे जमनालालजींचें चरित्र. आपल्या जीवनांतील प्रत्येक व्यवहार धर्माच्या तराजूंत तोलून ते घेत असत.

" भारतमें अंग्रेजी राज्य " हें पं० सुंदरलालजींचें पुस्तक सरकारनें जप्त केलें आणि त्याचा शोध करण्यासाठीं पोलिसांनीं घरनूघर शोधलें. आपल्या घरीं किंवा आपल्या कार्यालयांत तें पुस्तक नाहीं, असा विश्वास जमनालालजींनीं दिला असतांनाहि पोलिसांनीं त्या दोन्ही ठिकाणांची झडती घेतली. जमनालालजींची बेइज्जत करावी एवढाच त्यांचा हेतु, असें गांधीजींनीं लिहिलें.

याबाबत खुद्द जमनालालजींनीं पोलीस-कमिशनरला जें पत्र लिहिलें, तें त्यांच्या बाणेदार व सडेतोड स्वभावाचें द्योतक आहे. त्यांत त्यांनीं लिहिलें, " भारत सरकारचें हें कृत्य निरंकुश व अन्याय्य आहे. आणि झडतीचा प्रकार तर अत्यंत अपमानकारक, आक्षेपार्ह व सूडाच्या भावनेनें भरलेला आहे. मीं तें पुस्तक वाचलें आहे. आणि माझें मत असें झालें आहे कीं, तें पुस्तक पूर्ण निर्दोष आहे, एवढेंच नव्हे तर अहिंसेचा पाठ देणारा तो एक स्तुत्य प्रयत्न आहे. "

▲

जमनालालजी आगगाडींतून प्रवास करीत होते तेव्हांची गोष्ट. प्रवास दुसऱ्या वर्गाच्या डब्यांतून चालला होता. त्या वर्गाचे उतारू प्रायः ऐदी व ऐटबाज ! दुसरा उतारू डब्यांतच थुंकूं लागला. तसें करूं नये, म्हणून जमनालालजींनीं त्याला खूप समजावून सांगितलें. पण सरळपणानें ऐकेल तो श्रीमंत कसला ? तो आपल्या तोंडांत विड्याचा तोबरा भरीतच होता आणि डब्यांत पिचकाऱ्या टाकीतच होता. शांतपणें जमनालालजी पाहात राहिले. पुढें त्या बड्या गृहस्थाचें तांबूल-भक्षण संपलें व रंगपंचमीहि संपली. तेव्हां जमनालालजी आपल्या जागेवरून

शांतपणें उठले आणि आपल्या हातांनीं डब्यांतील सारी थुंकी धुऊन त्यांनीं डबा साफ केला व मग आपले हात धुतले.

एक अक्षरहि जमनालालजी बोलले नाहींत. पण तें न बोलणेंच त्या थुंकण्या उतारूला असह्य झालें. तो लाजला आणि म्हणाला, "शेठजी, मला क्षमा करा. मी पुनः असें करणार नाहीं अशी शपथ घेतों." शांति, क्षमा व सेवा यांच्या रसायनांत पाषाणहृदयहि विरघळतें, तें असें.

▲

एकदां जिल्हा कॉंग्रेस कमिटीची निवडणूक होती. ती जमनालालजींच्या घरींच होती. 'वर्धा कॉंग्रेस कमिटी' व 'नागपूर प्रदेश कॉंग्रेस कमिटी' यांच्यामध्यें बरींच वर्षे झगडा चालला होता. डॉ. मुंजे हे प्रदेश कॉं. कमिटीचे अध्यक्ष होते. त्यांनीं जिल्हा कॉं. कमिटी आपल्या ताब्यांत घेण्यासाठीं पुष्कळ बेकायदा सभासद बनविले. तो त्यांचा डाव हाणून पाडण्यासाठीं जि. कॉं. कमिटीच्या कार्यकर्त्यांनींहि पुष्कळ खोटे सभासद बनविले.

या अ-धर्म-युद्धाची गंधवार्ता जमनालालजींना नव्हती. कारण ते मुंबईहून वर्ध्यास त्याच दिवशीं गेले होते. चौकशीअंतीं त्यांना सर्व बनवाबनवी कळली. ते खिन्न झाले. सभेचे अध्यक्ष तेच होते. बहुमत त्यांचेंच होतें. तरी सभा सुरू होतांच त्यांनीं जाहीर केलें, "आमचा पक्ष या निवडणुकींत भाग घेणार नाहीं. कारण त्यांत असत्य शिरलें आहे." असें म्हणून त्यांनीं, उघड्या डोळ्यांनीं, आपल्या हातांत राहूं शकणारी कॉं. कमिटी, विरोधी पक्षाच्या हातीं सोपविली.

▲

वर्धा हें महाराष्ट्रांतील एक व्यापारी शहर. तेथें राहिलेले—वाढलेले व तेथील व्यापारावर जगलेले जमनालालजी स्वतःस महाराष्ट्रीय समजत. "जन्म संस्थानचा व धंदा मुंबईचा; तरी मी महाराष्ट्रीयच आहें." असें ते

नेहमीं म्हणत. एकदां एका विशिष्ट प्रसंगानें त्यांनीं आपली ही भावना स्वच्छ लिहून व्यक्त केली.

पुण्याचे सेवासंपन्न गांधीभक्त श्री. हरिभाऊ फाटक यांनीं एका तरुण महाराष्ट्रीयाला जमनालालजींकडे मदतीसाठीं व मार्गदर्शनासाठीं पाठविलें. परंतु त्या तरुणानें त्या सुवर्ण-संधीचा दुरुपयोग केला आणि जमनालालजींना दुःख दिलें. त्याबद्दल त्या तरुणानें पुढें त्यांची क्षमा मागितली व ती त्यांनीं उदारपणें दिलीहि.

या प्रकरणांत लिहिलेल्या एका पत्रामध्यें जमनालालजी हरिभाऊंना आपली भूमिका निवेदन करतात,

"महाराष्ट्र व महाराष्ट्रीय लोक याविषयीं माझ्या मनांत आपुलकीची भावना आहे. माझा उभा जन्म नागपूर प्रांतांत गेला, व जी कांहीं अल्पस्वल्प लोकसेवा माझ्या हातून घडली असेल, तीहि विशेषतः याच भागांत घडली. मला या प्रांताचा अभिमान असून मला स्वतःला "महाराष्ट्रीय" म्हणविण्यांत एक प्रकारचा आनंदहि वाटतो. पण महाराष्ट्रीय तरुणांचें काय व इतर तरुणांचें काय, ज्या गोष्टींत कल्याण आहे, असें मला प्रामाणिकपणानें वाटेल तीच मी करीन. त्यांचे आपल्याबद्दलचे गैरसमज दूर व्हावेत म्हणून चुकीच्या मार्गानें त्यांना खूष करणें मला अयोग्य वाटतें. त्यांची खरी सेवा मीं जर केली, तर कालांतरानें गैरसमज आपोआप नष्ट होतील."

आपण शिफारस केलेला महाराष्ट्रीय तरुण लबाड निघाला, याविषयीं हरिभाऊंनीं आपल्या पत्रांत दुःख व्यक्त केलें होतें व त्याबद्दल स्वतःकडे दोष घेतला होता. त्याचें निराकरण करण्यासाठीं जमनालालजी या पत्राचे शेवटीं लिहितात,

"आपण खोटेपणानें वागण्यास सर्वस्वीं असमर्थ आहांत. खोट्या माणसाला जे दुर्गुण लागतात किंवा जी लायकी लागते, तिचा आपल्या ठिकाणीं संपूर्ण अभाव आहे असें माझें आपल्याविषयींचें मत आहे."

उलट, त्यांच्या गुणांची चहा लो. टिळकांनींहि केलेली आहे. त्यांचे-कडे श्री. रिषभदास रांका मार्गदर्शनासाठीं गेले होते. त्या वेळीं रांका होते १७ वर्षांचे. मनांत इच्छा देश-भक्तीची. ते लोकमान्यांना म्हणाले, "मी आपल्याजवळ राहून देश-सेवा करूं इच्छितों."

लोकमान्यांनीं चौकशी केली, तेव्हां रांकांनीं सांगितलें, "माझें शिक्षण मराठी चार इयत्ता झालें आहे, आणि मी व्यापारांत पडलों आहें. तरी आपल्याजवळ राहण्याची माझी इच्छा आहे."

लोकमान्यांनीं उत्तर दिलें, "व्यापार करतां करतांहि तुला देश–सेवा करतां येईल. माझ्यापेक्षां वर्धा येथील जमनालालजी बजाज यांचे-जवळ राहणें अधिक चांगलें. ते व्यापार करीत असून देश-सेवा करीत असतात. तीन–चार दिवसांपूर्वींच ते पुण्यास आले होते. त्यांचा येथें मोठा सन्मान झाला. तोच आदर्श तूं आपल्या डोळ्यांपुढें ठेव. म्हणजे देशाची सेवा चांगली होईल."

महाराष्ट्राच्या नर-केसरीनें जमनालालजींना दिलेलें हें अभावित प्रमाणपत्रच नव्हे काय?

खुद्द 'केसरी'नेंहि, १९२३ सालीं नागपूरचा झेंडा–सत्याग्रह धैर्यानें चालविल्याबद्दल, जमनालालजींचा मुक्तकंठ गौरव केला. ता. १७ जुलैच्या अंकांत 'केसरी'नें आपल्या 'स्फुट सूचनें'त लिहिलें, "नागपूर चळवळीचे आद्य प्रवर्तक शेठ जमनालाल बजाज यांनीं आपल्या धीरो-दात्त वर्तनानें अखिल व्यापारीवर्गाला एक उत्कृष्ट उदाहरण घालून दिलें यांत शंका नाहीं. 'महात्माजींचा पांचवा मुलगा' असें म्हणवून घेण्यांत त्यांना जी यथार्थ धन्यता वाटे, तिला शोभे असेंच वर्तन व महात्माजींचें अनुकरण त्यांचे हातून घडलें आहे. शेठजींचा हा स्वार्थत्याग पाहून

"कृतार्थोऽयं सोऽर्थस्तव सति वणिक्त्वेऽपि वाणिजः॥"

असेच प्रशंसोद्गार कोणाच्याहि तोंडून बाहेर पडतील."

महाराष्ट्रांतील किती तरी संस्थांकडे जमनालालजींच्या दान-गंगेचे

पाझर वळले असतील. चिंचवडच्या पाठशाळेस १९२४ सालीं त्यांनीं १५००० रुपयांची मदत केली. आणि १९३६ सालीं तर, महाराष्ट्रांत काँग्रेसचें अवतरण होण्याचे वेळीं, ते तन-मन-धनानें झटले. त्या प्रसंगीं श्री. शंकरराव देव यांनीं त्यांना लिहिलें,

"लोकमान्यांच्या निधनानंतर महाराष्ट्रांत काँग्रेसबद्दल प्रेम व विश्वास निर्माण करण्याचा उद्योग ज्यांनीं केला, त्यांना आपण पुरेपूर साहाय्य केलें. १९३० नंतर कायदेभंगादि ज्या ज्या चळवळी महाराष्ट्रानें इतर प्रांतांबरोबर केल्या, त्यांत आपणहि पुढाकारानें भाग घेतला. महाराष्ट्राच्या आतांपर्यंतच्या कामगिरीबद्दल, आम्हांला जितका अभिमान वाटत आहे, तितकाच आपल्याबद्दलहि वाटत आहे."

परंतु महाराष्ट्राचा एक भाग गांधीजीविरुद्ध व काँग्रेसविरुद्ध होता आणि म्हणून तो जमनालालजींच्या विरुद्धहि होता. त्याचें मुखपत्र असलेल्या 'केसरीनें' जमनालालजींवर खोटे आरोप केले आणि शेवटीं क्षमा मागितली. ही हकीकत पृ. २७ वर आली आहे. त्याहिपेक्षां निराधार नालस्ती केली दोन महाराष्ट्रीय वृत्तपत्रांनीं.

नागपूर येथें निघणाऱ्या 'सावधान' साप्ताहिकाच्या ता. ७ जुलै १९३६ च्या अंकांत "देशभक्तीची पेढी व स्वराज्याची मगनवाडी" या नांवाचा लेख आला. त्यांत जमनालालजींवर असे आरोप करण्यांत आले होते कीं, "औदार्य व देशभक्ति यांच्या नांवावर ते स्वार्थ साधीत आहेत. त्यांनीं 'अ. भा. ग्रामोद्योग संघाला' जी मगनवाडी अर्पण केली, तिचें दान-पत्र करण्यांत आलें नाहीं आणि त्या संघाचीं कार्यें पुढेंमागें संपुष्टांत आलीं म्हणजे सर्व इमारतींसह मगनवाडी 'बच्छराज कंपनी' कडे परत येईल. ही 'बच्छराज कंपनी' म्हणजे शेठजी, त्यांची पत्नी व पुत्र यांचीच आहे.'

असे बेअब्रूकारक आरोप करणारे लेख त्या वृत्तपत्रांत वर्षभर वारंवार येत होते. त्यांकडे जमनालालजींनीं लक्षहि दिलें नाहीं. परंतु त्यांत

राष्ट्रीय कार्यावर व संस्थेवरहि शिंतोडे उडविण्यांत येत आहेत, म्हणून, जनतेचा गैरसमज दूर करण्यासाठीं, जमनालालजींनीं त्या पत्राला न्याय-मंदिरांत खेंचावें, असा सल्ला गांधीजींनींहि त्यांना दिला. त्याप्रमाणें, त्या पत्राचे संपादक श्री. रा. बा. मावकर यांचेविरुद्ध त्यांनीं फिर्याद केली. तिचा निकाल ता. २५ नोव्हेंबर १९३८ रोजीं वर्धा येथील मॅजिस्ट्रेटनें असा दिला कीं, मावकर यांना ६ महिने साधी कैद व १००० रु. दंड, त्यांतील २५० रु. फिर्यादीस द्यावेत.

यावर मावकरांनीं सेशन्स कोर्टांत अपील केलें, पण तेथें ती शिक्षा कायमच झाली. पुढें नागपूरच्या हायकोर्टाकडे दाद मागण्यांत आली; पण कोठेंहि गेलें तरी कोळसा तो कोळसाच ! त्या लेखानें जमनालाल-जींची निष्कारण नालस्ती करण्यांत आली, असाच निर्णय अखेरच्या न्यायमंदिरांतहि ता. १३ जुलै १९३९ रोजीं लागला.

या न्याय-मंदिरांत जो निकाल देण्यांत आला, त्यांत न्यायमूर्तींनीं असा स्वच्छ अभिप्राय प्रगट केला कीं, 'या लेखांतील माहिती चुकीची आहे आणि त्या माहितीवर आधारलेलीं विधानें तर अयोग्य, द्वेषपूर्ण व क्षुद्रतेचीं आहेत.' परंतु राजकारणाच्या धकाधकींत अशी चिखलफेक चालूच असते, असें म्हणून न्यायमूर्तींनीं मावकरांची कैदेची शिक्षा रद्द केली व दंडाची रक्कम ५०० रु. वर आणली, आणि त्यांतील १०० रु. फिर्यादीस द्यावे असें म्हटलें.

मुंबई येथील 'चित्रा' साप्ताहिकानेंहि ता. २६ जुलै १९३६ च्या अंकांत 'जमनालाल बजाज यांनीं जिंकलेला युरोप' या नांवाचा जमनालालजींची अब्रू-नुकसानी करणारा लेख लिहिला. त्यांत त्यांचेवर असा आरोप करण्यांत आला होता कीं, ४०००० रुपये किंमतीचें सेगांव हें खेडें शेठजींनीं ४००० रुपयांस गिळंकृत केलें; तसेंच कॉंग्रे-सचे ते खजीनदार असल्यानें त्यांचेजवळ असलेला कॉंग्रेसचा पैसा बिनव्याजानें घेऊन ते व्याजीं लावतात व नफा उकळतात.

अशा नालस्तीमुळें आपल्या पतीला व प्रतिष्ठेला धक्का पोंचत आहे, असें पाहून जमनालालजींनीं ता. २३ सप्टेंबर १९३६ रोजीं वर्ध्याच्या कोर्टांत 'चित्रा'चे संपादक श्री. मो. ग. रांगणेकर व श्री. अनंत आत्माराम काणेकर यांचेवर फिर्याद लावली. लेख लिहिणारे भाई जयवंत यांनाहि आरोपी करण्यांत आलें होतें.

खटल्याच्या सुरुवातीसच श्री. रांगणेकर-काणेकरांनीं लेखी माफी जमनालालजींना सादर केली. ती त्यांनीं स्वीकारली. त्यामुळें खटल्याच्या खोड्यांतून त्यांची सुटका झाली.

श्री. रांगणेकर-काणेकरांनीं आपल्या माफी-पत्रांत लिहिलें, "सदरहू लेखांतील विधानें अज्ञानमूलक, निराधार व खोटीं आहेत. तो लेख प्रसिद्ध करण्यांत आमच्याकडून चूक झाली." पण लेखक जयवंत यांना ६ महिने साधी कैद व ५०० रु. दंड अशी शिक्षा मॅजिस्ट्रेटनें सुनावली.

खोडसाळ लोकांची लबाडी जनतेसमोर जाहीरपणें मांडण्याचे दृष्टीनें या दोन वृत्तपत्रांवरील खटल्यांचा चांगला उपयोग झाला.

▲

अशी धुळवड करणारे लोक कोणत्याहि समाजांत केव्हांहि असणारच, पण ते थोडे. त्यामुळें महाराष्ट्र व जमनालालजी यांच्या प्रेम-भावांत कांहीं अंतर पडलें नाहीं. विनोबा तर महाराष्ट्रीयच. आणि ते केवळ जमनालालजींचे गुरु नव्हते, तर त्यांचे कुल-गुरु बनले. बजाजांचें कुटुंब हें जर एक विद्यापीठ मानलें, तर त्याचे कुलपति गांधीजी व कुल-गुरु विनोबाजी.

महाराष्ट्रांतील साधुसंतांच्या साहित्यावर जमनालालजींची गाढ श्रद्धा असे. तुकाराम-रामदासांचीं वचनें त्यांच्या जिभेवर नेहमीं खेळत. फार काय, १९४१ सालीं नागपूरच्या तुरुंगांत असतांना, त्यांनीं हरिभाऊ

आपटे यांच्या “ उषःकाल ” व “ मी ” या कादंबऱ्या वाचल्या; त्याचप्रमाणें श्री. वि. स. खांडेकर यांची “ हृदयाची हांक ” ही कादंबरी वाचून आपल्या रोजनिशींत त्यांनीं लिहिलें, “ सध्यांच्या परिस्थितीला योग्य अशी ही कादंबरी लिहिलेली आहे. तिचा मनावर परिणाम झाला व बराच काळ विचार चालू राहिले. ” पुढें खांडेकरांची “ उल्का ” वाचून तर त्यांना इच्छा झाली, या कादंबरीकाराचा परिचय करून घ्यावा,* या ‘ परिचया ’ चा हेतु खांडेकरांच्या गुणांचा उपयोग राष्ट्रकार्यास करून घ्यावा असाच असावा. अशी लोकसंग्रही वृत्ति जमनालालजींची होती.

मुळशी-सत्याग्रहाचे बाबतींत जमनालालजींची सहानुभूति शेतकऱ्यांचे बाजूस सहजच होती. तिचें प्रत्यक्ष फल हें कीं, त्या शेतकऱ्यांवर टाटा कंपनी अत्याचार करीत आहे हें कळतांच, त्या कंपनीतील आपले शेअर त्यांनीं विकून टाकले व मोठ्या नफ्यावर पाणी सोडलें.

कलकत्ता येथील आपल्या व्यापारामुळें आपल्याला कोर्टांत वारंवार जावें लागतें, हें लक्षांत येतांच त्यांनीं तेथील व्यापार आखडता घेतला.

साधेपणाचें अंतिम स्वरूप म्हणजे खादी. त्यांचें घर खादीमय झालें

* एका महाराष्ट्रीय साहित्यिकाविषयीं एका देशभक्त व्यापाऱ्याला वाटलेला हा आदरभाव विशेष महत्त्वाचा आहे, असें वाटल्यावरून मीं वरील मजकूर श्री. वि. स. खांडेकर यांना, त्यांच्यासाठीं–समारंभानिमित्त पाठविलेल्या अभिनंदनपर पत्रांतून, कळविला. श्री. खांडेकर यांनीं ता. २२ जानेवारी १९५८ रोजीं पाठविलेल्या उत्तरांत मला असें लिहिलें कीं, “ जमनालाल बजाज यांच्या रोजनिशींतील जीं दोन वाक्यें आपण कळविलीं, तीं परिचिताच्या गौरवपूर्ण लेखापेक्षांहि अधिक उत्तेजक वाटलीं. अपरिचित रसिक हाच एका दृष्टीनें लेखकाचा सर्वांत अधिक निःपक्षपाती टीकाकार होऊं शकतो. ” —लेखक

होतें. पण त्यांत एक उणीव न कळत राहिली होती. त्यांच्या घरांत शें-पन्नास नवारच्या खाटा होत्या. ती नवार खादीची नव्हती. म्हणून त्यांनीं ती नवार काढून टाकली. बारीकसारीक गोष्टींतहि ते तत्त्व-पालन करीत.

▲

विवाहांतील वायफळ अवडंबरावर पैशाची वारेमाप उधळपट्टी होते, याचा निषेध त्यांनीं केला होता आणि प्रसंग येतांच आपला आचार तसाच ठेवला. आपल्या मुलांमुलींचीं लग्नें गरिबांतील गरिबाप्रमाणें अत्यंत साध्या रीतीनें त्यांनीं केलीं.

'बोले तैसा चाले' हें जमनालालजींच्या जीवनाचें ब्रीदवाक्य. साधी राहणी ते नेहमीं तर ठेवीतच. पण लग्न-समारंभासारख्या नैमित्तिक प्रसंगींसुद्धां त्यांचा साधेपणावर कटाक्ष असे. त्यांची ज्येष्ठ कन्या कमला, हिचा विवाह रामेश्वरप्रसाद यांचेशीं ठरला. तो मुंबईत थाटामाटानें व्हावा अशी दोन्हींकडील आप्तेष्टांची इच्छा. परंतु जमनालालजींनीं गांधीजींच्या सत्याग्रहाश्रमांतच तो करण्याचें ठरविलें. मुंबई नाहीं नि वर्धा पण नाहीं. त्यांच्या व्याह्यानेंहि तें मानलें. त्यामुळें ता. २६ फेब्रुवारी १९२६ रोजीं हा विवाह अत्यंत साधेपणानें पार पडला.

नाच-गाणें, मेजवानी-मेवामिठाई-वाद्यें-रोषणाई हें सारें अवडंबर, त्या जुन्या काळांत-आणि मारवाडी समाजांत-किती तरी दिवस चालावयाचें. पण त्या सर्वांना फाटा देण्याचें धैर्य जमनालालजींनीं दाखविलें. अशी लहानशी परंपरा मोडणेंहि, लोखंडाची सांखळी तोडण्यापेक्षां, अधिक शक्तीचें काम असतें.

या साध्या विवाहाचें वैभव एकच आणि तें म्हणजे महात्माजींचा पवित्र आशीर्वाद. तो त्यांनीं असा दिला कीं, "वधू-वर दीर्घायु होवोत आणि आपापल्या वडिलांची कीर्ति वाढवोत. धर्माचें रक्षण व देशाची सेवा सदैव करोत."

▲

पवनारचा तो पवित्र परिसर. पवनार नदीच्या कांठावर ‘जमना-कुटीर’ नांवाची झोपडी. तींत १९४२ सालीं जमनालालजी पांच दिवस पूर्ण मौन धारण करून राहिले. त्या वेळीं त्यांचा ५३ वा वाढदिवस होता. तिथि व तारीख यांत पांच दिवसांचें अंतर पडलें होतें. त्या काळांत केवळ दुग्धाहार व फलाहार यावरच ते राहिले. गांधीजी व विनोबाजी या साधुसंतांनीं तपोभूमि बनविलेल्या त्या पावन परिसरांत त्यांनीं जणुं तपच आरंभिलें. ते आत्मचिंतन करीत राहिले. ‘कपिला’ नांवाची एक गाय गोपुरीच्या आश्रमांत होती. तिची सेवा ते करीत होते. जणुं कांहीं दिलीप राजाचेंच ते अनुसरण करीत होते.

मातृसुखाला ते वंचित झाले होते. दत्तक गेल्यामुळें त्यांना दोन माता होत्या हें खरें. पण दत्तक घेणारी माता त्यांच्या लग्नानंतर थोड्याच दिवसांनीं मृत झाली. आणि जन्मदात्री माता मातृ-देवतेचें ज्ञानमय सौख्य देऊं शकत नव्हती. म्हणून मातृ-प्रेमाची आस जमनालालजींना तीव्रतेनें लागली होती,

आईची ही ओढ दिवसेंदिवस त्यांना अधिक लागत चालली. १९४१ सालीं तुरुंगांतून सुटून आल्यावर, प्रकृति सुधारण्यासाठीं, त्यांना गांधीजींनीं सिमला येथें पाठविलें. तेथून त्यांनीं गांधीजींना पत्र लिहून कळविलें, “माझी आई मला अत्यंत प्रिय आहे. परंतु माझी ज्ञानाची भूक तृप्त करूं शकेल, आणि आपल्या मांडीवर घेऊन मला निजवूं शकेल, अशी आध्यात्मिक माता मला मिळावी अशी माझी इच्छा आहे.”

गांधीजींनीं विनोदानें उत्तर लिहिलें, “तुम्ही पर्वतासारखे धिप्पाड ! तुम्हांला आपल्या मांडीवर खेळविणारी माता कोठें मिळूं शकेल ? तथापि आपली इच्छाच असेल तर, सिमल्याहून वर्ध्याला परत येतांना, डेहराडून येथें उतरा. तेथें कमला नेहरू यांची गुरु ‘आनंदमयी’ नांवाची एक बाई आहे. तिची भेट घ्या.”

गांधीजींच्या सूचनेनुसार जमनालालजी डेहराडूनला उतरले. तेथें दोन तास राहण्याचा त्यांचा बेत होता. पण तेथील शांत व प्रसन्न वातावरण पाहून, त्यांचें मन मोहित झालें. आनंदमयीची सात्विक व तेजस्वी मुद्रा अवलोकन करून तर त्यांना वाटलें, "अखेर, आज आपल्याला आध्यात्मिक आई भेटली."

"आनंदमयी म्हणजे अहिंसा व प्रेम यांची मूर्ति आहे." असें त्यांनीं पुढें गांधीजींना लिहून कळविलें. त्यांनीं तिला आपली भाबडी इच्छा सांगितली, "आई, मी तुझ्या मांडीवर निजूं शकेन का?"

"त्याला काय हरकत?" असें म्हणून आनंदमयींनीं जमनालालजींना आपल्या मांडीवर निजविलें. डोळे मिटून ते त्या मातृ-सौख्याचा अनुभव घेत राहिले.

थोडा वेळ गेला. आणि जमनालालजींनीं डोळे उघडले. त्यांचें मन शांत झालें होतें—जीवन कृतार्थ झालें होतें. "या वेळीं माझे प्राण गेले, तरी मला पर्वा नाहीं. आतां माझें मन कोणत्याच वस्तूंत राहिलें नाहीं." असे धन्यतेचे उद्गार त्यांच्या तोंडून निघाले.

त्या आनंदाचे भरांत त्यांनीं आपल्या नव्या मातेजवळ तीन इच्छा प्रगट केल्या. त्या म्हणजे—(१) आश्रमाजवळ स्वतःचें घर बांधावें (२) मला 'शेठजी' न म्हणतां दुसरें कांहीं नांव द्यावें. (३) माझा मृत्यूचा दिवस सांगावा.

आनंदमयींनीं पहिली मागणी मान्य केली व दुसऱ्या मागणीप्रमाणें 'भैय्या' शब्द सुचविला. पण मृत्यु-तिथि सांगण्यास नकार दिला. परंतु जमनालालजींनीं आग्रह धरला. "मृत्यूचा दिवस न सांगाल तर मी तोंडांत पाणी घेणार नाहीं." अशी प्रतिज्ञा त्यांनीं केली. तेव्हां मातेनें नाइलाजानें सांगितलें, "सहा महिन्यांची तयारी ठेवा." ही मुदत ता. १५ फेब्रुवारी १९४२ रोजीं संपत होती. तोंपर्यंत वर्ध्या-बाहेर जावयाचें नाहीं आणि मोटार-आगगाडींत बसावयाचें नाहीं,

असा निश्चय जमनालालजींनीं केला. पण जें घडावयाचें तें घडलेंच—फक्त चार दिवस आधीं !

▲

दिवसेंदिवस त्यांचें आत्मचिंतन वाढत चाललें. सारी सृष्टि मातेच्या स्वरूपांत पाहण्याचा ते प्रयत्न करूं लागले. त्या कामीं "गोमातेनें मला मार्ग दाखविला" असें ते म्हणूं लागले. सामाजिक व राजकीय कार्यांतील वादांचा त्यांना वीट आला. फार काय, आपला व्यापार व उद्योगधंदा यांच्यांतूनहि त्यांनीं आपलें मन पूर्णपणें काढून घेतलें.

आरंभापासूनच ते 'पद्मपत्रमिवाम्भसा' असा व्यापार करीत. त्याला आपलें स्वतःचें नांवहि त्यांनीं कधीं दिलें नाहीं. 'बच्छराज आणि कंपनी' या नांवानेंच सारे व्यवहार होत. १९२० सालापासूनच जमनालालजी व्यापारांतून निवृत्त होत चालले होते. आणि १९३० सालापासून तर त्यांनीं त्याकडे पूर्ण पाठ फिरविली होती. परंतु आतां एक क्षणभरहि व्यापाराचा विचार ते आपल्या मनांत शिरकूं देत नसत. आयुष्याच्या शेवटीं शेवटीं तर केवळ गो-सेवेंत ते गढले होते.

गोसेवा—हेंच एक त्यांनीं आपलें जीवित-कार्य मानलें—आणि त्याच्याशीं ते अगदीं तन्मय झाले, एकाग्र झाले. त्यांचा आत्मीय भाव केवळ मानव-जातीपुरता मर्यादित न राहतां मूक प्राण्यापर्यंत जाऊन पोहोंचला. त्यामुळें त्यांच्या सेवेचें क्षितिज विशाल झालें. गोसेवेंत द्वेष-मत्सरादि भावनांचें वारेंहि साहजिकच नसे. घाण-गदळ नसलेलें, वस्रगाळ केलेलें शुद्ध पाणीच तें ! त्यामुळें गो-सेवेपासून त्यांना अपार मानसिक शांति लाभली.

जमनालालजींनीं गांधीजींना सांगितलें, "गोसेवासंमेलन भरवावें असें मला वाटतें." त्यांनीं संमति दिली. १९४२ चा फेब्रुवारी महिना उजाडला. संमेलन भरलें. देशांतील तज्ज्ञ व कार्यकर्ते जमले. गांधीजींच्या मार्ग-दर्शनाखालीं व विनोबांच्या अध्यक्षतेखालीं संमेलन यशस्वी झालें.

गो-सेवेच्या कार्याला त्यांनीं वाहून घेतलें, ते अगदीं एकतानतेनें. ते वर्धा येथील 'गो-रक्षणी संस्थेचे' अध्यक्ष पूर्वींच बनले होते. त्या वेळीं त्या संस्थेंत ४०० गाई-वासरें होतीं—शिवाय म्हशीहि होत्या. त्या त्यांनीं बाहेर काढल्या.

आधुनिक पद्धतीनें गो-रक्षण व गो-संवर्धन कसें करावें याचें ज्ञान त्यांनीं करून घेतलें आणि संस्थेच्या नोकरांना सूचना दिल्या कीं, "बंद केलेल्या भांड्यांतून दूध विकावयास पाठवावें. प्रत्येक गाईच्या दुग्धोत्पादनाची नोंद ठेवावी. दुधाच्या प्रमाणांत चारा द्यावा. तो यंत्रानें कापून द्यावा. शिल्लक राहिलेल्या दुधाचें तूप बनवावें. हिरव्या चाऱ्याची शेती सुरू करावी. त्यासाठीं विहिरी खणाव्या. जनावरांचा दवाखाना चालवावा."

बैलगाडींत बसून जमनालालजी आजूबाजूच्या गांवांतहि जात आणि डोंगरांत—अरण्यांत हिंडून, तेथील गाईंच्या पाण्या—चरण्याची व्यवस्था पाहात व गांवकऱ्यांना योग्य त्या सूचना देत. गाईची जात सुधारून तिची दुग्धदायिता वाढविण्याचें शास्त्रोक्त प्रयत्न ते करीत. खुद्द वर्धा येथें गो-दुग्धाचें उत्पादन इतकें वाढलें कीं, रेल्वे-स्टेशनावर तें विकावें लागलें. 'माल जास्त, मागणी कमी' अशी उलटी व आनंददायक स्थिति तेथें निर्माण झाली.

वर्धा येथील मुसलमानांनीं १९२२ सालीं गो-हत्या करण्याचें स्वेच्छेनें बंद केलें. ईदच्या दिवशींहि त्यांनीं गाईची कुरबानी केली नाहीं. उलट श्रीशंकराचार्य डॉ. कुर्तकोटी तेथें गेले असतां त्यांना मुसलमानांनीं एक चांगली शृंगारलेली गाय, प्रेमाची खूण म्हणून, सन्मानपूर्वक अर्पण केली. पुढें वर्धा नगरपालिकेनें गो-हत्या-बंदीचा ठराव केला.

जमनालालजी आपल्या आयुष्याचे अखेरीस गो-सेवेकडेच कां वळले? त्यांचें चित्त विधायक कार्यांतच अधिक रमत असे, हें खरें; पण त्या

कार्यपैकीं गाईची सेवाच त्यांनीं कां निवडली? "गाय हा एक उपयुक्त पशु आहे—माता नव्हे कीं देवता नव्हे." हा बुद्धिवादी विचार त्यांच्या कृतीचे आड कसा आला नाहीं? मानव-सेवेचीं कामें काय थोडीं पडलीं होतीं?

असेच आक्षेप खुद्द गांधीजींना एका समाजवादी स्त्रीनें समक्ष ऐकविले होते. तिला उत्तर देतांना गांधीजी म्हणाले होते, "माझी गो-सेवा ही मानव—सेवाच आहे." गाय सुधारली म्हणजे शेती सुधारेल आणि मग मानवाला भरपूर अन्न-धान्य मिळेल हा त्याचा भावार्थ. शिवाय पूर्णान्न असणारें गो-दुग्ध हें मानवाच्या आरोग्याला अमृतासारखें आहे. केवळ बुद्धिवादाची कसोटी लावली, तरी गाईचें संरक्षण व संवर्धन हें हितावहच ठरतें.

आणि गांधीजींची गो-सेवा म्हणजे गाईचें पुच्छ डोळ्याला लावून व तिला गंधफुलें वाहून चहाच्या डबक्यांत डुंबावयास सांगणारी आंधळी व निष्क्रिय नव्हती. पांजरपोळांत लुळयापांगळ्या गाईंचा सांभाळ करणें हें निव्वळ भूतदयेच्या दृष्टीनें धर्म-कृत्यच आहे; पण त्याशिवाय ज्या हजारों-लाखों गाई सुदृढ, तरुण व दुग्धदायी असतांना कत्तलखान्याकडे हाकलल्या जातात, त्यांचें काय? देशांत चारा अपुरा आहे, म्हणून सध्यां होतो तेवढा गो-संहार अवश्यच आहे, असें गणित मांडणें निर्बुद्धपणाचें आहे.

कसायाच्या सुरीपासून सशक्त व दुभत्या गाई वांचविणें, गाईची दूध देण्याची शक्ति वाढविणें, तिची अवलाद सुधारून तिची नीट निगा राखणें, मृत्यूनंतर तिच्या चामड्याचे पदार्थ बनविणें यावर गांधी-जींचा—आणि तसाच जमनालालजींचा—भर होता. त्याला विज्ञाननिष्ठ पंडित तरी नांवें ठेवूं शकेल काय? गाईचें मोल वाढलें म्हणजे तिची विक्री व कत्तलहि आपोआप थांबेल, म्हणून तिच्या दुधातुपाला खूप मागणी असावी, या हेतूनें गांधीजींनीं 'गो—सेवा—व्रत' सुरू केलें. तें

व्रत घेणाऱ्यानें केवळ गाईचेंच दूध, दहीं, तूप इत्यादि पदार्थ सेवन केले पाहिजेत. 'गो–सेवा–संघाच्या' कार्यकर्त्याला असा नियम करावा लागत असे. तसा तो जमनालालजींनीं केला होता–आणि धार्मिक व्रताप्रमाणें, कांटेकोरपणें पाळला होता. त्यांच्या पत्नी जानकीदेवी यांनींहि तें व्रत या संघ-स्थापनेपूर्वीं वीस वर्षें स्वीकारलें आहे आणि आजमितीपर्यंत अखंड व अचूक चालविलें आहे.

शेती व आरोग्य यांची गंगोत्री असणाऱ्या गाईकडे गांधीजी—आणि जमनालालजी-आध्यात्मिक दृष्टीनेंहि पाहात. 'गाय म्हणजे पावित्र्याचें काव्य आहे.' असें वर्णन गांधीजी करीत. कारुण्याची मूर्ति असणारी गाय ही सर्व पशु–सृष्टीची प्रतीक मानली गेली आहे. अध्यात्म-दृष्टीनें 'आब्रह्मस्तंब'पर्यंत एकच ईश्वरी तत्त्व स्फुरण पावत आहे, हा सिद्धान्त ज्याचे अंगीं बाणला, तो आपली आत्मौपम्य दृष्टि केवळ मानव प्राण्यापुरतीच मर्यादित कशी ठेवील? त्याचें दुसरें क्षितिज पशुसृष्टि. माणसाप्रमाणेंच पशूलाहि, परमेश्वराचे अंश मानून, त्यावर प्रेम करणें, त्याची सेवा करणें, ही आध्यात्मिक विकासाची एक पायरी आहे, असें जमनालालजी मानीत.

• • •

## १० : राष्ट्रसेवक कुटुंब

*पांडुरंग आमुचा पिता । रखुमाई आमुची माता ॥*
*भाऊ पुंडलीक मुनि । चंद्रभागा आमुची बहिणी ॥*

*— तुकाराममहाराज*

मानव-सेवेचें एक अंग म्हणून गांधीजी देश-सेवा करीत, आणि त्याच मार्गानें जमनालालजी चालले होते. देशभक्तीची दीक्षा त्यांनीं लहानपणापासूनच घेतलेली होती. लोकमान्य टिळकांच्या 'केसरी' पत्रास १०० रुपयांची देणगी आपल्या खाऊच्या पैशांतून त्यांनीं पाठविली होती. पुढें मोठेपणीं त्यांना हें पटलें कीं, दारिद्य, अपमान, जुलूम, विषमता, शोषण इत्यादि अनेक पापांची जननी म्हणजे राजकीय परतंत्रता. ती दूर करण्यासाठीं जमनालालजी तन-मन-धनानें झटत— तुरुंगवासांतील कष्ट, हाल व यातनाहि आनंदानें सहन करीत.

१९२३ सालीं, गांधीजी तुरुंगांत असतांना, जमनालालजींनीं नागपूरच्या 'झेंडा सत्याग्रहा'चें नेतृत्व स्वीकारलें आणि १॥ वर्षे कैद व ३००० रुपये दंड अशी शिक्षा शिरावर घेतली. त्या दंडासाठीं त्यांची

मोटारगाडी वगैरे घरचा माल जप्त झाला. पण तो विकत घेण्यास तेथें पुढें कोणी आलें नाहीं.

१९३० सालीं मिठाचा सत्याग्रह त्यांनीं केला. विले-पार्ले येथील छावणीमध्यें त्यांनीं सत्याग्रहाचें संचालन केलें. त्यांना दोन वर्षें तुरुंगवासाची शिक्षा झाली. त्या वेळीं ठाण्याच्या तुरुंगांत त्यांना राहावें लागलें.

१९३२ सालीं त्यांना पुनः सरकारनें अटक केली आणि विसापूर, धुळें, येरवडा व नाशिक या तुरुंगांत ठेवलें.

१९३९ सालीं जयपूर दरबारचा मनाई–हुकूम त्यांनीं मोडला. त्या सत्याग्रहाबद्दल त्यांना तेथेंच पांच महिने स्थानबद्ध म्हणून राहावें लागलें.

१९४१ सालीं गांधीजींनीं वैयक्तिक सत्याग्रहाचें रणशिंग फुंकलें. तेव्हां

"इस अंग्रेजी लडाईमें आदमी या पैसेसे मदद देना हराम है।
लडाईयोंका सही विरोध अहिंसासे ही हो सकता है॥"

अशी रण-गर्जना करून जमनालालजींनीं नागपूरच्या तुरुंगांत प्रवेश केला.

हे पांचहि तुरुंगवास त्यांनीं मोठ्या संयमानें व शांतपणानें सोसले. तुरुंगवासांत तत्त्व-निष्ठा कसास लागण्याचे प्रसंग वारंवार येतात. त्या वेळीं जमनालालजींचें खरें स्वत्व दिसून आलें.

१९३२ सालीं त्यांना मुंबई येथें अटक झाली व दोन वर्षांची सक्त-मजुरीची शिक्षा झाली; एवढेंच नव्हे तर, त्यांच्यासारख्या लक्ष्मीपुत्राला 'क' वर्ग देण्यांत आला. जणुं कांहीं त्यांना पुरी अद्दल घडावी म्हणूनच, मुंबई सरकारनें आपल्या राज्यांतील, वाईटांतील वाईट तुरुंग जो विसापूरचा, तेथें त्यांना डांबलें. तेथील पाणी वाईट, हवा वाईट आणि इतर कैदीहि गुन्हेगार. तशाहि वातावरणांत जमनालालजींनीं कांहीं दिवस काढले.

पुढें सरकारनेंच त्यांची बदली धुळ्याच्या तुरुंगांत केली. ती बदली होण्याची कुणकुण त्यांच्या मित्रांना आगाऊ कळली. ते त्यांच्या स्वागता-

साठीं धुळें स्टेशनवर जाऊन उभे राहिले. गाडी आली, आणि त्या मित्रांना जमनालालजी तिसऱ्या वर्गाच्या डब्यांतून उतरतांना दिसले.

चड्डी–कुडता–टोपी अशा कैद्याच्या वेषांत उभी असलेली ती जमनालालजींची मूर्ति ! त्यांच्या मित्रांच्या डोळ्यांतून अश्रु गळाले !

"तुम्ही आपले कपडे घालूं शकतां." असें पोलीस-अधिकाऱ्यानें जमनालालजींना सुचविलें होतें. पण नाहीं. जें वाण बुद्धया घेतलें, तें निष्ठेनें पार पाडावयाचें हें त्यांचें व्रत. स्टेशनवरील मुशाफरखान्यांत ते जाऊन बसले व आपल्या मित्र-मंडळींशीं अर्धा तास बोलत राहिले. कांहीं मित्रांनीं त्यांना आग्रह केला, "आमच्या मोटारींतून तुरुंगापर्यंत चला." पण नाहीं. जमनालालजी पायीं एक मैल चालत जाऊन तुरुंगांत दाखल झाले.

गंमत ही कीं, जमनालालजी आपल्या तुरुंगांत येणार आहेत, याची वर्दी तुरुंगाच्या अधिकाऱ्याला मुळींच नव्हती, पण तुरुंगांत असलेल्या विनोबाजींना होती. गाडीची वेळ होऊन गेली, तरी जमनालालजी आले नाहींत. म्हणून विनोबांनीं तुरुंगाधिकाऱ्याकडे चौकशी केली. तिचें उत्तर तो काय देणार ? उलट त्यानें खडसावलें, "ही बातमी तुरुंगांत आलीच कशी ?"

ही चर्चा चालू असतांनाच जमनालालजी तुरुंगाच्या दारांत येऊन पोचले. चौकशीअंतीं तुरुंगाधिकाऱ्याला असें दिसून आलें कीं, एका नोकरानें ही बातमी तुरुंगांत आणून सोडली होती, त्या नोकराला बडतर्फ करण्याचा हुकूम सुटला. बिचारा नोकर रडूं लागला. विनोबा व जमनालालजी यांनीं रदबदली केली, तेव्हां त्याची नोकरी कायम राहिली. विनोबा 'ब' वर्गांत होते. जमनालालजींनाहि त्या वर्गांत ठेवण्यास सरकार तयार होते, पण त्याला त्यांनीं नकार दिला.

त्या वेळीं त्यांनीं मुंबई सरकारला लिहिलेलें पत्र त्यांच्या मनाची थोरवी दाखविणारें आहे. ता. ७ एप्रिल १९३२ रोजीं लिहिलेल्या

पत्रांत आपण 'ब' वर्ग कां नाकारतों व 'क' वर्गातच कां राहूं इच्छितों, याची मीमांसा त्यांनीं फार चांगली केली आहे. ते लिहितात,

"कायदेभंगाच्या चळवळींतील बहुसंख्य कार्यकर्ते 'क' वर्गातच ठेवलेले आहेत. त्यांना मानवाच्या प्राथमिक सुखसोयीहि देण्यांत येत नाहींत. हा मोठा अन्याय आहे. प्रत्येक कैद्याला मानवतेला धरून वागणूक मिळाली पाहिजे, असें माझें ठाम मत आहे. म्हणून मी वरच्या वर्गांत जाऊं इच्छित नाहीं. वरच्या वर्गाला सवलती देऊन सरकारनें कार्यकर्त्यांमध्यें निष्कारण विषमता निर्माण केली आहे. कांहीं थोड्या कैद्यांना सवलती देऊन माझ्या बहुसंख्य 'कवर्गीय' बंधुभगिनींचे हाल छपविण्याचें सरकारचें धोरण दिसतें. म्हणून मी 'क' वर्गातच राहणें पसंत करतों."

त्या वेळीं 'कवर्गीय' कैद्यांसाठीं सरकार प्रत्येकीं दररोज फक्त दीड आणा खर्च करी. त्यावरून अन्न कोणत्या तऱ्हेचें मिळत असेल याची कल्पना करतां येते. पण त्याबद्दल जमनालालजींनीं तोंडांतून तक्रारीचा शब्दहि काढला नाहीं. प्रसन्न चित्तानें ते आपलें काम पार पाडीत. परंतु शरीराचें वजन मात्र एकसारखें घटत राहिलें. तें पाहून तुरुंगाधिकाऱ्यानेंच त्यांना भात, गव्हाची रोटी, गाजरें देण्यास सुरुवात केली. बाहेरून लोणी आणण्यासहि त्यानें मुभा दिली. त्याचप्रमाणें जमनालालजींचें टपाल दररोज त्यांच्या नोकरानें आणण्यास त्यानें परवानगी दिली.

एके दिवशीं टपाल पाहण्यांत जमनालालजींचा बराच वेळ गेला. कारण त्यांचे व्यवहार मोठे व नाना प्रकारचे. पण तो विलंब तुरुंगाधिकाऱ्याला सहन झाला नाहीं. अधिकाराच्या तोऱ्यांत तो गुरगुरला, "तुमच्या अन्नांत सुधारणा झाली, बाहेरून लोणीहि मिळूं लागलें आणि दररोज टपालहि मिळूं लागलें. आणखी सुख तें काय पाहिजे?" हे त्याचे शब्द जमनालालजींच्या अंतःकरणास झोंबले. ते ताडकन् बोलले,

" साहेब, आपल्या मेहेरबानीवर राहणें मला पसंत नाहीं तुरुंगाच्या नियमाप्रमाणें जे पदार्थ मला मिळूं शकणार नाहींत, ते मी घेणार नाहीं. " तेव्हांपासून बाहेरून लोणी घेण्याचें त्यांनीं बंद केलें.

एप्रिल महिना. उन्हाळ्याचे दिवस. तुरुंगांत पाण्याची टंचाई. तेव्हां जमनालालजींनीं तुरुंगाधिकाऱ्याला समजाविलें, " तुरुंगांतील एक विहीर बंद आहे, ती उघडा. "

" तिचें पाणी कोण काढणार ? " तुरुंगाधिकारी कडाडला.

" मी काढीन—माझे मित्र काढतील. " जमनालालजींनीं धीरगंभीर स्वरांत उत्तर दिलें.

विहीर सुरू झाली. तिच्यांतून पाणी निघूं लागलें. त्यासाठीं जमनालालजी व त्यांचे सहकारी अंगांतून घाम गाळूं लागले. मोटेचें पाणी काढतांना बैल जसे पुढेंमागें जातात, तशा फेऱ्या त्यांना माराव्या लागल्या. तुरुंगाधिकाऱ्याचा आपल्या डोळ्यावर विश्वासच बसेना. ज्याचे घरीं लक्ष्मी पाणी भरीत आहे, तो येथें पाणी भरण्यासाठीं बैलाप्रमाणें श्रम करीत आहे, हें त्याला अद्‌भुत वाटलें. त्यानें आपल्या कॅमेऱ्यानें त्या दृश्याचें छायाचित्र घेतलें.

एकदां जमनालालजींची मुलाखत घेण्यासाठीं त्यांची वृद्ध माता तुरुंगांत आली. बरोबर पत्नी होती; आणि इतर आप्तेष्टहि होते. जमनालालजींचा तो कैद्याचा ओबडधोबड पोशाख, तें कृश झालेलें शरीर आणि तुरुंगांतील एकंदर वातावरण पाहून आईच्या डोळ्यांतून आंसवें गळूं लागलीं.

जमनालालजींचें वजन ४० पौंडांनीं घटलें. त्यासंबंधीं विधि-मंडळांत प्रश्नोत्तरें झालीं, त्यामुळें त्यांची बदली येरवड्याच्या तुरुंगांत झाली. तेथील व्यवस्था तुलनेनें ठीक होती.

परंतु धुळ्याच्या तुरुंगांत जमनालालजींना स्वर्गसुख लाभलें. तें म्हणजे विनोबाजींचा सहवास. चोवीस तास गुरूचें सान्निध्य लाभलें.

याचा हर्ष जमनालालजींना पराकाष्ठेचा झाला. विनोबांचीं 'गीता-प्रवचनें' जमनालालजींनीं तेथेंच ऐकलीं. तेव्हां त्यांना आपल्या अंतःकरणास अभ्यंगस्नानच घडलेंसें वाटलें. 'गीताई' त्याच तुरुंगांत सिद्ध झाली.

'गीताई' लिहिली तरी ती आपल्या इतर लेखनाप्रमाणें गंगार्पण करावी असाच विनोबांचा मूळ विचार. पण जमनालालजींच्या आग्रहामुळें हे दोन्ही ग्रंथ प्रकाशित झाले. त्यांचें पहिले प्रकाशक म्हणून जमनालालजींचेंच नांव आहे. अर्जुनाच्या मिषानें जगाला श्रीकृष्णाकडून गीता लाभली, तशी जमनालालजींच्या निमित्तानें, विनोबांपासून भारताला 'गीताई' मिळाली, मराठी–हिंदी–गुजराती आदि भाषा–भगिनींच्या अंकावर खेळली व लाखों लोकांना पावन करूं लागली. गीतेच्या गंगा–प्रवाहानें नरकाचा स्वर्ग बनला !—कारागृहाची तपोभूमि झाली !

धुळ्याच्या तुरुंगांत असतांना जमानालालजींवर कसोटीचे दोन प्रसंग आले. एके दिवशीं रामेश्वरदास बिर्ला यांचा निरोप आला. तो असा कीं, "आपली साखरेची गिरणी चालूं शकत नाहीं. कारण तिला जरूर असलेला गंधकाचा परवाना सरकार देत नाहीं. आपण या गिरणीचे एक डायरेक्टर आहां आणि सरकारच्या विरुद्ध कार्य करीत आहां. म्हणून आपण सरकारला असें लिहून द्यावें कीं, "गंधकाचा उपयोग दारू बनविण्याचे कामीं आम्हीं करणार नाहीं."

जमनालालजींना असा कबुलीजबाब देणें अपमानाचें वाटलें. कारण ते स्वतः अहिंसक होते. स्फोटक दारू आम्ही करूं अशी शंका सरकारनें घेणें हाच त्यांना आपला उपमर्द वाटला. त्यांनीं ताडकन् उत्तर दिलें, "गिरणी बंद झाली तर खुशाल होऊं दे. मी अशी कबुली लिहून देणार नाहीं."

पुढें असेंब्लींत यासंबंधीं प्रश्न विचारण्यांत आले, तेव्हां सरकारनें उत्तर दिलें, "गिरणीला परवानगी देण्यांत येईल."

दुसरा प्रसंग मगनवाडीच्या बागेसंबंधीं होता. त्या वेळीं त्या जागेला मगनवाडी नांव मिळालें नव्हतें. सरकारनें मगनवाडीचा ताबा घेऊन तेथें आपले पोलीस ठेवले होते. तेथें बाग–बगीचा होता, त्याची काळजी कोण घेणार ? झाडें सुकून चाललीं. म्हणून सरकारनें जमनालालजींना कळविलें, " झाडांना पाणी देण्याची व्यवस्था तुम्ही करीत असाल, तर आमची ना नाहीं. "

जमनालालजींनीं उत्तर दिलें, "मी तर माझ्या बागेची होळी करूनच येथें आलों आहें. आतां मी माझ्या माणसाला तेथें पायदेखील ठेवूं देणार नाहीं. "

तीन तुरुंगांचा खडतर अनुभव घेऊन जमनालालजी येरवड्याच्या तुरुंगांतून बाहेर पडले. बाहेर पडतांना त्यांनीं आपल्याबरोबर एक टिनपॉट व कटोरी घेतली. पुष्कळ दिवस या दोन वस्तु ते वापरीत असत. कारण ते म्हणत, " जोंपर्यंत बापूजी बंधमुक्त झाले नाहींत, तोंपर्यंत मी स्वतःलाहि बंधमुक्त मानीत नाहीं. "

गांधीजींच्या प्रेरणेनें व जमनालालजींच्या प्रयत्नानें वर्धा शहर हें ' संस्था-नगरी ' बनलें. निरनिराळ्या विधायक कार्यासाठीं भिन्न-भिन्न संस्थांचें जाळेंच तेथें निर्माण झालें. तें राष्ट्रीय तीर्थक्षेत्र झालें. एकदां वल्लभभाई थट्टेनें म्हणाले, "जमनालालजींनीं आपली झोपडी अशा जागीं बांधली आहे कीं, तेथून आपल्या सर्व कार्यावर नजर ठेवतां यावी. एका कोपऱ्यांत ' मगनवाडी ' आहे आणि तिच्याजवळच 'काकावाडी' आहे. दुसरीकडे ' मारवाडी विद्यालय ' आहे आणि त्याच्यासमोरच ' महिलाश्रम ' आहे आणि जवळच ' हरिजन-वस्तीगृह ' आहे. इकडे नालवाडी अन् तिकडे तें ' सेवा-ग्राम ' आणि तें ' परंधाम ' ! ती ' गो-पुरी ! ' तें ' चर्मालय ! ' तें ' महारोगी सेवा-मंडळ ! ' छे ! छे ! अगदीं कहर केला आहे जमनालालजींनीं ! "

त्या आपल्या सर्व संस्थांवर निरंतर नजर ठेवतां यावी म्हणूनच कीं काय, तेथेंच त्यांनीं आपला देह ठेवला.

याशिवाय ग्रामोद्योग, नई तालीम, गो-सेवा, राष्ट्रभाषा इत्यादींच्या कैक संस्था तेथें फुलल्या आहेत. राष्ट्रहितकारी संस्थांचा कल्पवृक्षच दिसतो तेथें !

त्या कल्पवृक्षाला पाण्यासारखें द्रव्य ओतण्यास जमनालालजी सदैव सिद्ध होते. त्यांनीं आपल्या आयुष्यांत गुप्त व प्रगट असा किती दान-धर्म केला, हें एक तेच जाणोत ! कैक कार्यकर्त्यांना त्यांनीं गुप्त-दानें दिलीं. पण जाहीर झालेल्या व संस्थांना दिलेल्या देणग्यांची रक्कम २५ लाखांहून अधिक होती. आणि ती त्यांच्या संपत्तीच्या मानानें फारच मोठी होती. एखाद्या नवकोट-नारायणानें एवढें दान केलें असतें, तर त्यांत कांहीं आश्चर्य नव्हतें; पण तसें नसतांना, जवळ जवळ सर्वस्व-दान जमनालालजींनीं केलें.

त्यांच्या ठळक देणग्या अशा—

| | |
|---|---|
| (१) गांधी-सेवा-संघ | २५०००० |
| (२) टिळक स्वराज्य फंड | २००००० |
| (३) मारवाडी शिक्षा मंडळ वर्धा | ८०००० |
| (४) सत्याग्रहाश्रम, वर्धा | ७५००० |
| (५) सत्याग्रहाश्रम, साबरमती | ३५००० |
| (६) मारवाडी अगरवाल महासभा | ६१००० |
| (७) काशी येथील हिंदु-विश्वविद्यालय | ५१००० |
| (८) जगदीशचंद्र बोस यांची विज्ञानशाळा | ३५००० |
| (९) गुजरात विद्यापीठ | २१००० |
| (१०) मुसलमान विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या | २१००० |
| (११) नागपूर झेंडा सत्याग्रह | १०००० |
| (१२) नागपूर कॉंग्रेस | १०००० |

| | |
|---|---|
| (१३) नाशिक कुंभमेळा | १०००० |
| (१४) राजस्थान केसरी | १०००० |
| (१५) 'कर्मवीर'-पत्र | ६००० |
| (१६) जालीयनवाला बाग स्मारक | ७५०० |
| (१७) असहयोगाश्रम, नागपूर | ६००० |

जमनालालजी मनांत असें मानीत कीं, आपण तरुणपणीं आपल्या आजोबांना पत्र लिहून त्यांच्या सर्व मिळकतीवर पाणी सोडलें, तें कायमचेंच. ती मिळकत सुमारें चार लाखांची होती. ती मनापासून समाजाला देणगीच दिली आहे असें मानून, बच्छराजजींनीं ठेवलेली सारी जिंदगी तिच्या व्याजासह ते सुरवातीपासून दानधर्मांत खर्च करीत. असें दान त्यांनीं तीन-चारदां केलें. सर्वस्व-दानालाहि ते आतुर होते, पण गांधीजींनीं सबुरीचा सल्ला दिला.

पुढें जमनालालजींच्या मृत्यूनंतर, त्यांच्या मृत देहाला साक्ष ठेवून, जानकीदेवींनीं आपलें अडीच लाखांचें स्त्री-धन गो-सेवेसाठीं कृष्णार्पण केलें. पुढें कमलनयनजी व रामकृष्णजी यांनीं अर्ध्या जिंदगीचा 'श्रीजमनालाल सेवा ट्रस्ट' केला; आणि गांधीजींच्या सल्ल्यानुसार, ट्रस्टाशिवाय इतर देणग्याहि दिल्या.

बजाजवाडी येथील अतिथि-गृहांत राष्ट्रीय नेत्यांचा पाहुणचार करण्यासाठीं दरसाल सुमारें २०००० रुपये खर्च होई. त्याची एकूण रक्कम २॥ लाखांवर गेली असेल. कांहीं कांहीं वेळीं राष्ट्रीय पाहुण्यांची तेथें इतकी गर्दी होई कीं, जमनालालजी व त्यांचीं मुलेंबाळें यांना निजावयास खोलीच शिल्लक राहात नसे व म्हणून तें सेवाशील कुटुंब अंगणांतच निजे. तशीच गर्दी भोजनाची. एकदां एका पंक्तींत २७ देशांतील ७८ जातींचे प्रतिनिधि जेवणास होते. आणि प्रत्येकाच्या पथ्य-रुचि-मतानुसार ४२ निरनिराळीं ताटें तयार करण्यांत आलीं होतीं.

वर्ध्याच्या संस्थासाठीं सुमारें १॥ लाखाची जमीन व इमारती जमनालालजींनीं दान केल्या. याशिवाय कलकत्त्याची ' वैद्यक संशोधन संस्था ', मुंबईची ' देशी राज्य प्रजापरिषद, ' प्रयागचा ' कमल नेहरू स्मारकनिधि,' डेहराडूनचा 'माता आनंदमयी ट्रस्ट,' 'क्वेटा भूकंप-निधि;' 'महाराष्ट्र–सेवा–संघ', डॉ. टागोरांचें 'शांति-निकेतन,' 'मद्रास फेडरेशन,' इत्यादि देशभर पसरलेल्या अनेकानेक संस्थांवर जमनालालजींनीं आपल्या औदार्याचा अविरत वर्षाव केला. जणुं मातृभूमीच्या मस्तकावर त्यांनीं सहस्रधारांनीं केलेला तो मंगल अभिषेकच !

शिवाय, आपले समव्यवसायी जे लक्ष्मीपुत्र होते, त्यांच्याकडून दान मिळवून तें राष्ट्रमातेच्या सेवेस त्यांनीं किती लावलें असेल, हें सांगणें कठीण. हिंदीचा प्रसार, अस्पृश्यता-निवारण इत्यादि कार्यासाठीं त्यांनीं जनतेकडून लाखों रुपये जमविले. भारतमातेच्या चरणीं त्यांनीं स्वतःचें तर जीवितपुष्पच वाहिलें.

जमनालालजींनीं केवळ स्वतःचें जीवन राष्ट्रमातेच्या चरणीं समर्पित केलें होतें असें नव्हे, तर त्यांची पत्नी, त्यांचीं मुलें, त्यांचा पुतण्या त्यांचें सर्वच्या सर्व कुटुंबच राष्ट्रार्पण झालेलें होतें.

ऐश्वर्याच्या राशीवर लोळणाऱ्या सुखी व विलासी स्त्री–पुरुषांनीं व बाल–तरुणांनीं कारागृहाच्या कोठडींत स्वतःला कोंडून घ्यावें, कदन्न खावें, किंबहुना मानहानि सोसावी, मारहाणहि सहन करावी,—हें सारें, राष्ट्रभक्तीची ज्योत अंतःकरणांत जागृत झाल्याशिवाय,शक्य कसें होणार !

" देवाची ते खूण आली ज्याच्या घरां ।
त्याच्या पडे संसारासी चिरा ॥ "

या तुकोबांच्या अनुभवाप्रमाणें, गांधीजींनीं जें जें कुटुंब स्पर्शिलें व आपलेसें केलें, तें तें राष्ट्रगंगेस मिळालें—त्या सर्व कुटुंबाचें ऐश्वर्य, विलास, स्वार्थबुद्धि, भोगासक्ति, जातीयता—हें सारें गदळ त्या गंगेनें वाहून नेलें, आणि सर्व कुटुंबाचें समग्र जीवन पावन व धन्य झालें.

जानकीदेवी या कांहीं शिकल्या-सवरलेल्या नव्हत. त्यांना तें राजकारण व तें स्वातंत्र्ययुद्ध काय कळणार? पण गांधीजींच्या उपदेशानें व जमनालालजींच्या सहवासानें त्यांच्याहि मनांत ऊर्मि आली कीं, आपण राष्ट्रकार्यांत भाग घ्यावा. त्यांनीं विलेपार्लें येथील छावणींतून १९३० च्या जूनमध्यें आपल्या तुरुंगांत गेलेल्या पतीस जें पत्र पाठविलें आहे, तें त्यांच्या अंतःकरणांतील भावनांचा स्वच्छ आदर्श आहे. त्या पत्रांत त्या लिहितात,

" प्राणेश,

आपल्या कुटुंबाविषयीं माझ्या मनाला खरोखर मोठा अभिमान वाटत आहे. आणि मी स्वतःला तर फारच धन्य मानतें. कारण निर्बुद्ध अबलाकडून सरकारशीं सामना देण्याचा या युगाचा विशेष आहे. स्वराज्य हें स्त्रियांच्या हातून मिळविलें जाणार आहे. इंग्रज सरकारला जिंकण्याचें काम वानर-सेनाच करील—विद्वान व बलवान लोक करणार नाहींत. म्हणून आपण तुरुंगांत सुखानें राहावें. मृत्यूचे वेळीं आपण हंसतों कीं रडतों, हें पाहावयास हवें. आपलें नशीब चांगलें असेल, तर चांगला मृत्यु येईल. एकानें दुसऱ्याची चिंता करण्याचा हा काळ नाहीं. जेथें लढाईचा खास सामना चालू असेल, तेथें कमलनयनला मीं पाठविलें, तर मला कर्तव्य केल्याचा संतोष होईल."

देशभक्तीची बाह्य निशाणी असणारी खादी जानकीदेवींनीं १९२० सालापासूनच मनापासून अंगीकारिली. घरांतील प्रत्येक कापड खादीचेंच. त्यांनीं आपल्या रेशमी साड्या टाकून जाड खादी पेहरली. त्यांची खादी-भक्ति इतक्या कोटीला जाऊन पोचली कीं, एकदां जमनालालजींना कापडाची गिरणी विकत घेऊन ती आदर्श पद्धतीनें चालवावी अशी इच्छा झाली असतांना जानकीदेवी स्वतः गांधीजींकडे गेल्या व विरोध करण्यास विनवूं लागल्या. त्या गांधीजींच्या साबरमती आश्रमांतहि

जाऊन राहिल्या होत्या. तेथील काबाडकष्टाचीं कामें त्या करीत असत. त्यांनीं स्त्रियांसाठीं आपल्या घरीं सूत-कताईचे वर्ग सुरू केले.

जशी खादी, तशीच हरिजन-सेवा. जानकीदेवी वैष्णवांच्या घराण्यांतील-फार ईश्वरभक्त. वृत्तीनें कट्टर सनातनी. आचार पूर्ण धार्मिक. मुलीचें नांवहि ठेविलें 'ओम्'. तथापि मानवता-प्रेमाला त्या विन्मुख झाल्या नाहींत. हरिजनांच्या हातचें अन्न ग्रहण करण्याइतपत त्यांच्या मनानें मजल मारली.

जानकीदेवींनीं आपल्या पतीच्या पावलावर पाऊल ठेवून, आपल्या मारवाडी समाजाची सेवाहि सुरू केली. पडदा, बालविवाह यांचेविरुद्ध त्यांनीं जणुं मोहीमच काढली. १९३३ सालीं कलकत्ता येथें "अखिल भारतीय अग्रवाल महिला परिषद" भरली. तिचें अध्यक्षपद जानकीदेवींना देण्यांत आलें होतें. एक एका दिवसांत २।२, ३।३ गांवांमध्यें जाऊन व भाषण करून, स्त्रीवर्गांत त्यांनीं मोठी जागृति केली.

प्रत्यक्ष राजकारणाच्या रणांगणावरहि त्या जाऊन उभ्या राहिल्या. १९३० सालीं मिठाचा कायदेभंग सुरू झाला, तेव्हां त्यांनीं बिहार व बंगाल या प्रांतांत दौरे काढले आणि परदेशी मालावरील बहिष्काराची मोहीम सुरू केली व खादीचा प्रचार धूमधडाक्यानें केला.

१९३२ सालीं तर त्यांना नागपूरच्या तुरुंगांत ६ महिने राहावें लागलें. तेथें त्यांना 'अ' वर्ग देण्यांत आला होता. पण आश्रमवासीय स्त्रिया 'ब' वर्गांत असल्यामुळें त्यांनीं 'ब' वर्ग मागून घेतला. तेथें त्यांनीं हिंदीचा अभ्यास सुरू केला.

जानकीदेवीच्या धैर्याची व त्यागाची खरी सत्त्वपरीक्षा १९४२ सालीं झाली. जमनालालजींचा देहान्त झाला, तेव्हां त्यांना वाटलें, आपल्यावर आकाशच फाटलें. त्यांनीं पतीबरोबर सहगमन करण्याची इच्छा दर्शविली, पण त्यापासून गांधीजींनीं त्यांना निवृत्त केलें आणि गोसेवेला लावलें. त्या आपल्या सर्व शरीराचा होम करावयास निघाल्या होत्या, पण



वर्धा येथील ‘ गांधी-ज्ञान-मंदिराचें ’ उद्घाटन करतांना
जानकीदेवी पंतप्रधान जवाहरलालजींचें स्वागत करीत आहेत.



रामकृष्णजी व गांधीजी

१९४६ साली मद्रास स्टेशनावर आगगाडींतून उतरतांना

गांधीजींनीं त्यांना आपल्या वासनांचा होम करावयास लावलें. २–२॥ लाख रुपये किंमतीची आपल्या हक्काची मिळकत त्यांनीं 'गोसेवा-संघास' दान दिली.

गो-व्रत तर त्यांनीं फार पूर्वींपासून घेतलें आहे. केवळ गाईचेंच दूध-तूप त्या गेलीं पस्तीस वर्षे वापरतात. नागपूरच्या तुरुंगांतहि तें त्यांनीं चालू ठेवलें. पतीनें आयुष्याच्या अखेरीस आरंभिलेलें गोसेवेचें कार्य त्या निष्ठेनें व अंगमेहनतीनें चालवितात. 'गो-सेवा संघाच्या' त्या अध्यक्षच आहेत.

त्याचप्रमाणें वर्धा येथील "महिलाश्रमाच्या" हि त्या अध्यक्षा आहेत. असहकारितेच्या चळवळींत भाग घेणाऱ्या सत्याग्रहींच्या मुलींचें शिक्षण रीतसर व्हावें, म्हणून जमनालालजींनीं ही संस्था काढली आहे.

'कस्तुरबा गांधी स्मारक निधीच्या' त्या विश्वस्त आहेत. त्याचप्रमाणें "सर्वसेवा-संघाच्या" हि त्या सभासद आहेत.

गांधी–युगानंतर 'विनोबा–युग' देशांत सुरू झालें. स्वातंत्र्य–प्राप्ती-नंतर भूदान-आंदोलन जन्मास आलें. देशाला राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झालें, तरी आर्थिक स्वातंत्र्य कोठें आलें? व सामाजिक स्वातंत्र्य तरी कोठें आलें? तें सर्वांगीण स्वातंत्र्य प्राप्त होऊन सर्व-उदय व्हावा, 'सर्वोदय' व्हावा, यासाठीं १९५१ सालापासून विनोबाजी पद-यात्रा करीत आहेत, आणि आपल्या स्पर्शानें एक एका प्रांतामध्यें ही शांति-पूर्ण क्रांति घडवीत आहेत—लोकांचीं हृदयें प्रेमानें लुटीत चालले आहेत. भूदानानंतर संपत्तिदान, त्यानंतर बुद्धिदान, पुढें समयदान आणि शेवटीं जीवनदान—अशा आर्थिक मोक्षाच्या पायऱ्यांवर ते सर्व समाजाला चढवीत आहेत.

या क्रांतीच्या पर्व-कालांत जानकीदेवी मागें कशा राहतील? त्या विनोबाजींच्या 'पद-यात्रेंत' सामील झाल्या. त्यांतहि त्यांनीं आपली

स्वतंत्र बुद्धि चालविली. आणि आपल्या शक्तीचा व प्रतिष्ठेचा उपयोग स्वतंत्रपणें केला. ' कूप-दान ' हें एक नवेंच कार्य त्यांनीं आपल्या जबाबदारीवर उभारलें. १९५३ सालीं चांडिल येथें ' सर्वोदय संमेलन ' भरलें असतांना ' एक महिला संमेलन ' हि भरविण्यांत आलें होतें. त्याचें अध्यक्षपद जानकीदेवींना देण्यांत आलें. त्या वेळीं भाषण करतांना त्या म्हणाल्या,—

"मला तर गांधीजींनीं पूर्वींच अलंकार-दान करण्यास शिकविलें. आतां विनोबाजी सर्वांना कांचन-मुक्ति शिकवीत आहेत. ते भूमिहीनांना भूमि देत आहेत.पण पाणी नसेल तर भूमि काय पिकवील ? जमिनींत पाणी असेल तर हिरवें गवत उगवेल आणि त्यामुळें गोसेवाहि यशस्वी होईल. म्हणून माझी सर्व मायभगिनींना अशी विनंति आहे कीं, शेतांत एक एक विहीर खणण्यासाठीं तुम्ही पैसे द्यावे. आपल्या संमेलनांत विनोबाजी येतील, तेव्हां त्यांच्या गळ्यांत सुताचे हार घालण्यापेक्षां तुम्ही आपल्या कंठांतील सोन्याचे हार घालाल, तर किती चांगलें होईल ! "

आणि विनोबा आले—महिला-संमेलनांत बसले. जानकीदेवींच्या जादूचा परिणाम झाला. एका स्त्रीनें दिली अंगठी, तर दुसरीनें दिली कंठी. कोणी कोणी आपल्या हातांतील सोन्याच्या बांगड्या काढून दिल्या. ते सारे दागिने जानकीदेवींनीं विनोबांच्या विरक्त देहावर रचले. त्या ब्रह्मचाऱ्याच्या दाढींत मंगळसूत्र गुंतलें ! एकंदर २७ तोळे सोनें, कांचनमुक्तीचा मंत्र देणाऱ्या त्या साधूला प्राप्त झालें. त्याचें तो काय करणार ?

" कूप-दानासाठीं हें सोनें द्या. " जानकीदेवींनीं मागणी केली. विनोबांना ती कल्पना फार आवडली. विनोबांचे विचार नेहमीं विराट स्वरूपाचे. त्यांनीं तत्काळ आपल्या भाषणांत संकल्प प्रगट केला, " एक लाख विहिरी खोदण्यासाठीं आपण पैसा जमविला पाहिजे. "

झालें! विजेचें बटन दाबलें गेलें. त्यासरशीं लाखों दिवे लखलखूं लागले. 'कूप-दानाचें' कार्य जोरांत सुरू झालें. जानकीदेवी चांडिल-हून गया जिल्ह्यांत गेल्या. कडक उन्हाळ्याचे ते दिवस होते. तरी त्या सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत वकील, डॉक्टर, व्यापारी यांच्या घराघरांत फिरल्या. पुष्कळ ठिकाणीं पायींच गेल्या. वेष साधा खादीचा, अंगावर फुटका मणी नाहीं; आणि रूप सामान्य. त्यामुळें कांहीं कांहीं ठिकाणीं, त्यांना निर्वासित स्त्री समजून, दार बंद करण्यांत आलें. पण तो केवळ अपवाद. इतरत्र त्यांच्या प्रतिष्ठेमुळें त्यांचें काम सुलभ झालें. त्यामुळें गया जिल्ह्यांत विनोबाजी गेले, तेव्हां वीस विहिरींचा खर्च भागविण्या-इतकें संपत्तिदान त्यांना मिळालें.

लवकरच ६० कूप-दानें मिळालीं. एकट्या बोधगया शहरांत १०० कूप-दानें प्राप्त झालीं. गया जिल्ह्यांत १००० कूप-दानें मिळ-ण्याची योजना झाली. बोधगया येथें १९५४ सालीं 'सर्वोदय-संमेलन' भरलें. राष्ट्रपति डॉ. राजेन्द्रप्रसाद यांच्या हस्तें कूप-खननाच्या प्रत्यक्ष कार्यास प्रारंभ झाला. जानकीदेवींना सर्व राष्ट्र-नेत्यांचीं घरें उघडीं होतीं. त्या राजेन्द्रबाबूंना भेटल्या—जवाहरलालांना भेटल्या आणि कूपदानाचे पैसे त्यांनीं त्यांचेकडून तत्काळ मिळविले.

ता. ११ सप्टेंबर हा विनोबांचा जन्मदिन. त्या दिवशीं जानकीदेवी दिल्लींत होत्या. त्यांनीं पं. नेहरूंची मुलाखत मागितली. त्यांनीं दुपारीं ११ वाजतां बोलाविलें. त्याप्रमाणें त्या त्यांचे भेटीस गेल्या. एक सभा आटोपून पंडितजी खोलीमध्यें आले. त्या वेळीं त्यांचा चेहरा थकलेला दिसत होता. तो पाहून जानकीदेवी विनोदानें म्हणाल्या,

"पंडितजी, असं गंभीर राहून कसं चालेल? आज आपण हंसलं पाहिजे."

"हो! हो! मी जरूर हंसेन. पण आपलें काम तर करूं द्या." पंडितजी गदगदून हंसत म्हणाले.

" अर्जुनाची गोष्ट आपल्याला माहीत आहे ना ? पितामह भीष्मांना पिण्यास पाणी मिळावें, म्हणून अर्जुनानें जमिनींत बाण मारला. आपणहि असाच बाण मारावा, आणि तो इतक्या जोरानें कीं, त्यामुळें पाताळ फुटून जाईल आणि सर्व भारतांत पाणीच पाणी होईल—सारी पृथ्वी हिरवीगार होईल आणि विनोबाजी खूष होऊन जातील. "

" वा ! वा ! फारच रम्य हें कल्पना–चित्र. पण मी बाण मारायचा म्हणजे काय करायचं ? "

" आमच्या ' कूप–दान ' कार्यास आशीर्वाद द्यायचा. "

" आशीर्वाद तर कोणत्याहि सत्कार्यास माझा आहेच. "

" पण नुसत्या शब्दांचा काय उपयोग ? रोकडा आशीर्वाद पाहिजे." जानकीदेवी हंसत हंसत म्हणाल्या.

त्यांचे स्नेहसंबंध प्रेमाचे होते–घरोब्याचे होते.

लगेच जवाहरलालांनीं एका विहिरीचा खर्च म्हणून,५०० रुपयांचा चेक जानकीदेवींच्या हातीं दिला.

आणि त्याच दिवशीं संध्याकाळीं जानकीदेवी ' राजघाटा'वर गेल्या. गांधीजींच्या त्या समाधि–स्थानीं प्रार्थना होत होती. प्रार्थनेस राष्ट्रपति राजेन्द्रप्रसाद आले. त्यांचेजवळहि जानकीदेवींनीं एक ' कूप–दान ' मागितलें. पण राजेन्द्रबाबूंनीं दोन कूपांसाठीं १००० रुपये दान केले. राष्ट्रपतींनीं घालून दिलेला हा कित्ता इतरांनीं गिरविला. एका शीख भाईनें १० विहिरींसाठीं ५००० रुपये दिले, तर एका गुजराती मित्रानें ८ विहिरींसाठीं ४००० रुपये दिले. हां हां म्हणतां २७ कूप–दानें मिळालीं.

ता. ११ सप्टेंबर हा विनोबांचा जन्मदिन, तर ता. २ ऑक्टोबर हा गांधीजींचा जन्मदिन. या २१ दिवसांच्या पर्वकालांत एकट्या दिल्लीमध्यें जानकीदेवींनीं ५९ कूप-दानें मिळविण्याचा संकल्प केला.

कारण तेव्हां विनोबांचा ५९ वा वाढदिवस होता. तो संकल्प मुदती-आधींच पुरा झाला. तेव्हां त्यांनीं १०८ कूपदानांचा संकल्प केला.

ता. २ ऑक्टोबरचा दिवस उजाडला. १०७ कूपदानें मिळालीं— एक कमी पडलें. जानकीदेवी त्यासाठीं चिंता करूं लागल्या. संध्या-काळ झाली, रात्र पडली. पाऊस धो धो ओतत होता. बाहेर जाण्याची सोय नाहीं. निराशेनें जानकीदेवींचें मन आंतल्या आंत तडफडूं लागलें. रात्रींचे १२ वाजले. 'आतां कसला आपला संकल्प पुरा होणार?' त्यांचें चित्त चुकचुकलें. पण—

दार खडखडलें. त्यांचे जामात श्रीमन्नारायण अगदीं पहाटे जे बाहेर गेले होते, ते काम आटोपून मध्यरात्रीं परत आले. आले ते आनंदानें व अभिमानानें बोलत, "माताजी, आज आपल्या कूप-दाना-साठीं ३००० रुपयांचें वचन मिळालें आहे." जानकीदेवींना संकल्प पुरा झाल्याचा संतोष मिळाला!

पुढें बंगालमध्यें बांकुरा येथें 'सर्व–सेवा-संघाची' सभा भरली. तेव्हां जानकीदेवींनीं श्री. मोहनलाल गोयंका या एकट्या धनिका-कडून १०८ 'कूप-दानें' मिळविलीं. एकटया मुंबई शहरांतून 'कूप-दानासाठीं' ३०००० रुपये मिळाले. एका अमेरिकन बाईनेंहि एक 'कूप-दान' दिलें. 'हिंदुस्थान शुगर मिल्स' या बजाजांच्या गिरणीनें तर ५००० रुपये दिले.

जमनालालजींमुळें थोर थोर राष्ट्रनेत्यांचा व लक्ष्मी-पुत्रांचा परिचय जानकीदेवींना घडलेला होता. तो सर्व त्यांनीं कूप-दानाच्या सत्कारणीं लावला. अजूनहि त्या कूप-दानासाठीं व गो-सेवेसाठीं वाऱ्यासारख्या फिरत असतात. त्या म्हणजे सत्कार्याच्या सुवासानें सुगंधित झालेली वायु-लहरीच! त्यांना राष्ट्रपतींनीं 'पद्म-विभूषण' पदवी देऊन गौरविलें.

जमनालालजी व जानकीदेवी–यांनीं आपला जन्म जन-सेवेला वाहिलेला; त्याचा परिणाम त्यांच्या संततीवर झाल्याविना कसा राहील?

▲

ज्येष्ठ पुत्र म्हणजे कमलनयन. गांधीजींच्या मतानुसार, प्रचलित शिक्षणपद्धतीपासून त्यांना पूर्ण अलिप्त ठेवण्यांत आलें. विनोबाजींसारख्या अलौकिक गुरूच्या मुखानें मिळालें, तेवढेंच त्यांचें शिक्षण. त्यामुळें त्यांच्या मनावर, बुद्धीवर व आत्म्यावर उच्च संस्कार सहजच घडले.

त्यांची खरी शाळा म्हणजे गांधीजींचा आश्रम; आणि त्यांची खरी परीक्षा म्हणजे गांधीजींचा सत्याग्रह-संग्राम. १९३० सालीं गांधीजींनीं आपली इतिहास-प्रसिद्ध "दांडी-यात्रा" सुरू केली. तिचें भवितव्य काय होईल याचें अनुमान कोणासच करतां येत नव्हतें. पण तरीहि, १६ वर्षांचे कमलनयन हे, अंगांत ताप असतांनाहि, त्या यात्रेंत सामील झाले—आणि येईल तें संकट सोसण्यास सिद्ध झाले. परंतु मध्येंच त्यांचे डोळे बिघडले. गांधीजींच्या सांगण्यावरून त्यांनीं डोळ्यावर मातीचे प्रयोग सुरू केले. पुढें अहमदाबाद येथें 'गुजरात विद्यापीठां'त त्यांना गांधीजींनीं पाठविलें.

कमलनयन हे दिसण्यांत आपल्या पित्याची प्रतिकृतिच आहेत. 'आत्मा वै पुत्रनामास्ति' हें वचन ते खरें करून दाखवीत आहेत. गोरा वर्ण, गोल चेहरा व गोड भाषण—अशा बाह्य गुणांचा वारसा तर त्यांना लाभलेला आहेच, पण राजकारणांत देहदंडहि सोसणें, सत्कार्याला प्रोत्साहन देणें आणि सतत आत्म-शोधन करीत राहणें, या आंतरिक गुणांचा ठेवाहि त्यांनीं स्वप्रयत्नानें कमावलेला आहे.

कमलनयनजींचा जन्म ता. २३ जानेवारी १९१५ रोजीं झाला. त्या वेळच्या सरकारी शिक्षणावर, असहकारितेच्या चळवळीमुळें, बहिष्कार टाकलेला असल्यानें, त्यांचें शिक्षण ठरीव चाकोरींतून झालें नाहीं. परंतु याची 'नुकसान-भरपाई' सहस्रपटीनें करणारे गांधीजी-विनोबाजींसारखे अलौकिक गुरु लाभण्याचें भाग्य त्यांचें होतें. त्यांचीं विद्यालयें म्हणजे अहमदाबाद येथील साबरमती आश्रम, गुजरात

विद्यापीठ व वर्धा येथील सत्याग्रहाश्रम. महादेवभाई तर त्यांचीं इंग्रजी पत्रें शुद्ध करून त्यांचेकडे परत पाठवीत. खरेंखुरें ‘ राष्ट्रीय शिक्षण ’ त्यांना सहजगत्याच मिळालें. त्यांच्याभोंवतालच्या वातावरणाचा अणुरेणु राष्ट्रीयत्वानें भारलेला होता.

विनोबांची शिक्षण-पद्धति म्हणजे आश्रमकालीन ऋषींची. कडक शिस्तीनें,प्रत्यक्ष आचारावर ते भर देत. प्रार्थना—सूतकताई—दळण—शेती इत्यादि गांधीवादी कार्यक्रमांत तर कमलनयन भाग घेतच, पण संडास-सफाईचें काम करण्यांतहि या लक्ष्मी—पुत्रानें कुचराई केली नाहीं. प्रयाग येथील ‘ हिंदी साहित्यसंमेलना’ची ‘विशारद’ परीक्षा ते उत्तीर्ण झाले.

पुढें गांधीजींचा आशीर्वाद घेऊन,इंग्लंडांत जाऊन, मॅट्रिकची परीक्षा त्यांनीं दिली. केंब्रिज विद्यापीठाच्या अर्थशास्त्रांत प्रथम विभागांत ट्रायपासहि त्यांनीं मिळविला. ‘ इनर टेंपल’मध्येंहि ते दाखल झाले. पण दुसऱ्या महायुद्धामुळें त्यांना अभ्यास सोडून स्वदेशीं परत यावें लागलें.

त्यांनीं मुंबई, वर्धा व अहमदाबाद येथें निरोधन सुरू केलें—दारूच्या गुत्त्यावर व विदेशी कापडाच्या दुकानावर. १९३२ सालीं अजमीरजवळ पुष्करतीर्थांत दारूवर निरोधन करीत असतां त्यांचेवर पोलिसांनीं व गुंडांनीं आपली लाठी चालविली; इतकी कीं, त्यामुळें ते बेशुद्ध पडले ! आल्मोरा येथें त्यांना पकडण्यांत आलें आणि ७॥ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा देण्यांत आली. त्यांनीं आपलें नांवगांव सांगितलें नसल्यानें त्यांना ‘ क ’ वर्गात डांबण्यांत आलें आणि वाईटां-तील वाईट अशा हरदोई तुरुंगांत त्यांना खूप छळण्यांत आलें.

१९४२ च्या ‘चले जाव’ चळवळींत त्यांना मुंबई सरकारनें पकडलें नाहीं. कारण त्यांचा पूर्वींचा तुरुंगवास येथील पोलिसांच्या यादींत नोंदलेला नव्हता. पण ‘ भूमिगत ’ कार्याला कमलनयनांनीं फार मोठी मदत केली. विशेषतः अष्टी, चिमूर वगैरे ठिकाणच्या निष्पाप

कार्यकर्त्यांना फांशीची शिक्षा होण्याचा धोका असतांना, त्यांचा कायदेशीर बचाव करण्यासाठीं पाण्यासारखा पैसा ओतला.

ता. ९ ऑगस्ट १९४२ हा भारतांतील क्रांति-दिन. या क्रांतीच्या कालिमातेनें मुंबई शहरांत तर उग्र स्वरूप धारण केलें होतें. जणुं फ्रेंच राज्यक्रांतीचाच पुनरावतार! प्रभातींच सरकारनें सर्व राष्ट्र-नेत्यांची गठडी वळली. तरी संध्याकाळीं शिवाजी पार्कवर राष्ट्र-माता कस्तुरबा यांचें भाषण व्हावयाचें जाहीर झालें. अलोट जनसमुदाय लोटला. सरकारनें कस्तुरबांना दुपारींच पकडलें; तरी संध्याकाळीं सभा भरली. त्या विराट सभेंत कमलनयन यांनीं भाषण केलें.

त्या वेळीं वृत्तपत्रांच्या फोटोग्राफरनीं त्यांचें छायाचित्र घेतलें, पण त्यांच्या सांगण्यावरून तें प्रसिद्ध केलें नाहीं. पुढें एकाद्या 'रहस्य-कथेला' साजेशा घटना घडल्या. दोन-तीन दिवसांनी बातमी आली कीं, रामकृष्णजींना पोलिसांनीं पकडलें. पण त्यांनीं पकडण्यापूर्वींच रामकृष्णजी आगगाडींतून उतरून गेले होते. पुढें त्यांना खरीखुरी अटक झाली, तेव्हां मुंबईस बातमी आली. ती वाचून वृत्तपत्रांनीं तर्क केला, रामकृष्णजी तर पूर्वींच पकडले गेल्याचें वृत्त आलें होतें. आतां अटक झालीं ती कमलनयनजींना असावी. म्हणून त्यांनीं 'चुकीची दुरुस्ती' करून 'कमलनयनजी बजाज यांना अटक' अशी वार्ता छापली आणि त्याबरोबर छापून टाकलें तें पूर्वींचें छाया-चित्रहि! पत्रकारांच्या या दुरुस्तींतील चुकीनें पोलिसांना कळलें, कमलनयनजी मोकळे आहेत. त्या असत्य वार्तेनें त्यांना सत्य कळलें! तरी पोलिसांच्या तावडींत कांहीं कमलनयनजी सांपडले नाहींत. ते मोकळेच राहून मोकळ्या हातानें भूमिगत कार्यकर्त्यांना लाखों रुपयांची मदत करीत राहिले.

यानंतर संस्थानी चळवळींकडें कमलनयनांनीं लक्ष दिलें. कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें नेमलेल्या 'संस्थानी सबकमिटी'चे ते सभासद होते.

'अ. भा. संस्थानी प्रजा परिषदेच्या' पार्लमेंटरी बोर्डाचे ते सभासद व खजीनदार होते. विशेष म्हणजे, सर्व राष्ट्रांतील जें पहिलें संस्थानी संघराज्य महाराष्ट्रांत निर्माण झालें, त्याचें उद्घाटन त्यांचे हस्तें झालें. आणि त्या संघराज्यासाठीं संस्थानी परिषदेनें नेमलेल्या पार्लमेंटरी बोर्डाचे ते अध्यक्ष निवडले गेले. १९४८ सालीं जयपूर काँग्रेसच्या स्वागत-समितीचे खजीनदार म्हणून काम करून त्यांनीं आपल्या वडिलांची गादी चालविली. अ० भा० काँग्रेस कमिटीचे ते सभासद आहेत—आणि तसेच दिल्लीच्या लोकसभेचेहि काँग्रेस पार्लमेंटरी पक्षाच्या कार्यकारिणीचे ते सभासद आहेत.

१९५७ च्या निवडणुकींत वर्धा मतदार-संघांतून, काँग्रेसचे उमेदवार म्हणून, ते लोकसभेवर निवडून गेले. 'गांधी–स्मारक–निधी' च्या ट्रस्टीमध्येंहि त्यांची त्या वर्षींच निवड झाली. 'गांधी-विचार–परिषद', 'गांधी–ज्ञानमंदिर' व 'जमनालाल बजाज सेवा ट्रस्ट' या संस्थांचेहि ते ट्रस्टी आहेत. दिल्ली येथील 'भारतीय संस्कृति संगम' व 'अखिल भारतीय हिंदी परिषद' या संस्थांचे ते खजीनदार आहेत.

राजकारणाप्रमाणेंच उद्योगधंद्यांतहि कमलनयनजी हे जमनालाल-जींचा सचोटीचा व सत्याचा आदर्श डोळ्यांपुढें ठेवून त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करीत आहेत. 'बच्छराज कंपनी'चे तर ते मॅनेजिंग डायरेक्टर आहेतच, पण त्याशिवाय कुर्ला येथील 'मुकुंद आयर्न वर्क्स'चे ते अध्यक्ष आहेत; तसेंच 'रेडिओ लँप' चा व्यापारहि त्यांनीं आपल्या हातीं घेऊन यशास चढविला आहे. संयुक्त प्रदेशांतील 'हिंदुस्थान शुगर मिल्स,' पंजाब नॅशनल बँक, दिल्ली क्लॉथ मिल, ओरिसा सीमेंट कंपनी,–इत्यादि कैक कंपन्यांचे डायरेक्टर होऊन त्यांनीं आपल्या व्यापाराचें जाळें भारतभर पसरलें आहे. राजस्थानच्या 'व्यापारी संघाचे' अध्यक्षपदाचा मान त्यांना देण्यांत आला. तसेंच

तेथील सरकारनें नेमलेल्या 'उद्योग-सल्लागार मंडळ' व 'नियोजन मंडळ' यावरहि ते आहेत. अ. भा. फेडरेशन ऑफ् कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचेहि ते सभासद आहेत.

पूर्व आफ्रिकेंतील हिंदी लोकांची स्थिति अभ्यासण्यासाठीं; पंतप्रधान पं. नेहरूंनीं कमलनयनजींना १९५० सालीं तिकडे पाठविलें होतें. १९५४ सालीं त्यांनीं रशिया, पोलंड वगैरे देशांत, तेथील सरकारच्या निमंत्रणानुसार, भारत सरकारनें उद्योगपतींचें जें शिष्टमंडळ पाठविलें, त्याचे सभासद म्हणून ते गेले होते. युरोपमधील युद्धोत्तर उद्योगधंदे पाहण्यासाठीं ते १९५४, १९५६ व १९५७ या तीन वर्षी तिकडे जाऊन आले. येथील उद्योगधंद्यांची वाढ करण्यासाठीं युरोपमधील तंत्र-ज्ञानाची जोड मिळविण्याचे कामीं त्यांना यश लाभलें.

कमलनयनजींना जी सहचारिणी लाभली, तीहि बजाजे-कुटुंबाला शोभेशी; तेथील उदात्त वातावरणाशीं समरस होणारी. सावित्रीदेवी कलकत्ता येथील पोद्दार घराण्यांतील. विवाहानंतर त्या इंटर व बी. ए. प्रथम श्रेणींत उत्तीर्ण झाल्या, आणि गांधीजींच्या राष्ट्रीय परीक्षेंतही त्या तशाच मानानें उत्तीर्ण झाल्या.

१९४२ सालचा 'चले जाव' चा लढा सुरू झाला. तो लढा अंतिम स्वरूपाचा होता—प्राणपणानें लढण्याचा होता. स्वतःची प्रकृति ठीक नसतांहि, सावित्रीदेवींनीं त्या लढ्यांत उडी घेतली—आणि तुरुंगाची हवा खाल्ली;-एका नव्हे तर, वर्धा, नागपूर व जबलपूर अशा तीन तुरुंगांची.

सावित्रीदेवींची बहीण विमलादेवी. त्यांचा विवाह रामकृष्णजींशीं झाला. बहिणीबहिणी जावा झाल्या; पुनः एका घरांत नांदूं लागल्या.

▲

जमनालालजींचे दुसरे पुत्र रामकृष्णजी. त्यांचा जन्म ता. २२ सप्टेंबर १९२३ रोजीं झाला. त्यांच्या आयुष्यांतील आरंभीचीं चार-पांच वर्षे साबरमती आश्रमांतच गेलीं. नंतर कांहीं वर्षांनीं वर्धा येथें श्री. नाना कुलकर्णी यांचे हाताखालीं त्यांचें प्राथमिक शिक्षण झालें. पुढें १९३० च्या चळवळीची लाट आली. उलट दडपशाहीची लाट उठली. तींत साऱ्या संस्था जप्त झाल्या. पुनः त्या संस्था बंधमुक्त होऊन काम करूं लागल्या. तेव्हां तेथील 'नवभारत विद्यालयांत' रामकृष्णांनीं आपलें शिक्षण चालू केलें. स्वावलंबनाची दीक्षा मिळावी, म्हणून त्यांना तेथील 'विद्यार्थि-गृहांत' जमनालालजींनीं ठेवलें.

शिक्षणाचें एक अंग म्हणून, जमनालालजींनीं रामकृष्णांना दिवाळीच्या सुट्टींत पंधरा दिवस, दक्षिण भारताच्या सफरीवर, एका विद्यार्थ्याबरोबर पाठविलें. उन्हाळ्याच्या सुट्टींत, एका शिक्षकाबरोबर, त्यांनीं त्याला सीलोनला धाडलें. तसेंच, १९३४ सालीं मुंबई येथें कॉंग्रेस भरली असतां, रामकृष्णांनीं तिला हजर राहण्याची उत्सुकता दाखविली. वास्तविक प्रत्येक कॉंग्रेसला हजर राहण्याचा जमनालालजींचा नियम; पण त्याच वेळीं त्यांचा कान मनस्वी दुखूं लागला. म्हणून ते गेले नाहींत. तेव्हां त्यांनीं रामकृष्णांना एका मित्राबरोबर मुंबईस पाठविलें—आणि कॉंग्रेसच्या छावणींत राहावयास लावलें. त्यानेंच त्याला स्वावलंबनाचें खरें शिक्षण मिळालें.

रामकृष्णांच्या शिक्षणानें १९४१ सालीं मॅट्रिकपर्यंत मजल मारली. त्याच सुमारास कॉंग्रेसनें वैयक्तिक सत्याग्रहापर्यंत मजल मारली होती. दुसरें महायुद्ध सुरू झालें होतें व त्याच्याशीं कॉंग्रेसनें असहकार पुकारला होता. युद्ध-विरोधी घोषणा करून एकएक कॉंग्रेस-नेता कारागृहांत जात होता—जमनालालजीहि त्याच वाटेनें चालले होते. पोलीस त्यांना तुरुंगाकडे घेऊन चालले होते. इतक्यांत—

'काकाजी!' अशी रामकृष्णांची हाक त्यांचे कानीं पडली.

जमनालालजींनीं चमकून मागें पाहिलें. भावनेनें मोहरलेला रामकृष्णांचा चेहरा त्यांना दिसला—आणि त्याबरोबरच त्यांच्या नेत्रांत निश्चयहि दिसला.

'काय?' असें म्हणून ते त्याचेकडे पाहूं लागले. रामकृष्ण हलक्या आवाजांत म्हणाले,

"माझ्याहि मनांत सत्याग्रह करून तुरुंगांत जावयाचें आहे—आपली परवानगी आहे ना?"

१६ वर्षांचा आपला लहानगा—लाडका मुलगा. स्वतः तुरुंगाकडे प्रस्थान ठेवलेलें. त्यांत हा प्रश्न. राष्ट्र-प्रेम कीं पुत्र-प्रेम?—यांची परीक्षा पाहणाराच तो आणीबाणीचा क्षण! पण जमनालालजींनीं तत्काळ उत्तर दिलें, "माझी तुला परवानगी आहे. तरी तूं बापूजींची परवानगी मिळव."

रामकृष्ण गांधीजींकडे गेले. त्यांची चाळणी फार कडक होती. ते स्पष्टपणें म्हणाले, "१८ वर्षांखालील कोणास मी सत्याग्रहांत घेत नाहीं, मग तुलाच कसें घेऊं?"

पण बाल रामकृष्णाला भीति वाटत होती कीं, 'आपण तुरुंगांत जाण्याआधींच स्वराज्य मिळालें, तर काय करा? आपलें पुण्य जाईल ना!' म्हणून त्यांनीं गांधीजींजवळ दोन-तीन दिवस खूप युक्तिवाद केला—हट्टच धरला! तेव्हां गांधीजींनीं त्यांची कडक परीक्षा घेतली आणि अपवाद म्हणून सत्याग्रहांत भाग घेण्याची परवानगी दिली.

परवानगी दिली एवढेंच नव्हे, तर सरकारला सत्याग्रहाची जी सूचना द्यावयाची, तिचा मसुदा त्यांनीं स्वतः लिहून दिला. आणि अटक झाल्यानंतर कोर्टांत जें वक्तव्य त्यानें द्यावयाचें तेंहि त्यांनीं लिहून काढलें व तें रामकृष्णाला, आदले दिवशीं रात्रीं झोपी जाण्यापूर्वीं, दाखविलें. "या पत्रांतील कांहीं गोष्टी तुला समजल्या नाहींत, किंवा मान्य झाल्या नाहींत, तर तसें मला सांग. म्हणजे त्यांचा आपण विचार

करूं." असें स्वातंत्र्यहि गांधीजींनीं रामकृष्णाला दिलें. यावरून गांधीजी आपल्यावर किती जबाबदारी घेत हें स्पष्ट होतें.

गांधीजींनीं रामकृष्णासाठीं जें वक्तव्य तयार केलें, त्यांतील महत्त्वाचा मजकूर असा—" माझें वय १८ वर्षांखालीं असलें, तरी मला विद्यार्थि-जगत् व एकंदर बाहेरचें जग यांची माहिती आहे. त्यामुळें शिस्तीचें महत्त्व मी जाणतों. मीं माझ्या पालकांची परवानगी घेतली आहे. माझ्या मातापित्यांनीं मला जीवनाच्या प्रत्येक बाबींत अहिंसा आचरण्याचा धडा दिला आहे. त्यांनीं आम्हां सर्वांना स्वतंत्र वातावरणांत वाढविलें आहे. स्वातंत्र्याच्या प्रयत्नांत भाग घेतल्यानें मला जो जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळेल, तो शाळेंतील नित्याच्या शिक्षणापेक्षां फारच महत्त्वाचा असेल असें मला वाटतें. कारण शालेय शिक्षणाचा उद्देश राज्यकर्त्यांचें हित पाहणें हा आहे.—जनतेचें हित पाहणें हा नव्हे. तरीसुद्धां आम्ही तें शिक्षण घेतों, याचें कारण तेंच एक शिक्षणाचें द्वार उघडें आहे. पारतंत्र्याचा हा परिणाम आहे."

यानंतर सत्याग्रहाच्या साध्यासंबंधीं या वक्तव्यांत असें लिहिलें आहे कीं, " या संग्रामाचें आकर्षण मला वाटतें याचें मुख्य कारण राजकीय नसून नैतिक आहे. हिंदुस्थानानें अहिंसेचें आदर्श उदाहरण घालून दिलें, तर मानवजातीच्या प्रगतीस मोठाच हातभार लावल्यासारखें होईल, असा मला विश्वास वाटतो. या ध्येयानें माझें तरुण मन भारून गेलें आहे. अशा भव्य व उदात्त कार्यासाठीं कितीहि हाल सोसले, तरी मला ते थोडेच वाटतील."

ठरल्याप्रमाणें रामकृष्णानें पोलीस-अधिकाऱ्याला नोटीस दिली. त्याप्रमाणें युद्धविरोधी घोषणा केली व त्यासाठीं त्याला अटक झाली. न्यायमंदिरांत तें थोर विचारांचें वक्तव्य बाल रामकृष्णानें वाचून दाखविलें. तेव्हां तें ऐकून न्यायाधीशाहि चकित झाला. त्यानें फक्त १०० रुपये दंड केला.ही ता. १९एप्रिल १९४१ची गोष्ट. तो शनिवार होता.

त्यानंतर सोमवारीं रामकृष्णानें पुनः सत्याग्रह केला. तेव्हां २०० रुपये दंड झाला. पण रामकृष्णाचें मन दंडानें दबलें नाहीं. ता. २३ रोजीं त्यानें पुनः सत्याग्रह केला. तेव्हां त्याला चांगली अद्दल घडावी म्हणून,सरकारनें चार महिने कैदेची शिक्षा ठोठावली. ती शिक्षा भोगून शनिवारीं आल्यावर रामकृष्णानें पुनः सोमवारीं सत्याग्रह केला. रविवार हा गांधीजींनीं सुटीचा दिवस ठेवला होता. ता. १४ ऑगस्ट रोजीं त्याला ६ महिन्यांची कैद सुनावली गेली. दडपशाहीचा वारा कितीहि जोरानें वाहिला, तरी न विझावी—उलट अधिकच भडकावी, अशी स्वातंत्र्य-भक्तीची प्रखर ज्वाला रामकृष्णांचे अंतःकरणांत धगधगून पेटली होती.

योगायोग असा कीं, रामकृष्णाला नागपूरच्या तुरुंगांत ठेवण्यांत आलें, तेथेंच जमनालालजी, विनोबाजी वगैरे होते. तेथें जातांच रामकृष्णाला जमनालालजी म्हणाले, "आतां येथें तुझें स्वतंत्र व्यक्तित्व सुरू झालें. माझ्या मताप्रमाणें येथें चालण्याची गरज नाहीं." जमनालालजींच्या शेजारच्याच कोठडींत रामकृष्णाला ठेवण्यांत आलें होतें.

एके दिवशीं एका 'अ'वर्गीय कैद्याकडे बाहेरून कांहीं आंबे आले.त्यांतले कांहीं त्यानें जमनालालजींना दिले. ते त्यांनीं घेतले नाहींत, कारण तें नियमाला सोडून होतें. तेव्हां तो 'अ'वर्गीय बंदीवान म्हणतो, "आपण न घ्याल तर नका घेऊं, पण रामकृष्ण तर खाईल ?"

पण जमनालालजींनीं उत्तर दिलें, "तो तरी कसा खाईल ? तो 'ब'-वर्गाचा आहे."

सत्यासाठीं वनवास स्वीकारणाऱ्या हरिश्चंद्रानें स्वतः तर पाणपोयींतलें पाणी प्राशन केलेंच नाहीं, पण त्याचा मुलगा रोहिदास याच्या तोंडाला कोरड पडली असतांनाहि त्यानें तें पाणी घेण्याचें नाकारलें, ही परंपरा अद्याप या देशांत चालू आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ............ राष्ट्रसेवक कुटुंब
क्रमांक ............ नों. दि. ............

पिता असा सत्य-निष्ठ तर पित्याचा गुरु ज्ञान-निष्ठ. विनोबांनीं तुरुंगांत रामकृष्णाला गीता व वाल्मीकि रामायण शिकविण्यास प्रारंभ केला. ती कुणकुण लागतांच, साखरेभोंवतीं मुंग्यांच्या रांगा लागाव्या, तसे सारे राजबंदी त्या प्रवचनास जमूं लागले. कारागृहाचें शालागृहच बनलें ! तेथें तपोवनाचें पावित्र्य अवतरलें.

१९४१ च्या डिसेंबरांत रामकृष्णाची तुरुंगांतून मुक्तता झाली. त्या वेळीं त्याचे स्वागतार्थ स्टेशनावर वत्सल विनोबा आले होते. पुढें फेब्रुवारींत ११ तारखेस जमनालालजी निधन पावले. पण आईच्या आग्रहानें, तो दुसरेच दिवसापासून, वर्धा येथील 'कॉमर्स कॉलेजांत' जाऊं लागला. 'प्रथम वर्षा'च्या अभ्यासास त्याला अवघे ४२ दिवसच मिळाले. तरी परीक्षेंत त्याला यश लाभलें—आणि तेंहि वर्गांतील ६२ विद्यार्थ्यांत ६ वा क्रमांक पटकावून.

चौथी शिक्षा भोगून रामकृष्ण घरीं आले. आणि थोड्याच दिवसांत जमनालालजींचा अंत झाला. त्यानंतर १९४२ च्या ऑगस्टमध्यें "चले जाव" चा लढा सुरू झाला. त्यांतहि रामकृष्णांनीं हिरारीनें उडी घेतली. त्याबद्दल त्यांना सरकारनें तीन वर्षें स्थानबद्ध करून नागपूरच्या तुरुंगांत ठेवलें. तुरुंगांत नेण्यापूर्वी पकडतांना पोलिसांनीं त्यांना खूप मारहाण केली. पण ती सर्व त्यांनीं धैर्यानें व शांतपणें सोसली. 'मारावयाचें तर मला खुशाल मारा, पण शिव्या कां देतां?' एवढेंच ते म्हणाले.

'पिताजीका नाम रखना' हा गांधीजींनीं १९३९ सालीं दिलेला आशीर्वाद त्यांनीं खरा करून दाखविला.

पहिल्याच तुरुंगवासाच्या वेळीं गांधीजींनीं रामकृष्णाला बजावलें होतें, 'सुमारें पांच वर्षें तरी तुला तुरुंगांत काढावीं लागतील.' त्याप्रमाणें साडेचार वर्षें तर त्यानें तुरुंगवास सोसला. 'उरलेलें अर्धे वर्ष तुमचेंच आहे. मी काय करावें हें सांगा." त्यानें गांधीजींस सांगितलें.

‘ चल तर मज बरोबर. ’ असें म्हणून गांधीजींनीं त्याला १९४६ सालीं बंगाल, आसाम व मद्रास या तीन राज्यांतील दौऱ्यांत आपल्याबरोबर तीन महिने नेलें तेव्हां रामकृष्ण गांधीजींचीं लहानमोठीं कामें इतक्या आस्थेनें करीत कीं, ते थट्टेनें ‘ हा माझा हमाल आहे. ’ म्हणत. ‘हमाल’ म्हणवून घेणारा लक्ष्मीपुत्र किती मोठा. व तशा हमालाची सेवा घेणारा महात्मा तरी किती मोठा !

स्वातंत्र्य-प्राप्तीपूर्वींपासूनच रामकृष्णजी हे विद्यार्थ्यांच्या चळवळींत विशेष भाग घेत. १९४६ सालीं ते “ जागतिक विद्यार्थि-परिषदे ”साठीं झेकोस्लोव्हाकियाला गेले. त्या वेळीं ते इंग्लंड, आयर्लंड, फ्रान्स, स्वित्झर्लंड इत्यादि देशांत जाऊन तेथील विद्यार्थि-चळवळींचें निरीक्षण करून आले. १९५६ सालीं “ जागतिक व्यापारी परिषदेसाठीं ” ते जपानला गेले आणि त्या आपल्या प्रवासाचें हिंदी पुस्तकहि त्यांनीं प्रसिद्ध केलें. १९५५ सालीं जिनिव्हा येथें व १९५६ सालीं बर्लिन येथें “ जागतिक युवक परिषदेसाठीं ” ते गेले आणि युरोप खंड पाहून आले. आतां १९५८ च्या ऑगस्टमध्यें दिल्ली येथें “ जागतिक युवक परिषद ” भरणार आहे. तिचे स्वागताध्यक्षच ते आहेत. तिच्या तयारींत ते सध्यां गर्क आहेत. शिवाय वडिलांच्या व्यापाराचा गाडाहि ते कुशलतेनें चालवीत आहेत. “महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स”चे ते उपाध्यक्ष आहेत.

▲

आपल्या कुलाला भूषण ठरणारे हे जमनालालजींचे जसे दोन पुत्र, तशा तीन कन्याहि सेवारत व भक्तिसंपन्न आहेत. त्यांपैकीं कमलादेवी ही ज्येष्ठ कन्या. तिचा जन्म १९१२ चा. तिचा विवाह श्री. रामेश्वरजी नेवटिया यांच्याशीं साबरमती आश्रमांत, गांधीजींच्या साक्षीनें, मारवाडी पद्धतीचा पडदा न ठेवतां, अत्यंत साधेपणानें साजरा झाला. श्री. रामेश्वरजी हे ‘ गुजरात विद्यापीठाचे ’ विद्यार्थी. साखरेच्या धंद्यांत त्यांनीं

नांव कमाविलें—'हिंदी साखर-गिरणी-संघाचे' ते अध्यक्ष होते. 'वेस्ट इंडीज्'मध्यें भरलेल्या 'जागतिक साखर-तज्ज्ञ-परिषदेस' गेलेल्या हिंदी शिष्टमंडळाचे ते प्रमुख होते. त्यांनीं आपल्या पत्नीसह जग-प्रवास केला आहे. १९५१ सालीं, उत्तर प्रदेशांतून, काँग्रेसचे उमेदवार म्हणून ते लोकसभेंत निवडून गेले होते.

जमनालालजींची द्वितीय कन्या मदालसा (जन्म—१९१७) तिलाहि गांधीजी व विनोबाजी या उभयतांच्या लालना-शिक्षणाचा लाभ झाला. वर्ध्याजवळील नालवाडीच्या आश्रमांत त्यांनीं खडतर जीवन कंठिलें. विनोबासारख्या ज्ञानी भक्ताच्या मुखांतून 'ज्ञानेश्वरी' शिकण्याचें भाग्य त्यांना लाभलें. त्यामुळें ज्ञानेश्वरीच्या गंगा-जलांत त्यांचें वैराग्यशील चित्त सदैव डुंबत असतें. विनोबांच्या भू-दान-कार्यासाठीं त्यांनीं पद-यात्रेंत भाग घेतला. लोकसभेसाठीं काँग्रेस त्यांना उभी करण्यास तयार असतांनाहि, त्यांनीं त्याकडे पाठ फिरवून, विधायक कार्यालाच आपलें जीवन वाहिलें.

सौ. मदालसाचा विवाह श्रीमन्नारायण या तरुणाशीं झाला. श्रीमन्नारायणाची तारीफ गांधीजींनीं आपल्या अनेक पत्रांत केली आहे आणि 'असा पति मिळाला हें तुझें भाग्य!' असें मदालसाला लिहिलें आहे. श्रीमन्नारायण इंग्लंडला जाऊन आय्. सी. एस्. परीक्षेला बसले. पण त्यांत त्यांची निवड झाली नाहीं. त्यांना जमनालालजींनीं गांधीजींकडे खेचलें—आणि गांधीजींनीं त्यांना आपलेसें केलें. त्यांना प्रथम वर्धा येथील 'नवभारत विद्यालयाचे' प्राचार्य नेमण्यांत आलें—आणि नंतर तेथील 'व्यापारी कॉलेजा'चें प्रमुख पदहि त्यांनाच देण्यांत आलें. नागपूर व जबलपूर येथील 'व्यापारी कॉलेजा'चेंहि संस्थापन व संचालन त्यांनीं यशस्वी रीतीनें केलें.

गांधीजींचें अर्थशास्त्र, मूलोद्योग शिक्षण, राज्यघटना इत्यादि विषयांवर श्रीमन्नारायण यांनीं पुस्तकें लिहिलीं आहेत. 'रोटी का राग', 'मानव', 'सेगांव का सन्त,' इत्यादि त्यांचे ग्रंथहि प्रसिद्ध आहेत. आतां तर ते

काँग्रेसचे सरचिटणीस आहेत. १९५१ सालीं ते लोक-सभेवर निवडून गेले. ' खादी-ग्रामोद्योग कमिशनचे ' ते सभासद आहेत.

जमनालालजींची तृतीय कन्या ओम्-किंवा उमादेवी (जन्म-१९१९). तिचें शिक्षण गांधीजींच्या साबरमती आश्रमांत आणि विनोबाजींच्या कन्याश्रमांत झालें. लहानपणींच ती गांधीजींबरोबर सर्व भारताच्या हरिजन-दौऱ्यांत हिंडली. १९४२ सालीं तिलाहि तुरुंगवास घडला. तिचा विवाह दिल्लीचे श्री. राजनारायण अग्रवाल यांचेशीं झाला. दिल्लीच्या 'सोशल वेल्फेअर बोर्डा'त त्या विशेष लक्ष घालतात. ' कस्तुरबा-स्मारक-निधि'च्या दिल्ली-शाखेच्या त्या प्रतिनिधि आहेत.

जमनालालजींचे पुतणे राधाकृष्णजी हेहि याच वृत्तीचे. १९३२ सालीं त्यांनीं सत्याग्रहांत भाग घेतला, म्हणून त्यांना सहा महिन्यांची शिक्षा झाली. ती त्यांनीं अकोला व खांडवा या तुरुंगांत भोगली. दुसरी शिक्षा १९३४ सालीं शिवनी व नागपूर या तुरुंगांत त्यांनीं चार महिने सोसली. आणि १९४२ च्या झंझावातांत तर काय? कट केल्याचा त्यांचेवर आरोप लादण्यांत आला. त्यामुळें फांशीपर्यंतची शिक्षा त्यांना मिळणें शक्य होतें. परंतु ती तीन वर्षांवर भागली. ती त्यांनीं बुलढाणा, वर्धा व नागपूर येथें सहन केली. त्यानंतर त्यांनीं गोसेवेच्या कार्यास पूर्णतेनें व तन्मयतेनें स्वतःस वाहून घेतलें. नालवाडी येथील 'ग्राम-सेवा-मंडळा'चे ते अध्यक्ष आहेत. भू-दान-आरोहणांतहि ते भाग घेतात. स्वतःची ५५ एकर जमीन त्यांनीं दान केली आहे.

याशिवाय गुलाबचंद, रामगोपाल, मोतीलाल व घनश्याम या बजाज-घराण्यांतील तरुणांनीं आणि बहीण-भावजय, फार काय, नोकरचाकरहि यांनीं स्वातंत्र्य-संग्रामांत आपली आहुति देऊन अनेकवार तुरुंगाची यात्रा केली. जमनालालजींचे जामात श्रीमन्नारायण यांनींहि १९४२ सालीं १८ महिन्यांची शिक्षा भोगली.

पूर्वीं देव-भक्तीसाठीं वेडीं झालेलीं कुटुंबें निघालीं, आतां देश-भक्ती साठीं देह-दंड सोसणारीं बजाजासारखीं कुटुंबें राष्ट्रास भूषवूं लागलीं.

• • •

# ११ : यज्ञाची सांगता

*याचसाठीं केला होता अट्टाहास ।*
*शेवटचा दिस गोड व्हावा ॥*
*आतां निश्चितीनें पावलों विसांवा ।*
*खुंटलिया धांवा तृष्णेचिया ॥*

*—तुकाराममहाराज*

गांधीजी सेवाग्राम येथील आपल्या झोपडींत बसले होते—घनश्यामदास बिर्लाशीं बोलत होते. इतक्यांत टेलिफोनची घंटा वाजूं लागली. वर्ध्याहून फोन आला—" जमनालालजींना एकाएकीं उलटी झाली आणि नंतर ते बेशुद्ध पडले. पंधरा मिनिटें ते बेशुद्धच आहेत. "

हा निरोप ऐकतांच गांधीजी वर्ध्यास जाण्यास तत्काळ निघाले. बरोबर बिर्लाहि निघाले. मोटारींत बसतां बसतां गांधीजींच्या तोंडून एवढेच शब्द बाहेर पडले, " भेट न झाली तर अनर्थ होईल ! "

आणि अनर्थ झालाच ! बापूजी पोचण्यापूर्वींच त्यांच्या लाडक्या जमनालालजींनीं इहलोक सोडला होता !

पंधरा मिनिटांत एकाएकीं सारा खेळ आटोपला! जीवनाचा व्यापार अकस्मात् बंद पडला! कोणाला कल्पना नव्हती, इतक्या तांतडीनें मृत्यु जमनालालजींना घेऊन गेला! ता. ११ फेब्रुवारी १९४२ चा तो पवित्र दिवस! तो दिवस बुधवार माघ शुद्ध एकादशीचा—पितामह भीष्मांच्या निर्याणाचा!

आदले दिवशींच जमनालालजी हास्यविनोद करीत होते. चीनचे नेते चँग कै शेक वर्ध्यास येणार होते, तेव्हां त्यांची बडदास्त कशी ठेवावयाची या योजनेंत ते गर्क होते. थट्टेनें ते महादेवभाईना म्हणाले होते, "माझ्याकडून गांधीजी गोसेवेचें काम घेऊं इच्छितात, पण हीं अशीं नवीं नवीं कामें येतच राहतात."

"आपण तर जगांतील एका महापुरुषालाच आपले पाहुणे बनविलें आहे ना? मग पाहुण्यांची रीघ लागणारच." महादेवभाईनीं उत्तर दिलें.

"एक बडा पाहुणा पुरेसा नाहीं का? आतां मी गोपुरीलाच जाऊन राहतों." जमनालालजी म्हणाले.

"गोपुरीला खुशाल जा. पण चिनी पाहुणा येतांच गोपुरी सोडून जानकीपुरीला यावें लागेल." महादेवभाईनीं कोटि केली.

त्या कोटीला कोटि म्हणून जमनालालजी म्हणाले, "आतां गोपुरी-सुद्धां जानकीपुरी बनली आहे. कारण जानकीदेवी तेथें येऊन बसली आहे ना?" असें म्हणून जमनालालजी मोठ्यानें हंसले. आध्यात्मिक आनंदाचा लोट त्यांच्या मुखांतून हास्याचे रूपानें सदैव बाहेर पडे.

तेंच मुक्त हास्य! तेंच मोकळें बोलणें! तीच कामाची लगबग! ता. ११ डिसेंबर १९४२ चा दिवस उजाडला, आणि जमनालालजींचा सेवामय नित्य-क्रम सुरू झाला. कोणाला कल्पना नाहीं कीं, त्यांच्या जीवन-सूर्याला दुपारीं ग्रहण लागणार आहे?

दुपार झाली. तीन वाजले. जमनालालजींचा रक्तदाब एकदम

कमी झाला--२५० वरून १२५ वर उतरला. त्यामुळें ते बेशुद्ध पडले. त्यावर डॉक्टरांनीं एक औषध देण्याचें योजलें. तें आणण्यासाठीं मोटार पाठविली गेली. परंतु ती परत येण्यापूर्वींच काळाचा रथ आला. आणि जमनालालजींना स्वर्गी घेऊन गेला !

गांधीजींची भेट होऊं शकली नाहीं. वय अवघें ५२ वर्षांचें—प्रकृति चांगली--सतत सेवाकार्य चालू असलेलें--अशा स्थितींत जमनालालजी इतक्या लवकर जातील असें कोणाच्याहि स्वप्नीं नव्हतें. त्यामुळें त्यांच्या मृत्यूच्या वार्तेनें सर्वांच्या हृदयावर एकदम आघातच झाला! त्यांच्या मृत्यूची वार्ता ज्यांनीं ज्यांनीं ऐकली, ते एकदम स्तब्ध झाले. वर्धा शहरांत सर्वत्र हरताळ पडला, आणि सेवा-ग्रामामधील नानाविध संस्थांच्या तर नाड्याच एकदम आंखडल्या.

जमानालालजींची इच्छा अशी होती कीं, आपला देह पडेल तेव्हां त्याचें दहन गोपुरीच्या पवित्र परिसरांत व्हावें. कारण ते आपल्या समग्र जीवनाला एक पावन यज्ञच मानीत. प्रपंच असो, राजकारण असो, विधायक कार्यें असोत, धार्मिक कृत्यें असोत,—सर्व कांहीं यज्ञरूपच त्यांना वाटे. गीतेंत सांगितल्याप्रमाणें,

“ **सर्वाणींद्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे ।**
**आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते ॥** ”

ज्ञानानें प्रज्वलित झालेल्या आत्मसंयमरूपी योगाच्या अग्नींत ते आपलीं इंद्रियांची व प्राणाचीं सर्व कर्में हवन करीत. ऋषियज्ञ, देवयज्ञ, भूतयज्ञ, मनुष्ययज्ञ व पितृयज्ञ हे पंच महायज्ञ नित्य आचरण्याचा ते प्रयत्न करीत. लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं, जानकीदेवींनीं गांधीजींजवळ लेखन शिकण्यास सुरुवात केली, तेव्हां गांधीजींनीं त्यांना जे शब्द लिहावयास घातले आणि पुढें दुरुस्त केलें, ते या पंचमहायज्ञाचेच होते. त्यांनीं दुरुस्त केलेला तो पंचमहायज्ञाचा कागद आजहि उपलब्ध आहे.

अशा यज्ञामध्यें आहुति दिलेल्या जमनालालजींच्या देहाचें दहन गोपुरी येथें संध्याकाळचे वेळीं झालें. त्या वेळीं हजारों लोक दुःखानें अश्रु ढाळीत होते. गांधीजी, विनोबाजी, जमनालालजींची ८० वर्षांची वृद्ध माता, पत्नी जानकीदेवी इत्यादि सर्व कुटुंबीय शोकमग्न होते. कुष्ठ रोगानें जर्जर झालेले परचुरेशास्त्रीसुद्धां आपल्या रुग्णशय्येवरून उठून सेवा-ग्रामाहून गोपुरीला पायीं आले होते. सर्व जातीचे लोक तेथें जमले होते आणि 'रघुपति राघव राजाराम' गंभीर स्वरांत म्हणत होते.

संध्याकाळ झाली. विनोबांनीं आणि शास्त्रीजींनीं मंत्र म्हटले. अम्तुल सलाम् हिनें कुराणांतील 'आयते' म्हटले. काळोख दाटला. चितेला अग्नि दिला. पिवळसर—लालसर ज्वाला आकाशांत उंच उठल्या. जमनालालजींचें सेवा-पूत शरीर भस्मसात् झालें.

विनोबांनीं समग्र ईशोपनिषद् म्हटलें. शोकावर पावित्र्याचें आवरण चढलें. नंतर गीतेचा नववा अध्याय त्यांच्या मुखांतून निघाला. त्यानंतर तुकारामाचा एक अभंग—आणि शेवटीं "वैष्णव जन तो तेने कहीये."

नंतर परचुरेशास्त्री यांनीं वैदिक मंत्र म्हटले व त्यांचा अर्थ सांगितला, तो असा—"जी ज्योति जमनालालजींच्या जीवितामध्यें तेवत होती, ती आतां विश्व-ज्योतीमध्यें समाविष्ट झाली आहे. मातीचें शरीर मातीस मिळून गेलें, पण त्यांतील शाश्वत तत्त्व मात्र आतां विश्वात्मक बनलें."

जमनालालजींच्या वृद्ध मातेचें सांत्वन गांधीजींनीं केलें; आणि पत्नीचें ?

जानकीदेवी तर दुःखानें वेड्याच झाल्या होत्या आणि म्हणत होत्या, "त्यांच्याबरोबर मी सती जाणार!" त्यांना सतीचें पुण्य जोडण्याची लालसा लहानपणापासून वाटे. त्यांना आवरणें—समजावणें फार कठीण, पण गांधीजींनीं निश्चयात्मक शब्दांत त्यांना सल्ला दिला—

"असें सती गेल्यानें लोक आपली पूजा करतील असें समजूं नका; उलट निंदा होईल. शक्य तर योगाग्निमध्यें आपलें शरीर जाळून तुम्हांला सती जातां येईल. त्याला कोण अडविणार? पण तें शक्य नाहीं. म्हणून मी तुम्हांला सांगतों, जमनालालजींच्या पश्चात्, जोगीण बनून, तुम्ही त्यांचीं सारीं कार्यें पार पाडा. सती जाण्याचा हाच खरा मार्ग."

हा सुविचार जानकीदेवींना पटला. गांधीजींनीं त्यांना स्वच्छ बजावलें, "तुम्ही आपलें सारें धन कृष्णार्पण करा व स्वतः भिकारी बना. मुलांनीं खाऊं घातलें तर खा, नाहींतर माझ्याजवळ या, आणि माझ्या भिक्षान्नामध्यें भागीदार व्हा. यापुढील सर्व जीवन जमनालालजींचीं कार्यें पूर्ण करण्यासाठीं खर्च करा. यापुढील तुमचें सारें जीवन स्वतःचें नाहीं—जमनालालजींचें आहे. यापुढें शोक करण्यालाहि तुम्हांला अवकाश नाहीं."

गांधीजींच्या मार्गदर्शनानें, विनोबाजींच्या गुरूपदेशानें व जमनालालजींच्या सहवासानें जानकीदेवींची मनोवृत्ति सर्वस्व-दानाला व सेवाभावाला सिद्ध झालेलीच होती. त्यांनीं आपल्या शरीराची आहुति सेवा-यज्ञांत कणाकणानें देण्याचें योजलें. स्त्री-सुलभ असा दागिन्यांचा मोह तर त्यांनीं पूर्वींच सोडला होता. सौभाग्यालंकाराशिवाय आपल्या अंगावरील सर्व अलंकार त्यांनीं पूर्वींच उतरले होते.

गोसेवेसाठीं दोन-अडीच लाख रुपयांच्या संपत्तीवर त्यांनीं संतोषानें पाणी सोडलें. पुढें मुलें आपला संभाळ करोत वा न करोत, त्यांची चिंता न करतां, त्या निष्कांचन बनल्या—बैरागी बनल्या.

▲

ता. ११ फेब्रुवारीची रात्र. जमनालालजींचा आत्मा स्वर्गीं जाऊन शांत झाला. त्यांचे प्रियजन आपापल्या घरीं जाऊन झोपीं गेले. पण हा

एक विरागी सबंध रात्रभर जागत राहिला. निमिषभरहि निद्रा त्याला आली नाहीं.

बावीस वर्षांतील, निकट सहवासांतील, नानाविध प्रसंग त्याच्या स्मरण-चक्षूपुढें एकसारखे येत गेले.

" बापू, मला आपल्या देवदासाप्रमाणें आपला पुत्र माना. " भक्तीनें गद्‌गद्‌लेले स्वर गांधीजींच्या कानांत घुमूं लागले. तेव्हांपासून गांधीजींच्या प्रत्येक कार्यांचा भार जमनालालजींनीं उचलला होता. ज्यांत जमनालालजी नाहींत असें गांधीजींचें बहुधा एकहि कार्य नसेल. त्यांच्या सर्व कार्यांची कामधेनु म्हणजे जमनालालजी. कांहीं काम पडलें कीं ते म्हणत, जमनालालजींना बोलवा.कांहीं अडचण आली कीं, ते म्हणत, जमनालालजींना बोलवा. " अशा जमनालालजींच्या मृत्यूचें दुःख मला कसें होणार नाहीं ? " गांधीजी हळहळले. त्यांच्यावर मोठाच आघात झाला ! पण ते वैष्णवजन होते—स्थितप्रज्ञ होते.

तिसरे दिवशीं दुपारीं गांधीजींनीं जमनालालजींच्या सर्व कुटुंबीयांना एकत्र बोलाविलें, आणि प्रत्येकाला भावी कर्तव्याचा उपदेश केला. ज्येष्ठ पुत्र कमलनयन संयुक्त प्रदेशांतून तेथें तिसरे दिवशीं येऊन पोचले. त्यांना उद्देशून गांधीजी म्हणाले, " हिंदुधर्माप्रमाणें ज्येष्ठ पुत्र हा आपल्या कुलधर्माचा संरक्षक होतो आणि आपल्या पित्याची नीति पुढें चालवितो.तुला व्यापारांत पडावयाचें असेल तर पड; धन कमवायचें असेल तर कमव. मात्र तुझी सारी कमाई जमनालालजींप्रमाणें धार्मिक स्वरूपाची असली पाहिजे. एवढेंच नव्हे तर, जमनालालजींप्रमाणें, तूंहि लोकांच्या हितासाठीं आपल्या संपत्तीचा 'संरक्षक' बनला पाहिजेस. आपल्या कमाईचा पैसा आपल्यासाठीं खर्च करावयाचा नाहीं, तर लोकसेवेसाठीं, असें केलें तरच तुझें ट्रस्टीपण सार्थकीं लागेल. "

धाकटा मुलगा रामकृष्ण याच्या पाठीवरून हात फिरवून गांधीजी

म्हणाले, " तूं आपलें सारें जीवन सेवेसाठीं समर्पित कर. शुभ संकल्प केला म्हणजे तो सिद्धीस नेण्याची शक्ति ईश्वर देत असतो. "

जमनालालजींचे पुतणे राधाकृष्ण यालाहि त्यांनीं गोसेवेला वाहून घेण्यास सुचविलें.आणि जमनालालजींच्या तिन्ही मुलींना उद्देशून गांधीजी म्हणाले, " तुम्हीहि हीं सारीं कामें करावयाचीं आहेत हें लक्षांत ठेवा. जमनालालजींप्रमाणेंच तुम्ही सेवा करण्यास शिका आणि आपली सारी संपत्ति कृष्णार्पण करा. "

▲

जमनालालजींच्या निधनानें गांधीजींना मनस्वी दुःख झालें. पुढें १९४२ सालीं महादेवभाई मृत्यु पावले, तेव्हांहि त्यांना असेंच विलक्षण दुःख झालें. त्या वेळीं डॉ.सुशीला नायर यांनीं त्यांना प्रश्न केला "महादेवभाईंच्या मृत्यूनें आपल्यावर सर्वांत मोठा आघात झाला आहे, नाहीं ? "

त्याला उत्तर देतांना गांधीजी म्हणाले, "होय, मगनलाल, जमनालाल व महादेव—यांतील प्रत्येक जण आपापल्या क्षेत्रामध्यें अद्वितीय होते. त्यांची जागा दुसरे कोणीच घेऊं शकणार नाहींत असें मला वाटतें. "

या आपल्या विरह-दुःखाला गांधीजींनीं त्या वेळीं आपल्या लेखांतून व भाषणांतून जी वाचा फोडली, ती अत्यंत हृदयद्रावक आहे. रावणाशीं युद्ध चालू असतांना लक्ष्मण मूर्च्छित पडला, तेव्हां तो मृत झाला असें समजून, श्रीरामानें केलेला करुण विलाप रामायणांत प्रसिद्ध आहे. तसाच जमनालालजींच्या मृत्यूमुळें महात्माजींनीं केलेला हा विलाप हृदय हालविणारा आहे.

'हरिजन-सेवका'च्या ता. १६ फेब्रुवारीच्या अंकांत जो सविस्तर मृत्यु-लेख गांधींजींनीं लिहिला, त्यांत त्यांनीं जमनालालजींचें गुणवर्णन भावनापूर्ण रीतीनें केलें आहे. त्यांत ते म्हणतात,

" राष्ट्रासाठीं त्यांनीं आपलें घर म्हणजे एक धर्मशाळा बनविली होती. माझें असें कोणतेंहि कार्य नव्हतें कीं, ज्यांत त्यांनीं मनापासून

पुरेपूर साहाय्य केलें नाहीं. त्यांचेपाशीं बुद्धीची तीव्रता व व्यवहाराची चतुरता हे दोन्ही गुण होते. धन तर कुबेराच्या भांडारासारखें होतें. त्यांच्या निधनानें वसुंधरेचें रत्न गेलें."

ही राष्ट्रीय हानि झाली, पण गांधीजींची वैयक्तिक हानि केवढी झाली? त्यांची प्रकृति ठीक आहे कीं नाहीं? त्यांचा वेळ कोणी उगाच घेत नाहीं ना? त्यांचीं सारीं कामें व्यवस्थित चाललीं आहेत कीं नाहींत? ही सर्व काळजी जमनालालजी करीत. ते गेल्यानें गांधीजींच्या जीवनांत केवढी पोकळी निर्माण झाली! म्हणून ते कळवळून लिहितात,

"आतां असा दुसरा पुत्र मी कोठून आणूं? असा पुत्र निघून गेल्यामुळें बाप पंगु बनतो. आज माझी तशीच अवस्था झाली आहे. मगनलाल गेल्यावर माझी जी दशा झाली, तीच आज पुनः ईश्वरानें माझी केली. त्यांतहि ईश्वराची कांहीं गुप्त कृपा असेल, माझी आणखीहि परीक्षा करण्याचें त्याचे मनांत असेल. करूं दे तो माझी परीक्षा. तींत उत्तीर्ण होण्याची शक्ति देणारा तोच आहे."

गांधीजींचे हे करुण शब्द म्हणजे त्यांच्या कोमल हृदयाचें रोदन!

पित्यानें पुत्राचें श्राद्ध करावें ही किती शोककारक घटना! पण ती गांधीजींच्या नशिबीं आली. जमनालालजींच्या स्मारकाची सभा त्यांनीं ता० २० फेब्रुवारी रोजीं वर्धा येथील 'नवभारत विद्यालयां'त बोलावली. तिला जमनालालजींचे सुमारें दोनशें सहकारी निमंत्रणानुसार उपस्थित होते. त्यांच्यापुढें गांधीजींनीं जें भाषण केलें, तें म्हणजे त्यांच्या हृदय-मंथनांतील अमृतच होतें.

थोरांची कासाविशीहि किती थोर असते, याचा नमुना, ज्ञानेश्वरांच्या निर्याणानंतर निवृत्तिनाथांनीं काढलेल्या उद्गारांत पाहावयास सांपडतो.

"**आतां ऐसे कोणी सखे नाहीं**" अशी आपली असहाय्यता वर्णन

करून निवृत्तिनाथांनीं ज्ञानदेवाला कडकडून मिठी मारली आणि धन्योद्गार काढले, " अमर्यादा कधीं केली नाहीं येणें. "

गांधीजी महात्मा होते—स्थितप्रज्ञ होते–कर्मयोगी होते, तरी जमनालालजींच्या वियोगानें त्यांचें मन कासावीस झालें. आणि ते त्या मित्रांच्या सभेंत म्हणाले,

"आजच्यासारखा प्रसंग माझ्या आयुष्यांत यापूर्वी कधीं आला नाहीं. आणि पुढेंहि कधीं येणार नाहीं असें मला आज विचार करतांना वाटतें. आजच्या सभेला कोणी अध्यक्ष नाहीं. मी तर अध्यक्ष होऊंच शकत नाहीं. कारण आतां जमनालालजींच्या सर्व कामांचा भार माझ्या खांद्यावर येऊन पडला आहे. हा असह्य बोजा उचलण्याचे कामीं मला आपण मदत करावी अशी आपल्याला प्रार्थना करण्यासाठीं, एखाद्या भिकाऱ्याप्रमाणें, मी आज येथें उभा आहें. मग मी सभापति कसा होईन ?

" भिक्षा–पात्र हातीं घेऊन मी आपल्यासमोर उभा तर आहेच, पण मला धनदौलतीची भीक नको आहे. तशी भीक मीं माझ्या आयुष्यांत पुष्कळ मागितली आहे. गरिबाची कवडी व अमिराचे करोडों रुपये या सर्वांची मला जरुरी आहे. माझ्या मनांत असतें, तर आज मी जमनालालजींच्या सर्व धनिक मित्रांना येथें एकत्र आणलें असतें,आणि त्यांच्यावर दडपण टाकून, त्यांची खुशामत करून, त्यांच्या भावनांना पाझर फोडून त्यांच्या थैल्यांचीं तोंडें खुलीं केलीं असतीं. हा धंदा सर्व आयुष्यभर मी करीत आलों आहे—आणि तो मला चांगला साधलाहि आहे, पण आजचा प्रसंग निराळा आहे.

" तो माझी परीक्षा घेण्यासाठींच माझेकडे आला आणि पुत्र बनून माझ्या कामाचा सारा बोजा उचलूं लागला. आज तो पुत्र निघून गेल्यामुळें साऱ्या कामांचा भार माझ्या शिरावर पडला आहे. तो हलका करण्यासाठीं मीं आपल्याला पाचारलें आहे. जमनालालजींच्या विविध सेवा–कार्यामध्यें जे जे कोणी अंशभागी व साहाय्यक होते, त्यांना

त्यांना मी येथें बोलावलें आहे. एका माणसानें मदत देऊन चालणार नाहीं. सर्वांनीं मिळून हा कामाचा बोजा वांटून घेतला पाहिजे. ”

अशा तळमळीनें, दुःखावेगानें, लीनतेनें पण दृढनिश्चयानें व कार्यैकदृष्टीनें, गांधीजींनीं हें सर्व भाषण केलें आणि जमनालालजींच्या पत्नीनें व मुलामुलींनीं त्यांच्या एकेका कार्यास वाहून घेण्याचें कसें कबूल केलें आहे आणि त्यासाठीं द्रव्य, जमीन, इमारती—किंबहुना सारी ‘बजाजवाडी’ अर्पण करण्याचें औदार्य कसें दाखविलें आहे, हें गांधीजींनीं निवेदन केलें. बाकीच्या कार्यांत जमनालालजींच्या सहकाऱ्यांनीं विशेष भाग घ्यावा, असें आवाहन त्यांनीं केलें.

शेवटीं त्यांनीं सांगितलें कीं, “ रोदन करण्याचा हा समय नाहीं. रडणें हें प्रेमाचें एक लक्षण आहे. पण मी आज त्याचें प्रत्यक्ष कार्यांत रूपांतर करूं इच्छितों. आपल्या मायभूमीला गुलामगिरींतून मुक्त करून तिला स्वातंत्र्याचा लाभ करून देण्यासाठीं आपण आपलें शक्तिसर्वस्व खर्च केलें पाहिजे. निर्बलांची अहिंसा सोडून सबलांची अहिंसा आपण स्वीकारली, तर आपण स्वतंत्र होऊं, अजेय बनूं. हेंच जमनालालजींचें खरें स्मारक. ”

▲

जमनालालजींच्या निधनाबद्दल सर्व देशानें दुःख व्यक्त केलें. कॉंग्रेसचे तर ते एक आधारस्तंभच. तिनें त्याचेविषयीं शोकप्रदर्शक ठराव केला. सर्व देशभर हरताळ पडला. गांवोगांव सभा भरवून विषाद प्रगट करण्यांत आला. मोठमोठ्या पुढाऱ्यांनीं आपापल्या परीनें, आपापल्या अनुभवानुसार, जमनालालजींचें गुणवर्णन केलें.

सरदार वल्लभभाईंनीं लिहिलें कीं, “जमनालालजी तर गेले. त्यांच्याहून अधिक चांगलें मरण दुसरें कोणतें असूं शकेल ? पण म्हण आहे ना ? ‘ शंभर मरावे, पण शंभराचा पालनवाला मरूं नये ! ’ येथें तर शंभराचाच काय, पण अनेकानेक लोकांचा पालनवाला निघून गेला

आहे. आज देशांतील अनेक ठिकाणीं अनेक क्षेत्रांत काम करणारे मूक सेवक गुपचूप अश्रु ढाळीत आहेत. बापूंचा सच्चा पुत्र गेला, जानकीदेवींच्या शिरावरचें छत्र गेलें, कुटुंबाचा संरक्षणकर्ता गेला, देशाचा निष्ठावंत सेवक गेला, काँग्रेसचा एक आधारस्तंभ ढासळला ! अनेक लोकांचा मित्र व अनेक संस्थांचा पोशिंदा निघून गेला. आणि आम्हां लोकांचा तर सख्खा भाऊच गेला. मला तर सारें शून्य-शून्य वाटत आहे. "

जमनालालजींना गुरुस्थानीं असलेले आचार्य विनोबा यांनीं स्थिरचित्तानें त्यांचें गुणगान केलें. त्यांत भावनेचा उमाळा नसला तरी हृदयाचा जिव्हाळा भरपूर आहे. ज्याप्रमाणें एखादा डॉक्टर शरीराची तपासणी करून त्यांतील गुणदोष निर्विकार पद्धतीनें निवेदन करतो, पण तरीहि त्यांत त्याची आस्था, एकाग्रता व ज्ञानपूर्वकता असते, त्याप्रमाणें विनोबाजींचे हे उद्‌गार पूर्ण सत्यनिष्ठ व अंतःकरणाच्या तळापासून निघालेले आहेत. विनोबा म्हणतात,

" गेलीं वीस वर्षे त्यांना सूक्ष्म आत्मनिरीक्षणाची सवय जडलेली होती. पण त्या कालांत मनाची जी उन्नत अवस्था त्यांना प्राप्त झाली नव्हती ती गेल्या तीन महिन्यांत त्यांनीं मोठ्या त्वरेनें मिळविली होती. अलीकडे मी हें पाहात होतों कीं, जमनालालजींच्या मनांत देह-भावनेचा अवशेषहि राहिलेला नव्हता-केवळ सेवाच सेवा भरून राहिली होती. याहून अधिक चांगला मृत्यु तो कोणता ? अखेरच्या क्षणापर्यंत सेवा करीत राहणें ही केवढी भाग्याची गोष्ट आहे ! त्यांचें निधन ही दुःखाची गोष्ट नाहीं—ईर्ष्येची आहे. "

जमनालालजींच्या मनोवृत्तीची मीमांसा विनोबा पुढीलप्रमाणें करतात, " ज्या सेवेचा परिणाम चित्त-शुद्धीमध्यें होतो ती खरी सेवा, असा त्यांचा विश्वास होता. अशा पवित्र अवस्थेमध्यें ज्यांनीं आपलें शरीर सोडलें, त्यांचा मृत्यु झाला असें म्हणतां येत नाहीं; तर त्यांनीं लहानसें

शरीर सोडून समाजरूपी व्यापक देहामध्यें प्रवेश केला असेंच म्हटलें पाहिजे. शरीर हें आत्म्याच्या विकासासाठीं आहे. परंतु ज्यांचा आत्मा महान बनला आहे, त्यांच्या विकासासाठीं मानवदेह लहान पडतो. अशा वेळीं तो महान आत्मा कधीं कधीं आपलें दुर्बल शरीर सोडून देऊन देहरहित अवस्थेंत अधिक सेवा करूं लागतो. जमनालालजींची हीच अवस्था आहे. त्यांच्या मृत्यूनें, त्यांच्या पत्नीचे ठायीं, आपलें सारें जीवन सेवाकार्याला अर्पण करण्याची प्रेरणा उत्पन्न केली. सदेह आत्मा जितका प्रभाव पाडूं शकत नाहीं, तितका विदेह आत्मा पाडूं शकतो. महान विभूति देहत्यागानंतर अधिक बलवान होत असतात. संतांचीं उदाहरणें आपल्यासमोर आहेतच. जीवंतपणीं त्यांचा छळ होतो; पण मृत्यूनंतर समाजाच्या चित्तावर त्यांचा प्रभाव पडतो. अशा संतांच्या मालिके-मध्यें जमनालालजींचें स्थान, छोटेंसं कां होईना, पण महत्त्वाचें आहे."

"संत" अशी पदवी विनोबासारख्या विवेचक गुरूच्या हिशेबी भाषेंतून मिळणें, हें अहोभाग्यच नव्हे काय?

जमनालालजींचा अंत झाला तेव्हां जवाहरलाल दिल्ली येथें होते. संध्याकाळीं एका सभेंत भाषण करण्यासाठीं ते व्यासपीठावर चढत होते. तोंच त्यांना जमनालालजींच्या मृत्यूची बातमी कळली. तिच्या-वर त्यांचा एकदम विश्वासच बसेना. त्यांच्या मनांत आलें, "थोड्याच दिवसांपूर्वीं जमनालालजी आपल्याला भेटले होते, तेव्हां ते जनसेवेचे कार्य उत्साहानें करीत होते. जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठीं त्यांनीं आपलें जीवन समर्पित केलें होतें."

त्यांच्या मृत्यूनें आपली काय अवस्था झाली हें पुढें सांगतांना जवाहरलाल म्हणतात, "या आकस्मिक आघातानें माझ्या हृदयाला मोठी जखम झाली. त्यामुळें त्या सभेमध्यें भाषण करणें मला कठीण गेलें. मी इतर विषयावर बोलत होतों, पण माझें मन वर्ध्यामध्यें होतें. गेल्या २२ वर्षांत सार्वजनिक कार्यामध्यें व घरगुती बाबतींमध्यें त्यांचा–

माझा घनिष्ठ संबंध होता. काँग्रेस कार्यकारिणींमध्यें सर्वांत अधिक काळ सभासद म्हणून राहिलेले बहुधा तेच असावेत. सार्वजनिक व व्यक्तिगत अशा दोन्ही प्रकारच्या गोष्टींमध्यें मी त्यांचा सल्ला व मार्गदर्शन घेत असे. तो एका प्रिय मित्राचा सल्ला यापुढें मिळणार नाहीं, याचें मला दुःख होतें. सार्वजनिक सेवा करणारे राजनीतिज्ञ व लोकप्रिय पुढारी अनेक आहेत. तरीसुद्धां त्यांमध्यें जमनालालजींचें स्थान अजोड होतें. तें त्यांचें स्थान ग्रहण करील, अशी कोणी व्यक्ति डोळ्यापुढें दिसत नाहीं."

डॉ. राजेन्द्रप्रसाद यांना ही वार्ता कळली, तेव्हां त्यांचे डोळ्यांतून घळघळा अश्रु गळाले. त्यांनीं स्वानुभवाचे असे उद्गार काढले, "माझें भाग्य असें कीं, त्यांच्याशीं माझे मोठे घनिष्ठ संबंध निर्माण झाले व ते अखेरपर्यंत कायम टिकले. माझ्याशीं त्यांचे व्यवहार इतके उत्तम होते आणि माझ्यावर त्यांचे इतके उपकार झालेले आहेत कीं, मी त्यांना विसरूं शकत नाहीं. सार्वजनिक कामांत तर त्यांचें सहकार्य होतेंच आणि प्रत्येक प्रसंगीं त्यांचें साहाय्य मला मिळत असे; पण माझ्या स्वतःच्या कामामध्येंहि त्यांनीं नेहमीं मला सख्ख्या भावाप्रमाणें साह्य केलें. केवळ व्यापारी वर्गाचे ते प्रतिनिधि होते असें नव्हे, तर देशांतील सर्व प्रकारच्या लोकांचा विश्वास व प्रेम त्यांनीं आपल्या त्यागानें, देशसेवेनें व सत्यनिष्ठेनें प्राप्त करून घेतलें होतें."

सौ. सरोजिनी नायडू यांनीं त्यांचा असा स्वभाव-विशेष वर्णन केला, "त्यांच्या स्वभावाची मधुरता व दयालुता इतकी होती कीं, त्यामुळें कोणालाहि त्यांचें आकर्षण वाटावें." तसेंच आचार्य काका कालेलकर यांनींहि असें म्हटलें कीं, "त्यांच्या मुद्रेवर प्रेम व आत्मीयता यांच्या भावनेचें जें तेज खेळत असे, तें मी कधींच विसरूं शकणार नाहीं. आत्मीयतेच्या भावनेमुळें, त्यांचें मानवताप्रेमी हृदय, 'हा मोठा-हा

छोटा, हा आपला–हा परका, हा अमीर–हा गरीब, '—असा भेद-भावच मानीत नसे. कार्याची कुशलता असून हृदयाची अशी श्रीमंती क्वचितच पाहावयास मिळते. "

श्री. जाजूजी यांनीं जमनालालजींच्या जीवनाचें समालोचन करून त्याचें सार पुढील यथार्थ शब्दांनीं उकललें, " सत्यानें व्यापार करतांना त्यांना पुष्कळ अडचणी आल्या पण त्यामुळें ते डगमगले नाहींत. सारा व्यवहार न्याय, नीति व शुद्धता या साधनांनींच करावा, यावरच त्यांचा कटाक्ष, तरुण असल्या वेळेपासूनहि, होता. त्यांनीं आपली सर्व साधन–संपत्ति व शक्ति जन–सेवेला पूर्णपणें अर्पण केली होती. त्यांनीं आपल्या देहांतील षड्रिपु जिंकण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न केला आणि अंतःकरणाची शुद्धि साधून जीवनाचा उत्तरोत्तर विकास केला. "

किशोरलाल मश्रूवाला यांनींहि आपल्या सहवासाच्या बळावर जमनालालजींचे विशेष गुण जे सांगितले,ते म्हणजे, "बालाप्रमाणें निष्कपटता, सरलता व आदरवृत्ति. "

राजकुमारी अमृतकुंवर यांनींहि असें लिहिलें, " त्यांचा स्वभाव इतका प्रेममधुर होता कीं, त्यामुळें सर्वांचीं मनें जिंकलीं जात. त्यांचा साधेपणा, नम्रता, नियम–पालनाची शक्ति व निःस्वार्थता–यापासून मी पुष्कळ शिकलें. "

" त्यांचें हृदय समुद्रासारखें विशाल आणि बालकाप्रमाणें सरळ होतें. " अशी प्रशस्ति जमनालालजींची कोणी कोणी केली, तर कोणी अशीहि प्रशंसा केली, " त्यांचें जीवन म्हणजे सेवेचा शांत प्रवाह, निर्भयतेचा निवास, श्रद्धेचें आश्रयस्थान, औदार्याचा अखंड झरा, साधेपणाची पाठशाला, प्रेमाचे निर्मल निकेतन आणि सर्व लोकांचा आधार. "

" कमींत कमी बोलावें आणि अधिकांत अधिक करावें, हा जमनालालजींचा अचल सिद्धान्त होता. त्यांचें मानव–प्रेम अनुपम होतें. त्यांची सरलता व स्पष्टवादिता आश्चर्यजनक होती. त्यांची वीरता

अनुकरणीय होती." हे गौरवाचे उद्‌गार केवळ औपचारिक होते, असें कोण म्हणेल ?

मद्रासचे सत्यमूर्ति यांनीं त्यांच्या "मृदु, मधुर व सुसंस्कृत" स्वभावाचें वर्णन करून असें म्हटलें कीं, "ते व्यापाऱ्यांचे राजे होते आणि कॉंग्रेसचे आधार-स्तंभ होते."

नोबेलवंत शास्त्रज्ञ सर जगदीशचंद्र बोस यांनीं कलकत्त्याहून ता. २१ ऑगस्ट १९२५ रोजीं लिहिलेल्या पत्रांत जमनालालजींचा गौरव पुढील उज्ज्वल शब्दांनीं केला होता—

"ग्रामोद्योगांचें पुनरुज्जीवन करून आपण जी राष्ट्रसेवा भक्तिभावानें करीत आहां, त्याबद्दल मला आपल्याविषयीं किती कौतुक व अभिमान वाटतो, हें मला शब्दांनीं व्यक्त करतां येत नाहीं. कर्तव्याची हांक आली असतांना तिला ओ देण्यासाठीं आपण जास्तींत जास्त त्याग केलेला आहे. आपलें उदाहरण इतरांनीं अनुकरण करण्यासारखेंच आहे."

"धर्मवीर जमनालालजी" या नांवाचा एक लेख महादेवभाई देसाई यांनीं ता. २४ जून १९२३ च्या 'हिंदी नवजीवन' मध्यें लिहिला होता. त्यांत जमनालालजींना 'मृदुल-हृदय' या विशेषणानें त्यांनीं गौरविलें आहे आणि त्यांच्या जीवनाचें समालोचन केलें आहे. शेवटीं त्यांच्या त्यागवृत्तीचें वर्णन करतांना महादेवभाई लिहितात,

"त्यांचे बाबतींत त्याग ही एक मामुली गोष्ट होती. उजव्या हातानें केलेलें दान डाव्या हाताला कळूं न देण्याचें त्यांचें धोरण असे. एका शब्दांत सांगावयाचें तर, त्याग हा त्यांचा धर्म-भाव आहे. या धर्मभावामुळें, एखादे दिवशीं मनुष्यजातीसाठीं ते फकीर बनले, तर त्याचें मला आश्चर्य वाटणार नाहीं."

देशांतील सर्व वृत्तपत्रांनीं जमनालालजींच्या स्मृतीवर पुष्पांजली वाहिली यांत नवल नाहीं. परंतु 'चित्रा' साप्ताहिकानेंहि अशी कबुली

दिली कीं, " धन-दौलतीचा उपभोग घेण्याची वासना त्यांच्या चित्तांत कधीं उत्पन्न झाली नव्हती आणि त्यांच्या मनाला अधिकार-लालसेनें कधीं पछाडलें नव्हतें. "

दुसऱ्या एका मराठी पत्रानें त्यांचें वर्णन असें केलें, " परिस्थितीचा जनक, काँग्रेसचा शूर सैनिक, स्वसंतोषानें स्वसंपत्तीची आहुति देणारा त्यागवीर आणि अनेक नंग्या-भुकेल्या लोकांना मदत करणारा राष्ट्रसंत."

कलकत्त्याच्या ' अमृत बाजार पत्रिकेनें ' लिहिलें, " त्यांनीं प्रसिद्धीची पर्वा कधीं केली नाहीं, पण त्यांच्याहून अधिक भक्तीनें काँग्रेसची सेवा दुसऱ्या कोणीं केली नाहीं. त्यांचें ऐश्वर्य कांहीं कमी नव्हतें, पण त्यांनीं तें सर्व काँग्रेसला अर्पण केलें होतें. धनवान असूनहि त्यांनीं स्वदेशासाठीं श्रमाचें व दुःखाचें जीवन स्वीकारलें होतें. गरिबांसाठीं धनिकांनीं आपल्या संपत्तीचे ट्रस्टी बनावें, या गांधीजींच्या आदर्शाप्रत पोचण्याचा ते प्रयत्न करीत असत. "

जमनालालजींची जीवनांतील आकांक्षा कोणती होती हें त्यांच्या दैनंदिनीवरून स्पष्ट होतें.त्यांनीं तींत एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, " आम्हांला गांधीजींचें उत्तम मार्गदर्शन मिळालें आहे. त्यांनीं दाखविलेल्या मार्गानें आम्हीं निष्काम जनसेवा केली, तर याच जन्मीं आम्हांला मोक्ष मिळेल. आणि तो नाहीं मिळाला तरीहि चिंता नाहीं. अनेक जन्म घेऊन सेवा करीत राहण्यामध्येंहि आनंद आहे. बुद्धि शुद्ध राहिली म्हणजे झालें. "

ही त्यांची आकांक्षा किती प्रमाणांत पूर्ण झाली, हें त्यांच्या समग्र व सर्वांगीण चरित्रावरून स्पष्ट होतें. त्यावरून त्यांचा जीवन-यज्ञ यथाविधि सांगता पावला,अशीच नोंद इतिहास अभिमानानें करून ठेवील.

समाप्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23303 दि: —
क्रमांक 630 नोंद दि: 901414

# चरित्र-पट

१८८९.... जन्म, ता. ४ नोव्हेंबर रोजीं; काशीकावास येथें.

१८९४.... बच्छराजजींना दत्तक म्हणून वर्धा येथें वास्तव्य.

१८९६... शिक्षणास प्रारंभ—१९०० मध्यें शाळेस रामराम.

१९०२... विवाह.

१९०७... बच्छराजजींना त्यागपत्र-बच्छराजजींचा मृत्यु.

१९०८... ऑनररी मॅजिस्ट्रेट.

१९१५... म. गांधींचा सहवास.

१९१७... 'रायबहादुर' ही पदवी सरकारनें दिली.

१९२०... नागपूर काँग्रेसचे स्वागताध्यक्ष-काँग्रेसचे खजिनदार.

१९२१... असहकारितेच्या चळवळींत भाग घेतला. वर्धा येथें सत्याग्रहाश्रमाची स्थापना. तेथें विनोबाजींचें आगमन.
'रायबहादूर' ही पदवी सरकारला परत केली.

१९२३... नागपूरच्या झेंडा-सत्याग्रहाचें पुढारीपण-१॥ वर्ष कैद व ३००० रु. दंड.
'गांधी-सेवा-संघाची' स्थापना.

१९२४... नागपूर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष.

१९२५... अ. भा. चरखा संघाचे खजिनदार.
'सस्ता साहित्य-मंडळा'ची स्थापना.

१९२७... चरखा संघाचे अध्यक्ष.

१९२८.... वर्धा येथील 'लक्ष्मीनारायण मंदिर' हरिजनांना खोलले.

१९३०... मिठाचा सत्याग्रह–विलेपार्लें छावणीचें प्रमुखत्व.
सत्याग्रहांत २ वर्षांची शिक्षा.

१९३१... कर्नाटक प्रांतीय काँग्रेस परिषदेचे अध्यक्ष.

१९३४... गांधीजींचें वर्धा येथें वास्तव्य.
बिहार-भूकंप-साहाय्यक समितीचें कार्य.

१९३६...आपल्या मालकीचें शेगांव गांधीजींना दान, त्या 'सेवाग्रामांत' गांधीजींचें वास्तव्य.

१९३७... मद्रास येथील हिंदी साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष.

१९३८... जयपूर राज्यप्रजा मंडळाचे अध्यक्ष.

१९३९... जयपूर संस्थानांत सत्याग्रह व स्थानबद्धता.

१९४१... युद्धविरोधी प्रचाराबद्दल शिक्षा.

१९४२... वर्धा येथें गोसेवा संघाची स्थापना.
निधन, वर्धा येथें, ता. ११ फेब्रुवारी रोजीं.

8029

REFBK-0009821